सुभाषित आणि विनोद.

लेखक—

नरसिंह चिंतामण केळकर,

बी. ए., एल्. एल्. बी., संपादक "मराठा", पुणें.

मुंबई,

कर्नाटक छापखान्यांत छापिला.

१९०८.

प्रस्तावना.

सुमारें दहा वर्षांपूर्वी एका स्नेह्याचा व माझा वादविवाद चालला असतां सहज ' विनोद विनोद ह्मणतां, पण विनोद ह्मणजे तरी काय? करा पाहूं त्याची व्याख्या!' असें एकजण दुसऱ्यास ह्मणाला; व या व्याख्येवर पुन्हा वादविवाद होऊन दोघांनाही अखेर असें कबूल करावें लागलें कीं, विनोदाची व्याख्या बसल्या बसल्या करणें सोपें नाहीं. हा वादविवाद लक्षांत ठसला असल्या कारणानें पुढें कांहीं दिवस असें होऊं लागलें कीं ज्या ज्या प्रसंगीं हंसूं येई त्या त्या प्रसंगीं "मीं कां हसलों? हंसू येण्याचें या ठिकाणीं कारण कोणतें? येथें विनोदस्वरूप कशानें सिद्ध झालें?" असा प्रश्न आपोआप मनामध्यें उत्पन्न व्हावा. यामुळें या विषयावर संस्कृतांत व इंग्रजींत काय काय लिहिलेलें आहे हें पाहण्याची इच्छा झाली. या दोन वाङ्मयांत, विशेषतः इंग्रजीमध्यें, हास्य व विनोद यांवर बऱ्याच ग्रंथकारांनीं लिहिलेलें आहे; तथापि तें वाचूनही विनोद शब्दाची व्याख्या ठरविणें खरोखरच फार कठीण असून तिजवर एकमत होणें शक्य नाहीं असें आढळून आलें. परंतु समर्पक व्याख्या न मिळाली तरी या विषयासंबंधी विचारांचे अनेक नवीन मार्ग आढळून आले. व या मार्गांपैकीं कित्येकांचे दृष्टीनें सदरहू विषयाची चर्चा प्रस्तुतचे निबंधांत करण्याचा प्रयत्न मीं केला आहे.

हल्लींच्या निबंधांत या विषयाचें विवेचन संपूर्ण झालेलें नाहीं. तथापि त्या विवेचनाचा पहिला हप्ता ह्मणून हा निबंध प्रसिद्ध केलेला आहे. व टीकाकारांकडून या विषयावर थोडी बहुत चर्चा होईल तर त्याच्या विचारांचे आणखीही नवीन मार्ग आढळून येतील असा भरंवसा आहे.

पुणें,
१५ माहे मे १९०८

न० चिं० केळकर.

अर्पणपत्रिका

हा लहानसा निबंध माझे विनोदी मित्र व ग्रंथकार

रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांस

अर्पण केला आहे.

न. चिं. केळकर.

सुभाषित आणि विनोद.

:ooo:

तमोगुणविनाशिनी सकलकालमुद्योतिनी
धरातलविहारिणी जडसमाजविद्वेषिणी ।
कलानिधिसहायिनी लसदलोलसौदामिनी
मदंतरवलंबिनी भवतु कापि कादंबिनी ॥

[१] वाणी ही मनुष्यास ईश्वराची सर्वोत्कृष्ट देणगी आहे. बहुधा इच्याच योगानें मनुष्यमात्र व इतर सर्व चराचर विश्व यांजमधील फरक पडतो. मनुष्याचा सर्व ऐहिक किंवा पारमार्थिक व्यवहार चालण्यास वाणी हेंच मुख्य साधन होय. "विचित्रो यस्य विन्यासो विदधाति जगत्पटं"—ज्याच्या विचित्र रचनेमुळें हा सर्व जगत्पट तयार होतो असा सूक्ष्म 'वाक्तत्त्वतंतु,' असें जें वाणीचें वर्णन कवींनीं केलेलें आहे, तें यथार्थ नाहीं असें कोण ह्मणेल ? वेदान्तांत 'वाक्' व 'ब्रह्म' हे शब्द समानार्थकतेनें योजण्यांत आलेले आहेत, व ग्रीक भाषेंतील Logos (वाक्) हा शब्दही ईश्वरवाचक आहे.

[२] ही ईश्वर-स्वरूप वाणी मनुष्याच्या मनांतील विचार व अंतःकरणांतील भाव व्यक्त करण्यास उपयोगी पडते. आजपर्यंत जगांत झालेला ज्ञानप्रसार व सौख्यवृद्धि हीं सर्व वाणीचींच फळें होत. ज्ञानाची वृद्धि जसजशी होत जाते व अंतःकरणाचा विकास जसजसा होऊं लागतो, तसतशी वाणीस अधिकाधिक रमणीयता येत जाते; व जसजशी रमणीयता अधिक तसतशी तिची कार्यसाधकताही अधिक, असें मनुष्यमात्राच्या अनुभवास आजपर्यंत येत गेलें आहे. वाणी ही एक शक्ति असल्यामुळें, जसा तिचा सदुपयोग तसाच तिचा दुरुपयोगही मनुष्यमात्रांनी पूर्वीं केलेला आहे व अद्यापिही ते करीत आहेत; परंतु प्रस्तुत आपल्यास त्या दुरुपयोगासंबंधी विचार कर्तव्य नसून, सदुपयोगास साधनीभूत अशा वाणीच्या रमणीयतेचें महत्त्व व गौरव दाखवून त्या रमणीयतेची फक्त एका अंगापुरती मीमांसा करावयाची आहे. हें अंग ह्मणजे 'सुभाषित व विनोद' हें होय.

[३] मनुष्य पुण्यशील असो अगर पापी असो, सद्गुणी असो अगर दुर्गुणी असो, शहाणा असो अगर मूर्ख असो, रमणीय वाणी उच्चारण्याचा त्याचा आमरण प्रयत्न चालूं असतो. या प्रयत्नांत सर्वांस सारखें यश येत नाहीं, व हें यश सारखें नाहीं ह्मणूनच जगांत विषमता उरलेली आहे. तथापि सर्वांचा प्रयत्न मात्र या कामीं एकसारखाच चालू असतो ही गोष्ट निर्विवाद आहे. रमणीय वाणी बोलावयास येत असतां तद्व्यतिरिक्त प्रकारची वाणी बोलण्याची कोणीही कधीं इच्छा करीत नाहीं. आपल्या वाणीस रमणीयता असेल तर ती वाढविण्याचीच त्याची इच्छा असते, व त्या मार्गानें त्याचा सतत प्रयत्नही चाललेला असतो. या रमणीयतेचा विचार करणारें शास्त्र प्रत्येक भाषेंत आहे. भाषेच्या रमणीयतेस तिच्या शुद्धतेची अपेक्षा असतेच असें नाहीं. व यामुळें भाषेच्या शुद्धाशुद्धतेचा विचार करणारें जें व्याकरणशास्त्र तें या दृष्टीनें पाहतां साहित्यशास्त्रापेक्षां कमी महत्त्वाचें ठरतें.

प्रस्तुत आह्मांस साहित्यशास्त्राचा सांगोपांग विचार करावयाचा नाहीं, फक्त शब्दार्थाच्या रमणीयत्वाचा विचार करितांना त्या शास्त्राचा जितका निर्देश अगर उपयोग करणें जरूर पडेल तितकाच आह्मी करणार आहों.

[४] सुभाषित व विनोद यांतच वाणीच्या रमणीय अशा अंगाचा मुख्य संग्रह असतो. सर्व देशांच्या वाङ्मयांतून सुभाषितास अगर विनोद वचनांस तेंच विवक्षित स्थान मिळेल हें अर्थातच शक्य नाहीं. कारण सुभाषित व विनोद हा विषय निरनिराळ्या लोकांच्या दृष्टीनें निरनिराळ्या स्वरूपाचा भासेल. इंग्रजी वाङ्मयांत याचा अंतर्भाव (Rhetoric) या शास्त्राखालीं होतो व संस्कृतांत साहित्यशास्त्रांत होतो. इंग्रजी साहित्यशास्त्रांत Wit किंवा Humour यास स्वतंत्र असें स्थान नाहीं. त्याचप्रमाणें संस्कृत साहित्यशास्त्रांतही सुभाषित किंवा विनोद हा पदार्थ पृथक्पणानें मानलेला नसून त्यास स्वतंत्र असें स्थान नाहीं. तथापि आपणास Wit & Humour किंवा 'सुभाषित व विनोद' याची जी कल्पना आलेली आहे तिजवरून इंग्रजी व संस्कृत साहित्यशास्त्र पाहत गेलें असतां त्यांतील कोणत्या पोटभेदांत किंवा वर्गांत ही जोडी स्थापित करितां येईल हें कळण्यासारखें आहे. तरी प्रथमतः इंग्रजी साहित्यशास्त्राविषयीं लिहून नंतर संस्कृत साहित्यशास्त्राकडे वळूं.

(५) इंग्रजींतील बहुधा सर्व साहित्यशास्त्र ग्रीक तत्त्ववेत्ता आरिस्टाटल याचे साहित्यशास्त्राला धरून आहे. आरिस्टाटलच्या साहित्यशास्त्राचें भाषांतर व पृथक्करण मूळारंभीं Hobbes हाब्स या तत्त्ववेत्त्यानें केलें. व त्यानंतर आर्चबिशप व्हेटले व प्रो. बेन यांनींही या विषयावर ग्रंथ लिहिलेले आहेत. हॉब्सच्या मताप्रमाणें मनुष्यवाणीच्या परिणामांतून चार शास्त्रें उद्भवतात. पैकीं पहिलें काव्यशास्त्र (Poetics), दुसरें वक्तृत्वशास्त्र (Rhetorics), तिसरें तर्कशास्त्र (Logic), व चवथें व्यवहारशास्त्र (Science of Justice). काव्याचा हेतु प्रतिष्ठा वाढविणें किंवा प्रतिष्ठा कमी करणें (Magnifying or Vilifying) हा होय; Rhetorics किंवा वक्तृत्वशास्त्राचा हेतु दुसऱ्याचें मन वळविणें किंवा परानुनय करणें हा आहे; तर्कशास्त्राचा हेतु तर्क प्रतिपादन करणें व सत्यसिद्धांत ठरविणें हा होय; व व्यवहारशास्त्राचा हेतु विधिनियमांचे योगानें मनुष्यमात्राचे व्यवहारास मदत करणें, ह्मणजे न्यायाची प्रवृत्ति व अन्यायाचा निरोध करणें हा होय. पैकीं वक्तृत्वशास्त्रासंबंधानें पाहतां आरिस्टाटलच्या मताप्रमाणें त्याचा उपयोग मुख्यतः चार प्रकारचा आहे. एक कुतर्कांची दुरुस्ती करणें, दुसरा शिक्षण देणें, तिसरा व्यंग्यार्थ सुचविणें, व चवथा वादविवादांत आत्मरक्षण करणें. हे चारही उपयोग परानुनय करण्याचे कामीं घडून येतात. यामुळें आरिस्टाटलनें वक्तृत्वशास्त्राची व्याख्या "The faculty of discerning in every case the available means of persuasion" ह्मणजे 'कोणत्याही विवक्षित प्रसंगीं, सर्व परिस्थिति ध्यानांत आणून, परानुनयाचें कार्य घडवून आणण्यास किंवा सिद्ध करण्यास आपणाजवळच्या साधनसामुग्रीपैकीं कोणतीं साधनें उपयोगी पडतील हें जाणण्याची शक्ति—' अशी केलेली आहे. याच तत्त्ववेत्त्याचे मताप्रमाणें वक्तृत्व हें तीन प्रकारचें असतें. एक Deliberative ह्मणजे विवादात्मक, दुसरें Epideictic किंवा Ornamental ह्मणजे अलंकारिक, व तिसरें

Forensic ह्मणजे न्यायविषयक. ज्यास आपण सुभाषित किंवा विनोदवचन असें ह्मणूं तें आरिस्टाटलच्या काव्यशास्त्राखालीं पडत नाहीं, तर वक्तृत्वशास्त्राखालीं ह्मणजे Epideictic किंवा अलंकारशास्त्राखालीं पडतें; व त्याचें विवेचन त्यानें याच पोटभागांत केलेलें आहे. Diction ह्मणजे शब्दरचना किंवा शब्दप्रयोगपद्धति. शब्दप्रयोगाचे गुण त्याचे मताप्रमाणें विशदपणा, औचित्य वगैरे असून, क्लिष्टत्व, समासप्रचुरत्व व अप्रसिद्धत्व व अप्रयोजकत्व हे त्यानें दोष गणले आहेत. पद्य व गद्य ह्मणजे नियमबद्ध किंवा नियमरहित शब्दरचना. यांचा विचार शब्दरचना किंवा भाषाप्रयोगपद्धति याखालींच त्यानें केला आहे. उपमा व रूपक हे मुख्य अलंकार असे त्यानें गणिलेले असून, पुढें Vivacity ह्मणजे भाषणाची प्रफुल्लता अगर तेजस्विता या सदराखालीं ज्यास आपण सुभाषित व विनोद ह्मणूं त्याचा समावेश त्यानें केलेला आहे. Smart sayings किंवा चटकदार शब्दप्रबंध असाही एक स्वतंत्र वर्ग त्यानें याच ठिकाणीं नमूद केलेला आहे. परन्तु 'चटकदार शब्दप्रबंधा'चे लक्षणांत हास्यरसाचा त्यानें उल्लेख स्पष्टपणें केलेला नाहीं. आपल्या इकडील रसव्यवस्थेप्रमाणें ग्रीक भाषेंतील काव्यशास्त्रांत किंवा वक्तृत्वशास्त्रांतहीं 'रसा'चा विचार केलेला नाहीं. वक्तृत्व सुफल होण्यास प्रमेयरूप सिद्धांताची सत्यता, ऐकणाराची अनुकूल मनःस्थिति, व बोलणाराचें चातुर्य किंवा त्याची प्रसन्न मनःस्थिति, या तीन गोष्टींची अपेक्षा असते. पैकीं बोलणाराचे मनःस्थितीचा विचार करितांना मनोविकारांचा विचार आरिस्टाटलनें केलेला आहे. परंतु मनोविकार हे ज्यांचे स्थायीभाव आहेत अशा रसांस आपल्याइकडे जितकें महत्त्व दिलेलें आहे, तितकें महत्त्व त्यांस आरिस्टाटलनें दिलेलें नाहीं. हें 'चटकदार शब्दप्रबंध' लोक फार वाखाणतात, ते अनुभविक व चतुर मनुष्यांनीं रचलेले असतात, व मुख्यतः साधर्म्य, वैधर्म्य व विशद स्वभाववर्णन इत्यादिकांमुळें ते उत्पन्न होतात, असें त्याचें मत आहे. ज्यांचें स्वरूप आपलें सुभाषित व विनोद यांच्या जवळ जवळ आहे, त्या चटकदार शब्दप्रबंधास हास्यरस अवश्य आहे असें तो ह्मणत नाहीं. मात्र अर्थचमत्कृति अवश्य आहे असें बहुधा त्याचें मत असावें असें दिसतें. 'चमत्कृतिजनक रूपक' या नांवाचा एक विशिष्ट प्रकार आरिस्टाटल यास फार आवडता असून 'पूर्वीं दिसून न आलेलें असें आनंददायक साम्य हुडकून काढणें' असें त्या प्रकाराचें त्यानें वर्णन दिलेलें आहे. तथापि अशा चमत्कारिक व आनंददायक शब्दप्रयोगापासून हास्यरसोत्पत्ति बहुधा झालीच पाहिजे, व हा प्रकार निःसंशयें करून इंग्रजींतील wit किंवा मराठींतील 'कोटि' याचीच प्रतिकृति होय, असें ह्मणण्यास फारशी हरकत दिसत नाहीं.

(६) प्रो० बेन यांचा ग्रंथ वक्तृत्वशास्त्रावर आहे असें ह्मणण्यापेक्षां मुख्यतः लेखनकलेसंबंधानें आहे असें ह्मटलें तरी चालेल. त्याच्या ग्रंथांत शब्दांचा अनुक्रम कसा असावा, शब्दसंख्या अधिक असावी कीं कमी असावी, वाक्य कसें असावें, त्यास तालबद्धता कशी येते, कमीजास्त जोर कोठें कोठें द्यावा, वाक्यांत अर्थैक्य कसें आणावें, वगैरे गोष्टींचा विचार करून नंतर भाषेंतील अलंकार त्यानें सविस्तर रीतीनें वर्णन केलेले आहेत. या सर्व प्रकरणांत आपल्या इकडच्या 'रसांचा' विचार कोठेंच केलेला नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्याची बहुधा सर्व भिस्त अर्थचमत्कृति किंवा अलंकार

याजवरच आहे. त्यानें निरनिराळ्या तत्त्वांना अनुसरून अलंकारांचे निरनिराळे वर्ग केलेले आहेत. हीं तत्त्वें ह्मणजे बुद्धितत्त्व, व भाव किंवा मनोविकारतत्त्व, हीं होत. बुद्धितत्त्वावरून बनलेल्या अलंकारांत 'साधर्म्या'वर व 'वैधर्म्या'वर अवलंबून राहणारे अलंकार, असा मुख्य पोटभेद केला आहे. व अलंकारांनंतर, भाषापद्धतीचे गुण कोणते हें सांगितलेलें आहे. तात्पर्य, या ग्रंथांतही wit व humour यास विवक्षित स्वतंत्र असें स्थान नाहीं. अलंकाराचे अर्थचमत्कृतीमुळें निरनिराळ्या स्थितींत कदाचित् हास्यरसोत्पत्ति होईल हें सांगावयास नकोच, व जेथें ती होईल तेथें तो शब्दप्रबंध Witty किंवा Humourous ह्मणजे सुभाषिताचे अथवा विनोदवचनाचे स्वरूपाचा असेल. Epigram हा प्रकार बेननें स्वतंत्र सांगितलेला आहे परन्तु Wit व Humour याची व्याप्ति Epigram याचे व्याप्तीपेक्षां फार मोठी आहे हें उघड आहे.

(७) इंग्रजी भाषेंतील वक्तृत्वशास्त्राची ही जी माहिती सांगितली ती देण्याचा मुख्य हेतु सुभाषितास व विनोदास या शास्त्रांत साधारणतः कोठेंसें स्थान मिळेल हें स्थूलमानानें पाहतां यावें हा होय. Wit व Humour यांस वरील ग्रंथांतून जरी स्वतंत्र असें स्थान दिलेलें नाहीं तरी या दोन वस्तूंचा स्वतंत्र विचार इतर कांहीं आंग्ल ग्रंथकारांनीं केलेला आहे. हे ग्रंथकार Addison, ॲडिसन Leigh Hunt (ले हंट), Hazlit (हाझलिट), Sydney Smith (सिडने स्मिथ) वगैरे होत. या ग्रंथकारांनीं Wit व Humour या मध्यें सरीस भेद केलेला आहे असें दिसून येत नाहीं, व रूढीमुळें 'कोटि', 'चतुरालाप' व 'विनोद वचन' या सर्व प्रकारांस त्यांनीं कोठें कोठें Wit and Humour या जोड सदराखालींही घातलेलें आहे. याचें कारण हास्यरसोत्पत्ति हें तत्त्व दोघांनाहीं साधारण आहे हें असावें असें दिसतें. तथापि Wit व Humour हीं दोन्हीही मिळून जरी एकच विषय आहे तरी ते स्वभावतः दोन भिन्न पदार्थ आहेत. व त्यांच्या लक्षणांत फरक आहे, असें वरील ग्रंथकारांनीं मानिलें होतें यांत संशय नाहीं. ॲडिसनच्या Six papers on Wit या लेखांत Wit किंवा कोटि हाच मुख्य विषय ह्मणून धरलेला असून पद्धतशीरपणानें Wit व Humour यांचें त्यांत पृथक् विवेचन नाहीं; तथापि Wit व Humour हे पदार्थ एकच न मानतां एक दुसऱ्याहून भिन्न असून दोघांचें परस्पर कांहीं विवक्षित नातें आहे असें त्यानें दाखविलें आहे. मात्र ते बहुधा परस्परांवर अवलंबून असतात असें त्याचें मत आहे. Humour वरील आपल्या निबंधांत त्यानें खालीलप्रमाणें वंशावळ दिलेली आहेः—

"*Truth* was the founder of the family and the father of *good sense*. *Good sense* was the father of *Wit* who married a lady of a collateral line called *Mirth*, by whom he had issue *Humour*. *Humour* being the youngest of this illustrious family and descended from parents of such various dispositions is very various and unequal in his temper. Sometimes you see him putting on grave looks and a solemn habit, sometimes airy in his behaviour and fantastic in his dress, in so much that at different times he appears as serious as a

Judge and as jocular as a Merry Andrew. But as he has a great deal of the mother in him, whatever mood he is in, he never fails to make his company laugh."

याचा अर्थ असा कीं " या महानुभाव घराण्याचा मूळ पुरुष ' सत्य ' हा आहे. 'सत्या' स 'शोभनार्थ' नांवाचा मुलगा झाला. व त्यास पुढें 'कोटी' हा पुत्र झाला. ' कोटी ' नें आपल्याच वंशांतील ' आनंदा ' नांवाच्या मुलीशीं लग्न केलें; व या दंपत्यापासून ' विनोद ' हें पुत्ररत्न झालें. ' विनोद ' हा निरनिराळ्या स्वभावांच्या मातापितरांपासून उत्पन्न झाल्यामुळें त्याचा स्वतःचा स्वभावही तऱ्हेवाईक बनला आहे. केव्हां तो दिसण्यांत गंभीर, तर केव्हां चंचल व विलासी असा दिसतो. परंतु एकंदरीनें त्याच्यामध्यें त्याच्या आईचाच स्वभाव अधिक उतरला असल्यामुळें, तो कोणत्याही प्रकारच्या चित्तवृत्तींत असला तरी दुसऱ्यांस सपाटून हांसविल्याशिवाय सोडीत नाहीं." या छोटेखानी कादंबरीचें तात्पर्य इतकेंच कीं, ॲडिसनच्या मताप्रमाणें wit 'कोटी' मध्यें सत्य व प्रौढ असा अर्थ असला पाहिजे. ती निवळ बाष्कळपणाची असूं नये. कोटीमध्यें आनंदीपणाची भर पडली ह्मणजे अस्सल विनोद तयार होतो, व कोटीच्या स्थितींत जें ' हास्य ' स्मित असतें, तें विनोदाच्या स्थितींत प्रगट व खळखळून सोडविणारें हास्य असें होतें. हाच अर्थ त्यानें इतरत्रही खालीलप्रमाणें व्यक्त केला आहे. तो ह्मणतो.—"If humour would pass for the offspring of wit without mirth, or mirth without wit, you may conclude it altogether spurious and a cheat." ह्मणजे जेथें जेथें आनंद किंवा गंमत अगर मौज आणि कोटि यांचा मिलाफ होत नाहीं, तेथें तेथें तो विनोद अगदीं खोटा असें समजावें. तसेंच "True wit is that which can be translated in different languages; if it bears the test you may pronounce it true, but if it vanishes in the experiment you may conclude it to be a pun." ह्मणजे " खरी कोटी अशी असते कीं, तिचें भाषांतर परभाषांतून होऊं शकतें; भाषांतर करतांना जर तिचें स्वारस्य कमी होईल तर ती कोटि नसून फक्त शब्दश्लेष असें मानावें, " असा नियम ॲडिसन यानें घातलेला आहे. यावरून त्याचें मत अर्थचमत्कृति हाच ' कोटी ' चा मुख्य घटक असावा असें उघड होतें. त्याची wit ची व्याख्या अशी आहे:—"Wit is the resemblance or contrast of ideas that give the reader *delight* and *surprise*, especially the latter" ह्मणजे ज्याचे योगानें ऐकणारास किंवा वाचणारास आनंद किंवा मौज व चमत्कृति, व त्यांतल्या त्यांत विशेषतः चमत्कृतीच वाटेल—असें जें पदार्थांमधील संबंधदर्शन त्यास कोटि ह्मणावें. ॲडिसनचे पूर्वी कवि ड्रायडन (Dryden) यानें wit ची ह्मणजे कोटीची व्याख्या 'Propriety of word and thought adapted to the subject.' ह्मणजे " विषयपरत्वें विचाराचें व भाषाप्रयोगाचें औचित्य " अशी केली होती. परंतु ही ॲडिसननें खोडून काढली आहे त्याचें ह्मणणें असें कीं ड्रायडनच्या या व्याख्येप्रमाणें जर कोटी ह्मणजे नुसतें " औचित्य " तर मग युक्लिडचे सिद्धांत ह्मणजे एक "कोट्यां" चें भांडागारच ह्मणावें लागेल. कारण विषयाचे मानानें पाहतां भूमितीचे पुस्तकांतील युक्लिडची भाषा विषयास जितकी उचित आहे तितकी दुसरी कोणचीही आहेसें वाटत नाहीं.

ले हंटचे मताप्रमाणें, "साधर्म्य अगर विरोध दाखविण्याचे हेतूनें विषम कल्पना अर्थाअर्थी संबंध नसतां एके ठिकाणीं जवळजवळ मांडणें" याचें नांव कोटि (Wit). ज्याप्रमाणें परस्परांस शत्रूप्रमाणें मानणाऱ्या मनुष्यांची एकत्र अवचित गांठ पडली असतां, खटका उडेल असें वाटत असून, अखेर त्यांचा सलोखाच व्हावा; त्याप्रमाणें, कोटीचे योगानें विषम कल्पना एकत्र येऊन धडकतात, परंतु परिणामीं त्यांची एकवाक्यता होते. कोटिबाज मनुष्याचे भाषणानें असंबद्ध पदार्थांची संबद्धता दृष्टीस पडते; व एका पदार्थावरून दुसऱ्या पदार्थावर, अंधेरांत सूर्यकिरण एकदम पडल्याप्रमाणें, उजेड पडतो. अशा विषम कल्पना एकत्र आल्यानें मनावर दुःखकारक आघात न होतां त्याचे योगानें उलट गंमतच वाटते. मात्र ज्याप्रमाणें लग्नाला एक वधु व एक वर अशीं दोन माणसें लागतात, त्याचप्रमाणें 'कोटि' सिद्ध होण्यास निदान दोन कल्पनाविषय लागतात. व हा विषम कल्पनांचा प्रीतिसंबंध जितका अधिक सुखी, तितकें त्यांपासून उत्पन्न होणारें विनोदात्मक अपत्यही अधिक गोड असेंच निपजतें. (Wit is the arbitrary juxtaposition of dissimilar ideas for some lively purpose of assimilation or contrast, generally of both. It is the clash and reconcilement of incongruities, the meeting of extremes round a corner, the flashing of an artificial light from one object to another, disclosing some unexpected resemblance or connection. It is the detection of likeness in unlikeness, of sympathy in antipathy, or of extreme points of antipathies themselves made friends by the very merriment of introduction. Two ideas are as necessary to Wit as couples are to marriage, and the mind is happy in proportion to the agreeableness of the offspring.") ले हंटचे मताप्रमाणें विनोदी मनुष्य त्याला ह्मणावें, कीं ज्याच्या मनाची प्रवृत्ति थोडीशी एककल्ली असते, किंवा ज्याचे विचार व मनोभाव दोन्हीही सरळ व अपेक्षित अशा मार्गानें न जातां ज्या दिशेनें आनंद किंवा मौज वाटेल अशाच दिशेकडे वळतात; ह्मणजे उद्देश्य तेंच, परंतु तिकडे जातांना टपालाच्या घोड्याप्रमाणें तडक न जातां रमत गमत व गंमत करीत जातात. अर्थात् हेतूची हानि यत्किंचितही न होतां मार्गाचे आक्रमणापासून त्रास नव्हे तर उलट सुखच होतें. ज्याप्रमाणें कोटीचा विषय पदार्थांची असंबद्धता हा आहे, त्याप्रमाणें विनोदाचा विषय मानवी स्वभाव व परिस्थिति यांच्यासंबंधी जी असंबद्धता ती होय. या दोन वस्तु जितक्या अधिक असंबद्धतादर्शक, तितका विनोद अधिक सरस. (Humour is a tendency of mind to run into particular directions of thought and feeling, more amusing than accountable. The more the incongruities the better, but two at any rate are as necessary to humour as two ideas are to Wit; and the more strikingly they differ yet harmonise, the more amusing the result *e. g.* *love and war; the gullible and manly; the acci-

*संस्कृत साहित्यशास्त्राप्रमाणें, या प्रत्येक असंबद्ध जोडीस हास्यरसाचा निरनिराळा विभाव किंवा उत्पत्तिकारण असें ह्मणतां येईल.

dental and permanent; the objectionable and the agreeable; flat and sharp witted; honesty and knavery; pretention and non-performance; folly and wisdom; shrewdness and dotishness.) ॲडिसनप्रमाणेंच ले हंट हाही Wit व Humour हे पदार्थ स्वभावतः भिन्नलक्षणात्मक आहेत असें मानितो; व ॲडिसनप्रमाणेंच, त्या दोहोंचा संयोग व मिलाफ झाला असतां दुधांत साखर पडल्याचें श्रेय येतें, असें त्याचें मत आहे. (Wit and Humour are to be found sometimes apart, but their richest effect is produced by their combination. Wit apart from Humour is an element to sport with; in combination with humour it runs into the richest utility and helps to humanise the world.) वुइलिअम हॅझ्लिट नांवाचा एक प्रसिद्ध भाषाविषयक टीकाकार होऊन गेला, त्यानेंही Wit व Humour यांतील भेदाचें निरीक्षण केलें आहे. तो ह्मणतो:- Wit व Humour दोन्हीही हास्यकारक विषयांचा परामर्ष घेतात, परंतु Humourमध्यें त्या हास्यकारक विषयाचें वर्णन स्वभावोक्तीनें केलें जातें; Witमध्यें तेंच वर्णन कांहीं तरी वक्रोक्तीनें केलें जातें; ह्मणजे तें करितांना उपमा, विरोधदर्शन वगैरे प्रकार अमलांत आणावे लागतात. Humour मध्यें जी चमत्कृति असते ती स्वाभाविक असते, परंतु Wit ला एक प्रकारची सुसंस्कृत कल्पनाशक्ति व कलाज्ञान लागतें. (Humour is describing the ludicrous as it is in itself; Wit is the exposing it by comparing or contrasting it with something else. Humour is as it were the growth of natural or acquired absurdities of mankind or of the ludicrous in accidental situation and character; Wit is the illustrating and hightening the sense of that absurdity by some sudden and unexpected likeness or opposition of one thing to another which sets off the thing we laugh at or despise in a still more contemptible or striking point of view). दुसऱ्या एका इंग्रजी ग्रंथकारानें Wit व Humour यांतील भेद खालील वर्णनानें दर्शविला आहे. तो ह्मणतो:-"Wit is the light from heaven that dispels darkness; it is the diamond that needs light in order that it may sparkle. Humour holds the torch and lights up the interior; Wit stands on the threshold and says clever things about what it sees. Humour makes the breach in the otherwise impregnable walls; Wit darts and coruscates all around like willow-of-the-wisp and grows every moment with the spoils which it appropriates. Humour is the child of the imagination; Wit is the darling of the intellect. Humour spreads good temper on every side of it when it takes up its stand in a crowd. All of a sudden Wit springs upon its shoulders and shoots needle-points in the upturned faces. Humour can, however, manage sometimes to put the imp in its pocket."

ह्मणजे:-" विनोद हा सूर्यकिरणाप्रमाणें स्वयंप्रकाशी आहे. 'कोटी' ला हिऱ्याची उपमा

साजेल, कारण ती स्वत: स्वच्छ व सुंदर असते; परंतु तिच्यांतून चमक निघण्यास बाहेरचा प्रकाश तिजवर येऊन पडावा लागतो. ज्याप्रमाणें एखादा बत्तीवाला अंधाऱ्या घराचे तोंडीं उभा राहिला असतां आपणांस घरांतलि सर्व भाग स्वच्छ पाहण्यास सांपडतो, त्याचप्रमाणें विनोदाची गोष्ट आहे; ह्मणजे विनोदाचे मदतीनें मनुष्यस्वभाव किंवा सृष्टिवैचित्र्य हें आपणांस स्पष्टपणें दिसून येतें. परंतु ज्याप्रमाणें घराच्या उंबरठ्यावर, ह्मणजे प्रेक्षक व घरांतील वस्तु यांचे दरम्यान, उभा राहून आंतील एकेक वस्तु पाहून तिचें आपणास चटकदार वर्णन देतो, त्याच प्रकारचें काम 'कोटि' ही करते. अगदीं अभेद्य अशा तटबंदीच्या किल्ल्यावर ज्याप्रमाणें तोफखान्याच्या गोळ्यांचा परिणाम व्हावयाचा, त्याचप्रमाणें विनोदाचे योगानें अगदीं मी मी ह्मणविणाऱ्या अशा गंभीर मनोवृत्तीवर परिणाम होऊन ती आनंदपर बनते. व ज्याप्रमाणें भुताची दिवटी आतां इथें तर मग तिथें अशा रीतीनें नाचून मनास चकवून टाकते, त्याचप्रमाणें कोटिबाज भाषणाचा मनुष्याचे मनावर परिणाम होतो. प्रत्येक क्षणीं कोटीमुळें होणाऱ्या परिणामाचा उपयोग तिचें स्वरूप अधिकाधिक रणमीय करण्याकडेच होतो." इंग्लंडांतील प्रख्यात कोटिबाज 'भटजी' सिडने स्मिथ यानें Witची मीमांसा सविस्तरपणें केलेली आहे. त्याचे मताप्रमाणें कोटीमध्यें चमत्कार किंवा अद्भुतपणा असल्याशिवाय मुळींच चालावयाचें नाहीं; व यामुळें एकदां कोणचीही कोटि ऐकली असतां तीच फिरून ऐकण्यांत कांहीं गमत वाटत नाहीं. तसेंच जी कोटि ह्मणून आहे, तिजमध्यें काव्यास अलंकारभूत असें जें सौंदर्य तें असतां कामा नये; किंवा तींतील प्रमेय, ज्यास आपण साधारणत: उपयुक्त असें ह्मणतों-ह्मणजे ज्याचा परिणाम केवळ आपल्या बुद्धितत्त्वावर होतो, असें असूं नये. बुद्धिमत्तेचा तर कोटींत उपयोग झालाच पाहिजे. परंतु तिचा उपयोग पदार्थांमधील सुंदर किंवा उपयुक्त असे संबंध हुडकण्याकडे न होतां जो संबंध अनपेक्षित, अद्भुत व चमत्कृतिजनक असेल, तोच हुडकून काढण्याकडे झाला पाहिजे.

[८.] आतां सुभाषितास व विनोदास संस्कृत वाङ्मयांत कोणतें स्थान मिळालेलें आहे हें पाहूं. संस्कृतभाषाविषयक शास्त्राचे मुख्य दोन भाग आहेत; एक व्याकरणशास्त्र, व दुसरा साहित्यशास्त्र. संस्कृत भाषेंत इतर भाषांप्रमाणेंच शब्दप्रबन्ध दोन प्रकारचे असतात, एक गद्य व दुसरा पद्य. गद्य ह्मणजे मात्रा, छंद वगैरे संबंधानें ज्यास कांहीं नियम नाहींत तें; पद्य ह्मणजे छंदानुवर्ती शब्दप्रबंध. परंतु गद्य व पद्य हा भेद गौण मानिलेला असून भाषेंतील मुख्य भेद काव्य व अकाव्य (ह्मणजे काव्य नाहीं तें) असा आहे; व साहित्यशास्त्रांत मुख्यत: काव्याविषयींच विचार केलेला आहे. लौकिक समजुतीनें पद्य व काव्य यांची साधारणत: समव्याप्ति आहे असें मानिलेलें असतें. कारण काव्य बहुतेक पद्यांतच संग्रहित आहे. परंतु तात्त्विक दृष्टीनें विचार करितांना पद्य व काव्य यांना पृथक् लेखिलें पाहिजे. कारण संस्कृत साहित्यशास्त्राप्रमाणें काय किंवा इतर कोणत्याही भाषेंतील साहित्यशास्त्राप्रमाणें काय, काव्य ह्मणजे कांहीं विशिष्टगुणयुक्त व सरस शब्दप्रबंध अशी व्याख्या असल्यानें, काव्यांत गद्याचाही समावेश होतो. एखादा शब्दप्रबंध गद्य आहे किंवा पद्य आहे ही विचक्षणा अर्थातच विशेष महत्त्वाची नाहीं; तर तो शब्दप्रबंध सगुण आहे किंवा गुणरहित आहे, सदोष आहे कीं निर्दोष आहे, सरस आहे कीं नीरस आहे, अथवा सालंकार आहे कीं निरलंकार आहे, हीच विचक्षणा विशेष मह-

त्वाची आहे. एखाद्या मनुष्याविषयीं आपल्यास चिकित्सा उत्पन्न होते ती तो डोक्यास पागोटें घालतो कीं टोपी घालतो अशा प्रकारची होत नाहीं; तर त्याच्या आंगचे गुणदोष काय आहेत, तो विद्वान् आहे कीं अविद्वान् आहे, रसिक आहे कीं अरसिक आहे, हें जाणण्याविषयीं होते. साहित्यशास्त्रांतही काव्याचा आत्मा व त्याचे गुणदोष यांचेंच मुख्यत: विवेचन असतें.

[९.] काव्याचे दोन प्रकार आहेत. एक श्राव्यकाव्य व दुसरें दृश्यकाव्य. श्राव्यकाव्य ह्मणजे ऐकण्याचें काव्य, व दृश्य ह्मणजे प्रयोगद्वारें पाहण्याचें. परंतु हा भेदही गद्य व पद्य यांतील भेदाप्रमाणें बहुधा निरर्थक आहे. कारण दृश्यकाव्य झालें तरी तें बहुधा श्राव्य असतेंच. निवळ मुक्या आविर्भावांस किंवा विशिष्टार्थदर्शक शरीररचनेस (Pantomime) काव्य असें ह्मणतां यावयाचें नाहीं; तर श्राव्यकाव्यासच आविर्भावांची मदत झाली असतां तें दृश्य होतें. श्राव्यकाव्यांत महाकाव्य, उपकाव्य, क्षुद्र काव्य, खंडकाव्य, कथा, उदाहरण, चक्रवालक, भोगावली, बिरुदावली, तारावली, विश्वावली, रत्नावली, वगैरे प्रकार असून, दृश्यकाव्यांत प्रकरण, महानाटक, नाटक, भाण, प्रहसन, डिम वगैरे प्रकार आहेत.

[१०.] पण काव्याचे खऱ्या महत्त्वाचे प्रकार झटले ह्मणजे उत्तम, मध्यम, व अधम हे होत. उत्तम काव्यांत व्यंग्यार्थ प्रधान असतो; मध्यम काव्यांत व्यंग्यार्थ गौण असतो; व अधम काव्यांत फक्त शब्दांचा वाच्यार्थच चमत्कृतियुक्त असल्यामुळें प्रधान असतो. काव्याची व्याख्या अनेक प्रकारची आहे. कोणाच्या मतें रस हाच काव्याचा आत्मा असल्यानें ज्यांमध्यें रसाचा उत्तम परिपाक झाला आहे तें खरें काव्य, अशी ते त्याची व्याख्या करितात. दुसऱ्या कित्येकांचे मतानें काव्य ह्मणजे सगुण व निर्दोष असा शब्दप्रबंध होय. पण गुण झाले तरी रसांच्या आंगचे धर्म मानिलेले असल्यामुळें काव्याचा व रसाचाच विशेषत: अवलंबी व अवलंब असा संबंध येतो. अलंकारांशिवायही रसपरिपाक होऊं शकेल, तथापि अलंकारांशिवाय काव्यास अर्थचमत्कृति येऊं शकत नाहीं. जगन्नाथ पंडितांनीं 'रसगंगाधरां'त काव्याची व्याख्या "रमणीयार्थप्रतिपादकः शब्दः काव्यं" अशी केलेली आहे. अलंकारांशिवाय नुसत्या रसपरिपाकानें अर्थ तितका '**रमणीय**' होऊं शकत नाहीं. यास्तव अलंकार हे काव्यास अंगभूत परंतु अत्यावश्य अशी उपाधि होऊन राहिलेली आहे. साहित्यशास्त्रकारांची अलंकारांस गौण मानण्याची रीति पडून गेली आहे इतकेंच काय तें. परंतु, पुष्कळ वेळां खरी विद्वत्ता व रसिकता अलंकाररचनेंतच दिसून येते. अलंकारांशिवाय नुसता रसपरिपाक फारसा हृदयंगम होऊं शकत नाहीं.

[११.] साहित्यशास्त्रकारांचे मताप्रमाणें काव्योत्पत्तीचीं कारणें—

*"शक्तिः निपुणता लोकशास्त्रकाव्याद्यवेक्षणात्।
काव्यज्ञशिक्षयाभ्यासः" ॥

अशीं आहेत. पैकीं शक्ति ह्मणजे कवित्वबीजरूप **संस्कारविशेष.** Poets are born, not made अशी एक इंग्रजींत ह्मण आहे, तिजवरून तरी वरीलच अर्थ निघतो. बुद्धि ही जशी ईश्वरी देणगी आहे तशीच कवित्वशक्ति ही होय. या कवित्वशक्तीस प्रतिभा असें ह्मणतात. प्रतिभेची व्याख्या, "नवनवोन्मेषशालिनी प्रज्ञा"

*मनसि सदा सुसमाधिनि विस्फुरणमनेकधाभिधेयस्य
अक्लिष्टानि पदानि च विभांति यस्यामसौ शक्तिः

काव्यालंकार.

ह्मणजे 'प्रतिक्षणीं विकास पावत जाऊन कल्पना-दृष्टीस नवीन नवीन देखावे दाखविणारी शक्ति' अशी आहे. ही शक्ति अर्थातच ईश्वरी देणगीनें मिळेल, मानवी उपायानें मिळणें शक्य नाहीं. ती पूर्वजन्मींच्या सुकृतसंस्कारानेंच अंगीं येते, व ती अंगीं येण्यास अदृष्ट चांगलें पाहिजे अशी समजूत आहे.

[१२.] काव्यशक्ति अंगांत असूनही प्रत्यक्ष रमणीय अशी कविकृति निपजण्यास खालीलपैकीं एखाद्या फलाची अपेक्षा हा हेतु असावा लागतो, असें साहित्यशास्त्रकारांचें मत आहे. मम्मट या नांवाच्या प्रसिद्ध अलंकारिकानें हीं हेतुविषयीभूत काव्यफलें खालील प्रकारचीं असतात ह्मणून लिहिलें आहे.

काव्यं यशसेऽर्थकृते व्यवहारविदे शिवेतरक्षतये ।
सद्यः परनिर्वृतये कांतासंमिततयोपदशयुजे ॥

या फलांपैकीं व्यवहारविज्ञान व धन हीं लौकिक-फलें व अनर्थनिवारण हें भ्रममूलक फल असें जरी कोणी मानलें तरी—१ यश, २ काव्य-रसास्वादनापासून उत्पन्न होणारा व इतर सर्व ज्ञानविषयाचा क्षणभर लय करणारा असा आनंद, व ३ सरसता उत्पन्न करून मोठ्या गोडीनें दिला जाणारा उपदेश, हीं फलें तरी महत्त्वाचीं अशीं शिल्लक राहतात.

[१३.]अलंकार व गुणदोष यांचे आधीं रसाविषयीं दोन शब्द सांगितले पाहिजेत. अंतःकरणाच्या धर्मांचे विचार व भाव असे दोन भेद आहेत. ज्ञानेंद्रियाचे योगानें झालेल्या अनुभवावरून प्रत्यक्ष, अनुमिति, उपमिति व शाब्द या चार प्रमाणांचे साहाय्यानें बनविलेला जो सिद्धांत, तो विचार होय; व अंतःकरणाची जी सहज व स्वाभाविक वृत्ति तिला भाव असें ह्मणतात. भाव हे आंतर व शारीर असे दोन प्रकारचे आहेत. मनुष्याच्या ठिकाणीं कांहीं आंतरभाव स्थायी ह्मणजे कायमचे व दृढ असतात; व कांहीं फक्त तात्पुरते किंवा अनिश्चल असे असतात. हे स्थायीभाव परिपूर्णतेस किंवा उत्कर्षास गेले ह्मणजे त्यांसच रस असें ह्मणतात. "रसानुकूलविकृतिभावः" अशीही भाव याची व्याख्या केलेली आढळते.* विरुद्ध किंवा अनुकूल यांपैकी कोणच्याही प्रकारच्या इतर भावांनीं स्थायिभावाचा विच्छेद होत नाहीं, एवढेंच नव्हे, तर अशा इतर भावांना, जोंपर्यंत रस कायम आहे तोंपर्यंत, आपल्या मध्येंच त्यांस तो लीन करावयास लावतो. हे स्थायी भाव ह्मणजे प्रीति, हर्ष, शोक, क्रोध, उत्साह, भय, जुगुप्सा, विस्मय व शांति हे होत. व या नऊ स्थायी भावांवर अवलंबून राहणारे नवरस ह्मणजे श्रृंगार, हास्य, करुण, रौद्र, वीर, भयानक, बीभत्स, अद्भुत व शांत हे होत. कित्येकांचे मतें "रसो वै सः" इत्यादि श्रुतिवचनामुळें रस फक्त एकच आहे, व तो फक्त श्रृंगारच असें मानिलें गेलें आहे. कित्यकांचे मतें मुख्य रस चारच आहेत. ह्मणजे श्रृंगार, रौद्र वीर व बीभत्स. भरतनाट्यशास्त्रांत यास खालीलप्रमाणें आधार आहे.

श्रृंगाराद्धि भवेत् हास्यो रौद्राच्च करुणो रसः
वीराच्चैवाद्भुतोत्पत्तिः बीभत्साच्च भयानकः ॥

इतर कित्येकांचे मतानें रस फक्त आठच आहेत; व ते शांतरस मानीत नाहींत. दुसऱ्यांचे मतें वात्सल्य किंवा अपत्यविषयक प्रीति (स्त्रीपुरुष-विषयक नव्हे) हा ज्याचा स्थायीभाव आहे असा ललित नांवाचा दहावा रस मानावा.

विरुद्धैरविरुद्धैर्वा भावैः विच्छिद्यते न यः
आत्मभावं नयत्यन्यान् स्थायीयावाद्रसस्थितिः ॥

* मंदारमरंदचंपू, पान ९१.

(१४) स्थायी भावांशीं भेददर्शक असे व्यभिचारी व सात्त्विक असे दोन प्रकारचे भाव आहेत. पैकीं व्यभिचारी भावांचें लक्षण असें आहे कीं, ते रसास आवश्यक नसून फक्त सहचरीभूत असतात; मात्र ज्या वेळीं ते असतात, त्यावेळीं रसोत्कर्षास मदत करितात. हे व्यभिचारीभाव ३३ आहेत:— निर्वेद, शंका, व्रीडा, असूया, मद, श्रम, आलस्य, दैन्य, आवेग, चिंता, मोह, स्मृति, धृति, हर्ष, चपलता, गर्व, जडता, औत्सुक्य, उग्रता, विषाद, निद्रा, अपस्मार, विबोध, अमर्ष, सुप्ति, अवहित्था, उन्माद, मति, मरण, व्याधि, त्रास, वितर्क. रस उत्पन्न करण्यास नेहमीं कांहीं तरी पुरोगामी प्रत्यक्ष असें कारण लागतें; व या कारणास विभाव असें ह्मणतात. हीं कारणें आलंबनरूप किंवा उद्दीपनरूप असतात. शृंगारांत स्त्रीपुरुष वगैरे आलंबनविभाव होत. तसेंच हास्यांत विदूषक; बहुरूपी, मुर्ख मनुष्य, वगैरे हास्यास्पद पदर्थ हे होत. शृंगारांत उद्दीपनरूप विभाव ह्मणजे, ज्या गोष्टींपासून कामोद्दीपन होतें त्या. उदाहरणार्थ चंद्रोदय, उद्यान, कोकिलशब्द इत्यादि. अनुभाव ह्मणजे रस किंवा स्थायीभाव यांचा संचार झाला असतां मनुष्याकडून जीं कृत्यें होतात तीं. जसें शृंगारांत कटाक्षप्रेक्षण, भुजक्षेप, इत्यादि. हास्यांत हंसणें, टाळ्या वाजविणें वगैरे.

रसानुभवगोचरत्वं नयंति ये
प्रयत्नजा देहधर्माः अनुभावाश्चते मताः ॥

सात्विक भाव ह्मणजे सुखदुःखादि भावांनीं भावित असें जें अंतःकरण त्यापासून उत्पन्न होणारे जे भाव ते. यांत रोमांच, स्वेद, वैवर्ण्य, वेपथु, अश्रु, व वैस्वर्य इतके गणिले जातात.

(१५.) निरनिराळ्या सर्व रसांचे स्थायीभाव, विभाव, अनुभाव व व्यभिचारीभाव यांचीं उदाहरणें देत बसलों असतां विस्तार होईल. परंतु भावांसंबंधानें जातां जातां इतकेंच सांगणें जरूर आहे कीं, एका रसाचे स्थायीभाव दुसऱ्या रसाचे व्यभिचारी भाव होऊं शकतात. व परस्पर अनुकूल अशा रसांत अशा तऱ्हेनें एकमेकांचे स्थायीभाव मिसळले असतां रसोत्कर्ष होतो. शुद्ध रसाचे प्रकार नऊ आहेत. परंतु साहित्य शास्त्रकारांचें मतें कित्येक प्रसंगीं कांहीं विशिष्ट रस एकत्र आले असतां ते परस्पर उत्कर्षास कारणीभूत होतात, व अशा ठिकाणीं रससंकर बहारीचा होतो.

(१६.) कोणता रस कोणत्या रसाशीं विरुद्ध आहे व कोणता उपकारी आहे, ह्मणजे कोणच्या कोणच्या रसांचा संकर झाला तरी चालेल, हें खालील तक्त्यावरून दिसून येईल.

रस.	विरुद्ध रस.	उपकारी रस.
शृंगार.	करुण, बीभत्स, रौद्र वीर, भयानक.	हास्य.
हास्य.	भयानक, करुण.	शृंगार.
करुण.	हास्य, शृंगार,	...
रौद्र	हास्य, शृंगार, भयानक, अद्भुत.	करुण
वीर.	भयानक, शांत.	अद्भुत
भयानक.	शृंगार, वीर, रौद्र, हास्य, शांत	...
बीभत्स.	शृंगार.	भयानक
अद्भुत.	रौद्र	...
शांत.	वीर, शृंगार, रौद्र, हास्य, भयानक.	...

(१७.) रस हा काव्याचा आत्मा मानिलेला आहे, व वरील विवेचनानें वाणीचें एक रमणीय अंग जें काव्य त्याच्या मुख्यांगाचें विवेचन केल्यासारखें झालें. आतां गुणदोष ह्मणजे काय हें थोडक्यांत पाहूं. गुण हे रसाचे धर्म आहेत हें मागें एक ठिकाणीं सांगितलेंच आहे. गुण फक्त तीन प्रकारचे आहेत, ते माधुर्य, ओज व प्रसाद हे होत. ज्या शब्दार्थगुणामुळें अंतःकरण द्रवी-

भूत होतें तो गुण माधुर्य होय. ओजोगुणानें अंतःकरणाचें दीपन होतें. ज्या गुणाचे योगानें शब्दाचा अर्थ सुलभ असा असून तो अंतःकरणास एकदम व्यापून टाकितो किंवा त्यांत भिनतो, तो प्रसाद असें ह्मणतात. कित्येक साहित्यशास्त्रकारांचे मतानें शब्द व अर्थ यांचे मिळून आणखी २१ गुण आहेत. ते गुण ह्मणजे श्लेष, समता, सुकुमारता, अर्थव्यक्ति, उदारत्व, कांति, उदात्तता, सुशाब्दता, प्रेयान्, और्जित्य, विस्तर, समाधि, सूक्ष्मता, गांभीर्य, संक्षेप, भावुकसंमितत्व, प्रौढी, रीति, उक्ति, गति, हे होत. पण त्यांचा समावेश वरील तीन मुख्य गुणांत होत असल्यानें त्यांचा निराळा विचार करावयाचें कारण नाहीं. ज्या पदानें, शब्दानें, अर्थानें, वाक्यानें किंवा अलंकारानें रसहानि होते, तो दोष असें ह्मणतात. हे दोषही अनेक प्रकारचे आहेत; परंतु त्यांचें विवेचन येथें विस्तारानें करण्याचें कारण नाहीं. चांगल्या काव्यांत वरील गुणांपैकीं एखादा ना एखादा गुण ठळकपणानें असलाच पाहिजे, व त्याचप्रमाणें तें या सर्व दोषांपासून अलिप्तही असलें पाहिजे.

(१८.) रसांचे खालोखाल किंवा त्यांचे बरोबरीच्या महत्त्वबुद्धीनें अलंकारांचाही विचार केला पाहिजे. कारण अर्थास जी चमत्कृति येते, ती रसानें येत नाहीं, तर ज्या अलंकाररचनेनें तो अर्थ व्यक्त केलेला असेल त्यामुळें येते. रस हा निवळ द्रव्यरूप आहे, व अलंकार ही त्याजवरील कारागिरी होय. एखादा दागिना करावयाचा झाला तर प्रथमतः उत्तम सुवर्ण पाहिजे खरें, परंतु नुसता सोन्याचा गोळा ह्मणजे कांहीं दागिना नव्हे. तर त्याजवर निरनिराळी नक्षी करावी तेव्हांच त्यास दागिना हें नांव येईल. हेंच उदाहरण रस व अलंकार यांचे परस्पर सापेक्ष महत्त्वासंबंधानें घ्यावयाचें आहे. व जसे एकाच सोन्याच्या गोळ्याचे निरनिराळ्या नकशीनें व कारागिरीनें निरनिराळे दागिने करितां येतील, त्याचप्रमाणें एकच रस उत्पन्न करणारा अर्थ, किंवा तो रस उत्पन्न करणारे शब्द देखील निरनिराळ्या 'अलंकारां'च्या सांच्यांतून ओततां येणें शक्य आहे. अलंकाराची व्याख्या संस्कृत साहित्यशास्त्रांत "ज्याच्या योगानें काव्यास शोभा येते तो" अशी मोघम केलेली आढळते. शब्दाचे अलंकार ८ व अर्थाचे १२० मिळून १२८ अलंकार मानिलेले आहेत. तथापि ही संख्या निश्चित आहे असें नाहीं. शब्दालंकारापेक्षां अर्थालंकार अर्थातच अधिक महत्त्वाचे मानिले जातात. व काव्यास खरी चमत्कृति किंवा खरी शोभा अर्थालंकारानींच येते. या १२० अलंकारांचें वर्गीकरण निरनिराळ्या तत्त्वांचे दृष्टीनें केलें असतां पांच चार प्रकारांनीं होतें. अलंकारांचें मुख्य काम, ह्मटलें ह्मणजे निरनिराळ्या वस्तूंच्या धर्मांचें किंवा स्वरूपाचें साहाय्यानें त्यांतील चमत्कारिक व अकल्पित असे संबंध हुडकून काढणें हें होय. वस्तुजातांतील मुख्य संबंध दोन प्रकारचे असतात. हे संबंध ह्मटले ह्मणजे साधर्म्य व वैधर्म्य; समपणा व विरोध. आणि बहुतेक अलंकार या दोन तत्त्वांचे दृष्टीनें पाहतां साम्यमूलक व विरोधमूलक या दोन मुख्य सदरांखालीं पडतील. परंतु अध्यवसाय, वाक्यन्याय, लोकव्यवहार, तर्कन्याय, रचनावैचित्र्य, अपन्हव, विशेषणवैचित्र्य इत्यादि निरनिराळ्या सूक्ष्म तत्त्वांचे दृष्टीनें पाहतां अलंकारांचें वर्गीकरण निरनिराळ्या रीतींनीं होऊं शकतें. परंतु वस्तुसंबंध कोणत्याही प्रकारचा दाखवावयाचा असला तरी अर्थवैचित्र्य हा अलंकाराचा असा भाग आहे कीं, त्याशिवाय अलंकार शक्यच नाहीं असें ह्मटलें तरी चालणार आहे. हें अर्थवैचित्र्य असाधारण किंवा अद्भुत शब्दार्थयोजनेनें येतें. या अद्भुतशब्दार्थयोजनेचे मुख्य चार प्रकार आहेत; एक पर्यायोक्ति, दुसरा अतिशयोक्ति,

तिसरा अन्योक्ति, व चवथा साम्यविरोधदर्शनोक्ति. सर्व अर्थालंकार बहुधा या चार प्रकारांपैकीं एखाद्या ना एखाद्या प्रकाराखालीं आलेच पाहिजेत.

(१९.) इंग्रजी भाषेंत हास्यरसोत्पादक अशा सर्व शब्दप्रबंधांचा समावेश स्थूलमानानें *Wit* and *Humour* या दोन शब्दांखालीं होतो. Anagram, Epigram, Witticism वगैरे इतर थोडे बहुत शब्द आहेत, परंतु ते विशेषार्थदर्शक असल्यामुळें त्यांचा जातिवाचक अशा नात्यानें उपयोग करितां येत नाहीं. *Wit* and *Humour* हे शब्द जितके रूढ आहेत, तितके इतर कोणतेही नाहींत. संस्कृत भाषेंतील एतद्विषयक शब्द पाहतां ते सुभाषित, सुप्रलाप, सुवचन, [अमरकोश, पहा] सूनृत, सूक्ति, चतुरालाप, विनोदवचन इत्यादि होत. निवळ मराठी शब्द ह्मटला ह्मणजे 'कोटि' हा ह्मणतां येईल. या सर्व शब्दांत सुभाषित हाच शब्द सर्वांत अधिक व्यापक व रूढ आहे. इंग्रजींतील Wit व Humour हे दोन्ही वेगळे वेगळे शब्द आहेत, व त्या दोहोंसही व्यापणारा असा एकच शब्द सांपडत नाहीं. परंतु आपल्या सुभाषित किंवा विनोद या शब्दाखालीं या दोहोंचाही समावेश करितां येईल असें वाटतें. Wit या शब्दाची प्रस्तुत विषयोपयोगी व्याख्या इंग्रजींत खालीलप्रमाणें आहे:—"Felicitous association of objects, not usually connected, so as to produce a pleasant surprise." ह्मणजे "ज्यांचा सकृद्दर्शनीं बहुधा कांहींएक संबंध नाहीं अशा अनेक पदार्थांचा असा समर्पक व मनोरम संबंध जोडून दाखविणें, कीं ज्या संबंदधर्शनापासून मनास चमत्कृति व ह्मणून आनंद किंवा मौज वाटेल." मराठींतील कोटि या शब्दापासून प्रायः हाच बोध होतो. Humour ची व्याख्या अशी आहे:—"That quality of the imagination which gives to ideas an incongruous or fantastic turn and tends to excite laughter or mirth." ह्मणजे जिच्या योगानें विचारास किंवा कल्पनेस असंबद्ध, विकृत किंवा अद्भुत स्वरूप येऊन एकंदर परिणाम हास्यरसोत्पादनपर होतो अशी कल्पनाशक्ति." यास समानार्थक असा आपल्या इकडील शब्द ह्मटला ह्मणजे विनोद हा आहे, व अशा शक्तीपासून उत्पन्न होणारें वचन त्यास विनोदवचन ह्मणतां येईल. अशा रीतीनें खालीलप्रकारचें परिभाषासमीकरण तयार होतें:—

Wit and Humour = सुभाषित.
(हास्यरसोत्पदक शब्दप्रबन्ध)

Humour = विनोद (वचन.)

Wit = कोटि, वैदग्ध्य.

Wit and Humour या दोन शब्दांचें समर्पक व व्यापक भाषांतर ह्मटलें ह्मणजे हास्यरसात्मक शब्दप्रबंध असें होईल. परंतु हा असा प्रयोग अवजड असून रूढही नाहीं; व सुभाषित हा शब्द रूढ असून सुबक व व्यवहारसुकर असा आहे. या परिभाषेची समर्पकता किंवा तिचा उचितपणा पाहावयास प्रथमतः हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं, Wit व Humour या दोहोंचेंही पर्यवसान हास्यरसोत्पत्तिमध्यें आहे. कोटि(Wit) या शब्दाचे व्याख्येंत अनपेक्षित व चमत्कृतिपूर्ण असा अनेक पदार्थांचा संबंध दाखवावा लागतो, व अशा रीतीनें चमत्कृति उत्पन्न झाली असतां हास्यरसोत्पत्ति झालीच पाहिजे, हें पुढें येणाऱ्या हास्याच्या शारीर मीमांसेमध्यें स्पष्टपणें कळून येईलच. Wit किंवा कोटि केली असतां जरी Laughter किंवा 'प्रस्फुटित हास्य' उत्पन्न होणें

अवश्य नसलें, तरी Smile किंवा स्मित तरी उत्पन्न झालेंच पाहिजे. व स्मित हें हास्यरसाचें अंगभूत आहे. Humour किंवा विनोदवचन यामध्यें तर स्फुट हास्यच प्रायः उद्भवतें. तेव्हां त्याचेंही पर्यवसान हास्यरसोत्पत्तीमध्यें आहे हें उघड आहे. Wit व Humour या दोन्ही पदार्थांत हास्यरसोत्पादन हा साधारण धर्म आहे. पण त्या दोहोंचाही समावेश करणारा असा एक शब्द इंग्रजींत मिळत नाहीं. संस्कृतांतील 'विनोद' हा शब्द उभयार्थव्यंजक असा असल्यानें, तो कोटी चतुरालाप, विनोदवचन या सर्वांवर व्याप्ति असणारा, जातिवाचक असा आह्मीं योजिला आहे. Wit व Humour या शब्दांच्या समर्पक व्याख्या इंग्रजी कोशांत दिलेल्या आहेत. परंतु 'सुप्रलाप' 'सुवचन' 'सूक्ति,' 'सुभाषित' 'विनोदवचन' हे संस्कृत शब्द, किंवा मराठींतील 'कोटी' हा शब्द, यांच्या व्याख्या त्या त्या भाषेंत कोठें चांगल्याशा दिलेल्या नाहींत. अशा स्थितींत साधारणपणें रूढार्थ लक्षांत घेऊन, व Wit आणि Humour किंवा हास्यरसोत्पादक वचनांचे स्थूल विभाग लक्षांत आणून केलेल्या परिभाषासमीकरणासंबंधानें मतभेद होण्याचा संभव आहे हें आह्मीं जाणून आहों. तथापि शब्दार्थ जोंपर्यंत निश्चित नाहींत तोंपर्यंत असा मतभेद झाल्यास त्यांत विशेष कांहीं वावगें आहे असें आह्मांस वाटत नाहीं. व एकंदरीनें या विषयाची पुढें केलेली चर्चा जर वाचकवर्गास पसंत पडली तर आह्मीं दिलेल्या समीकरणांतील शब्दार्थही कदाचित् पुढें मागें रूढ होऊन बसतील. व शब्दार्थ रूढ होण्यास तो वाच्यार्थासंनिध व व्यवहारास सुकर असला ह्मणजे नेहमी पुरें होतें.

(२०) सुभाषित, कोटी, विनोदवचन वगैरे गोष्टी ह्या कोणत्याही भाषेंत वाणीस रमणीयता आणण्याचीं मुख्य साधनें आहेत. ह्मणून त्यांपैकीं प्रत्येकाचा आपण थोडाबहुत विचार करूं.

(२१) **सुभाषित** या शब्दाचा यौगिकार्थ पाहिला तर तो—चांगलें भाषण—असा होतो. परंतु 'चांगलें भाषण' यानें निश्चितार्थबोध मुळींच होत नाहीं. रूढार्थाकडे पाहिलें तरी तीच स्थिति आहे. सुभाषित या शब्दाची व्याख्या संस्कृत साहित्यशास्त्रांत केलेली नाहीं; व व्यवहारामध्यें तर तो वाटेल त्या रीतीनें उपयोगांत आणिलेला आहे. परंतु व्यवहारांत शब्दाची ज्या प्रमाणानें व्यापकता अधिक त्या प्रमाणानें त्याचा अर्थबोध कमी, असा सामान्य सिद्धांत आहे. हल्लीं सुभाषित या शब्दाची व्यापकता किती मोठी झाली आहे हें पाहावयाचें असल्यास 'सुभाषितरत्नाकर' किंवा 'सुभाषितरत्नभांडागार' यांसारख्या पुस्तकांत पाहावें ह्मणजे कळेल. सुभाषितरत्नभांडागारांतील संग्रह विपुल आहे. परंतु तो नुसता पद्यांचा संग्रह आहे. त्यांत गद्याचे वेंचे मुळींच नाहींत. व यावरून सुभाषित हें पद्य असलेंच पाहिजे अशी सुभाषितरत्नभांडागारकारांची समजूत होती हें उघड दिसतें. परंतु कोट्या व विनोदवचनें संस्कृत वाङ्मयांतर्गत गद्यांतही बरींच आढळतात, हें संस्कृत वाचकांस माहीत आहेच. लहानसेंच उदाहरण द्यावयाचें झालें तर शाकुंतलांतील विदूषकानें केलेली कोटी घ्या. 'कृतं त्वया उपवनं तपोवनं', ह्मणजे—हे राजा ! हें तपोवन तूं उपवनच करून टाकलेंस—हें सुभाषित असून गद्यांतच आहे. याठिकाणीं तपोवन व उपवन या परस्परभिन्न किंबहुना परस्परविरोधी पदार्थांचा संबंध दुष्यंताचे विलासी कृतीनें जुळवून दाखवून कवीनें चमत्कृति उत्पन्न केलेली आहे.

अशा वचनांचा संग्रह वास्तविक सुभाषितरत्नभांडागारामध्यें व्हावयास पाहिजे. व तो केलेला नाहीं यावरून सुभाषिताच्या अर्थाची कल्पना एका बाजूनें पाहतां अव्याप्तिदोष-

दूषित आहे असें दिसून येईल. दुसरे पक्षीं, सदर भांडागारांत जीं पद्यें दिलेलीं आहेत त्यांवरून ती कल्पना अतिव्याप्तिदूषित आहे असेंही दिसून येतें. कारण हीं पद्यें इतक्या निरनिराळ्या जातींचीं आहेत कीं त्यांवरून सुभाषिताचे व्याख्येस उपयोगी असा कांहीं एक नियम किंवा निर्बंध ठरवितां येणें शक्यच नाहीं. किंबहुना हें भांडागार ह्मणजे गारोड्याची एक पोतडीच आहे असें ह्मटलें तरी चालेल. यामध्यें, परब्रह्मनमन व वर्णन, विशिष्ट देवतांचीं वर्णनें व स्तोत्रें, दशावतारस्तुतिपाठ, निरनिराळ्या शास्त्रांची स्तुति व निंदा, वर्णाश्रमवर्णन, व्यवहारस्तुति, व्यवहारनिंदा, सामान्य व विशिष्ट राजप्रशंसा, राजसभा व त्यांतील घटक यांचीं वर्णनें, नवरसवर्णन, अन्योक्तिकलाप, चित्रकाव्याचीं उदाहरणें, वगैरे शेंकडो विषय आलेले आहेत. व यांतील प्रत्येक पद्य जर सुभाषिताचे लक्षणास पात्र आहे असें ह्मटलें, तर मग सामान्यतः असें कोणतेंही पद्य संस्कृत वाङ्मयांत सांपडणार नाहीं कीं ज्यास सुभाषित हें पद तितक्याच उचितपणानें लावतां येणार नाहीं. आतां केवळ विषयवैचित्र्य अतिशय, एवढ्यावरूनच आमचा हा वरील आक्षेप केलेला नाहीं; कारण अमुक एखादें पद्य सुभाषित होणें किंवा न होणें हें त्यांतील विषयावर अवलंबून नसून त्या पद्याच्या रचनेवर—ह्मणजे त्यांतील अर्थचमत्कृतीवर—अवलंबून आहे. उदाहरणार्थ परब्रह्मासारख्या नीरस किंवा गंभीर विषयाचें वर्णन करावयाचें असतांही तद्वर्णनपर पद्य सुभाषिताचे लक्षणास सर्वथैव योग्य असें एखाद्यास रचितां येईल. दुसरे पक्षीं पाहतां, विषय 'राजयशोवर्णन' किंवा 'मदनचरित्र' असा, ह्मणजे प्रायः सरस व सुभाषितानुकूल असला तरी, तद्वर्णनपर पद्यही अ—सुभाषित या वर्गांत येऊन पडण्यासारखें कोणी रचण्याचा संभव आहे. परंतु आमच्या वरील आक्षेपाचा भावार्थच असा आहे कीं, सुभाषितरत्नभांडागारांत, कसल्याही विषयावर कां पहाना, अशीं अनेक पद्यें आहेत कीं, ज्यामध्यें कसल्याही प्रकारची मुळींच चमत्कृति नाहीं. व यामुळें जर असलीं पद्येंही सुभाषिताखालीं गोंवावयाचीं, तर मग संस्कृतांतील वाटेल तो शब्दप्रबंध सुभाषितामध्यें गणितां येईल.

(२२) खुद्द सुभाषितरत्नभांडागाराची अशी स्थिति असल्यामुळें, ह्मणजे जेथें मुख्य विषयच सुभाषिताचा तेथेंच जर 'सुभाषित' या पदार्थाची कल्पना इतकी अनियामित व अव्यवहारोपयोगी आहे, तर मग संस्कृत भाषेंत इतर ठिकाणीं,—ह्मणजे काव्य, नाटक, कादंबरी, वगैरे प्रबंधांमध्यें—जेथें अगदीं तुरळकपणें या शब्दाचा उपयोग करण्यांत आलेला असेल तेथें सुभाषिताची योग्य व्याप्ति ठरविण्यास कांहीं साधन मिळेल, अशी आशा बाळगण्याचें कारण नाहीं. बाणभट्टाचे 'कादंबरी'त वैशंपायन शुकाचें वर्णन करितांना, "वेदिता गीतश्रुतीनां, काव्यनाटकाख्यायिका प्रभृतीनां अपरिमितानां **सुभाषितानां** अध्येता, स्वयंच कर्ता" असें लिहिलेलें आहे. यावरून काव्य नाटक व आख्यायिका वगैरे सर्व प्रकारच्या रसिक शब्दप्रबंधांस सुभाषित हा शब्द लाविलेला आहे असें दिसतें. तसेंच उज्जयिनींतील पौरजनांचें वर्णन करितांनाही "**सुभाषित-व्यसनी**" ह्मणजे 'सुभाषिताची आवड असणारे' असें वर्णन आहे. तेथेंही त्या शब्दाचा अर्थ वरीलप्रमाणें अतिव्यापकच आहे हें उघड दिसतें. अमरकोशाकडे पाहावें तर त्यांत 'सुभाषित' हा शब्दच मुळीं सांपडत नाहीं. परंतु वाग्वर्गांत "सुप्रलापं सुवचनं" या वचनावर टीका देतांना 'द्वे सुभाषितस्य' ह्मणजे हे दोन शब्द सुभाषिताचे वाचक आहेत, असें टीकाकारानें लिहिलेलें

आहे. परंतु हा नुसता त्याच भाषेंत तर्जुमा झाला; व त्यावरून 'सुभाषित' या शब्दाचा अर्थ निश्चित करितां येणार नाहीं हें उघड आहे. अशी स्थिति होण्यास शब्दाची व्यापकता जितकी अधिक तितका त्याचा खरा अर्थबोध कमी, हाच सिद्धांत कारणीभूत आहे.

(२३) आतां प्रस्तुत पदार्थाची व्याख्या इतर कोणत्या तरी रीतीनें ठरवितां येते किंवा कसें हें पाहूं. ही रीति ह्मणजे पृथक्करणाची. 'सुभाषित' ह्मणावें कशाला—हा प्रश्न खरोखरच फार बिकट आहे. तथापि निरनिराळीं उदाहरणें घेऊन, त्यांतून बहुजनमतानें सुभाषिताचे लक्षणास अयोग्य अशीं जीं दिसतील तीं टाकून, बाकी जीं उरतील त्यांवरून काय दिसतें हें पाहूं. सु—ह्मणजे चांगलें, व चांगलें ह्मणजे सुखोत्पादक किंवा आनंददायक. परंतु मनुष्यास आनंद किंवा सुख हें इतक्या निरनिराळ्या रीतींनीं होऊं शकतें कीं केवळ सुख किंवा आनंद देणारा शब्दप्रबंध ह्मणजे सुभाषित असेंच जर आपण ह्मणूं लागलों तर पुष्कळ वेळां निखालस अप्रयोजकपणा पदरीं बांधून घ्यावा लागेल. मनुष्यास सुख किंवा आनंद मुख्यतः दोन तीन तऱ्हांनीं होऊं शकतो. पैकीं एक प्रकार ह्मटला ह्मणजे मनोविकारांचें समाधान होणें हा. खालीं दिलेल्या प्रकारच्या शब्दप्रबंधांनीं मनोविकारांचें समाधान निःसंशय होतें; परंतु त्यांस सुभाषित असें कोणीही समंजस मनुष्य ह्मणणार नाहीं. ते शब्दप्रबंध अशा प्रकारचेः—आपल्या लहानग्या मुलानें उच्चारलेले बोबडे बोल; यांचे योगानें वत्सलतेच्या भावाची जागृति होऊन समाधान होतें. प्रेमकलहाचे वेळीं स्त्रीपुरुषांनीं परस्परांस दिलेलीं विशेषणें किंवा संबोधनें; यांनीं रतिभाव दीप्त होतो. आपल्या शत्रूस दुसऱ्यानें दिलेली चटकदार शिवी ऐकूनही मनास बरें वाटतें. परीक्षेचा निकाल सांगत असतांना युनिव्हर्सिटीच्या रजिस्ट्रारनें आपलें नांव उच्चारलेलें ऐकून आनंद होतो. हा अनुभव पुष्कळ विद्यार्थ्यांस आहेच. ज्याची आपल्यावर बहाल मर्जी आहे, व ह्मणून ज्याची शिवी ह्मणजे दहापांच रुपये बढतीची बिनचूक खूण आहे, अशा साहेबांनीं दिलेली शिवी ऐकूनही कित्येकांस गोड वाटतें. नवीनच पदवी मिळाली असतां ती लावून उच्चारलेलें आपलें नांव ऐकून फारच आनंद वाटतो, हें युनिव्हर्सिटीच्या पदवीधरांस व सरकारच्या पित्त्यांस माहीत असेलच. शर्यतीवर घोडा पाठविला असतां त्यानें शर्यत जिंकली अशाबद्दलची आलेली तार वाचून, किंवा आपण सोडतींत घेतलेल्या तिकिटास बक्षिस मिळाल्याचें ऐकून, सहजच आनंद होतो. या सर्व उदाहरणांमध्यें अंतःकरणांतील भाव प्रदीप्त होऊन सुख होतें व आनंद वाटतो. परंतु तेवढ्यावरून वरील उदाहरणासंबंधाच्या शब्दप्रबंधांस सुभाषित असें कोणीही समंजस मनुष्य ह्मणणार नाहीं.

(२४) वरील उदाहरणांसंबंधानें कदाचित् कोणी असें ह्मणेल कीं, त्या त्या प्रसंगीं स्वतःच्या हिताचा संबंध असल्यामुळें आनंद अगर सुख होतें. ठीक आहे. तर मग आतां असे शब्दप्रबंध घेऊं कीं ज्यांचा आपल्या हिताहिताशीं अर्थाअर्थीं संबंध नाहीं, परंतु ज्यांच्या योगानें फक्त आपल्या कल्पनाशक्तीवर परिणाम होऊन आनंद किंवा सुख होतें. पण अशा शब्दप्रबंधांस तरी सुभाषित हें नांव देतां येईल कीं काय? वर्तमानपत्रांतून प्रत्यहीं नव्यानव्या बातम्या इतक्या चमत्कारिक प्रसिद्ध होत असतात कीं, त्या वाचून आपल्या कल्पनाशक्तीस फार सुख होतें:—"अ.

मुक अमुक गांवीं एका ह्मशीस चार रेडकें झालीं. तीं सर्व दोन दोन पायांचीं असून प्रत्येकास दोन दोन डोकीं होतीं;" "सुरतेस बारा तासांत १४ इंच पाऊस पडला व रस्त्यांतून हिंडण्यास होड्या घालाव्या लागल्या;" "आपण पिपांत बसून व पिपाचें तोंड बंद करून—क्ष साहेब हा नायगारा नदीच्या धबधब्यांतून पार गेला;" "डेन्मार्कच्या राजाराणीचें खडाजंगीचें भांडण होऊन राजा द्वंद्वयुद्धांत जखमी झाला;" "बोअर लोकांच्या सक्त पहाऱ्यांतून विंस्टन चर्चिल हा अंधाऱ्या रात्रीं पळून गेला." इत्यादि बातम्या ऐकून आपणांस किती तरी गंमत वाटते. परंतु ज्यामध्यें या बातम्या ग्रथित असतात त्या शब्दप्रबंधांस सुभाषित असें कधीं कोणी ह्मणेल काय ?

(२९) जे शब्दप्रबंध कल्पनेला उद्देशून लिहिलेले नसतात, पण ज्यांचा रोंख मनुष्यमात्राच्या बुद्धीकडे असतो अशांपासूनही फार सुख होतें, किंवा आनंद वाटतो. आणि बुद्धिशक्तीच्या समाधानापासून होणारा हा आनंद वर सांगितलेल्या दोन प्रकारच्या आनंदाहून, ह्मणजे आपल्या अंतःकरणांतील भाव किंवा कल्पनाशक्ति यांचे समाधानापासून होणाऱ्या आनंदापेक्षां, अत्यंत श्रेष्ठ आहे. परंतु केवळ ज्ञानप्रद शब्दप्रबंधांस सुभाषित ह्मणतां येईल कीं नाहीं हें खालील उदाहरणांवरून तेव्हांच कळून येईल. 'दोहोंत दोन मिळविले असतां चार होतात' हा अंकगणितशास्त्रांतील एक सिद्धांत आहे. व अंकांचे धर्माचा विचार करणाऱ्या शास्त्राचे दृष्टीनें या सिद्धांतास महत्त्व आहे. किंवा 'शून्यास शून्यानें भागिलें असतां अनियमित संख्या येते' हा सिद्धांत तरी चमत्कार वाटण्यासारखा आहे. किंवा दुसरीं उदाहरणें घ्याः—सूर्याचे पाठीवर डाग आहेत; चंद्रावर लोकवस्ती आहे; ग्रहणें आकाशस्थ गोल व पृथ्वी यांचे परिभ्रमणामुळें होतात;—इत्यादिकामध्यें ज्ञानानंद नाहीं असें कोण ह्मणेल ? तथापि या शब्दप्रबंधांस सुभाषित ह्मणूं लागलों तर मग, केरोपंती अंकगणित, युक्लिडची भूमिति, हॉल व नाईटचें बीजगणित, वगैरे पुस्तकांस सुभाषितसंग्रहच ह्मणावें लागेल. केवळ शास्त्रविषयक असें याहूनही उच्च दर्जाचे ग्रंथ घेतले तरी त्यांचीही गति तीच होणार. कारण हर्षेलचें ज्योतिःशास्त्र, न्यूटनची प्रिंसिपिया, किंवा विद्युत्शास्त्रांतील अद्भुत चमत्कार वर्णन करणारें एखादें पुस्तक, यांपासून बुद्धिशक्तीचें समाधान होऊन आपणांस मौज वाटते व आनंदही होतो. परंतु त्यांतील सिद्धांत प्रतिपादणारीं वाक्यें काढून, 'हीं घ्या सुभाषिताचीं उदाहरणें' असें कोणी ह्मणेल काय ? इतिहासांतही अशींच सत्य प्रमेयें ग्रथित असतात; व तीं सर्व मनुष्यजातीशीं संबद्ध असल्यामुळें, इतिहासवाचनापासून जितका आनंद होतो तितका कदाचित् शास्त्ररहस्यवर्णनें वाचूनही होणार नाहीं. परंतु इतिहासांतील ज्ञानप्रद शब्दप्रबंधांस कोणीही सुभाषित ह्मणणार नाहीं. तीच गोष्ट नीतिबोधप्रद तात्विक ग्रंथांचीही समजावी. वेदान्त ग्रंथ, साक्रेटिसाचीं प्लेटोनें लिहिलेलीं संभाषणें, ख्रिस्तानें पर्वतावरून केलेला बायबलांतील उपदेश, किंवा आपल्या इकडील भारतांतील गीताशास्त्र, किंवा योगवासिष्ठांतील बोधप्रद वेंचे, वगैरेंसही सरसकट सुभाषित ग्रंथ ह्मणतां यावयाचें नाहीं.

(२६) आतां वरील सर्व उदाहरणांसंबधानें असा कोणी आक्षेप काढतील कीं, त्यांतील विषय बोधप्रद, ज्ञानप्रद, किंवा कल्पनाशक्तीस आनंददायक असा होता; परंतु केवळ विषयचमत्कृतीनें कोणताही शब्दप्रबंध सुभाषित होऊं शकणार नाहीं; तो विषय ज्यांचे द्वारें प्रतिपादित केलेला आहे अशा शब्दामध्येंच चमत्कृति पाहिजे. असो; तर

मग आतां निवळ शब्दचमत्कृतींचीं उदाहरणें घेऊन पाहूं. प्रथमतः 'चमत्कृति' याचा अर्थ काय हें पाहिलें पाहिजे. चमत्कृति ह्मणजे एक प्रकारचें विपरीतत्व होय. कारण वस्तु आहे तशीच दिसण्यांत चमत्कृति कांहीं नाहीं. घालवयाचें त्या रीतीनें, ह्मणजे पुढच्या अंगास कोची करून, पागोटें डोक्यास घालून तुह्मीं आह्मीं रोज रस्त्यांतून येतों जातों; परंतु त्याकडे कधीं कोणाचें लक्ष वेधलें आहे काय? परंतु तेंच पागोटें एखादे दिवस उलटें घाला, ह्मणजे कोची पुढें करावयाची ती मागें करा, किंवा पागोट्याचा पदर सुटून मागें जरा लोंबत राहूंद्या, कीं पहा रस्त्यांतील सर्व जाणारायेणारांस चमत्कृति वाटून सर्वांच्या नेत्रप्रहाराचे तुह्मीं विषय होऊन बसाल! तात्पर्य, नित्य क्रमाशीं विरोध किंवा त्याचा विपर्यास हें चमत्कृतीचें मूळ बीज आहे. व या दृष्टीनें निवळ शब्दचमत्कृतीचें साहाय्य झालें असतां सुभाषित हटकून होतें कीं काय हें पाहूं.

(२७) शब्दचमत्कृतीचे प्रकार पुष्कळ आहेत. परंतु आपण अगदीं मूळापासून प्रारंभ करूं. शब्दचमत्कृतीचें सर्वांत साधें उदाहरण ह्मटलें ह्मणजे अक्षरस्खलन होय. आपण नेहमीं अक्षरांचा उच्चार साफ व एका अक्षरास एकच उच्चार असा ऐकतों. यामुळें एखादा मनुष्य बोबडें बोलत असला, ह्मणजे र च्या ठिकाणीं द ह्मणत असला, किंवा अडखळत असून 'माझें' एवढें ह्मणण्याचे ऐवजीं-'म-म-म-म-माझें' इतक्या विस्तारानें बोलत असला, तर हा एक प्रकारचा नित्यक्रमाचा विरोध किंवा विपर्यासच होय. परंतु या चमत्कारिक शब्दप्रबंधास कोणीही सुभाषित ह्मणावयाचा नाहीं. याच्याही पुढें जाऊन अक्षराच्या उलटापालटीचीं उदाहरणें घेऊं. "पिंपळगांवचा शिंपी" ह्मणण्याचे ऐवजीं "शिंपळगांवचा पिंपी" असें ह्मणण्यांत शब्दचमत्कृति आहे; परंतु त्यास सुभाषित ह्मणतां येत नाहीं. तीच गोष्ट खालील उदाहरणांची:—"आप्पाबळवंताचे गेटाजवळ" ह्मणण्याऐवजीं "गेटाबळवंताचे अप्पाजवळ" असें ह्मणणें, किंवा सबंध शब्दांचीच उलटापालट करून "सकाळीं नदीवर स्नानास गेलों होतों, तेथें वाघ आला; मग काय, घामणभट बाबरला आणि नदी (धोतरें) खांद्यावर टाकून धोतरांच्या (नदीच्या) कांठानें पळत पळत चालला' असें ह्मणणें, इत्यादि. परंतु हीं चुकीमुळें होणाऱ्या चमत्कृतीचीं उदाहरणें आहेत असें कोणी ह्मणेल. तर मुद्दाम केलेल्या चमत्कृतीचीं उदाहरणें घेऊं. बोलण्यामध्यें किंवा लिहिण्यामध्यें एकच वर्ण वरचेवर व विशेषतः ठराविक अंतरानें येणें हें नित्य क्रमास विरुद्ध आहे. कारण नेहमींच्या लिहिण्याबोलण्यांत तें घडून येत नाहीं. व ह्मणून एकच वर्ण अशा प्रकारानें येणें यांत चमत्कृति उघड आहे. अशा प्रकारचीं उदाहरणें चित्रकाव्यांत आढळतात. पैकीं पहिलें व सर्वांत साधें उदाहरण ह्मटलें ह्मणजे 'यमकाचें.' यमक याचा अर्थ "अक्षरांची क्रमानें पुनरुक्ति होणें" असा आहे. व चरणाचे शेवटीं येणाऱ्या एका अक्षराच्या पुनरुक्तीपासून यमकाची मजल इतकी वाढली आहे कीं खालीं दिलेल्या उदाहरणांतील प्रसिद्ध आर्येप्रमाणें चरणाचे चरण ही त्याच अक्षरांनीं केलेले आढळतात.

"साधु ह्मणावे ह्मणती नर माधवदास साधु याला जे"
"अतिसारी पट ज्याचे न रमाधव दाससा धुया लाजे॥"

याच्याही पुढची पायरी खालील आर्येंत आहे:—

"अनलस मी हित साधी राया वारा महीवरा कामा"
"अनलस मीहि तसा धीरा याबा रामही वराका मा॥"

एकच वर्ण चरणाचे शेवटीं न येतां मधूनमधून येणें यास "अनुप्रास" ह्मणतात. अनुप्रासांची मजलही कोठवर गेली आहे पाहाः—

कल्पांत क्रूर केलिः क्रतुकदनकरः कुंद कर्पूर कांतिः
क्रीडन् कैलास कूटे कलित कुमुदिनी कामुकः कांतकायः
कंकाल क्रीडनोत्कः कलित कलकलः कालकाली कलत्रः
कालिंदीकालकंठः कलयतु कुशलं कोऽपिकापालिको नः ॥

कित्येक पद्यें तर फक्त दोन तीन अक्षरांचींच केलेलीं असतात. जसें:—

नमामि मा मनोनुन्न मानं मुनि म मानिनं ।
नाना मम ममा नाम मों नामा मुमेन मुम् ॥

किंवाः—

तार तार तरैरेतै रुत्तरोत्तरतो रुतैः ।
रतार्त्ता तित्तिरी रौति तीरे तीरे तरौतरौ ॥

किराताचे पंधराव्या सर्गात एकाच अक्षराचे बाराखडींतून सर्व श्लोक तयार केलेला आढळतोः—

ननु ननुन्नो नुन्नोनो । नानानाना नना ननु ।
नुनो नुन्नो ननुन्नेनो । नानेना नुन्ननुन्ननुत् ॥

परंतु या अशा व्युत्पत्तिज्ञानाचे प्रदर्शनास सुभाषित कोण ह्मणेल ?

(२८) चित्रबंधकाव्यांतही चमत्कृतीचीं उदाहरणें आहेत. आपण नेहमीं बोलतीं किंवा लिहितों तें अमुक एका साच्यांत बसेल असें लिहीत किंवा बोलत नाहीं. दर एक वाक्य अमुक एक इंच लांबीचें बोलावयाचें, किंवा अमक्या आकाराचें बोलावयाचें हा कांहीं नित्य क्रम नाहीं. यास्तव अशा ठराविक लांबीरुंदीचीं व विवक्षित आकृतींत बसण्यास ज्यांचीं अक्षरें सोईचीं आहेत अशीं वाक्यें निःसंशय चमत्कृतिजनक झालींच पाहिजेत. संस्कृत चित्रबंध काव्यांत अशी चमत्कृति उत्पन्न करणारे अनेक बंध किंवा सांचे आहेत. जसें—नाग, पद्म, गज, चक्र, छत्र, चामर, मर्दल, रथ, गोमूत्रिका, चतुरंग, मयूर, क्षीर, हार,—इत्यादि बंध प्रसिद्ध आहेत. हे बंधाचे प्रकार इंग्रजींतही आहेत, व त्यांचीं उदाहरणें अंडबंध, पक्षबंध, कुठारबंध, तमाखुनलिकाबंध, (!) स्थंडिलबंध, वगैरे होत. परंतु या सर्व प्रकारांतील चमत्कृति केवळ शब्दात्मक असून हें काम रिकाम्या वेळेचें व शब्दब्रह्मांतील क्लिष्ट गुह्यें हुडकून काढणाराचें होय. त्यापासून सहृदय मनुष्यास आनंद होण्याचा संभव नाहीं; त्यापासून हास्यरसोत्पत्ति किंवा ज्ञानप्राप्ति वगैरे कांहीं होत नाहीं; आणि त्यास सुभाषितही कोणी ह्मणणार नाहीं.

(२९) आपणास सुभाषित ह्मणावें असा वाद सांगणारे दुसरेही कित्येक शब्दप्रबंध असे आहेत कीं, ज्यांमध्यें निवळ शब्दचमत्कृति आहे असें ह्मणतां यावयाचें नाहीं; व यामुळें ते शब्दप्रबंध सुभाषित नव्हेत असें ठरविण्यास थोडेंसें अवघड पडतें. हे शब्दप्रबंध ह्मणजे समस्यापूरणाचे श्लोक, प्रहेलिका, कूटश्लोक, गुप्तपदश्लोक, मात्राच्युतक, बिंदुच्युतक, अक्षरच्युतक, विसर्गच्युतक, व्यंजनच्युतक, अंतरालाप, बहिरालाप, वगैरे. हे सर्व प्रकार सुभाषिताखालीं येतात अशा समजुतीनें 'सुभाषितरत्नभांडागारा'मध्यें ते दिलेले आहेत. यास्तव त्यांचें एकेक उदाहरण दिलें असतां ते सुभाषिताच्या लक्षणास योग्य आहेत कीं काय हें तेव्हांच कळून येईल.

समस्या—या प्रकारांत श्लोकाचा एक व बहुधा शेवटचा किंवा पहिला चरण दिलेला असतो, व त्यावरून इतर तीन चरण जुळवावयाचे असतात. दिलेल्या चरणांतील अर्थ सकृत् दर्शनीं चमत्कारिक किंवा असंबद्ध दिसतो; परंतु त्याचें समर्थन बाकीच्या चरणांनीं करावयाचें असतें. "मृगात् सिंहः पलायते" हा चरण दिला असतां, मृगाला भिऊन सिंह पळाला, असा विपरीत अर्थ निघतो. परंतु "असमाने समानत्वं

भवता कलहे मम" ह्मणजे 'तुझें माझें भांडण लागलें असतां ज्यांची बरोबरी नाहीं त्यांची बरोबरी केल्यासारखी होईल, व तुझ्याशीं कज्जा करणें हें मलाच अपमानकारक आहे, सबब मीं निघून जातों कसा:—असें सिंहानें ह्मटलें व तो निघून गेला, अशा अर्थाचा चरण जोडला ह्मणजे मग—

असमाने समानत्वं भवता कलहे मम
इतिमत्वा ध्रुवं मानी मृगात् सिंह: पलायते.

ही समस्या पूर्ण झाली. परंतु खुद्द समस्यापूरणक्रियेंत जी चमत्कृति आहे ती कांहीं सुभाषितपर नाहीं. अर्थात् समस्या हें सुभाषित नव्हे. समस्येंत एका चरणांतील अर्थाचें समर्थन करण्यासारखे इतर चरण तयार करावयाचे, इतक्यापुरती नजर असते; व नुसती एवढीच नजर ठेवली, ह्मणजे मग अर्थचमत्कृति साधेल किंवा नाहीं याची शंकाच आहे. उदाहरणार्थ, "राहुर्दिवा ग्रसति पर्वविना किलेंदुं" ह्मणजे "ग्रहण—पर्वकाळ नसतां दिवसा राहूनें चंद्रास ग्रासून टाकलें" असा समस्यापूरणास विषय दिला असतां, खालील तीन चरणांनीं त्या विपरीतार्थाचें समर्थन होऊं शकतें:—

कांचित् दिनार्धसमये रविरश्मितप्तां
नीलं शुकांचलं निलीन मुखेंदु बिंबाम्
तां तादृशीं समनु वीक्ष्य कवि र्जगाद
"राहुर्दिवा ग्रसति पर्वविना किलेंदुं"॥

ह्मणजे, कोणी सुंदर स्त्री भर दोनप्रहरीं चालली असतां सूर्याचे प्रखर किरणांनीं संतप्त झाल्यामुळें तिनें आपलें चंद्रबिंबासारखें मुख आपल्या निळ्या शालूच्या पदरानें झांकून घेतलें. या ठिकाणीं मुख व चंद्र यांच्या नेहमींच्या उपमानोपमेय संबंधदर्शनानें "भर दोन प्रहरीं व पर्वकाळ नसतां राहूनें चंद्रास ग्रासून टाकलें" या विपरीतार्थाचें समर्थन झालें. परंतु तें सुभाषित ह्मणतां येईलसें वाटत नाहीं. समस्येचा श्लोक सुभाषितही होऊं शकेल, नाहीं असें नाहीं; व त्याचें उदाहरण आमच्या मतें खालील होऊं शकेल:—

निजपति: आद्य: प्रणयी हरि: द्वितीय: करोमि किं गोपि
श्रृणु सखि पाणिनिसूत्रं विप्रतिषेधे परं कार्यं ॥

'विप्रतिषेधे परं कार्यं'—या पाणिनीच्या सूत्राचा अर्थ असा आहे कीं, "तुल्यबल विरोध प्राप्त झाला असतां पर ह्मणजे दुसऱ्याचें ग्रहण करावें." जसें, मनस् आणि रथ या दोन शब्दांचा समास करावयाचा असतां मनस् याचें नपुंसक लिंग व रथ या शब्दाचें पुल्लिंग आहे; अशा स्थितींत शेवटचा शब्द जो रथ त्याचें लिंग मनोरथ या सामासिक शब्दास लावावें, हा व्याकरणाचा नियम आहे. हें सूत्र समस्येकरितां दिलें असतां त्याची पूर्णता वरील श्लोकानें होते. एक गोपि दुसऱ्या गोपीस विचारते कीं, हे गोपि, मजवर प्रीति करणारा माझा पति हा तर आहेच; व तसाच पण दुसरा कृष्णही आहे. तेव्हां अशा संकटांत मीं काय करावें बरें? यावर सखीनें सरळ व स्पष्ट उत्तर न देतां तिला फक्त 'विप्रतिषेधेपरं कार्यं' या पाणिनीसूत्राची आठवण दिली. अर्थात् 'पर' ह्मणजे कृष्ण याला मन अर्पण करण्यास सांगितलें. यांत पर्यायोक्ति चांगल्या प्रकारची असून त्यापासून होणारी अर्थचमत्कृति हास्यजनक व विनोदपर आहे. अर्थात हें सुभाषिताचें उदाहरण ह्मणण्यास हरकत नाहीं.

प्रहेलिकेचें उदाहरण खालील श्लोक होय:

एक चक्षु: न काकोयं बिलमिच्छन् न पन्नग:
वर्धते क्षीयते चैव न समुद्रो नच चंद्रमा: ॥

ह्मणजे—"अशी वस्तु कोणची कीं जिला डोळा एकच आहे पण तो कावळा नव्हे; बिळांत घुसण्यास नेहमीं पाहत असते पण तो कांहीं सर्प नव्हे; वाढते व कमी होते पण तो कांहीं समुद्रही नव्हे व चंद्रही नव्हे." याचें उत्तर "सुई"

असें आहे. व तें कां हें तेव्हांच कळून येईल. प्रहेलिका ह्मणजे कोडें; इचें लक्षण 'विदग्धमुखमंडनां'त दिलें आहे तें असें:—"व्यक्तीकृत्य कमप्यर्थं स्वरूपार्थस्य गोपनात्। यत्र बाह्यांतरावर्थौ कथ्येते सा प्रहेलिका॥ ह्मणजे—जेथें आंतला एक व बाहेरचा एक असे दोन अर्थ असतात, परंतु वस्तुस्वरूप गुप्त ठेवण्याकरितां कुठचा तरी एक अर्थ व्यक्त करून दुसरा गुप्त ठेवितात, त्यास 'प्रहेलिका' ह्मणतात. या व्याख्येप्रमाणें पाहिलें असतां, प्रहेलिका मुख्यतः श्लेषात्मक (मग तो श्लेष शब्दश्लेष असो किंवा अर्थश्लेष असो) असते. व त्यामुळें निष्पन्न होणाऱ्या दोन अर्थांपैकीं एक व्यक्त करून एक गुप्त ठेवण्याचा असतो. अर्थात् जेथें निवळ शब्दश्लेष आहे तेथें अर्थचमत्कृति नाहीं, व ह्मणूनच शब्दश्लेषात्मक प्रहेलिका सुभाषित होऊं शकणार नाहीं. प्रहेलिका व कूट प्रश्न यांमध्यें फारसें अंतर नाहीं. सुभाषिताचे लक्षणाखालीं न येणारें असें कूट प्रश्नाचें उदाहरण ह्मटलें ह्मणजे हें:—

द्वंद्वोहं द्विगुरपि चाहं मद्गेहे नित्यमव्ययीभावः
तत्पुरुष कर्मधारय येनाहं स्यां बहुव्रीहिः॥

एका अर्थानें यांत समासांचीं नांवें आलीं आहेत. परंतु श्लोकाचा दुसरा अर्थ असा आहे कीं, मीं द्वंद्व आहें, ह्मणजे घरीं नवरा बायको दोघें जण आहों. द्विगु आहें—ह्मणजे घरीं दोन गायी बाळगल्या आहेत. अव्ययीभाव आहें—ह्मणजे घरीं खर्चायाला कांहीं नाहीं. तर या बायकोच्या व या दोन गाईंच्या पोटाला काय घालूं? तत्पुरुष ह्मणजे हे गृहस्था, दात्या, कर्म धारय—ह्मणजे असें एखादें काम मला सांग, कीं ज्याचेयोगानें बहुव्रीहि होईन, ह्मणजे घरीं धान्यसमृद्धि होईल. कूट प्रश्नाचें मराठींतील उदाहरण पुष्कळांस माहित असेल तें हें:—

"कोणी एक वनीं विचित्र पुतळा जेवावया बैसला।
पात्रीं जेवण जेवितां अतिवळें पात्रेंचि तो भक्षिला॥
त्याची जे वनिता वनांत फिरतां सूर्यास प्रार्थी तदा
बोले विठ्ठल हा पदार्थ उमगा षण्मासिंचा वायदा"॥

वनामध्यें कमलांतील मधु प्राशन करीत असतांच सायंकाळ झाल्यानें कमळ मिटून भ्रमर आंत सांपडला. व कमल उमलून जाईपर्यंत त्याची सुटका होणें शक्य नव्हतें. याकरितां त्याची स्त्री भ्रमरी, प्रकाश पाडून कमल फुलविण्यास व अशा रीतीनें स्वपतीची सुटका करण्यास सूर्याची प्रार्थना करीत होती.

क्रियापद गुप्त—यामध्यें सकृत दर्शनीं क्रियापद गुप्त असतें. परंतु कांहीं संधींचा विग्रह, किंवा समस्त पदांचें पृथक्करण, किंवा शब्दश्लेषाचा खुलासा केला असतां क्रियापद कोठें तरी असतें तें सांपडतें. जसें:—

पंपा सरसि रामेण सस्नेहं सविलासया।
सीतया किं कृतं साधं अत्रैवोत्तर मीक्ष्यतां॥

यामध्यें सस्नेहं असें जें समस्त पद आहे तें श्लिष्ट आहे. व त्याचीं सस्ने हंसविलासया अशीं पदें पाडलीं असतां गुप्त क्रियापद 'सस्ने' हें प्रगट होतें. पंपा सरोवरामध्यें रामानें विलासिनी अशा सीतेसह काय केलें तर 'सस्ने' ह्मणजे स्नान करिता झाला. यामध्यें शब्दश्लेषापेक्षां अधिक गंमत कांहीं एक नाहीं. व ह्मणून हें सुभाषित ह्मणतां येणार नाहीं. कर्तृगुप्त, कर्मगुप्त, करणगुप्त, संप्रदानगुप्त, अपादानगुप्त, संबंधगुप्त, अधिकरणगुप्त, कर्तृक्रियागुप्त, कर्तृकर्मक्रियागुप्त, संधिगुप्त, समासगुप्त, लिंगगुप्त, सुब्वचनगुप्त, तिङ्वचनगुप्त इत्यादि अनेक प्रकारांचीही तीच गति आहे. व ह्मणून आह्मी त्यांचीं या ठिकाणीं उदाहरणेंही देत नाहीं.

मात्राच्युतक—ह्मणजे एकाद्या शब्दांत एखादी मात्रा कमी करतांच त्या शब्दाचा अर्थ बदलतो.

व इतर शब्दांचेही अर्थ नवीन शब्दार्थास अनुसरून पालटतां येतात. जसें:—

तुषारधवल: स्फूर्जन् महामणिधरोऽनघ:
नागराजो जयत्येक: पृथिवीधरणक्षम: ॥

यामध्यें नागराज ह्मणजे शेषाकडे एक अर्थ लागतो. व दुसरे पक्षीं नागराज या शब्दांतील एक मात्रा काढून घेऊन नागराजाचा नगराज ह्मणजे हिमालय केला असतां इतर शब्दांचें वर्णनही हिमालयाकडे लागतें. शेष व हिमालय दोघेही तुषारधवलकांति आहेत. एकाची कांति तुषाराप्रमाणें धवल व दुसऱ्याची तुषारामुळें धवल. एक महामणिधर ह्मणजे मस्तकांत मोठा नागमणि धारण करणारा आहे व दुसरा बहुमूल्य अशीं रत्नें पोटांत (खाणींत) धारण करितो. शेष व हिमालय दोन्हीही पृथ्वीचें धारण करण्यास सारखेच समर्थ आहेत. याच प्रमाणें बिंदुच्युतक वगैरेंची गोष्ट समजावी. त्यांचे स्वरूपांत अर्थचमत्कृति फारशी संभवत नाहीं.

'अंतरालापा' मध्यें पहिल्या तीन ओळींत निरनिराळे प्रश्न विचारलेले असतात, व त्या प्रत्येकाचें उत्तर चवथ्या ओळींत दिलेलें असतें व चवथ्या ओळींतील सर्व उत्तरें एकत्र करून ओळ वाचली असतां तिच्यांतून कांहीं तरी संपूर्ण अर्थ निघतो व तो विपरीत भासतो. परंतु त्या अर्थाचें समर्थन नसतें. जसें:—

का शैलपुत्री किमु नेत्ररम्यं
शुकार्भक: किं कुरुते फलानि ।
मोक्षस्य दाता स्मरणेन को वा
गौरीमुखं चुंबति वासुदेव: ॥

येथें—१ गौरी, २ मुखं, ३ चुंबति, ४ वासुदेव: —हीं उत्तरें असून पृथक् आहेत. त्या शब्दांचा परस्पर कांहीं एक संबध नाहीं. शैलपुत्री कोण ? —तर गौरी. नेत्ररम्य असें काय असतें?—तर मुखं. पोपटाचें लहान पोर फळ पुढें आलें असतां त्याचें काय करतें? तर चुंबन करतें—नुसती चोंच लावतें. कारण, त्याला फळ फोडतां येत नाहीं. व स्मरणमात्रेंकरून मोक्ष कोण देतो? तर वासुदेव. व या अर्थाअर्थीं संबंध नसलेल्या प्रश्नाचीं उत्तरें एकत्र केलीं असतां ' गौरीमुखं चुंबति वासुदेव:' ह्मणजे वासुदेव पार्वतीचें मुख—चुंबन घेतो, असा विपरीत अर्थ निघतो. प्रहेलिकेमध्यें अशा विपरीतार्थाचें समर्थन तरी असतें. तसें समर्थनही या प्रकारामध्यें नाहीं. अर्थात् हा भाषाप्रकार सुभाषित होण्यास मुळींच योग्य नाहीं. हा शब्दचित्रांतील निवळ पोरखेळ दिसतो.

बहिरालापामध्यें चार चरणांत निरनिराळे प्रश्न विचारलेले असतात व त्या सर्वांचें उत्तर एकाच शब्दप्रबंधानें द्यावयाचें असतें. अर्थात् या कामीं श्लेषावर सर्व भिस्त असते व तीही शब्दश्लेषावर; अर्थाचा कांहीं एक संबंध नसतो. जसें,—

समयमिह वदंति कं निशीथं
शमयति कान् वद वारिवाहवृंदं
वितरति जगतां मनस्सु कीदृक्
मुदमतिमात्रमयं महातडाग: ॥

निशीथ कशाला ह्मणतात ? ज्या काळीं सूर्य नसतो अशा काळास (अरविं). मेघमंडळ काय शमवितें ? दवान् ह्मणजे दावानलास. कोणच्या प्रकारचा तडाग सर्व जगाच्या मनाला आनंद देतो ? तर अरविंदवान् ह्मणजे ज्यामध्यें कमलें उगवलेलीं आहेत असा. अशा रीतीनें (अरविं, दवान् व अरविंदवान्) अशीं तीन उत्तरें अरविंदवान् या एका शब्दांत साधलीं गेलीं. अर्थात् यांत नुसता शब्दच्छल आहे. अर्थचमत्कृति कांहीं एक नाहीं. व ह्मणून बहिरालाप सुभाषित होऊं शकत नाहीं हें उघड आहे. प्रश्नोत्तर ह्मणून आणखी एक प्रकार आहे. त्यांत बहिरालापाप्रमाणें उत्तर वाचकानें हुडकून काढून द्यावयाचें

नसून प्रश्न व उत्तर श्लोकांतच दिलेलें असतें जसें:—

भारतं चेक्षुदंडं च सिंधुं इंदुं च वर्णय
पादमेकं प्रदास्यामि ' प्रतिपर्वरसोदयः ' ॥

प्रश्न असा आहे कीं -भारत, इक्षुदंड ह्मणजे ऊंस, सिंधु ह्म० समुद्र व इंदु ह्म० चंद्र, या सर्वांचें वर्णन पाहिजे आहे. उत्तर देणारा सर्व उत्तरें—एका पदांत—देतो, तीं अशीं—“ प्रतिपर्वरसोदयः ” भारतांत प्रत्येक पर्वांत अधिकाधिक रस उत्पन्न होतो. उसांच्या प्रत्येक पेरांत अधिकाधिक रस (गोड पदार्थ) उत्पन्न होतो. समुद्राचे ठिकाणीं प्रत्येक तिथीस अधिकाधिक भरती येते. व चंद्रासही प्रत्येक तिथीस आधिकाधिक तेज येतें. या प्रकारांतही श्लेषावरच मुख्य भिस्त आहे. व तीही बहुधा शब्दश्लेषावरच. व ह्मणून प्रश्नोत्तर या प्रकारासही सुभाषित असें ह्मणतां यावयाचें नाहीं.

(३०) तात्पर्य, हे सर्व प्रकार शब्दवैचित्र्याचे होत. व निवळ शब्दवैचित्र्यानें झालेली चमत्कृति अर्थचमत्कृतीपेक्षां कमी सरस असते, हें सहृदय मनुष्यास सांगावयास नकोच. कारण, शब्दचमत्कृतींत जी काय गंमत आहे, तिचें पर्यवसान कर्णांतच होतें. ती बुद्धिशक्तीस किंवा अंतःकरणास प्रसन्न करूं शकत नाहीं.

(३१) इंग्रजी भाषेकडे पाहिलें असतांही अशा चित्रकाव्यास किंवा कूटांस किंवा शब्दश्लेषांस महत्त्व देत नाहींत, व अशा प्रकारांचा False Wit या सदराखालीं संग्रह करितात. ॲडिसन यानें आपल्या Six Papers on Wit या निबंधांत याचे बरेच प्रकार वर्णिलेले आहेत ते असेः—

Lippo Gramatism किंवा Letter-dropping, अथवा 'अक्षरच्युति 'या प्रकारांतील खुबी येवढीच कीं, त्यांत कांहीं इष्टाक्षरें पद्धतशीर रीतीनें वगळलीं जावयाचीं. Tripphiodorus या नांवाचा ग्रीक कवि होऊन गेला. त्यानें Odyssey नांवाचा एक पद्यग्रंथ रचिला होता त्यामध्यें पहिल्या सर्गांत 'अ'कार दुसऱ्यांत 'ब'कार अशा निरनिराळ्या चोवीस सर्गांत मिळून ग्रीक भाषेंतील सर्व मूळाक्षरें क्रमाक्रमानें वगळिलीं होतीं. आपल्या इकडे मोरोपंतांचीं निरोष्ठ रामायणें वगैरे याच तत्त्वावर रचिलीं आहेत. निरोष्ठरामायणांत सर्व 'प' वर्ग वगळलेला आहे, व हें सर्व रामायण वाचीत असतां ओंठाला ओंठच मुळीं लागत नाहीं.

Rebus Writing.—किंवा चित्रसमस्या. या प्रकारांत वाक्यांतील कांहीं शब्द गाळून त्यांचे जागीं तद्दर्शक अशीं चित्रें काढावयाचीं. जसें' राम वनांत गेला' असें लिहावयाचें असतां राम—(यापुढें वनदर्शक‡ चित्र काढून त्यापुढें) गेला असें लिहावयाचें. Rose Hill नांवाची एक कुमारिका होती. तिजवर प्रीति कारणाऱ्या एका तरुणानें आपल्या आंगरख्यावर Rose Hill I love well ह्मणजे रोज हिलवर माझी फार प्रीति आहे असा अर्थ व्यक्त करण्याकरितां खालील चित्रें काढिलीं होतीं. Rose स्त्रीचें नांव किंवा गुलाब, सबब गुलाबाचें चित्र. त्यापुढें Hill आडनांव किंवा टेंकडी असा अर्थ होतो, सबब टेंकडीचें चित्र. I याच उच्चाराचा शब्द Eye ह्मणजे डोळा आहे, सबब डोळयाचें चित्र. Love ह्म० प्रीति याच्या सारखाच जवळ जवळ उच्चार होणारा शब्द Loaf ह्म० भाकरी किंवा रोठ हा आहे, सबब भाकरीचें चित्र व Well ह्म० चांगलें या शब्दाचा दुसरा अर्थ विहीर

‡ कित्येक प्राचीन भाषांचीं मूळाक्षरें चित्रात्मक होतीं, व यावरून पुढें चित्रांचे जागीं अक्षरांची योजना झाल्यावरही गमतीखातर मध्येंच एकादें चित्र घालण्याचा प्रघात पडलेला असावा.

असा होतो सबब विहीरीचें चित्र. तात्पर्य 'मीं रोज हिल या कुमारिकेवर फार प्रीति करितों' हें लिहिण्याचे ऐवजीं गुलाब, टेंकडी, डोळा, भाकरी, व विहीर इत्यादि पदार्थांच्या चित्रांची परंपरा काढणाऱ्या तरुणाची धन्यच मानिली पाहिजे.*

Anagram—शब्दाचीं अक्षरें उलटीं ह्मणजे पुढें सुरवात करून मागें वाचीत जाण्याचा प्रकार जसें God हा शब्द उलट वाचला ह्मणजे Dog असें होतें. ह्मणजे "ईश्वराचा" "कुत्रा" बनविला असें झालें. Anagram याचाच दुसरा अर्थ एखाद्या शब्दांतील अक्षराची आलटापालट करून दुसरा शब्द तयार करणें असा आहे. जसें, Times यांतून smite ह्म० टाईम्स वर्तमान पत्रांतून मारणें अशा अर्थी शब्द तयार करणें किंवा Post टपाल यांतून Stop थांबणें इ० इ०

Acrostic—या प्रकारांत गद्याचीं किंवा पद्याचीं आद्याक्षरें ओळीनें घेतलीं असतां त्यापासून कांहीं तरी सार्थ असा प्रबंध सिद्ध होतो. किंवा पहिलींच अक्षरें न घेतां कांहीं ठरीव नियमानें मधलींमधलीं अक्षरें घेतलीं असतां तोच परिणाम होतो. हीब्रू भाषेतील एक काव्य असें आहे कीं, त्याचें प्रत्येक ओळीचें पहिलें अक्षर घेतलें असतां मूळाक्षरें—एका पुढचीं एक अशीं—निष्पन्न होतात. शेक्सपिअरच्या कांहीं नाटकांतील निरनिराळ्या ओळींमधून कांहीं ठरीव नियमानें अक्षरें घेऊन त्यावरून शेक्सपीअरच्या नांवावर प्रसिद्ध असलेलीं नाटकें खरोखर लॉर्ड बेकन, ज्याची पदवी लॉर्ड व्हेरुलॅम अशी होती, त्यानेंच लिहिलीं आहेत, अशाबद्दलचा वाद कांहीं वर्षांपासून उपस्थित झालेला होता व तो अद्यापिही सुरू आहे. आपल्या इकडील कवि मोरोपंत याच्या मंत्ररामायणामध्यें पहिलीं, किंवा पहिलीं व तिसरीं वगैरे अनुक्रमानें अक्षरें घेतलीं असतां त्यापासून श्रीराम जयराम जयजयराम वगैरे मंत्र सिद्ध होतात हें प्रसिद्ध आहेच. Double Acrostic ह्मणून एक प्रकार आहे त्या मध्यें आद्यंत अक्षरें घेऊन निरनिराळे शब्द बनवितां येतात व अशीं कोडीं ज्यांत आहेत, असे श्लोक आपल्याकडे बरेच आहेत.

Cronogram—या प्रकारांत एखाद्या शब्दांत कांहीं अक्षरें विशेष ठळक रीतीनें मांडलेलीं असतात, व त्यांचा अर्थ संख्यापर असून तीं एकत्र केलीं असतां त्यांतून कालनिर्णय होतो. गस्टेव्हस अॅडोलफस नांवाच्या राजानें एक पदक पाडलें व त्यावरील अवतरणांत किंवा वचनांत Chr Ist Vs DV X, ergo tr IV Mph Vs असें लिहिलें होतें. नेहमींच्या पद्धतीनें लिहिलें असतां हेंच Chritus Dux ergo Triumphus असें पाहिजे. वर जीं अक्षरें विशेष जाड लिहिलेलीं आहेत, तीं एकत्र केलीं असतां इष्ट संख्या निष्पन्न होते. आपल्या इकडे सुद्धां संख्येकरितां असंख्यावाचक असे सांकेतिक शब्द घालण्याची पद्धत होती. जुने ग्रंथांचे शेवटीं वगैरे ठिकाणीं शक द्यावयाचा तो

---

* या तरुणाचा हा चित्रविचित्र आंगरखा त्याच्या प्रियपात्रानें पाहिला कीं नाहीं व पाहिला असला तरी या अद्भुत चिताऱ्याचे मनांतील हितगुज तिला कळलें किंवा नाहीं, याची आह्मांस माहिती नाहीं. परंतु हीं चित्रें पाहिलीं असल्यास व तिच्याही डोक्यांत थोडीशी कल्पनाशक्ति असल्यास तिला त्या चित्रांवरून खालील प्रमाणें अर्थ भासला असण्याचाही संभव आहे. "मी प्रीतीच्या गुलाबी रंगाकडे नजर देऊन व्यर्थ फसलों; कारण त्या प्रेमरूपी गुलाबाचे मला कांटे लागले. व यामुळें मीं वेडा होऊन टेंकडीवर भ्रमण करितां करितां माझे डोळे फुटले व पोटास भाकरीही न मिळतां शेवटीं विहिरींत पडलों."

अशा शब्दांचे द्वारें लिहीत. रुद्र ह्मणजे ११, आदित्य ह्मणजे १२, दिक् ह्मणजे ८ पांडव ह्मणजे ५ असे संख्याविषयक संकेत ठरून राहिलेले आहेत, व 'अंकानां वामतो गतिः' हा नियम लावून या शब्दांमधून शकसंख्या काढावयाची असते.

Bouts-rimes.—या प्रकारांत यमकाचे शब्द दिलेले असतात व त्यावरून कवितांच्या ओळी तयार करावयाच्या. प्रतिभेशिवाय कविता करण्यास हें एक फार चांगलें साधनच आहे ह्मणावयाचें. कवितेकरितां यमक असें न मानितां यमकाकरितां कविता आहे असें मानण्यांत कविता ह्मणजे शब्दपांडित्याच्या पहिलवानगिरींतील एक पकड अगर पेंच इतकेंच महत्त्व कवितेस दिल्यासारखें झालें. मोरोपंत हा मोठा कवि होता. तथापि त्यानेंही यमकांस इतकें वृथा महत्त्व दिलेलें होतें कीं, त्यांचा वेळ पडेल तसा उपयोग करण्याकरितां तीं घरीं भिंतीवर लिहून ठेविलेलीं असत असें ह्मणतात.

Paragram किंवा Pun ह्म० नुसती शब्दावरील कोटी. ही बहुधा श्लेषाचे साहाय्यानें केली जाते.

Epigram हा प्रकार शब्दचित्रात्मक असतो. तेव्हां त्यांतील खुबी अशी असते कीं, एकच शब्दप्रबंध तो उलटसुलट वाचला असतां त्यांतून निरनिराळे अर्थ निघतात. Witche's Prayer ह्मणून एक शब्दप्रबंध आहे तो डावीकडून उजवीकडे वाचीत गेल्यास त्यांतून आशीर्वचन निघतें, परंतु तोच उजवीकडून डावीकडे वाचीत गेलें असतां शापवचन निघतें.

याशिवाय किरकोळ Clinches, Conundrum, Ploce, Antanaclacis इत्यादि प्रकार आहेत. या सर्वांतही अर्थाची चमत्कृति कांहीं एक नसते. क्वचित् शब्दश्लेष असतो, व कांहीं तरी वेड्यावांकड्या पर्यायानें गांवढळ व अज्ञजनास रुचेल अशीच चमत्कृति उत्पन्न केलेली असते.

(३२) वरील सर्व उदाहरणांवरून हें लक्षांत येईल कीं, शब्दचमत्कृति हा सुभाषिताचा आत्मा नसून तो आत्मा ह्मणजे अर्थचमत्कृति हा होय. खरी अर्थचमत्कृति ओळखणें हें इतर कित्येक गोष्टींप्रमाणें मनुष्याच्या सहृदयत्वावरच अवलंबून आहे.

(३३) भाषेस रमणीयता आणणारें 'सुभाषित' हें जें एक साधन त्याजविषयीं येथवर आपण विचार केला. आतां दुसरें एक अंग जें विनोद, ह्मणजे कोट्या, चतुरालाप, विनोदवचनें वगैरे त्या संबंधानें विचार करूं. सुभाषिताप्रमाणें विनोदास सुद्धां अर्थचमत्कृतीची अपेक्षा असते. परंतु, या दोहोंतील मुख्य भेद असा आहे कीं, सुभाषितांतील अर्थचमत्कृति हास्यरसोत्पादक नसली तरी चालते, परंतु विनोदांतील अर्थचमत्कृति हास्यरसोत्पादक असली पाहिजे.

(३४) **कोटी व विनोदवचन.** ज्या ठिकाणीं बोलणाराच्या वचनांत अर्थचमत्कृति असते व ती अर्थचमत्कृति केवळ आत्मगुणानेंच हास्योत्पादक होते, अशा वचनास **कोटी** किंवा **चतुरालाप** असें ह्मणतात. विनोदवचनामध्यें व कोटीमध्यें हा मुख्य फरक आहे कीं, विनोदवचनांत जें हास्य उत्पन्न होतें, तें केवळ अर्थचमत्कृतीच्या आत्मगुणानें होत नाहीं, तर तदंतर्गत जे पदार्थ त्यांच्या परस्पर असंबद्धतेनें, किंवा परिस्थितींच्या व त्यांच्या मिळून उत्पन्न होणाऱ्या असंबद्धतेनें उत्पन्न होतें. कोटी व विनोदवचन यांमध्यें दुसरा एक फरक आहे तो हा कीं, कोटी ही होतां होईतों फार थोड्या शब्दांत ग्रथित असते; (Brevity is the soul of wit–Shakespeare) किंबहुना ती जितक्या थोड्या शब्दांत ग्रथित असेल, तितकी तिची बहार

अधिक, असा नियम आहे. विनोदाचें तसें नाहीं. विनोद बहुधा एकाद्या दुसऱ्या वचनांत किंवा वाक्यांत संपूर्ण किंवा पक्क असा क्वचितच होतो. व तो परिस्थितिजन्य असंबद्धतेवर जेव्हां अवलंबून असतो, तेव्हां तर जितक्या विस्तृत वचनांत ग्रथित असेल तितका तो अधिक बहारदार असतो. हा भेद कोटी व विनोदवचन या दोन पदार्थांचीं पुढें जीं कांहीं थोडीं उदाहरणें दिलेलीं आहेत, तीं वाचलीं असतां विशेष कळून येईलच. परंतु, नुसता लक्षणभेद लक्षांत घ्यावयाचा असल्यास तो भेद निरनिराळ्या रीतींनीं व्यक्त करितां येईल. कोटीचा संबंध बहुधा बुद्धि व कल्पना यांशीं असतो. विनोदाचा संबंध मनोभावांशीं विशेष असतो. कोटींत बुद्धितेज चमकतें व विनोदांत मनोभावांची जागृती होऊन तद्द्वारा अर्थ हृदयांत शिरतो. दुसऱ्या एका दृष्टीनें असें ह्मणतां येईल कीं, कोटीचें स्वारस्य तिच्या चापल्यांत असतें. एखाद्या सुरुंगाप्रमाणें तिचा बार इतक्या अनपेक्षित रीतीनें उडून जातो कीं, तो होऊन गेल्यावर ऐकणारा डोळे चोळून आपणावर ह्मणजे आपल्या बुद्धीवर हा एकदम कसा घाला पडला, असें आश्चर्य करीत राहतो. व क्षणांत दृश्य होऊन अदृश्य झालेल्या विद्युत्तेजाप्रमाणें कोटी ही बुद्धीस चकविते. जी गोष्ट आपण एरवीं कबूल करण्यास पुष्कळ आढेवेढे घेतले असते, तीच गोष्ट कदाचित् कोटीचे द्वारानें आपल्या मनांत प्रविष्ट झाली असतां आपल्यास चटदिशीं पटते. कोटीचा आदि व तिचा अंत, हीं दोन्ही एका क्षणांतच होतात. व तसें होणें जरूरही असतें. कोटी करावयाची ह्मणून होत नसते. तिला अवचित प्रसंग मिळावा लागतो. व हा प्रसंग जाणून बुजून आणितां येत नाहीं, तर बोलण्यांत किंवा लिहिण्यांत अगदीं ओघानेंच यावा लागतो. कोट्या करण्यांत अगदीं प्रवीण किंबहुना हातखंडा असा जो फ्रेंच प्रहसनकार मॉलिअर, त्यानें असें ह्मटलें आहे कीं, Improptu is precisely the touch-stone of wit. ह्मणजे 'प्रत्युत्पन्नमतित्व हाच खऱ्या कोटीचा कस होय.' तरळबुद्धीच्या मनुष्यासच कोट्या करितां येणें शक्य आहे. वेळ निघून गेल्यावर जरी कोटि सुचली, तरी वरातीमागून जाणाऱ्या घोड्याप्रमाणें ती हास्योत्पादक न होतां हास्यास्पदच होते. विनोदवचनाची गोष्ट तशी नाहीं. विनोदाचें संज्ञान संपूर्ण रीतीनें एका क्षणांत होत नाहीं. तर तें हळू हळू होत जातें; व जसजसें विनोदी परिस्थितीचें वर्णन वाढत जातें, तसतसा विनोदास भर येत जातो. एखाद्या दिव्याच्या ज्योतींत जितकी उष्णता आहे, तितकीच एका तपेलीभर पाण्यांत साठविलेली आहे असें जर कल्पिलें तर कोटींतील हास्यशक्ति ज्योतींतील उष्णतेप्रमाणें एकवटलेली व विनोदवचनांतील हास्यशक्ति तांब्याभर पाण्यांत सांठविलेल्या उष्णतेप्रमाणें प्रसृत असते असें ह्मणतां येईल. प्रख्यात विनोदी लेखक मार्क ट्वेन (Mark Twain) यानें हाच भेद निराळ्या रीतीनें एके ठिकाणीं सांगितला आहे. तो असा. How to tell a story ह्मणजे गोष्ट सांगण्याचे प्रकार या नांवाच्या एका लहानशा लेखांत त्यानें खालील प्रमाणें आपलें मत दिलें आहे. तो ह्मणतो—"The humorous story is American, the Comic story is English, the witty sory is French. The humorous story depends for its effect upon the manner of the telling; the Comic story and the witty story upon the matter. The humorous story may be spun out to great length and may wander around as much as it pleases and arrive no where

in particular; but the comic and witty stories must be brief and end with a point. The humorous story bubbles gently along; the others burst. The humorous story is strictly a work of art—high and delicate art and only an artist can tell it; but no art is necessary in telling the comic and the witty story; any body can do it. The humorous story is told gravely, the teller does his best to conceal the fact that he even dimly suspects that there is anything funny about it; but the teller of the comic story tells you beforehand that it is one of the funniest things he has ever heard, then tells it with eager delight and is the first person to laugh when he gets through. And sometimes if he has had good success he is so glad and happy that he will repeat the nub of it and glance around from face to face collecting applause and then repeat it again."

(३९) 'निरनिराळ्या वस्तूंमधील चमत्कारिक व अनपेक्षित असे संबंध जोडून दाखविणें' असें ह्मटलें असतां कोटी किंवा चतुरालाप याची थोडक्यांत व्याख्या झाली. मनुष्यमात्राचें मुख्य ज्ञान ह्मटलें ह्मणजे त्याला इंद्रियगोचर होणाऱ्या वस्तुजातांतील संबंधाचें ज्ञान हेंच होय. ज्यांत कांहीं तरी ज्ञानप्रद अर्थ आहे असें लहानसें वाक्य घेतलें तरी त्यांत कर्ता, क्रिया व कर्म यांचा संबंध दाखविलेलाच असतो. मात्र सर्वच वस्तूंचे सर्वच संबंध चमत्कृतिजनक होऊं शकत नाहींत. देवघर व देव यांच्या कल्पनांचा संबंध, जेवण्याचे कामीं नित्य घडून येणारा हात व तोंड यांच्या कल्पनांचा संबंध, गाडी व घोडा यांच्या कल्पनांचा संबंध, इत्यादि संबंध आपल्या पाहण्यांत प्रत्यहीं येत असतात व त्यामुळें त्यांपासून कोणतीच चमत्कृति वाटत नाहीं. परंतु, या संबंधांत फरक पडला ह्मणजे मात्र आपलें लक्ष तिकडे वेधतें. मनुष्यप्राणी व मरण यांचा संबंध नित्य असून मनुष्य हा मरण पावणारा प्राणी आहे असें ह्मटलें असतां मुळींच चमत्कृति वाटत नाहीं. परंतु, तेंच मनुष्यप्राणी व वाळूचें घड्याळ या दोन पदार्थांचा संबंध नेहमीं प्रचारांत न येणारा आहे, व ह्मणून 'मनुष्यप्राणी हा वाळूचे घड्याळा सारखा आहे, कारण वाळूचे घड्याळांतील वाळूचे कण एक एक खालीं पडून शेवटीं ती वाळू खलास झालीच पाहिजे त्याच प्रमाणें मनुष्याचें आयुष्यही कणशः कमी होऊन शेवटीं तें नाहींसे झालेंच पाहिजे' असें जर ह्मटलें तर त्याचे योगानें मनुष्य हा मर्त्य प्राणी आहे हीच नेहमींची कल्पना, हेंच सत्य नेहमींहून विशेष चटकदार रीतीनें मनांत ठसतें व कल्पनाविलासाची मौज वाटते. संबंधाचें अनपेक्षितत्व किंवा चमत्कारिकपणा हा कोटीचा आत्मा आहे, व यामुळें तो अनपेक्षितपणा जर यत्किंचितही कमी झाला, तर कोटीचें स्वारस्य कमी होतें. आपण नेहमीं असें पाहतों कीं, एकदां केलेली कोटी जर फिरून उच्चारण्याचा प्रसंग आला, तर पहिल्यानें तिचें आपणांस जितकें हांसू येतें तितकें दुसरे वेळीं येत नाहीं. व उत्तरोत्तर तें कमीच होत जातें. यावरून हें सिद्ध होतें कीं, संबंधाच्या नूतनत्वांतच कोटीची कायती बहार आहे. चंद्र हा वाटोळा दिसतो व तो एखाद्या चेंडू प्रमाणें आहे अशी उपमात्मक कल्पना पुष्कळांस सुचण्यासारखी आहे व सुचतेही. यास्तव कोणाच्या बोलण्यांत

चंद्र व चेंडू यांचा संबंध दाखविण्यांत आला तर बहुधा ऐकणारास हंसूं येणार नाहीं. परंतु, तीच चंद्रास चेंडूची उपमा न देतां 'साखरेच्या लाडवाची' उपमा दिली अगर एका संस्कृत कवीनें दिल्याप्रमाणें 'राजयशोरूप हंसीच्या अंड्याची' उपमा दिली तर ती अपरिचित व साधारण प्रतीच्या कल्पनाशक्तीस न सुचणारी अशी असल्यामुळें या कल्पनेचें हंसूं आल्याखेरीज रहावयाचें नाहीं.

(३६) संबंधदर्शन विचित्र होण्यास कल्पना व्यक्तिशः एवढेंच नव्हे तर जातितः ही नूतन असावी लागते, व फक्त ज्यास प्रतिमेची देणगी आहे अशा खेरीज इतर माणसांच्या मनांत न येण्यासारखी ती पाहिजे. आतां संबंध दाखविणें तो गुणांचा प्रख्यात गुणाशींच असल्यास, ह्मणजे तोच गुण अगदीं उघड उघड दोन पदार्थांत सारखाच असल्यास फारशी चमत्कृति निष्पन्न होणार नाहीं. समजा एखाद्या पागोट्याचा रंग व अंजिराचा रंग सारखा आहे, ह्मणजे हा सारखवटपणा इतका उघड आहे कीं अंजीरी जातीचा रंग प्रसिद्ध असल्यामुळें कोणीही उपमा देणार झाला तर बहुधा अंजीरांचेंच नांव घेईल, तर हें पागोटें अंजिरी रंगाचें आहे असें ह्मणण्यांत चमत्कृति वाटणार नाहीं. त्याचप्रमाणें एखाद्या तरुणीच्या गौरवर्ण व पुष्ट अशा मांड्यांस केळीच्या खांबाची उपमा दिली तरीही विशेष चमत्कृति भासेल असें आह्मांस वाटत नाहीं. एका प्रसिद्ध मऊ पदार्थाची उपमा दुसऱ्या प्रसिद्ध मऊ पदार्थास, एका प्रसिद्ध सुवासाच्या पदार्थाची उपमा त्याच्या सारखाच सुवास असणाऱ्या दुसऱ्या प्रसिद्ध पदार्थास, एका विशिष्ट आकाराच्या पदार्थाची उपमा दुसऱ्या तशाच आकाराच्या लोकप्रसिद्ध पदार्थास दिल्यानें कल्पनाचमत्कृति होऊं शकणार नाहीं. तर 'उपमानभूत' किंवा 'अप्रस्तुत' असे जे पदार्थगुण ते जितके अप्रसिद्ध असतील ह्मणजे ते उपमानभूत करण्याकडे लोकांची जितकी प्रवृत्ति कमी असेल, तितका कल्पनेस चमत्कारिकपणा अधिक येईल.

(३७) परंतु कल्पना केवळ चमत्कारिक असूनही कोटीचें किंवा चतुरालापाचें काम भागत नाहीं. कारण, वस्तुसंबंध चमत्कारिक असूनही त्यापासून निवळ सौंदर्यप्रतीति किंवा व्यवहारोपयोगित्वाची प्रतीति झाली तर त्यापासून हास्योत्पत्तीस प्रतिबंध होतो, व ह्मणून त्या ठिकाणीं कोटी होत नाहीं. सौंदर्यप्रतीति झाल्यास कल्पनेला काव्याचें स्वरूप येईल व तसें झाल्यानें ती कोटी या सदराखालीं पडणार नाहीं; व्यवहारोपयोगित्वाची प्रतीति झाल्यास कल्पनेंतील मौज किंवा अद्भुतत्व नाहींसें होऊन चटकदारपणाची हानि होईल. यास उदाहरण असें कीं एखादा मनुष्य, ज्यास यंत्रशास्त्राच्या उपयोगाची माहिती नसेल त्यास, एखाद्या इंजिनापुढें उभें केलें असतां, येवढ्या अजवड व क्लिष्ट रचनात्मक यंत्रशरीराचे भाग एखाद्या धन्याच्या आज्ञेंत वागणाऱ्या बंद्या चाकराप्रमाणें कसकसे आपलीं कामें सुसूत्र चालवितात, त्यांतील दांडे मागें पुढें कसे होतात, चक्रें एखाद्या पिशाचाप्रमाणें कशीं गरगर फिरतात, व पडदे आपोआप कसे झांकतात व उघडतात हें सर्व पाहून ईश्वरानें ही एक मोठी कोटि (Wit) च केली असें सकृद्दर्शनीं वाटेल. परंतु, असल्या प्रचंड यंत्राचा व्यावहारिक उपयोग किती मोठा आहे, त्याच्या योगानें गिरणीच्या किंवा कारखान्याच्या इमारतींतील किती दूरचे व लहानसहान भागही चालतात, व शेवटीं त्याच्या योगानें मालकास किती ~~यांत्रिक व~~ द्रव्याचा फायदा होत असेल, असल्या कल्पना यंत्रशास्त्राचें महत्त्व जाणणाराचे मनांत हटकून यावयाच्याच, व त्या आल्या असतां हास्योत्पत्ति न होतां गहनविचारपरंपरा मात्र उत्पन्न होते.

ज्यास यंत्रशास्त्राच्या उपयोगाची कल्पना नसते, अशा लहान मुलांस अगर खेडवळ लोकांस मात्र वरील गोष्टी पाहून चमत्कार वाटेल व हासूं येईल.

(३८) जी गोष्ट वस्तूंस लागू तीच वाक्पदार्थांस लागू आहे. ह्मणजे भाषणांतील अर्थचमत्कारापेक्षां त्याच्या गहनत्वाकडे लक्ष गेलें असतां ती कोटी होऊं शकत नाहीं. हेंच खालील दोनतीन उदाहरणांवरून ध्यानांत येईल.

मृत्युः शरीरगोप्तारं वसुभाजं वसुंधरा
दुश्चरिणीव हसति स्वपतिं पुत्रलालनात् ॥

याचा अर्थ असा कीं "ज्याप्रमाणें जारिणी स्त्री आपल्या पतीस पुत्राचें कौतुक करितांना पाहून हंसते, त्याप्रमाणें मृत्यु हा शरीराची जोगवण करणाऱ्या मनुष्यास व भूमि ही धनरक्षण करणारास हांसते." या श्लोकामध्यें मृत्यु, भूमि व जारिणी स्त्री यांच्या कल्पनेमध्यें फारच चमत्कारिक संबंध दाखविला आहे. परंतु, या संबंधदर्शनापासून हास्य उत्पन्न न होतां त्यांत ग्रथित केलेल्या भयंकर सत्याचीच प्रतीति वाचणाराचे मनावर अधिक जोरानें ठसते. यास्तव तें काव्य ह्मणतां येईल, कोटी ह्मणतां येणार नाहीं. तसेंच—

पुष्पादनंतरं स्यात्फलं लतायां प्रसिद्धमिति लोके
चित्रं कनकलतेयं पुष्पोद्गमतः फलद्वयं पूर्वं ॥

या श्लोकाचा अर्थ असा कीं—"वृक्षसृष्टींत पाहिलें असतां प्रथम फुलें येऊन नंतर फळें धरतात असा क्रम आढळतो. पण या (स्त्रीरूप) सुवर्णलतेच्या ठायीं हा काय चमत्कार दृष्टीस पडतो पहा. कीं पुष्पोद्गमाच्या पूर्वींच फल द्वयाचा संभव" या ठिकाणीं स्त्री व (वृक्षसृष्टींत न सांपडणारी) लता यांच्या कल्पनांचा चमत्कारिक संबंध जोडून दाखविला आहे. परंतु, श्लोकांतील अश्लीलत्वामुळें व स्फुट ग्राम्यत्वामुळें सभ्य मनुष्यास हांसें न येतां खेदच अधिक वाटेल. यास्तव ही कोटी ह्मणतां येणार नाहीं. गहन विचार सुचण्यासारखे असले ह्मणजे मग कल्पना जरी चमत्कारिक असली, तरी तिजपासून कोटी होऊं शकत नाहीं याचें खालील श्लोक हेंही एक उदाहरण आहे.

हृदि लज्जोदरे वन्हिः स्वभावादग्निरुच्छिखः
तेन मे दग्धलज्जस्य पुनरागमनं नृप ॥

"हे राया, माझ्या हृदयाचे ठायीं लज्जा आहे व उदराचे ठायीं वन्हि आहे तेव्हां अग्नीच्या ऊर्ध्वज्वलनरूप धर्मामुळें माझी लज्जा जळून मी तुजकडे याचना करण्यास आलों आहे." यांत कल्पना चमत्कारिक केलेली आहे. परंतु, ती इतकी क्लिष्ट झालेली आहे कीं, ती समजून घेण्याच्या श्रमांमुळें त्यांतील स्वारस्य सर्व नष्टप्राय होतें. तसेंच अर्थचमत्कृतीपेक्षां नीतिशिक्षणाचा जोर ज्यामध्यें अधिक व ह्मणून जो कोटी या सदराखालीं पडणार नाहीं, अशा श्लोकाचें उदाहरण खालील होयः—

अहो बत विचित्राणि चरितानि महात्मनां ।
लक्ष्मीं तृणाय मन्यंते तद्भारेण नमंति च ॥

ह्मणजे—"महात्मे असे जे पुरुष त्यांचें चरित्रवैचित्र्य काय सांगावें ? पहा कीं लक्ष्मीला ते तृणा समान मानितात व त्या तृणवत् मानलेल्या लक्ष्मीच्या भाराच्या ओझ्याखालीं दडपून गेल्या प्रमाणें नम्र होतात." या ठिकाणीं महात्म्यांच्या वर्तनांत जी एक प्रकारची सकृद्दर्शनीं दिसणारी असंबद्धता दाखविली आहे, ती चमत्कृतिपूर्ण आहे. परंतु, याही ठिकाणीं कोटीवर नीतिविचारांचें दडपण पडल्यामुळें ती प्रभावी होत नाहीं—कल्पनेमध्यें चमत्कृतिपेक्षां सौंदर्य अधिक असल्यामुळें ती कोटि होऊं शकत नाहीं. याचीं उदाहरणें हवीं तितकीं देतां येतील. कादंबरींतील खालील श्लोक घ्या.

स्तनयुगमश्रुस्नातं समीपतरवर्तिहृदयशोकाग्नेः ।
चरति विमुक्ताहारं व्रतमिव भवतो रिपुस्त्रीणां ॥

ह्मणजेः—"हे राजा ! तुझ्या शत्रूंच्या स्त्रियांचें स्तनयुग्म अश्रूंनीं स्नात होत्सातें व विमुक्ताहार (त्यक्तभोजन–पक्षीं मुक्ताहाररहित) होऊन हृदयगत शोकाग्नीची उपासनाच करतें आहे कीं काय असें वाटतें !" या ठिकाणीं स्तनयुग्म, त्याचें साश्रुत्व व 'मुक्ता'हारहीनत्व, या कल्पनांचा दाखविलेला संबंध फारच सुंदर व रम्य आहे. परंतु या रम्यतेमुळेंच हा श्लोक काव्य या सदराखालीं घालावा लागेल. कल्पना अत्यंत चमत्कारिक असूनही हास्योत्पत्ति संभवत नाहीं; कां कीं, त्या ठिकाणीं शुद्ध व रम्य सौंदर्याचाच उत्कर्ष आहे. तसेंच

मणिहारलता विभाति तन्व्याः
कुचसिंहासनसीम्नि तस्थिवांसं ।
अभिषेक्तुमनंगदेवराजं
गलशंखाद्गलितेव दुग्धधारा ॥

ह्मणजेः—"तन्वीनें मणिहारलतारूप लता जी कंठीं धारण केली आहे, ती कुचसिंहासनावर अधिरूढ झालेल्या कामदेवास अभिषेक करण्याकरितां, शंखाकृति जो कंठ त्यापासून गळणारी दुग्धधाराच कीं काय अशी भासते." या ठिकाणीं हाराची कल्पना व दुग्धधारेची कल्पना, या दोन कल्पनांमध्यें जो संबंध दाखविला आहे, तो अत्यंत चमत्कारिक व निःसंशय हृदयंगम होय. तथापि त्यांत शुद्धसौंदर्यप्रतीतीच कायती आहे. यास्तव हा श्लोक फक्त काव्याखालीं मोडेल. तसेंच—

श्रिया गेहे मयारण्ये रामस्त्यक्तस्त्वया पथि
बत मुद्रे पुरंध्रीणां प्रत्ययं कः करिष्यति ?॥

सीता मुद्रिकेला उद्देशून ह्मणते, "हे मुद्रे ! राज्यलक्ष्मीनें रामाला घरींच सोडलें, मीं त्यास वनांत टाकून दिलें; आणि तूं त्यास मार्गांत सोडून आलीस. तेव्हां आतां स्त्रियांवर कोण बरें विश्वास ठेवील ?" यांत राज्यश्री, मुद्रिका, व जानकी यांचा पुरंध्री स्त्रीशीं दाखविलेला संबंध हृदयंगम आहे. परंतु हें काव्य होय; कोटी नव्हे.

दष्टे जगद्वपुषि कालभुजंगमेन
तत्रांधकारमिषमाविरभूद्विषं यत् ।
संजातलक्ष्मणि तदिदुमणौ निपात्य
ज्योत्स्नामये पयसि तक्षिपति स्म धाता ॥

ह्मणजेः—"कालरूप भुजंगमानें जगद्रूप शरीरास दंश केला असतां अंधकाराच्या रूपानें जो विषार चोहोंकडे पसरला, तो चंद्ररूप मण्याकडून शोषवून घेऊन चंद्रिकारूप दुग्धराशींत त्यास ब्रह्मदेव जणों काय टाकता झाला." येथें कल्पनेचें अद्भुतत्व असूनही श्लोकास वर सांगितलेल्या कारणामुळें कोटी ह्मणतां येणार नाहीं.

(३९) नास्तिपक्षीं इतकीं उदाहरणें दिल्यावर संस्कृतांतील कोटीचें समर्पक उदाहरण तरी कोणतें, अशी पृच्छा स्वाभाविकपणेंच होणार. यास्तव आमच्या समजुतीप्रमाणें ज्यास कोटी हें नांव देतां येईल, अशीं काहीं उदाहरणें खालीं देतों.

(१) हे दारिद्र्य नमस्तुभ्यं सिद्धोऽहं त्वत्प्रसादतः
पश्याम्यहं जगत्सर्वं न मां पश्यति कश्चन ॥

कोणी दरिद्री कवि दारिद्र्यास उद्देशून ह्मणतो—"हे दारिद्र्या ! तुझा काय प्रभाव सांगावा ? तुझ्या कृपेनें मी सिद्ध झालों आहें. कसा ह्मणशील तर मी सर्व जगास पाहत असतां मला मात्र कोणीही पाहत नाहीं !" या श्लोकांत दरिद्री पुरुष व सिद्ध पुरुष यांच्या कल्पनांचा संबंध अत्यंत चमत्कारिक रीतीनें व्यक्त केलेला असोन तो हास्योत्पत्तिकारकही आहे. यास्तव हा श्लोक कोटी होय. काव्य नव्हे.

(२) सर्वदा सर्वदोऽसीति त्वं मिथ्या कथ्यसे बुधैः
नारयो लेभिरे पृष्ठं न वक्षः परयोषितः ॥

याचक राजाची स्तुति करितांना ह्मणतो—"हे राजा! तूं सर्वकाळ सर्वांचें दान करितोस (कधीं कुणाला कांहींही नाहीं ह्मणत नाहींस), ही तुझी मिथ्या स्तुति कवि गातात. कां तर आजपर्यंत शत्रूंस तूं कधीं पाठ दिली नाहींस व परस्त्रियांस तुझें वक्षस्थळही कधीं लाधलें नाहीं." या श्लोकांतील व्याजनिंदा हास्योत्पादक आहे, व त्यास कोटी ह्मणणेंच बरोबर आहे.

(३) परीक्ष्य सत्कुलं विद्यां शीलं शौर्यं स्वरूपताम्।
विधिर्ददाति निपुणः कन्यामिव दरिद्रताम्॥

सर्वगुणसंपन्न पुरुष दरिद्री असतात या गोष्टीस अनुलक्षून कवि विधीची निंदा कोटीबाज रीतीनें करतो. तो ह्मणतो:—"विधीला ह्मणजे ब्रह्मदेवाला दरिद्रता नांवाची एक कन्या आहे. व तिला तो कर्तव्यतत्पर बापाप्रमाणें फारच श्रमानें स्थळ हुडकून काढतो. आणि कुल, शील, विद्या, शौर्य, सुंदर स्वरूप वगैरे गुणांनीं संपन्न असा युवा बघितला ह्मणजे त्याला ती अर्पण करितो." या श्लोकांतील सद्गुणसंपन्न मनुष्य व दरिद्रता यांजमधील संबंध किती तरी गमतीनें वर्णन केलेला आहे! व या श्लोकास कोटी ह्मणावें याबद्दल मुळींच मतभेद होणें शक्य नाहीं, असें आह्मांस वाटतें.

(४) आनंदतांडवपुरे द्रविडस्य गेहे
चित्रं वसिष्ठवनितासममाज्यपात्रं।
विद्युल्लतेव परिनृत्यति तत्र दर्वी
धारां विलोकयति योगबलेन सिद्धः॥ *

"आनंदाचें वसतिस्थान असें जें द्रविडाचें घर, तेथें तुपाची तपेली केवढी होती ह्मणाल, तर अरुंधतीच्या ताऱ्या एवढी! तींत पळी कशी खडबडत होती, तर विद्युल्लतेप्रमाणें! आणि तुपाची धार जी पानावर पडत होती, ती तर इतकी बारीक कीं, ती सिद्धानेंच योगबलेंकरून पाहावी; इतरांस अगोचर होय." हें वर्णन वाचून आमचे मतें फारच थोडक्यांस हंसू कोसळल्यावांचून राहील. विद्युल्लतेची उपमा सर्वत्रच हास्योत्पादक होईल असें नाहीं. मृच्छकटिक नाटकांतील नांदीमध्यें

"पातु वो नीलकंठस्य कंठः श्यामांबुदोपमः।
गौरीभुजलता यत्र विद्युल्लेखेव राजते॥"

या श्लोकांत शंकराच्या नीलवर्ण व मेघाच्या कांतीप्रमाणें कांति असणाऱ्या गळ्याभोंवतीं पार्वतीचा पडलेला गौरवर्ण जो हात त्यास मेघावर खेळणाऱ्या विजेची उपमा दिलेली आहे. परंतु त्या उपमेनें हास्य येत नाहीं, तर काव्यरम्यताप्रतीतीच होते.

(५) दीपो भक्षयते ध्वांतं कज्जलं च प्रसूयते।
यदन्नं भक्षयेन्नित्यं जायते तादृशी प्रजा॥

"दीप हा अंधकाराचें भक्षण करितो, आणि काजळास प्रसवतो. ठीकच आहे. जसें नित्य खावें, त्यासारखी प्रजा होते." या ठिकाणीं दाखला चमत्कारिक असून हास्योत्पत्तिकर आहे.

(६) च्युताः दंताः सिताः केशा वाङ्निरोधः पदे पदे।
पातसज्जमिमं देहं तृष्णा साध्वी न मुंचति॥

"दांत पाहावे तर पार पडून गेलेले. केसांत एक केंसही काळा उरला नाहीं. अडखळल्याशिवाय एक शब्दही उच्चारितां येत नाहीं. व अशा रीतीनें देह अगदीं पतनोन्मुख झाला, तरी आशा ही मात्र एखाद्या साध्वी स्त्रीप्रमाणें या देहरूप पतीस सोडण्यास तयार नाहीं." या ठिकाणीं आशा व साध्वी स्त्री या दोहोंच्या कल्पनांचा

* सुभाषितकारांस घृतधारा व विद्युल्लता यांचा संबंध फारच योग्य असा वाटला असावा, असें दिसतें. कारण, दुसऱ्याही एका श्लोकांत तीच कल्पना तशाच रीतीनें व्यक्त केलेली आढळते:—

"संचारिणी कांचनवल्लरीव
विद्युल्लता वा पतिता नभस्तः।
घृतस्य धारा पतिता न जाने
दिवं गता वाथ भुवं गता वा॥

जो संबंध दाखविला आहे, तो फारच बहारीचा आहे. व ही निःसंशय कोटी होय.

(७) अनुकुरुतः खलसुजनौ अग्रिमपाश्चात्ययोः सूच्याः
विदधाति रंध्रमेको मुद्रणमस्यापरोऽपि विदधाति ॥

"खल व सज्जन हे सुईच्या टोंकाचें व नेड्याचें अनुक्रमें अनुकरण करितात. पहिला (खल) हा रंध्र पाडतो ह्मणजे दूषणें काढतो, व दुसरा (सज्जन) हा त्यावर आच्छादन घालितो." या श्लोकांत सुईच्या दोन भागांची उपमा समर्पक असून चमत्कारिक व हास्योत्पत्तिकर आहे. ह्मणून ही कोटि होय.

(८) येनांचलेन सरसीरुहलोचनायाः
त्रातः प्रभूतपवनादुदये प्रदीपः ।
तेनैव सोऽस्तसमयेऽस्तमयं विनीतः
क्रुद्धे विधौ भजति मित्रममित्रभावम् ॥

"कमलनयना स्त्रीच्या ज्या पदरानें दीप लावण्याचे वेळेस दीपज्योतीचें रक्षण प्रचंड वाऱ्यापासूनही झालें, त्याच पदरानें तो मालविण्याचे वेळेस तिचा अंत झाला. तात्पर्य, दैव क्रुद्ध झालें असतां मित्रही शत्रु बनतो, असेंच नाहीं कां ह्मणावयाचें ?" या ठिकाणीं पदर व दीप यांचे दोन वेळचे दोन निराळ्या प्रकारचे संबंध मित्र व शत्रु यांच्या निदर्शनानें गमतीचे करून दाखविले आहेत.

(९) सरसहृदयाभियोग्ये खिद्यति काव्ये जडो न मौर्ख्ये स्वे ।
निंदति कंचुकमेव प्रायः शुष्कस्तनी नारी ॥

"काव्य अतिसहृदय वाचकांचे रुचीस योग्य असें असतांही बुद्धिहीन मनुष्य अशा काव्याचीच निंदा करतो, आपल्या मूर्खपणाची तो निंदा करीत नाहीं. वार्धक्यामुळें स्तन अत्यंत कृश झाल्यामुळें जिच्या अंगास कंचुकी बसेनाशी झाली आहे, अशी स्त्री आपल्या वार्धक्याला दोष न देतां कंचुकीलाच दोष देते." जडबुद्धीचा पुरुष व वृद्ध स्त्री यांचें जें साम्य या ठिकाणीं दाखविलें आहे, तें फार कोटिबाज आहे.

(१०) अस्य श्रीभोजराजस्य द्वयमेव सुदुर्लभं ।
शत्रूणां शृंखलैर्लोहं ताम्रं शासनपत्रकैः ॥

"या श्रीभोजराजाच्या राज्यांत लोखंड व तांबें, हीं मात्र अगदीं मिळेनातशीं झालीं. शत्रूंच्या पायांत घालण्याकरितां शृंखळा करून करून लोखंड संपलें व दानप्रसंगीं ताम्रपट करून देतां देतां तांबें खलास झालें." भोजराजाची राज्यश्री व लोह व ताम्र यांचा अभाव, या दोन कल्पनांचा संबंध या श्लोकांत फारच चमत्कृतिपूर्ण व हास्योत्पादक झाला आहे.

(४०) श्लेष—कोटी करण्याचें एक मुख्य साधन श्लेष होय. श्लेष ह्मणजे शब्दाचें नानार्थत्व. जेव्हां एका शब्दाचे अनेक अर्थ असतात व तोच शब्द एकाच वाक्यांत एकापेक्षां अधिक अर्थानें योजिला जातो, तेव्हां श्लेष होतो. अनेकार्थबोधक शब्द बहुधा प्रत्येक भाषेंत कांहींना कांहीं तरी असतातच. त्याप्रमाणें संस्कृतांतही ते आहेत. परंतु इतर भाषांच्या मानानें पाहतां संस्कृतांत श्लेषयोजनेचा प्रचार विशेष आहे. बहुधा सर्व प्रकारच्या काव्यांतून व नाटकांतून तर श्लेषाचा उपयोग पदोपदीं केलेला आढळतो, व संस्कृत भाषेच्या अगदीं अलीकडच्या इतिहासांत श्लेषाची गोडी इतकी वाढलेली दिसून येते कीं, खरें किंवा उत्तम प्रतीचें काव्य हें बाजूस राहून, ह्मणजे रस व अलंकार यांजकडे दुर्लक्ष होऊन, सर्व भर काय तो श्लेषावरच येऊन पडलेला आहे. आधुनिक हरिदास व कथेकरी यांची व्युत्पत्ति ह्मटली ह्मणजे तिजमध्यें बहुधा सर्व श्लेषात्मक श्लोकांचा भरणा असावयाचा. पूर्वरंगांत किंवा उत्तररंगांतही ते एखादा रस आळवीत बसले आहेत किंवा एखादा चटकदार अलंकार श्रोतृ-

वाच्यभेदेन भिन्ना यद्युगपद्भाषणस्पृशः ।
श्लिष्यंति शब्दाः श्लेषोऽसावक्षरादिभिरष्टधा ॥

ह्मणजेः—"वाच्यार्थभेदानें भिन्न असून एकसमयावच्छेदेंकरून होणाऱ्या उच्चारणामुळें जेव्हां शब्द आपलें भिन्न रूप झांकून टाकून फक्त एकरूपतेनेंच भासतात, त्या ठिकाणीं श्लेष नांवाचा अर्थालंकार होतो. हा अलंकार वर्ण, पद, लिंग, वचन, विभक्ति, प्रत्यय, प्रकृति व भाषा इत्यादिकांचे अवलंबनानें आठ प्रकारचा होऊं शकतो." व प्रकरण किंवा अनुसंधान एकच राहिल्यामुळें नवव्या प्रकारचा श्लेष होतो. एथें या सर्वांचीं उदाहरणें देण्याचें कारण नाहीं. निराळ्या रीतीनें पाहतां श्लेषालंकार दोन प्रकारचे होतात; एक सभंग व दुसरा अभंग. अभंग श्लेषाचें उदाहरण खालील आर्या होय.

वाणी मयूरवदनीं जी न शुकातें द्विजोत्तमा यावी
पक्ष श्रीहरि धरि मग काय न करि तो अनंत मायावी ॥

ह्मणजेः—"जी वाणी ब्राह्मण (ऋषि) वर्य जो शुक त्याचे तोंडांत आली नाहीं, ती वाणी कवि मोरोपंत याचे तोंडांत आली. मोरोपंताची बाजूच श्रीहरीनें धरिली, तेव्हां मग त्या अनंत मायावी हरीनें काय वाटेल तें घडवून आणिलें तरी काय आश्चर्य?" याच श्लोकांतून दुसरा अर्थ निघतो तो असाः—"पक्षिश्रेष्ठ जो शुक ह्म० पोपट अर्थात् ज्याची बोलकेपणाविषयीं ख्याति आहे अशाचेही तोंडून जे शब्दोच्चार निघाले नाहींत, ते मोराचे तोंडून निघाले. पण खुद्द श्रीहरीनें पक्ष धरिले ह्मणजे पक्षाचें रूप धरिलें, मग तेथें काय आश्चर्य?" या आर्येमध्यें शब्दाचीं पोटपदें न पाडितां स्वाभाविकपणें जशाचे तसेच शब्द घेतले असतां श्लेषनिष्पत्ति होते. मागें दिलेली "तूं मलिन कुटिल नीरस" ही आर्याही अभंग श्लेषाचेंच उदाहरण आहे. सभंग श्लेषाचें उदाहरण रघुनाथ पंडिताचे नळोपाख्यानांत आहे. तें हें:—"नलगे औषध मजला" इ०. दमयंतीला विरहपीडा झाली असतां तिच्या सख्यांनीं तिला काय औषध पाहिजे ह्मणून विचारिलें, तेव्हां "नलगे औषध मजला" असें तिनें उत्तर दिलें. याचा सरळ अर्थ 'मला औषध नको' असा आहे. परंतु नलगे या एका पदाचीं नल गे अशीं दोन पोटपदें पाडिलीं असतां, "गे, ह्मणजे हे सख्यांनो नल (प्राप्ति) हेंच औषध मला वांचवील" असा अर्थ त्यांतले त्यांत निघतो. या ठिकाणीं पदभंग करावा लागतो, ह्मणून त्यास सभंग श्लेष ह्मणतात. तसेंच

अनलसमीहितसाधीरायावारामहीवराकामा ।
अनलसमीहितसाधीरायावारामहीवराकामा ॥

हेंही एक सभंग श्लेषाचें उदाहरण आहे. नेहमीं प्रचारात अभंग श्लेषच असतो; सभंग असत नाहीं.

(४३) काव्यप्रकाशकार व इतर कित्येक साहित्यग्रंथकार यांमध्यें श्लेषाचे संबंधानें मतभेद आहे. काव्यप्रकाशकाराचे मताप्रमाणें श्लेष हा स्वतंत्र शब्दालंकार आहे व स्वतंत्र रीतीनें अर्थालंकारही आहे. इतर ग्रंथकारांचे मतानें श्लेष हा फक्त अर्थालंकारच आहे, शब्दालंकार होऊं शकत नाहीं. त्यांचें ह्मणणें असें आहे कीं, श्लिष्ट पदांचा उपयोग केला असतां प्रस्तुत व अप्रस्तुत अशा पदार्थांचा संबंध कांहींना कांहीं तरी दाखविला जातो व त्यापासून कोणत्याना कोणत्या तरी अर्थालंकाराची उत्पत्ति होते; सबब श्लेषास शब्दालंकार असें ह्मणतां येत नाहीं. परंतु काव्यप्रकाशकाराचें ह्मणणें असें आहे कीं, श्लिष्ट शब्द जर जाग्यावर राहील, तरच श्लिष्टार्थही राहील. व जर त्या श्लिष्ट पदाचे ऐवजीं दुसरें पद ह्मणजे शब्द घातला, तर त्यापासून श्लिष्टार्थ निघत नाहीं. असें ज्या ठिकाणीं घडत असेल, त्या ठिकाणीं श्लेष हा शब्दालंकारच मानिला पाहिजे. दुसरें

पक्षीं ज्या ठिकाणीं श्लेष हा अर्थालंकार असतो त्या ठिकाणीं श्लिष्ट शब्दास फारसें महत्त्व नसतें, ह्मणजे त्याचे ठिकाणीं त्याच अर्थाचा दुसरा शब्द घातला तरीही अलंकार साधतो. याचें उदाहरण खालील होय.

स्तोकेनोन्नतिमायाति स्तोकेनायात्यधोगतिम्
अहो सुसदृशी वृत्तिः तुलाकोटेः खलस्य च ।

याचा अर्थः——"अहो, खल ह्मणजे दुर्जन व तराजूचा कांटा यांचें साम्य किती तंतोतंत जुळतें पहा. कारण दोघांनाही "स्तोका" नें उन्नति येते व स्तोकानेंही अधोगति येते." स्तोक ह्मणजे यत्किंचित् किंवा क्षुद्र वस्तु. ताजव्याचे एका पारड्यांत यत्किंचित् कमीजास्ती वजन पडलें कीं, तो जसा एकदम वर खालीं होतो, तसेंच दुर्जनाला ही यत्किंचित् लाभ झाला असतां तो चढून जातो व यत्किंचित् हानि झाली असतां उतरून जातो. या ठिकाणीं स्तोक या शब्दाचे ऐवजीं 'अल्प' वगैरे जरी दुसरा एखादा शब्द घातला, तरीही वाक्याचें उभयार्थत्व ह्मणजे दोन वस्तूंकडे दोन तऱ्हेनें लागणारा अर्थ नाहींसा होत नाहीं. अशा ठिकाणीं शब्दाचें महत्त्व नसून अर्थाचेंच महत्त्व विशेष आहे. यास्तव हा श्लेष या ठिकाणीं अर्थालंकार आहे, शब्दालंकार नव्हे. वर दिलेल्या कित्येक उदाहरणांत ह्मणजे "वाणी मयूरवदनीं" वगैरे आर्येंत मयूर, शुक, द्विजोत्तम, पक्ष वगैरे शब्द, किंवा "नलगे औषध मजला" यांतील नलगे हा शब्द, हे बदलून त्या जागीं दुसरे शब्द घातले, तर श्लेष उत्पन्न होत नाहीं. या वादांत काव्यप्रकाशकाराचें ह्मणणें अधिक सयुक्तिक असून श्लेषाचे शब्दालंकार व अर्थालंकार असे पृथक् भेद खरोखर मानावे लागतात. परंतु निवळ शब्दश्लेषांत विशेष रमणीयता नसते. ह्मणून तो कोटीमध्यें मान्यतेनें गणितां येत नाहीं. परंतु श्लेष हा ज्या ठिकाणीं अर्थालंकार होतो, त्या ठिकाणीं तो तसा गणितां येतो. इंग्रजी साहित्यशास्त्रकारांच्या मतेंही निवळ शब्दांवरच्या कोट्यांना कोणी चांगलेंसें मानीत नाहीं. व अशी निवळ शब्दाची कोटी करणें केवळ ग्राम्यपणाचें लक्षण समजतात. ऍडिसननें असें ह्मटलें आहे कीं, शब्दावर कोट्या करण्याच्या बुद्धीचें बीज बहुधा सर्व मनुष्यांच्या डोक्यांत असतेंच. विचारानें, तर्कपरिचयानें, व समंजसपणानें या बीजास फारसे अंकुर फुटत नाहींत; परंतु कोटी करण्याची चटक मनुष्यमात्रांत इतकी प्रबळ आहे कीं, थोरा मोठ्या बुद्धीचीं मनुष्येंही जर त्यांस ललितकलांचा उत्तम संस्कार नसेल, तर कोट्या करीत बसतील. मनांत उदात्त कल्पना जोंपर्यंत येत नाहीं, तोंपर्यंत नुसत्या शब्दावर कोट्या करण्याची प्रवृत्ति राहील. परंतु मनांत उदात्त कल्पना असूनही कित्येक वेळीं शब्दश्लेष करण्याची गोडी अनिवार होते व यामुळें आरिस्टॉटल, सिसरो, शेक्सपीअर वगैरेंच्या ग्रंथांतूनही कोट्या सांपडतात.

(The seeds of punning are in the mind of all men and though they may be subdued by reason, reflection and good sense they will be very apt to shoot up in the greatest genius that is not broken and cultivated by the rules of art. Imitation is natural to us and when it does not raise the mind to poetry, painting, music and other noble arts it often breaks out in puns and quibbles.--*Addison.*)

शेक्सपीअरला तर शब्दावर कोटी कोठें करावी व कोठें करूं नये, याचा विधिनिषेधच नव्हता असें ह्मटलें तरी चालेल. कारण त्या त्याच्या हास्यरस-

प्रधान नाटकांतूनच आहेत असें नाहीं, तर त्या करुणरसप्रधान व शोकपर्यवसायी नाटकांतून व मुख्य पात्रांच्या तोंडीं ऐन करुण किंवा वीर रस पूर्ण भाषणांतून नुसत्या पेरलेल्या आढळतात.

शेक्सपीअरमध्यें आढळणाऱ्या शब्दावरच्या कोट्यांपैकीं कांहींचीं थोडीं निवडक उदाहरणें खालीं देतों:—

Proteus—It were best 'pound' you.
Speed—Nay sir, less than a *pound* shall serve me 'for' carrying your letter.
Pro.—You mistake. I mean the *pound*,—a pinfold.
Speed.—From a pound to a pin? *fold* it over and over. It is three-*fold* too little for carrying a letter to your lover.
(*Two gentlemen of Verona.*)

Julia.—And is that paper nothing?
Lucetta.—Nothing concerning me.
Ju.—Then let it *lie* for those that it concerns.
Lu.— Madam, it will not *lie* where it concerns. Unless it have a false interpreter.
(*Ibid.*)

Fal.—My honest lads, I will tell you what I am *about*.
Pist.—Two yards, and more.
Fal.—Indeed, I am in the *waist* two yards about; but I am now about no *waste*.
(*The Merry Wives of Windsor.*)

Oli.—What kind of man is he?
Mal.—Why, of man-kind?
Oli.—What manner of man?
Mal.—Of very ill manner.
(*Twelfth-Night.*)

Vio.—Art thou a *churchman?*
Clo.—No such *matter*, sir. I do *live by the church*; for I do live at my house, and my house doth stand *by the church*.
(*Twelfth-Night.*)

Pedro.—Truly the lady *fathers* herself.
(*Much Ado about Nothing.*)

Lys.—Then by your side no bed-room me deny.
For, *lying* so, Hermia, I do not *lie*.
(*A Midsummer-Night's Dream.*)

Cost.—Which is the *head* lady?
Prin.— Thou shalt know her, fellow, by the rest that have no *heads*.
(*Love's Labour's Lost.*)

Gra.—Not on thy *sole*, but on thy *soul* harsh Jew.
Anto.—If the Jew do but cut deep enough, I will pay it instantly *with all my heart*.
(*The Merchant of Venice.*)

Orl.—What, of my suit?
Ros.—Not out of your apparel, and yet out of your suit.
(*As You Like It.*)

Hor.—Madam, it is now in time.
Luc.—All but the *base*.
Hor.—The *base* is right; it is the *base* knave that jars.
(*The Taming of the Shrew.*)

Fal.—Yea, and so used it that were it not here *apparent* that thou art *heir-apparent.*
(*King Henry IV, Part I.*)

2nd Citi.—A trade, sir, that I hope I may use with a safe conscience; which is, indeed, sir, a mender of bad soles (*souls.*)
(*Julius Cæsar.*)

Cleo.—Indeed ?
Mar.—Not in deed, madam.
(*Antony and Cleopatra.*)

(४५) शेक्स्पिअरमध्यें शब्दश्लेष विपुल सांपडतो, तरी एकंदरीनें आपल्या इकडच्या संस्कृत ग्रंथांपेक्षां तो इंग्रजी ग्रंथांमध्यें फारच कमी आहे. Thomas Hood या कवीसारखे शब्दश्लेषबहादर तिकडेही आहेत. परंतु थोडे. (They went and *told* the sexton and the sexton *tolled* the bell.—Hood.) अलीकडील श्रेष्ठ प्रतीच्या गद्यपद्य ग्रंथांतून तर तो जवळ जवळ नाहीं ह्मटलें तरी चालेल. उदाहरणार्थ, टेनिसनच्या सर्व काव्यांत एखादा तरी निवळ शब्दश्लेष सांपडेल कीं नाहीं, याची शंकाच आहे. मिल्टनमध्यें एखाद दुसरा क्वचित् सांपडतो. (At one light bound high over leaped all bound.-Paradise Lost, Book VI.) एडमंड बर्क यानें एकच शब्दश्लेष केल्याचें माहीत आहे. पण तो फार समर्पक व गंभीर विचार उत्पन्न करणारा असा झाला आहे. तो असा—What is (M)a jest (y) when deprived of its externals, but a jest? इंग्रजी जाणणारांस या शब्दश्लेषाची खुबी स्पष्ट करून सांगण्याचें कारण नाहीं. इंग्रजी समाजांत आजमित्तीसही शब्दश्लेषाचा प्रचार आहे हें Tit-Bits किंवा London Punch and Charivari या पत्रांतून येणाऱ्या कोट्यांवरून उघड दिसत आहे. इंग्रजींत शब्दश्लेषाचा विशेष प्रचार मूळ इटालियन भाषेच्या संपर्कानें सुरू झाला व शेक्सपिअरच्या वेळेच्या पूर्वी फार थोडा काळ हा संपर्क झालेला असल्यानें त्याच्या व तत्समकालीन इतर ग्रंथकर्त्यांच्या ग्रंथांत श्लेषाचा फार भरणा दिसून येतो. परंतु, दिवसेंदिवस तो प्रचार कमी होत चालला. कांहीं प्रकारच्या कोट्या फार चटकदार असतात व कित्येक वेळां त्यांमध्यें समर्पकपणाही असतो. यामुळें शब्दश्लेषाचें साम्राज्य इंग्रजी भाषेवरूनचसें काय, पण दुसऱ्या कोणच्याही भाषेवरून समूळ नाहींसें होणें बहुधा अशक्यच होय. परंतु, चांगला व वाईट शब्दश्लेष यांतील भेद सदभिरुचीनें तेव्हांच कळण्यासारखा असतो, यामुळें त्यास योग्य तेंच महत्त्व कोठेंही मिळणार. ग्रॅहॅम नांवाच्या एका इंग्रजी ग्रंथकारानें " A Book about words " नांवाच्या आपल्या पुस्तकांत शब्दश्लेषाविषयीं खालील समंजसपणाचीं विधानें केलीं आहेत तीं कोणत्याही भाषेस लागू पडण्यासारखीं आहेत. तो ह्मणतो:—
" Language has been like most other things subject to many and various abuses. Anagrams, chronograms, acrostics, &c, have each and all "fretted their hour upon the stage and now are heard no more." But the Pun seems likely to maintain its place both in conversation and in written composition. Let us not be misunderstood. It is not the practice, but the abuse of it that is to be condemned. We are strongly of opinion that there can be no greater pest to society than the

inveterate and professional punster, a man who sets traps for you, who lies in wait for every phrase you utter to twist and turn it into a meaning of his own and who is continually stopping the natural flow of discourse and bringing it to some lame and impotent conclusion. But, as we have endeavoured to show, the pun when telling and well applied is as legitimate a form of wit as any other and quite as conducive to good feeling and good fellowship."

(४६) शब्दश्लेषाचें हें विवेचन पूर्ण करण्यापूर्वीं Mark Twain's Library of Humour या पुस्तकांत (पान ४१७) Oliver W. Holmes या प्रसिद्ध अमेरिकन विनोदी गृहस्थाचा शब्दश्लेष करणाऱ्या लोकांसंबंधानें जो एक लेख दिलेला आहे, तो अवश्य वाचावा अशी शिफारस वाचकांस केल्याशिवाय आमच्यानें राहवत नाहीं. कल्पना अशी केलेली आहे कीं, शब्दावर कोट्या करितां करितां ज्यांचा मेंदू बिघडून गेला आहे, अशा लोकांकरितां कोणी एका दयाळू गृहस्थानें एक इस्पितळ बांधलेलें असून, त्यामध्यें वरील प्रकारचे अनेक लोक कोंडून ठेविले आहेत, व या इस्पितळाचे नियम आणि त्या लोकांची दिनचर्या वगैरेचें वर्णन फारच विनोदी असें केलेलें आहे. त्यांतील सुरवातीच्या थोड्या ओळी खालीं दिल्या आहेत, त्यावरून एकंदर लेखाची कल्पना होईल. या लेखाचा मुख्य हेतु शब्दश्लेष करणारांची फटफजीती करण्याचा आहे, हें उघड आहे:—

"The great success of the asylum for idiots and feeble-minded youth, several of the scholars from which have reached considerable distinction, one of them being connected with a leading daily paper in this city, and others having served in the State and National Legislatures, was the motive which led to the foundation of this excellent charity. Our distinguished townsman, Noah Dow Esquire, as is well known, bequeathed a large portion of his fortune to this establishment, being thereto moved as his will expressed it "by the desire of N. Dowing some public Institution for the benefit of Mankind." Being consulted as to the rules of the Institution and the selection of a Superintendent, he replied, that all Boards must construct their own platforms of operation. Let them select *anyhow*, and he should be pleased. N. E. Howe, Esq. was chosen in compliance with this delicate suggestion."

(४७) **विनोदवचन**—जिच्या योगानें विचारांस असंबद्ध, विकृत किंवा अद्भुत स्वरूप येतें व एकंदर परिणाम हास्योत्पादनपर होतो, अशा कल्पनाशक्तीनें रचलेल्या शब्दप्रबंधास विनोदवचन ह्मणतात. कोटी व विनोद यांमधील मुख्य भेद मागें कोटीच्या विवेचनाचे वेळीं सांगण्यांत आलाच आहे. कोटीचा संबंध बुद्धिशक्तीशीं आहे व विनोदाचा संबंध हृदयभावांशीं आहे. कोटी चांगल्या रीतीनें करितां येण्यास बुद्धि प्रगल्भ व संस्कृत असावी लागते. विनोद हा

अशिक्षित मनुष्येंही करूं शकतात. कोटीमध्यें नुसतें असंबद्धतादर्शनच नसतें, तर त्या असंबद्धतेचें स्वरूप नवीन कल्पना रचून व्यक्त करावें लागतें. विनोदास नवीन कल्पना अशी रचावयास लागत नाहीं. तर आहे त्या असंबद्ध स्थितीचेंच यथार्थ वर्णन दुसऱ्याचें लक्ष वेधेल अशा रीतीनें दिलें ह्मणजे झालें. कोटी करणाराची नजर श्रोत्यांकडे जितकी असते, त्यापेक्षां विनोदवचन रचणाराची नजर तिकडे अधिक असते. कोटी करणारा हा श्रोत्यास जणूं काय असंबद्धतेच्या खोल पाण्यांत ढकलून देऊन आपण कांठावर गंमत पाहत बसतो अशी जर कल्पना केली, तर विनोदी मनुष्य फक्त त्यासच न ढकलतां त्याच्या बरोबर आपणही असंबद्धतारूपी खोल पाण्यांत उडी घेतो व एकमेकांस गटंगळ्या देत व घेत ते दोघेही निमज्जनसुख अनुभवितात अशी कल्पना करणें बरोबर होईल. विनोदामध्यें हास्य बहुधा स्फुट असतें, कोटीमध्ये तें तितकें स्फुट नसतें. विनोदाचे प्रकार अनंत असतात, कोटीचे प्रकार बहुधा ठराविक असतात. विनोद हा एक उत्कृष्ट बहुरूपी आहे. याचे सोंग घेण्याचे प्रकार व विषय मनुष्यस्वभाव व लोकव्यवहार यांच्याइतके विस्तृत असतात. तो केव्हां गंभीर स्वरूप धारण करून एखाद्या कडक न्यायाधीशाप्रमाणें तुह्मांस शिक्षा करण्याचा बहाणा करील, तर केव्हां एखाद्या लडिवाळ मुलाप्रमाणें तुमच्या मिशा ओढून तुह्मांस हंसवील. त्याचा पेहराव एखादे वेळीं अगदीं ताज्या रूढीस धरून असेल, तर केव्हां हजारो वर्षांपूर्वीचा व तुह्मांस न ओळखतां येणारा असा असेल; परंतु त्याचा वेष, पेहराव किंवा बहाणा कसाही असला, तरी शेवटीं तो तुह्मांस खदखदां हंसविल्यावांचून रहाणार नाहीं. मेकॉले यानें आपल्या Addison वरील निबंधांत विनोदाचें वर्णन खालीलप्रमाणें दिलें आहे.

"What a wonderful thing is humour! How supple and delicate it is! How swift to seize every opportunity and yet how gentle! How true to facts of life and yet how merciful in what it conceals! How bold in its delineation of character, yet how tender to preserve our respect. It discovers and binds together things which would otherwise appear unrelated and disunited. It detects similarity where there seems only incongruity. It finds hidden analogies in the midst of difference. But it can also untwist and set in opposition to each other things which at first sight appear almost identical. It is as quick as any metaphysician in detecting distinctions and discrepancies disclose themselves merely by the force of its presence. Humour can turn the most cautious self-contained closed-up person inside out in the twinkling of an eye. It seizes *e. g.* upon a stone-headed bumpkin and under its magic touch, the poor lout opens to us his heart and tells us the simple truth about himself and all connected with him in his own quaint dialect, yet to a cross-examining lawyer he would be as irresponsive as the box in which he was standing."

(४८) कोटी व विनोद यांतील भेद सांगतांना विनोदाचा संबंध मनोभावांशीं विशेष असतो असें सांगण्यांत आलेलेंच आहे.

व या विधानाचा खुलासा केला असतां विनोदाचे स्वरूपाचाही खुलासा आपोआप होईल. विनोद या शब्दाचा धात्वर्थ जर पाहिला तर तो "घालवून देणारा" "हांकून देणारा" असा होतो. अर्थात्, शब्द बनविणाराचे मनांत 'काळजी घालवून देऊन आनंदमय भावाची जागृति करणें' हा जो विनोद पदार्थाचा गुण तो आला होता असें दिसतें. काळजीस मनांतून घालवून देण्याचें काम मनोभावांकडून जितकें होतें, तितकें तें बुद्धीकडून होऊं शकत नाहीं. इंग्रजींत विनोद यास जो शब्द आहे, त्याच्याही धात्वर्थाचा संबंध मनोभावांशींच आहे. Huomur ह्मणजे, ज्याच्या योगानें मनुष्याचा स्वभाव बनतो, असा शरीरांतर्गत एक द्रवस्वरूपी पदार्थः—(The ancient physicians believed that there were four humours—the blood, the phlegm, yellow bile or choler, and black bile or melancholy—on the relative proportion of which the temperament and health depended. —*Webster.*) यावरून संस्कृत विनोद किंवा इंग्रजी Humour यांचा बुद्धीपेक्षां स्वभावाशीं ह्मणजे मनोभावाशीं निकट संबंध येतो. विनोदाचा मनोभावाशीं संबंध आहे तर मग त्याची घटना एक किंवा अनेक भावांनीं होते? व तो एक किंवा ते अनेक मनोभाव कोणते? याचें उत्तर केवळ तर्कानें बनवितां येण्यासारखें नाहीं, तर विनोदाचा परिणाम जें हास्य त्याच्या स्वरूपावरून व विनोद—वचन—व्यवहाराचे प्रत्यक्ष अनुभवावरून ठरविलें पाहिजे. प्रथम एक गोष्ट सांगितली पाहिजे ती ही कीं, विनोदानें येणारें हास्य आणि लहान मुलें अगर रानटी लोक, किंवा सुधारलेल्या समाजापैकींच पण अज्ञ लोक यांचें हास्य, हीं भिन्न असतात. पहिल्यामध्यें मनःसंस्कृतीचा परिणाम दिसून येतो. दुसऱ्यांत तो दिसून येत नाहीं. हास्यध्वनि हा एक प्रकारचा गायनध्वनि आहे असें मानलें, तर विनोदी हास्यध्वनीची जाती कोमळ ठरेल, तीव्र ठरणार नाहीं; ह्मणजे ज्या मनोभावांचा परिणाम विनोदी हास्य हा होय, त्या मनोभावांत कोमलता असते, तीव्रता नसते. ही गोष्ट लक्षांत घेतली असतां विनोदी मनोभावांत नवरसांपैकीं कोणत्या रसांच्या स्थायीभावांचा समावेश होऊं शकेल व कोणते त्यांमध्यें येऊं शकणार नाहींत, हें तेव्हांच कळून येईल. उदाहरणार्थ, ज्याच्या मनांत खरोखर क्रोधरूपी मनोविकाराचा प्रादुर्भाव झाला असेल, त्याला विनोद सुचणार नाहीं; व रागावलेलीं मनुष्यें जरी कित्येक वेळां हांसतात, तरी त्यांतील भयंकरपणावरून, तें हास्य विनोदी नसून क्रोधजन्य आहे, असें तेव्हांच कळून येतें. तसेंच मत्सरग्रस्त, असूयाग्रस्त, लोभग्रस्त, दंभग्रस्त, इत्यादि प्रकारच्या मनुष्यांचे हातून खरा विनोद होणें शक्य नाहीं; व त्यांच्या हांसण्याच्या मुळाशीं असणाऱ्या 'तीव्र' मनोभावांची ओळख ऐकणारास तेव्हांच पटल्याशिवाय राहणार नाहीं. विनोदी हास्य ऐकतांच त्या हांसणाराच्या मनांत शांतता, खेळकरपणा, आनंद, सहिष्णुता, विचारीपणा, सात्त्विकपणा, उदारभावजागृति व ममता इत्यादि सर्व किंवा यांतील कांहीं तरी भाव मुख्यत्वेंकरून वसत आहेत, अशी ऐकणाराच्या मनाची खात्री होते; व विनोदाच्या अनेक विभावांच्या जाति लक्षांत घेतल्या असतां खऱ्या व अस्सल विनोदी माणसांत हे वर सांगितलेले गुणच असले पा-

हिजेत, हें कळून येणार आहे. 'हास्या'चें उत्क्रमण कसें होत गेलेलें आहे, याचा विचार करितांना विनोदी हास्य ही हास्याच्या उत्क्रमणस्थितींतील शेवटची पायरी होय, असें तत्ववेत्त्यांनीं ठरविलें आहे; व त्याचें इतकें सूक्ष्म (Specialised) स्वरूप झाल्याशिवाय वर सांगितलेल्या इतक्या गुणांचा संयुक्त परिणाम दाखविण्याची शक्ति अगर पात्रता विनोदी हास्याचे ठिकाणीं कशी येणार? या इतक्या निरनिराळ्या मनोभावांचा विनोदामध्यें परिणाम होण्यास बुद्धिशक्तीची किंवा कल्पना-शक्तीची जी मदत लागते, ती एवढ्यापुरती लागते कीं, मोठ्या प्रमाणांच्या किंवा अनेक जातींच्या अनेक पदार्थांचा क्षणमात्रांत सन्निकर्ष होऊन त्यापासून होणाऱ्या ज्ञानाचा व अनुभवाचा लाभ साररूपानें घेतां यावा. एका आधुनिक अनुभवाचें उदाहरण द्यावयाचें असल्यास तें असें देतां येईल कीं, 'फोटोग्राफ' काढण्याच्या पेटीच्या तोंडीं बसविलेल्या लहानशा भिंगांतून मोठमोठ्या व विस्तृत देखाव्यांचें प्रतिबिंब आंतील कांचेवर एका क्षणांत पडतें, परंतु त्या छायारूप प्रतिबिंबाचा उद्भेद किंवा विकास होण्यास, ह्मणजे छाया व प्रकाश यांच्या मिश्रणानें यथार्थ दर्शन होण्यास, रासायनिक द्रव्यांचा उपयोग करावा लागतो. त्याच प्रमाणें कोणत्याही वस्तु-स्थितीचें ज्ञान एकदा मनांत झालें, ह्मणजे मग वरील निरनिराळ्या मनोभावरूपी रसायनद्रव्याचे साहाय्यानें विनोदशक्ति असलेल्या मनुष्यास तें ज्ञान हास्योत्पादक करून दाखवितां येतें.

(४९) विनोदी मनुष्याची वस्तुस्थितीकडे पाहण्याची रीती एकच नसते; व यामुळें एकाच वस्तुस्थितीचे निरनिराळे भाग त्याचे दृष्टीस पडून त्याच वस्तूच्या निरनिराळ्या परंतु सर्वस्वी खऱ्या अशा स्वरूपाची त्यास प्रतीति होते. या निरनिराळ्या दृष्टींनीं पाहतांना त्यानें आपली तर्कशक्ति अगदीं बाजूस ठेवलेली असते असें मात्र नाहीं. किंवा त्याच्या हेतूंत आवेश, गंभीरता अथवा सत्यप्रियता उरत नाहीं असेंही नाहीं. जें काय होतें तें एवढेंच कीं, अशा प्रकारचे हेतु असूनही त्याच्या विचारावर एक प्रकारची खेळकरपणाची झांक येते. ज्या गोष्टी पाहून दुसऱ्या तिसऱ्या प्रकारच्या मनुष्यामध्यें क्रोध, दुःख किंवा असूया इत्यादि मनोविकार जागृत होतील, त्याच गोष्टी विनोदी मनु-ष्याचे नजरेस पडल्या असतां तो असें ह्मणून भागवितो कीं, "जाऊं दे, त्यांत काय आहे? हें असें असावयाचेंच; तसें नसेल तरच आश्चर्य. आपलें नफा नुकसान त्यापासून काय होणार आहे? व त्याकरतां आपण मनःसम-तेचें सुख घालवून विनाकारण तीव्र मनोवेगाचे आधीन का व्हावें? व त्यांतील असंबद्धता पाहून जी एक प्रकारची मौज वाटण्यासारखी आहे, तिच्या सुखास आपण काय ह्मणून आंचवावें? किंवा अनुभवविषयाची कींव येऊन त्याशीं सहानुभूति ठेवल्यानें जे एक प्रकारचे कोमल मनोभाव जागृत होऊं शकतील, त्यांच्या प्रती-तीचा आनंद कां व्यर्थ गमवावा?" तीव्र मनोवृ-त्तींच्या व विनोदी मनोवृत्तींच्या मनुष्यांत फरक पडतो तो हाच. दोघांसही परिस्थिति एकच असते, व तिजपासून होणारें हिताहित वस्तुतः दोघांसही सारखेंच असतें. तथापि व्यावहारिक फायदा कोणताच नसतां एकजण आपल्या मनोविकारांच्या तीव्रतेनें करपून जातो व दुसरा

आपल्या मनोविकारांच्या स्निग्धतेमुळें सुरक्षित राहतो; व इतकें असूनही विनोदी मनुष्याच्या हेतूंच्या आवेशास किंवा गंभीरतेस कमीपणा मुळींच येत नाहीं. ज्याच्यामुळें आपणास विनोदसुखाचा एक क्षण तरी अनुभवावयास सांपडला, अशा परिस्थितीविषयीं तो मनांत उलट एक प्रकारची कृतज्ञताच बाळगतो.

(९०) हास्यास्पद व हास्योत्पादक या दोन स्थिति भिन्न आहेत. हास्यास्पद गोष्टींमध्यें एक प्रकारचा वाईटपणा किंवा कमीपणा असतो. परंतु हास्योत्पादक गोष्टींत तसा वाईटपणा असत नाहीं. एकाच गोष्टीस हास्यास्पद आणि हास्योत्पादक अशीं दोन अंगें असूं शकतात. तीव्र मनोवृत्तीचीं माणसें जरी प्रसंगविशेषीं हांसतात, तरी तीं बहुधा वस्तुस्थितीच्या या दोन अंगांपैकीं हास्यास्पद अशा अंगाकडे पाहतात, व ह्मणून त्यांची मनोवृत्ति शुद्ध व सात्त्विक राहात नाहीं. परंतु, जीं विनोदी माणसें असतात, तीं वस्तुस्थितीच्या हास्योत्पादक अंगाकडेच होतां होई तों नजर देतात. व ह्मणून त्यांस दुःख न होतां एक प्रकारचें सुखच होतें, व प्रसंगाप्रमाणें, वर सांगितलेल्यापैकीं एक किंवा अनेक कोमल मनोविकारांचा परिणाम त्यांच्या वृत्तींत दिसून येतो. एखाद्या लहान मुलानें खोडी केली तर तीव्र मनोविकारांची आई त्याला मार देईल. परंतु, तीच तिच्या जागीं एखादी विनोदी आई असेल, तर ती स्वतः हांसेल व मुलासही हांसवून त्याच्या कृतीची असंबद्धता त्याच्या नजरेस आणून देईल. वर जे निरनिराळे मनोभाव विनोदी मनोवृत्तीस सहायभूत ह्मणून सांगितले, त्यांपैकीं एकाहून अधिक जरी हजर असले, तरी त्यांचा परिणाम एकसमयावच्छेदेंकरून होतो. ह्मणजे ज्याप्रमाणें स्वरसप्तकांतील वादी व संवादी सूर एकाच वेळीं निघाले असतां त्यापासून संयुक्त अशा फक्त एकाच सुरेल स्वराची प्रतीति आपणास होते, त्याचप्रमाणें विनोदांत वर सांगितलेले निरनिराळे मनोभाव जागृत असतांही त्यांचा एकच परिणाम दिसून येतो व तो विनोदी हास्य हा होय. नुसतें वाईट वाटणें किंवा नुसती गंमत वाटणें किंवा नुसता खेद होणें अशी एकेरी मनोवृत्ति लहान मुलांत व रानटी मनुष्यांत, ह्मणजे ज्यांचें अंतःकरण विकसित झालेलें नाहीं अशांत, दिसून येते. परंतु विनोदासारखी मिश्र मनोवृत्ति ज्यांचें हृदय विकास पावलें आहे, अशामध्येंच दिसून येते; मग तो विकास शिक्षणामुळें असो किंवा उपजत गुणामुळें असो. या मिश्रणाची मौज हीच आहे कीं, कोणताही एक मनोविकार दुसऱ्याशीं विसंवादी असा नसतो, व प्रत्येकाच्या थोडथोड्या अंशाचा त्यांत समावेश असतो. हें लक्षांत घेतलें ह्मणजे मग आपला बळी होमकुंडांत जळत असतां खदखदां हांसणारे रानटी लोक किंवा अचावचा बोलून मोठमोठ्यानें हांसणारीं व खिदळणारीं शिमग्यांतील मुलें यांच्या मनोवृत्तींस किंवा हांसण्यास विनोदी हें विशेषण कां लावूं नये; व तेंच, औषध न घेणाऱ्या एखाद्या हटवादी रोग्याची फजिती होण्यासारखें कांहीं अर्थचमत्कृतिपूर्ण व हास्यकारक असें भाषण करणाऱ्या वैद्याच्या मनोवृत्तीस किंवा हास्यास तेंच विशेषण यथार्थ रीतीनें कसें लावतां येईल, हें सहज समजण्यासारखें आहे.

(९१) या सर्वांहूनही विशेषतः सांगण्यासारखी एक गोष्ट आहे. ती ही कीं, विनोदी मनुष्य हा खरा

परोपकारकर्ता होय; व त्याच्या परोपकारकृतीची मौज अशी आहे कीं, तो स्वतः जरी एखादे वेळीं दुःखी, कष्टी अगर उदासवाणा असला, तरी तो आपलेंच दुःख उगाळीत न बसतां आपल्या विनोदशक्तीनें दुसऱ्यांवर उपकार करतो. त्याच्या स्वतःच्या हेतूंचा आवेश व गंभीरता हीं दुसऱ्यावर होणाऱ्या उपकाराच्या मार्गांत आडवीं येत नाहींत. आजपर्यंत जगांत होऊन गेलेले पुष्कळ प्रसिद्ध विनोदी लेखक व भाषणकार हे स्वतः पोक्त विचारी, गंभीर वृत्तीचे व आवेशयुक्त असे असतांही त्यांनीं जगांतील असंबद्ध गोष्टींच्या हास्योत्पादक आंगाकडेच लक्ष देऊन त्यांजविषयीं आपल्या लेखांनीं व भाषणांनीं सहानुभूतीच उत्पन्न केली. प्रख्यात विनोदी फ्रेंच गृहस्थ रॅबेले, डॉन क्विझोट या अद्भुत व हास्यकारक कादंबरीचा कर्ता सर्व्हेंटीस, प्रख्यात प्रहसनकार मोलियर, तसेच शेरिडिन, गोल्डस्मिथ वगैरे इंग्लिश विनोदी ग्रंथकार वरील सत्यसिद्धांताचींच उदाहरणें होत. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं आपल्या विनोदमहदाख्यायिकेंत खालील गोष्ट दिलेली आहे तीही वरील सिद्धांताचेंच समर्थन करिते:—"जे मनुष्य सदोदित रंगेल दिसतात व चार चौघांत आले ह्मणजे ज्यांच्या योगानें मंडळीस करमणूक होते व जे स्वतः उल्हासवृत्ति दिसतात, त्यांची पुष्कळ वेळां वस्तुतः कशी स्थिति असते,याविषयीं पुढील गोष्ट हें एक मोठें समर्पक उदाहरण आहे. कार्लिनी नांवाचा एक मोठा विख्यात नकल्या होता. तो कांहीं दिवस पारिस शहरांत येऊन राहिला व तेथें त्याची पुष्कळ कीर्ति झाली. एके दिवशीं असें झालें कीं, वरील शहरांतील एका प्रसिद्ध वैद्याकडे एक मनुष्य आला आणि सांगूं लागला कीं, वैद्यबोवा! माझें चित्त वारंवार उदास होतें व मला कांहीं नकोसें वाटतें; व अशी वृत्ति झाली ह्मणजे मला पराकाष्ठेचा त्रास येतो. तर जेणेंकरून माझ्या जिवाला हुषारी वाटेल व माझी वृत्ति उल्हसित होत जाईल, असा कांहीं उपाय कृपा करून मला सांगा. वैद्य ह्मणाला, बाबारे! या तुझ्या विलक्षण रोगाला एकच औषध दिसतें. तें हें कीं, तूं एकलकोंडेपणानें न राहतां चारचौघां रंगेल मंडळींत जात जा; आणि त्यांतूनही कार्लेनी नांवाचा एक विख्यात नट येथें आला आहे, त्याच्या नकला पाहत जा. त्या पाहिल्या असतां तुझा कसलाही उदासपणा असला तरी तो पार निघून जाईल. रोगी उत्तर करतो, महाराज काय सांगावें? ज्या कार्लेनीची तुह्मी एवढी तारीफ करतां, तोच खुद्द मी आहें. मी साऱ्या पारीस शहरास खो खो हांसवितों खरा, पण माझी स्वतःची स्थिति पुसाल तर माझ्यासारखा उदास व दुःखी प्राणी नसेल." वरील उदाहरणांतील कार्लेनी हा फक्त नकल्या होता, ह्मणजे स्वतः विनोद करण्याचें सामर्थ्य त्याजमध्यें होतें किंवा नाहीं, याविषयीं कोणी शंका काढतील. परंतु, शेरिडन हा तरी स्वतः विनोदी लेखक होता, हें प्रसिद्ध आहे. पण तो फारच थोड्या वेळां हांसत असे, असें त्याजविषयीं सांगतात.

(९२) वरील सर्व विवेचनावरून विनोदाचा मनोभावाशीं कसा निकट संबंध असतो, हें दिसून येईल. विनोदवचन हें कोटी किंवा चतुरालाप याप्रमाणें बहुधा थोडक्या शब्दांत संगृहीत करतां येत नाहीं, मात्र शब्दरचना विस्तृत असली तरी तिजमध्यें एक प्रकारचें औचित्य हें असतेंच. ह्मणजे जरी कोटीप्रमाणें विनोदाचें सार एकेरी कल्पनेंत सहसा ग्रथित असत नाहीं, व विनोददर्शन हें परिस्थितीचे वर्णनावर अवलंबून असल्यामुळें शब्दविस्तार हा विनोदाचा पोषकच होतो, तथापि औचित्यविचार बरोबर पा-

ळला गेला नाहीं तर हास्यरसाचा भंग किंवा अपकर्ष होण्याचा संभव असतो. सारांश किंवा मतलब एकच असून तोच अशा दोन रीतींनीं सांगतां येणें शक्य आहे कीं, त्यांपैकीं एका रीतीनें तें विनोद्वचन होईल व दुसऱ्या रीतीनें तीच भाकडकथा होऊन त्यापासून हास्यनिष्पत्ति होणार नाहीं. हा शब्दाच्या औचित्याचा विचार कोटीस व चतुरालापास सारखाच लागू आहे; परंतु शब्दविस्तारामध्यें फरक पडण्याचें कारण हेंच कीं, कोटीमध्यें फक्त दोन पदार्थांच्या कल्पनांचा अकल्पित किंवा अनपेक्षित संबंध जोडलेला असतो, व विनोदवचनामध्यें हास्योत्पत्ति होणें ती असंबद्धतेचा प्रकार किंवा परिस्थिति ही जितकी अधिक खुलवून सांगावी तितका विनोद अधिक खुलतो. कोटीचें पर्यवसान एकेरी कल्पनेंत होत असल्यामुळें तिचा शब्दविस्तार फार होत नाहीं. नाटकांतून किंवा विनोदी कादंबऱ्यांतून कित्येक वेळां सर्व प्रवेशच्या प्रवेश किंवा पॅरेग्राफच्या पॅरेग्राफ वास्तविक एकाच विनोदी कल्पनेच्या उद्देदास आवश्यक असतात, हें प्रसिद्धच आहे. समजुतीचा घोटाळा, किंवा लोकविपरीत मनुष्यस्वभावदर्शन वगैरे विभावस्थलांच्या योगानें हास्यरसास उद्दीपन आणावयाचें असल्यास विनोदवचन थोड्याशा शब्दांनीं मांडणें शक्य नसतें. एवढेंच नव्हे, तर अशा वेळीं जितका शब्दविस्तार जास्त, तितका विनोद अधिक खुलेल, हें उघड आहे.

(९२) कोटीप्रमाणेंच विनोदवचनाची आमची कल्पना काय आहे हें दाखविण्याकरितां खालील एक दोन उदाहरणें पुरे होतील.

(१) उष्ट्राणां च गृहे लग्नं गर्दभाः शांतिपाठकाः
परस्परं प्रशंसंति अहो रूपं अहो ध्वनिः॥

उंटाच्या घरीं लग्न निघालें तेव्हां शांतिपाठकाचें काम कोणाकडे गेलें?--तर गाढवाकडे. मग ते एकमेकांची स्तुति करूं लागले; एक ह्मणतो " काय हो, किती हें सुंदर रूप!" तर दुसरा ह्मणतो " काय हो, किती हा सुंदर व गोड तरी तुमचा आवाज!"

(२) निर्मितुः सुदतीमजो विरचिते वक्रे शशिभ्रांतितः कोशीभूतनिजांबुजासनमधिष्ठातुं न शक्तो विधिः।
मध्यं विस्मृतवान् कुचौ च कठिनौ पीनौ नितंबौ कचान्
वक्रान् निर्मितवान् मतिः स्फुरति हि स्वस्थे नृणां चेतसि॥

याचा अर्थ—ब्रह्मदेवानें या सुदतीस जेव्हां निर्माण केली, त्या वेळेस प्रथम मुख बनविलें. त्या योगानें कमलांना चंद्रोदय झाला असें वाटून तीं मिटूं लागलीं; परंतु कमल हेंच पडलें ब्रह्मदेवाचें आसन व त्या आसनाचा संकोच होऊं लागल्या कारणानें त्याला त्यावर बसतां येईनासें झालें. तेव्हां गडबडीनें बाकीची देहरचना करितांना स्तन व नितंब हे कठिण व स्थूल असेच ओबडधोबड राहिले गेले. केंस कुरळ व वांकडे होते ते सरळ करावयाला झालेंच नाहीं. आणि कंबर करावयाची ती तर तो मुळींच विसरून गेला. तात्पर्य काय कीं, स्वस्थपणा असावा तेव्हांच कांहीं गोष्ट झाली तरी करायला सुचते घाईघाईनें केलेलीं कामें हीं अशींच व्हावयाचीं!" या ठिकाणीं सकृद्दर्शनीं देहरचनेस गडबड होऊन ती नीट झाली नाहीं असें बोलण्याची ऐट असून या देहरचनेंत जीं दोषस्थळें ह्मणून दाखविलीं तीं खरोखर सौन्दर्यस्थळें आहेत व सौन्दर्य वर्णन करण्याचाच कवीचा हेतु आहे. आणि या अर्थचमत्कृतीचा शेवट "मतिः स्फुरति हि स्वस्थे नृणां चेतसि" या व्याजनिंदात्मक विनोदपूर्ण वचनांत आहे. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं विनोद व महादाख्यायिका या सदराखालीं ज्या हास्यरसपर लहानमोठ्या गोष्टी दिल्या आहेत, त्यांत आमच्या

मतें विनोदवचनाचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. या गोष्टी बहुतेक वाचकांच्या नजरेखालून गेल्याच असतील. यास्तव त्यांपैकीं निवडक गोष्टी देखील या ठिकाणीं देण्याचें कारण नाहीं. शिवाय हास्यरसाचे विवेचनांत आह्मांस पुढें उदाहरणें द्यावयाचीं आहेत त्यांत विनोदाचीं उदाहरणें आहेतच. तसेंच या निबंधाचे अखेर मराठी, संस्कृत व इंग्रजी हास्यरसात्मक वाङ्मयाचें आह्मी थोडक्यांत समालोचन करणार आहों तेव्हां हीं विनोदवचनांचीं उदाहरणें हुडकलीं असतां कोठें सांपडतील हेंही कळून येणार आहे. सबब या ठिकाणीं स्वतंत्र रीतीनें उदाहरणें देऊन खुलासा केला नाहीं.

(५४) हास्यरस—येथवर सुभाषित, श्लेष, कोटी किंवा चतुरालाप, व विनोदवचन यांजविषयीं थोडेंबहुत विवेचन करण्यांत आलें. आतां यापुढें या सर्वांचा मूलाधार जो हास्यरस त्याचें विवेचन करण्याचें आह्मीं योजिलें आहे. कारण वरील सर्व प्रकारांची मीमांसा हास्यरसाचा विचार केल्याशिवाय परिपूर्ण होणार नाहीं. इंग्रजी साहित्यग्रंथांत हास्याचें 'रस' या दृष्टीनें विवेचन नाहीं. हास्यरसाचें पद्धतशीर विवेचन संस्कृत साहित्यशास्त्रांतच आहे. इतर रसांच्या मानानें याकडे जरा कमी लक्ष दिलेलें आहे. तथापि इतर रसांप्रमाणें याचीं अंगें उपांगें, भाव विभाव वगैरे सर्व कांहीं दिलेले आहेत. संस्कृत ग्रंथकारांनीं हास्यरसावर 'पुरुष'त्वाचा अध्यारोप केलेला आहे. त्याचा वर्ण 'श्वेत' कल्पिलेला असून 'प्रमथ' नांवाची देवता या रसावर अधिराज्य करिते, असा साहित्यशास्त्रकारांचा एक संकेत आहे. हास्यरसाचा स्थायिभाव 'हास' हा आहे. त्याचा विभाव ह्मणजे उत्पत्तिकारण वस्तुमात्रांतील 'विकार किंवा विपरीतत्व किंवा व्यंगदर्शन, परचेष्टानुकरण, असंबद्ध प्रलाप, पौरोभाग्य' (फाजिलपणा) वगैरे असून, ओंठ, नाक व कपोलप्रांत यांचें स्पंदन होणें, दृष्टीचा व्याकोश होणें, पोट धरून हांसणें वगैरे त्याचे 'अनुभाव' आहेत. तसेंच अवहित्था ह्मणजे अर्थगोपन, आलस्य, निद्रा, तंद्रा, स्वप्न वगैरे हास्याचे व्यभिचारिभाव मानिलेले आहेत. हास्य दोन प्रकारचें आहे. एक आत्मस्थ व दुसरें परस्थ. ज्या वेळीं मनुष्य स्वतः हांसतो, त्या वेळीं त्यास 'आत्मस्थ हास' ह्मणतात, व ज्या वेळीं दुसऱ्यास तो हांसवितो त्या वेळीं त्यास 'परस्थ हास' असें ह्मणतात. हास्याचे दुसरे रीतीनें सहा भेद केलेले आहेत. ते असेः—१ स्मित, २ हसित, ३ विहसित, ४ उपहसित, ५ अपहसित, ६ अतिहसित. पैकीं स्मित व हसित हे प्रकार श्रेष्ठ लोकांना योग्य आहेत; विहसित व उपहसित हे मध्यम प्रकारचे मानले असून ते मध्यम दर्जाचे लोकांना युक्त आहेत; व अपहसित व अतिहसित हे दोन प्रकारचे हास अधम मानिलेले आहेत. साहित्यशास्त्रांत या प्रत्येक प्रकारच्या हासाचें निरनिराळें वर्णन दिलेलें आहे. तें असेंः—जेव्हां गालास किंचित् फुगवटी येते, नयन किंचित् विकास पावतात, खालचा ओंठ किंचित् स्फुरण पावतो, दंतपंक्ति दिसून येत नाहीं, दृष्टि किंचित् कटाक्षयुक्त होते आणि या सर्वांमुळें चेहऱ्यास एक प्रकारचें माधुर्य येतें, अशा हासास स्मित ह्मणतात. ज्या हासामुळें डोळे, तोंड व गाल हे उत्फुल्ल ह्मणजे फुललेले दिसतात व दंतपंक्ति किंचित् दृष्टीस पडते, तेव्हां त्यास हसित ही संज्ञा आहे. विहसितामध्यें हास्यक्रिया सशब्द होते ह्मणजे ऐकूं येते, व डोळे किंचित् आकुंचित होतात. उपहसितामध्यें नाकपुड्या उत्फुल्ल होतात—ह्मणजे फुगतात, व डोकें व खांदे निकुंचित होऊन दृष्टि किंचित् 'जिह्म' (वक्र) होते. ज्या हासामुळें दृष्टि 'साश्रु' होते, ह्मणजे

डोळ्यांत पाणी उभें राहतें, व डोकें आणि खांदे हे स्पष्ट हालतात, त्यास अपहसित असें ह्मणतात. व अतिहसितांत हास्याचे सर्व परिणाम अतिशयच स्फुट होतात, ह्मणजे डोळे पाण्यानें भरून जातात व मनुष्य पोट* धरधरून हांसतो. हास्याचे अभिनयास योग्य दृष्टि ह्मटली ह्मणजे 'हास्या' या नांवाची आहे, असें नाट्यशास्त्रांत सांगितलें आहे.

हास्यरसाचीं संस्कृत वाङ्मयांतील उदाहरणें मुख्यतः भाण व प्रहसन या नाटकांचे प्रकारांत दिसून येतात. पैकीं भाणामध्यें हास्य हा प्रधान रस नसतो; तथापि विट वगैरे पात्रांच्या 'निपुण' भाषणावरून व 'धूर्त' चरित्रासारख्या मौजेच्या वृत्तांतांतून हास्यरस प्रगट होतो. प्रहसनांत मात्र हास्यरस हाच प्रधान असतो. व तो 'पाषंड' 'कुट्टीनी' (कुंटीण) वगैरे प्रकारच्या नीच पात्रांच्या भाषणांतून प्रगट होतो. अव्वल दर्जाच्या नाटकांतून किंवा प्रकरणांतूनही हास्यरस आढळत नाहीं असें नाहीं. परंतु तो त्या ठिकाणीं गौण रूपानें वसत असून विदूषक, शकार वगैरे कनिष्ठ प्रतीच्या पात्रांचे भाषणांत असतो, व त्याचें कार्य शृंगारादिक मुख्य रसांचा परिपोष करण्याचें असतें असें साहित्यशास्त्रकार मानितात.

(९९) हास्यरसाचीं कांहीं निवडक उदाहरणें संस्कृत वाङ्मयांतून हुडकून काढिलेलीं पुढें आह्मी देणार आहोंत. परंतु साहित्यशास्त्रकारांनीं या रसाचें वर्णन करितांना जीं उदाहरणें दिलेलीं आहेत, तीं त्या वर्गांतील उत्तम किंवा मासलेवाईक अशा समजुतीनेंच दिलेलीं असल्यामुळें, त्यावरून उत्तम प्रकारच्या हास्यरसाच्या स्वरूपाची त्यांची कल्पना काय होती हें त्याजवरून कळून येण्यासारखें आहे, ह्मणून तीं खालीं देतों. साहित्यदर्पणांत हास्यरसाचें उदाहरण ह्मणून खालील श्लोक दिलेला आहे:—

गुरोर्गिरः पंच दिनान्यधीत्य वेदांतशास्त्राणि दिनत्रयं च
अमी समाघ्राय च तर्कवादान् समागताः कुक्कुटमिश्रपादाः॥

"हे पहा आले कोंबडाचार्य! यांनीं काय ह्मणे गुरूजवळ पांच दिवस अभ्यास केला आहे, वेदांतशास्त्र सबंद तीन दिवस वाचलें आहे व तर्कवादाचा तर, ज्याप्रमाणें फुलाचा दुरून वास घेतात त्याप्रमाणें, वास घेतलेला आहे." रसगंगाधरांत खालील उदाहरण आहे:—

श्रीतातपादैर्विहिते निबंधे निरूपिता नूतनयुक्तिरेषा
अंगं गवां पूर्वमहो पवित्रं न वा कथं रासभधर्मपत्न्याः॥

"आमच्या वडिलांनीं केलेल्या ग्रंथांत एक नूतन कोटी दिलेली आहे, ती अशी:—आजपर्यंत गाईचें अंग पवित्र मानीत असत; पण 'रासभधर्मपत्नी' अर्थात् गाढवी इचेंही अंग पवित्र कां मानूं नये?" खालील उदाहरण काव्यप्रकाशांतील आहे:—

आकुंच्य पाणिमशुचिं मम मूर्ध्नि वेश्या
मंत्रांभसां प्रतिपदं पृषतैः पवित्रे।
तारस्वनं प्रथितथूत्कमदात्प्रहारं
हाहा हतोऽहमिति रोदिति विष्णुशर्मा॥

याचें तात्पर्य:—विष्णुशर्मा नांवाच्या दुराचारी विद्वान् ब्राह्मणाची कोणी एक मनुष्य थट्टा करितांना ह्मणतो:—"काय गंमत आहे पहा. विष्णुशर्मा हायरे हाय असें ह्मणून रडत होता, व तो तोंडानें ह्मणत होता कीं ज्या माझ्या डोक्यावर आपोहिष्ठादि मंत्रांनीं पवित्र केलेले तीर्थोदकाचे थेंब प्रत्येक शब्दागणिक पडले, अशा या सुसंस्कृत मस्तकावर या वेश्येनें आपल्या अपवित्र हाताची मूठ वळून आवाज निघण्यासारखे दणके कीं हो दिले!" मंदारमरंदचंपूमध्यें खालील उदाहरणें दिलेलीं आहेत:—

* Laughter holding both his sides.
—*Milton.*

"लेखिनीं इत इतो विलोकयन् कुत्र कुत्र न जगाम पद्मभूः
तां पुनःश्रवणसीमसंगतां प्राप्य नम्रवदनः स्मितं दधौ" ॥

"कानावर ठेवली लेखणी आणि इकडे तिकडे खूप हुडकूं लागला, आणि शेवटीं पाहतो तों ती कानावरच मिळाली; असें पाहून 'पद्मभू' (?) नें मान खालीं घातली व त्याला हसूं आलें." तसेंच सुभाषितरत्नभांडागारामध्यें जीं हास्यरसाचीं उदाहरणें दिलेलीं आहेत, त्यांतील कांहीं निवडक अशीं खालीं देतों:—

जिव्हायाश्छेदनं नास्ति न तालुपतनाद्भयं
निर्विशेषेण वक्तव्यं निर्लज्जः कोन पंडितः ॥

"जीभ तुटून पडत नाहीं, डोकें फुटत नाहीं, मग वाटेल तें बोलण्यास काय हरकत आहे? निर्लज्जास पंडित बनण्यास उशीर काय?"

परान्नं प्राप्य दुर्बुद्धे मा प्राणेषु दयां कुरु
दुर्लभानि परान्नानि प्राणा जन्मनि जन्मनि ॥

याचा अर्थ सर्वांस माहित आहेच, तो लिहिण्याचें कारण नाहीं.

पूर्वं चेटी ततो वेटी पश्चात् भवति कुट्टिनी
सर्वोपायपरिभ्रष्टा वेश्या भवति तापसी ॥

हाही श्लोक बहुधा सर्वांस माहीत आहेच.

सामगायनपूतं मे नोच्छिष्टमधरं कुरु
उत्कंठितासि चेत् भद्रे वामं कर्णं दशस्व मे ।

कोणी एक वेदाभ्यासजड, व अरसिक असा भट एका प्रमदेस ह्मणतोः-"हे भद्रे! हे माझे ओठ सामवेदाचें गायन करकरून पवित्र होऊन बसलेले आहेत. त्यांना कां बरें उगीच उष्टे करितेस? तुझ्या ओठांना राहवत नसेलच तर हा माझा डावा कान चाव कसा."

बिलाद्बहिर्बिलस्यांतःस्थितमार्जारसर्पयोः
मध्ये चाखुरिवाभाति पत्नीद्वययुतो नरः ॥

"बिळांत साप आणि बिळाबाहेर मांजर अशा या संकटांत सांपडलेल्या उंदराप्रमाणें दोन बायकांच्या दादल्याची गत होते."

सदा वक्रः सदा क्रूरः सदा पूजांमपेक्षते
कन्याराशिस्थितो नित्यं जामाता दशमो ग्रहः ॥

"जांवई ह्मणजे दहावा ग्रहच आहे. तो सदा वक्र व क्रूर असून बसल्या उठल्या त्याची पूजा करावयास पाहिजे. बरें, इतकें असूनही तो 'कन्या' राशीहून कधीं सुटत नाहीं तो नाहींच."

उपभुक्तखदिरवीटकजनिताधररागभंगभयात्
पितरि मृतेऽपि हि वेश्या रोदिति हा तात तातेति ॥

"वेश्येचा बाप जरी मेला असला तरी हे 'पित्या' असें ह्मणून ती कधींही शोक करावयाची नाहीं. तर हे 'ताता' असेंच ह्मणेल. कारण पित्या यांतील प हा वर्ण ओष्ठ्य आहे व तो उच्चारला तर विडा खाऊन ओंठाला आलेली लाली ओंठावर ओंठ घासून कदाचित् नाहींशी व्हावयाची! तेंच हे ताता असें ह्मटलें ह्मणजे तशी भीति राहत नाहीं. कारण त हा वर्ण दंत्य आहे व तो उच्चारतांना ओठ मिटण्याचा संभव नाहीं."

श्रमणः श्रावकवध्वाः सुरतविधौ दशति नाधरं दन्तै
मदिराक्षि मांसभक्षणमस्मत्समये निषिद्धमिति ॥

कोणी एक विनोदी गृहस्थ श्रावक—पंथी मनुष्याची (ह्मणजे अहिंसा हाच परम धर्म मानल्यामळें मांसभक्षण निषिद्ध मानणाऱ्याची) थट्टा करून ह्मणतोः—श्रावक हा प्रेमप्रसंगींही स्त्रीचें चुंबन घेत नाहीं; कारण ओंठास दांत लागल्यानें कदाचित् मांसभक्षणाचा दोष लागावयाचा!

आपांडुराः शिरासिजास्त्रिवली कपोले
दंतावलिर्विगलिता न च मे विषादः ।
एणीदृशो युवतयः पथि मां विलोक्य
तातेति भाषणपराः खलु वज्रपातः ॥

कोणी एक रंगेल वृद्ध मनुष्य ह्मणतो—"काय करावें ! डोक्याचे केंस पांढरे झाले, गालावर सुरकुत्या आल्या, दांत पडले, परंतु या सर्वांचें मला कांहीं वाईट वाटत नाहीं. परंतु रस्त्यानें चाललों असतां हरिणनयना तरुण स्त्रिया—ह्मातारे बाबा कुठें चाललां ?—ह्मणून विचारतात, त्याचें दुःख काय सांगूं ? डोक्यावर वज्रप्रहार झाल्यासारखा वाटतो हो ! "

(९६) हास्यरसाचा परामर्ष संस्कृत साहित्यशास्त्रांत घेतलेला आहे. तथापि इतर रसांचे मानानें पाहतां या रसास कमी महत्त्व दिलेलें आहे. संस्कृत वाङ्मयांत सर्व भर बहुधा श्रृंगाररसावर, व जुन्या मराठी वाङ्मयांत सर्व भर शांतरसावर. संस्कृतांत काव्य आणि श्रृंगार यांची बहुधा समव्याप्ति आहे असेंच ह्मटलें तरी चालेल. नवरसांच्या अनुक्रमांत श्रृंगार हा प्रथमपदीं विराजमान झालेला आहे, व साहित्यशास्त्रांत दिलेला सर्व रसांचा अनुक्रम केवळ महत्त्वाचे दृष्टीनेंच दिलेला आहे असें ह्मणण्यास जरी सबळ आधार नाहीं, तरी पण हें जें श्रृंगाररसास प्रथम पद मिळालेलें आहे तें केवळ यदृच्छेनेंच मिळालें असेल असें नाहीं[१]. सुभाषितरत्नभांडागारांत संस्कृत वाङ्मयांतील सर्व तऱ्हेच्या पद्यांचा यथाप्रमाण समावेश केलेला आहे असें घेऊन चाललें असतां श्रृंगाराच्या महत्त्वाची कल्पना येते. भांडागारांत श्रृंगाररसास अंगें व उपांगें यांसह मिळून सुमारें १८८ पृष्ठें— ह्मणजे हजारों पद्यें दिलीं आहेत. परंतु तेंच हास्यरसास फक्त ९६ श्लोकांत रजा मिळाली आहे, वीररसास ९१ व करुणास ४१ श्लोक दिलेले आहेत. यावरून श्रृंगारास दिलेलें फाजील महत्त्व दिसून येईल. श्रृंगाररसास प्रधान रस मानण्याची प्रवृत्ति इतकी कांहीं वाढलेली आहे कीं, " स एवैको रसः " या श्रुतिवचनाचा अर्थ साहित्यशास्त्रदृष्ट्या लावतांना नानाविध रसांचा लय एकाच रसांत झाला पाहिजे असें प्रथमतः ठरवून तो एक रस ह्मणजे शृंगारच असा या श्रुतीचा भावार्थ आहे, असेंही कित्येकांनीं सुचविलें आहे. मात्र श्रृंगाररसांत इतर रसांचा लय खरोखर कसा होऊं शकेल हें सयुक्तिक रीतीनें कोठें दाखविलें आहे असें आढळून येत नाहीं. आंता कित्येक लोक असें ह्मणतील कीं, मानवसृष्टीची परंपरा चालण्यास रतिभाव हा अवश्य आहे, व रतिभाव हा ज्याचा स्थायिभाव आहे असा रस श्रृंगार. यावरूनच श्रृंगारास प्रथम पद आलें पाहिजे. परंतु ही कोटि व्यर्थ होय. कारण मानवी सृष्टीची परंपरा चालण्यास ह्मणजे प्रजोत्पत्ति होण्यास जसा रतिभाव अवश्य आहे, त्याचप्रमाणें प्रजासंरक्षणास 'वात्सल्य' भाव अवश्य पाहिजे. प्रजोत्पत्ति होऊनही प्रजासंगोपन न होईल तर सृष्टिपरंपरा चालणारच नाहीं[१]. प्रजापरिपालनाचें महत्कार्य सिद्ध होण्यास रतिभावाची कांहींच मदत होऊं शकत नाहीं, एवढेंच नव्हे तर स्त्रीपुरुषविषयक प्रीतीपासून क्वचित् अपत्यलालसेला विरोधही होतो[२]. परंतु एकंदरीनें अपत्यप्रेम किंवा वात्सल्य हेंच अधिक बलवत्तर होऊन त्याचे योगानें सृष्टिक्रम चालण्यास मुख्य मदत होते. या दृष्टीनें पाहतां वत्सलरसास श्रृंगाराहून अधिक महत्त्व येतें; व त्याचा समावेश कित्येकांनीं दशम स्थानीं जो

१ ह्मता जो सरसावला नवरसां माझारि श्रृंगारसा. (नलदमयंती) रघुनाथ पंडित.

१ Prof. Drummond's Ascent of Man या पुस्तकांत या मुद्याची उत्तम तऱ्हेची चर्चा केलेली आहे.

(२) या संबंधानें फ्रान्स वगैरे देशांत किती अनर्थ होतात व लोकसंख्येचे वाढीसही कसा धक्का बसला आहे हें प्रसिद्धच आहे.

केला आहे तो त्याहून अलीकडे करावा लागेल. इतर कित्येकांचे मतें श्रृंगारास प्रथम स्थान दिलेलें आहे त्याचें कारण असें कीं, तो सर्व सजीव सृष्टीला साधारण असा आहे; हास्यरसासारखा फक्त मनुष्यप्राण्यासच दिलेला नाहीं. परंतु रसाचें महत्त्व सर्व सजीव सृष्टीसंबंधानें पाहावयाचें नाहीं, तर त्या सर्व सजीव सृष्टीमध्यें अग्रस्थानीं विराजमान झालेला जो मनुष्यप्राणी त्याचे संबंधानें ठरवावयाचें असतें. उदाहरणार्थ, हास्यरस हा बहुधा फक्त मनुष्यजातीसच दिलेला आहे, इतर प्राण्यांस दिलेला नाहीं, व ज्याप्रमाणें इतर सृष्टीस वगळून मनुष्यास दिलेली बुद्धि ही श्रेष्ठ त्याचप्रमाणें त्याच कारणाकरितां हास्यरस हाही श्रेष्ठ मानावा लागतो; व सर्वसाधारण असा जो श्रृंगार त्यास कमी दर्जाचें स्थान येतें. रसविचार किंवा साहित्यशास्त्र हीं जर फक्त मानवी प्राण्यांनींच केलेलीं आहेत व त्यांनाच जर त्यांचा आस्वाद घेतां येतो, तर फक्त त्यांचे ठायींच असणारा अनन्यसाधारण असा जो हास्यरस त्यासच त्या रसविचारांत किंवा साहित्यशास्त्रांत अग्रस्थान देण्याचें कोणी मनांत आणलें तर तें अगदींच वावगें होणार नाहीं. दुसराही एक आक्षेप आहे तो असा कीं, मनुष्यमात्राचे रचनेंत श्रृंगाररससंबंधीं जसें विवक्षित व प्रगट इंद्रिय असतें, तसें इतर रसासंबंधीं अशा प्रकारचें इंद्रिय मानवशरीररचनेंत नाहीं, व ह्मणून श्रृंगाररस इतरांहून श्रेष्ठ, याही कोटींत कांहीं अर्थ नाहीं. मन हें एक मानवी इंद्रियच आहे. एवढेंच नव्हे तर तें सर्वांत श्रेष्ठ इंद्रिय आहे, व त्यासच हास्यरसाचें इंद्रिय ह्मणतां येईल. “आहारनिद्राभयमैथुनं च सामान्यमेतत्पशुभिर्नराणां” इ. या सर्वमान्य वचनांत इतर सर्व इंद्रियांचे क्रियेपेक्षां मन हें जें इंद्रिय त्यासंबंधींच्या क्रियेस अधिक महत्त्व दिलेलें आहे हें उघड दिसतें. दुसऱ्या एका बाजूनें विचार करितांना असें दिसून येईल कीं, श्रृंगाराचा अनुभव मनुष्यमात्रास फक्त नियमित काळपर्यंत घेतां येतो. परंतु हास्यप्रमुख इतर कित्येक रसांच्या अनुभवाची जीविताशीं व्याप्ति अधिक आहे. नऊ किंवा दहा रसांत जर खरोखरच महत्त्वाचे दृष्टीनें अनुक्रम लावावयाचा असेल, तर हास्य व करुण हे रस प्रथम येतील; त्यानंतर वीररस येईल; नंतर वत्सलरस; त्यानंतर श्रृंगार; व त्यानंतर अद्भुत, रौद्र, बीभत्स, भयानक वगैरे येतील. मनुष्यमात्राचे जीवितक्रमांत येणाऱ्या भावजागृतीचे प्रसंगाचे दृष्टीनें पहा, किंवा त्याला होणाऱ्या आनंदाचे किंवा उपयोगाचे दृष्टीनें पहा, हास्य, करुण व वीर या तीनही रसांस श्रृंगारापेक्षां अधिक महत्त्व येईल. कारण हास्य व शोक यांतच बहुधा मनुष्यमात्राचा अनुभव वांटून गेलेला असतो. ज्यापासून आनंद उत्पन्न होईल अशा वस्तु मिळविणें व ज्यांपासून दुःख होईल अशा गोष्टी टाळणें यांतच मनुष्यमात्राची सर्व प्रवृत्ति गुंग होऊन गेलेली असते; व ही प्रवृत्ति विजयी होण्यास ज्याचा स्थायिभाव ‘उत्साह’ आहे अशा वीररसाची नेहमीं मदत लागते. सुख किंवा आनंद व्हावा, हास्याच्या अनेक प्रकारांपैकीं कोणतें तरी एखादे प्रकारचें हास्य उत्पन्न व्हावें, व दुःख किंवा करुणरसानुभव टळावा, याकरितां मनुष्यप्राणी सदैव उद्योग करीत असतो; व या दोन्हीही गोष्टी साधण्यास त्यास वीररसाचा अनुभव प्रथम घ्यावा लागतो—ह्मणजे अंगीं उत्साह आणावा लागतो. वीररस केवळ योद्धे लोक किंवा समरांगणावरील लढाई यांसच लागू आहे असें नाहीं, तर नेहमींच्या व्यवहारामध्यें सुद्धां वीररसाचा आविर्भाव मनुष्यमात्रामध्यें दिसून येतो. श्रृंगाररसास्वाद फक्त आयुष्याच्या कांहीं

स्थितींतच घेतां येतो. तशी करुण व हास्य यांची गोष्ट नाहीं. उदाहरणार्थ, शृंगाररसात्मक काव्याची गोडी मनुष्याचे बाळपणीं किंवा वृद्धपणीं घेतां येत नाहीं. शृंगारिक मनोभावांची जागृति फक्त तरुणपणींच होऊं शकते व भावजागृति जोंपर्यंत हृदयांत होऊं शकते, तोंपर्यंतच तत्संबंधीं रसांची गोडी अनुभविण्यास मनुष्य पात्र असतो. करुण व हास्य रस यांचा अनुभव मात्र मनुष्याच्या तीनही स्थितींत—ह्मणजे बाळपण, तारुण्य व वृद्धावस्था यांमध्यें घेतां येतो. लहान मुलें हास्यरसात्मक गोष्टी वाचून हंसतात व करुणरसात्मक गोष्टी वाचून रडतात हें आपण नेहमीं पाहतों. वृद्ध मनुष्यें करुणरसास तर अत्यंत प्रवण असतातच, परंतु आनंदी व थट्टेबाज असे ह्मातारेही पुष्कळ असतात. भयानक, रौद्र, अद्भुत वगैरे रसांचा अनुभव घेण्यास वरील प्रकारच्या मर्यादा नाहींत; परंतु त्या रसांचा अनुभव फार क्वचित् प्रसंगीं येतो. परंतु हास्य व करुण रस यांचा अनुभव बहुधा पावलोपावलीं येतो असें ह्मणण्यास हरकत नाहीं. या रसांचा अंमल लहान थोर, श्रीमान् गरीब व सर्व वयाच्या व सर्व स्थितींच्या लोकांवर कायमचा असतो. करुण व हास्य या रसांमध्येंही सापेक्ष दृष्टीनें पाहिलें तर करुणरसापेक्षां हास्यरसाचाच अनुभव मनुष्यास अधिक येतो. करुणरसानें हृदय आर्द्र होण्यास कांहीं विवक्षित इयत्तेची हानीच व्हावी लागते; व ती हानि स्वतःस प्रिय अशा वस्तूचीच व्हावी लागते. दुसऱ्याची हानि पाहूनही वाईट वाटणारे लोक जगांत असतात, परंतु अशा रीतीनें आत्मौपम्यबुद्धि ज्यांमध्यें प्रगट झाली आहे असे लोक जगांत फार थोडे असतात, हें कोणीही कबूल करील. परंतु हास्याची गोष्ट तशी नाहीं. निरनिराळ्या वस्तूंतील एक प्रकारची असंबद्धता पाहण्यानें हास्यरसाची उत्पत्ति होते. ही असंबद्धता जगांत बहुधा पावलोपावलीं दृष्टीस पडते, व ती स्वविषयक असली किंवा परविषयक असली तरीही मनुष्यास गंमत वाटल्याशिवाय राहत नाहीं. अशा रीतीनें विचार करितां हास्यरसास हल्लीं दिलें जात आहे त्याहून अधिक महत्त्व असावें असें कोणीही कबूल करील.

(९७) हास्यरसाची मीमांसा करितांना त्या रसाचे विभावांविषयींची चर्चा केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. विभाव या शब्दाचा अर्थ कारण असा स्थूलमानानें करितां येईल. परंतु हें कारण ह्मणजे उत्पत्तिकारण किंवा उद्दीपनपर प्रसंग. मूल मानसिक कारण एकच असतां प्रसंग अगर वस्तुस्थिति या स्वरूपाचीं दुय्यम कारणें अनेक असतात; व या दुय्यम कारणांसच विभाव असें आपण ह्मणूं. विभाव या शब्दाची व्याख्या रसगंगाधरांत "स्थायिभावानां लोके तत्तन्नायकगतानां यानि आलम्बनतया उद्दीपनतया वा कारणत्वेन प्रसिद्धानि तान्यन्येषु काव्यनाट्ययोः व्यज्यमानेषु विभावशब्देन व्यपदिश्यंते" अशी केलेली आहे. अर्थचमत्कृतीचे व वस्तुस्थितीचे जे अनंत प्रकार किंवा प्रसंग हास्यरसास उद्दीपक होतात, त्यांस हास्यरसाचे 'विभाव' असें ह्मणतां येईल. पदार्थ अगणित आहेत व यदृच्छेनें त्यांच्या जशा अगणित घटना होऊं शकतात, त्याचप्रमाणें मनुष्यास कल्पनाबलानेंही अगणित घटना बनवितां येतात. मनुष्यांच्या उत्पत्तीपासून आजपर्यंत तीं हासत आलीं आहेत; तरी जी पदार्थघटना त्यांच्या हास्याचें उद्दीपनकारण काल झाली तीच तंतोतंत आज होईल, किंवा आज ज्या पदार्थघटनेमुळें मनुष्यास हंसें आलें, तीच तंतोतंत त्याच्या हास्याचें उद्दीपनकारण उद्यां होईलच, असें संभवनीय नाहीं. अर्थात् हीं कारणें प्रत्यहीं व प्रतिक्षणीं भिन्न असणार; व ह्मणूनच आह्मी त्यांस अगणित ह्मणतों. तथापि या पदार्थघटना जरी

अगणित आहेत, तरी निरनिराळ्या विभावांत जो सारखवटपणा दिसून येतो, त्यामुळें त्यांच्या जाति किंवा त्यांचे गण हे ठरवितां येतात. मागें हास्यरसाचा विचार करितांना विकृतांगवेष, विकृतचेष्टा, परचेष्टानुकरण, असंबद्ध प्रलाप, पौरोभाग्य वगैरे त्याचे विभाव ह्मणून सांगण्यांत आलेच आहेत; अर्थात् हे विभावांचे वर्ग किंवा गण होत. व ते तेथें केवळ उपलक्षण ह्मणून सांगितलेले आहेत: साधारण प्रमुख जाति खालील होत:—१ वस्तूंचें नूतनत्व किंवा अपरिचितत्व; ह्मणजे कोणतीही एक वस्तु अगर दोन वस्तूंचा संबंध नवीनच असा किंवा पूर्वी न अनुभविलेल्या अशा रीतीनें दृष्टीस पडणें. २ वस्तुस्वरूपविकृति; ह्मणजे चांगली वस्तु तात्पुरती वाईट दिसणें. ३ शरीर वगैरेंची कांहीं नियमित इयत्तेपर्यंतची कुरूपता. ४ नीतिदृष्ट्या मनुष्यस्वभावाची कुरूपता (यांत फक्त कित्येक लहानसान दुर्गुणांचा समावेश होतो.) ५ अपवाददर्शन; ह्म० नेहमीं वस्तुसंबंधांत किंवा वस्तुस्वरूपांत जो नियम किंवा जी शिस्त दिसावयाची, तिला अपवादभूत असा प्रकार होणें. ६ सचेतन प्राण्यासंबंधानें व विशेषत: मनुष्यप्राण्यासंबंधानें शिष्टसंमत असा मानलेला जो संप्रदाय त्याचें उल्लंघन. ७ प्राणिमात्राच्या अगदीं क्षुल्लक आपत्ति. ८ समाजानें भाषणांत न आणण्याच्या व असभ्य ह्मणून ठरविलेल्या गोष्टींचा उल्लेख करणें. ९ मिथ्याभियोग; ह्मणजे जो अधिकार आपणास नाहीं, तो आपल्या आंगीं आहे असें दर्शविण्याचा प्रयत्न उघडकीस येणें. १० विशेष प्रकारचें अज्ञान किंवा बुद्धिमांद्य. ११ विशेष प्रकारचा मनाचा भोळेपणा किंवा कोंवळेपणा. १२ सर्व प्रकारचें अतिशयत्व; ह्मणजे कोणतीही गोष्ट सीमेबाहेर जाणें किंवा तिचा कडेलोट होणें. १३ सव्याज किंवा साकूत असें भाषण; ह्मणजे विशेष हेतु अगर अभिप्राय असतांना तो छपविण्याचे उद्देशानें केलेलें, किंवा विशेष हेतु किंवा अभिप्राय नसतांना तो असल्याचा आभास उत्पन्न करण्यासारखें बोलणें. १४ पदार्थांप्रमाणें शब्दांचे विपरीत संबंध दाखविणें. १५ मिथ्यासाम्यदर्शन व मिथ्याविरोधदर्शन. १६ जडबुद्धि व तीव्रबुद्धि यांचा यदृच्छयागत विरोध. १७ समजुतीचा घोंटाळा. १८ विमनस्कता किंवा शुद्धींतील बेशुद्धि. १९ परचेष्टानुकरण. इत्यादि.*

---

* तत्त्ववेत्ता लॉक यांचे मताप्रमाणें wit ह्मणजे कोटीचे प्रकार व हास्याचे विभाव खालील आहेत:— (1) Metaphors. (2) Similitudes. (3) Allegories. 4) Enigmas. (5) Mottos. (6) Parables. (7) Fables. (8) Dreams. (9) Visions. (10) Dramatic writings. (11) Burlesque. (12) Generally all methods of allusion.

दुसरा एक इंग्लिश ग्रंथकार Leigh Hunt ली हंट याचे मताप्रमाणें wit कोटीचे प्रकार व हास्याचे विभाव खालीलप्रमाणें आहेत:—(1) Direct Simile. (2) The metaphor. (3) Poetical process or the leap to a conclusion or the omission of intermediate particulars in order to bring the two ends of a thought or circumstance together. (4) Irony. (5) Burlesque or pure mockery. (6) Parody. (7) Exaggeration or ultra-continuity and exaggeration in general (i. e. 1 Easiness and flow of extravagance. 2 Laudatory exaggeration. 3 Spirit of continuity. 4 Understood dulness. 5 Contempt expressed for one person by praise of another. 6 Extravagant imputation against a character. 7 Subtle and confounding contradiction of appearances. 8 Contemptuous mimicry. 9 Forced rhyme. 10 Ludicrous panegyric and climax. 11 Ludicrous association of ideas and aspect of solemnity. 12

(९८) या विभावांसंबंधानें विचार करितांना साधारणतः असें एक विधान करितां येईल कीं, काव्यामध्यें जे दोष* मानिले जातात, ते सर्व हास्यरसाचे विभाव होऊं शकतात. याचें कारणही उघडच आहे. काव्यांत दोष असले तर त्यामुळें रमणीयत्वाची हानि होते व त्याचें काव्यस्वरूप राहत नाहीं. परंतु रमणीयत्वाची हानि जेव्हां ती जाणून बुजून केलेली असेल तेव्हां ती हास्यरसास अनुकूलच होते. "पातालमिव ते नाभिः" असें वर्णन करणें हें काव्यास शोभत नाहीं; पण विनोद कर्तव्य असतां नाभीस पातालाची उपमा देणें योग्यच होईल. मारवाड्याच्या वधूचें वर्णन करितांना ही उपमा अतिशयोक्तिमूलक व हास्यरसोत्पादक होईल, व ज्यांत हें वर्णन ग्रथित असेल त्या प्रबंधास विनोदवचन ह्मणतां येईल. हीच गोष्ट काव्याचा प्रत्येक दोष घेऊनही सिद्ध करून दाखवितां येईल, ह्मणजे काव्याचे जितके दोष तितके हास्यरसाचे विभाव असें दाखवितां येईल. जसें—च्युतसंस्कृति ह्मणजे 'व्याकरणलक्षणहीनत्व' हा काव्याचा एक दोष आहे. परंतु समजा, एखादा मनुष्य आपल्या विद्वत्तेची घमेंड मारीत आहे पण खरोखरी त्याच्या वाणीस कांहींच संस्कार झालेला नाहीं, व अशा मनुष्यास बोलतांना पाहून लोक त्याची चेष्टा करितात पण त्याला स्वतःला मात्र ती कळत नाहीं; असा विनोदप्रकार वर्णन करावयाचा असल्यास 'संस्कृतिच्युत' असे शब्दप्रबंध त्याचे तोंडीं घातले ह्मणजे विनोद अर्थातच पुरा रंगेल. 'त्राटिका' नाटकांतील रणधीरराव किंवा 'नवरदेवाची जोडगोळी' या नाटकांतील माणकूबाई या पात्रांचीं भाषणें वाचलीं असतां च्युतसंस्कृतीपासून हास्यरसोत्पत्ति कशी होते हें तेव्हांच कळून येईल.

ग्राम्य शब्दांचा उपयोग हा काव्यांतील दोष आहे. परंतु तो जाणून बुजून प्रसंग अगर वक्ता यांस उचित अशा रीतीनें वापरला असतां विनोदपर होतो. पतत्प्रकर्षत्व हा काव्याचा दोष आहे. परंतु त्याच्या योगानें हास्यरसाचें उ-

---

Burdens of songs. 13 Pleasant bit of a superfluous information. 14 puns. 15 Macaronic verses. 16 Nonsense verses.) (8) Cross purposes or contradictry intentions mistaken by their entertainers for intentional ones. (9) Unconscious absurdity in man's character apart from mere circumstance. (10) Conscious humours indulged. (11) Humours of nations and classes. वर्गीकरणाचे तत्त्वानें पाहतां या वर्गीकरणांत बराच घोटाळा आहे असें पाहणारास तेव्हांच दिसून येईल.

* काव्यदोष खालील कारिकेंत सांगितलेले आहेत:—

दुष्टं पदं श्रुतिकटु च्युतसंस्कृत्यप्रयुक्तमसमर्थं
निहतार्थमनुचितार्थं निरर्थकमवाचकं त्रिधाऽश्लीलं ॥
संदिग्धमप्रतीतं ग्राम्यं नेयार्थमथ भवेत्क्लिष्टम् ।
अविमृष्टविधेयांशं विरुद्धमतिकृत्समासगतमेव ॥
प्रतिकूलवर्णमुपहतलुप्तविसर्गं विसंधि हतवृत्तं
न्यूनाधिककथितपदं पतत्प्रकर्षं समाप्तपुनरात्तम् ॥
अर्धान्तरैकवाचकमभवन्मतयोगमनभिहितवाच्यम्
अपदस्थपदसमासं संकीर्णं गर्भितं प्रसिद्धिहतम् ॥
भग्नप्रक्रममक्रमममतपरार्थं च वाक्यमेव तथा ।
अर्थोऽपुष्टः कष्टो व्याहतपुनरुक्तदुष्क्रमग्राम्याः ॥
संदिग्धो निर्हेतुः प्रसिद्धिविद्याविरुद्धश्च ।
अनवीकृतः सनियमानियमविशेषाविशेषपरिवृत्ताः ॥
साकांक्षोऽपदयुक्तः सहचरभिन्नः प्रकाशितविरुद्धः ।
विध्यनुवादायुक्तस्त्यक्तपुनःस्वीकृतोऽश्लीलः ॥
व्यभिचारिरसस्थायिभावानां शब्दवाच्यता
कष्टकल्पनया व्यक्तिरनुभावविभावयोः ॥
प्रतिकूलविभावादिग्रहो, दीप्तिः पुनः पुनः ।
अकाडे प्रथनच्छेदौ, अंगस्याप्यतिविस्तृतिः ॥
अंगिनोऽननुसंधानं, प्रकृतीनां विपर्ययः ।
अनंगस्याभिधानं च रसे दोषाः स्युरीदृशाः ॥

(मम्मट.)

हे सर्व काव्याचे दोष होत. अर्थालंकाराच्या दोषांचा वरील दोषांत अंतर्भाव होतो.

त्तम पोषण होतें. पतत्प्रकर्षत्वाचें खालील उदाहरण ध्या—

प्रोज्ज्वलज्ज्वलनज्वालाविकटोरुसटाच्छटः
श्वासक्षिप्तकुलक्ष्माभृत् पातु वो नरकेसरी ।

या श्लोकांतील वर्णन प्रथम भयंकर असून अखेर अगदीं मिळमिळीत आहे. अर्थात् प्रकर्ष न होतां एक प्रकारचा अपकर्षच झाला. पतत्प्रकर्षत्वास इंग्रजींत Bathos असें ह्मणतात. याचीं उदाहरणें पोप कवीच्या Rape of the Lock या काव्यांत आलेलीं सुंदर आहेत. *

* "Here Britain's statesmen oft' the fall foredoom
Of foreign Tyrants and of Nymphs at home:
Here thou, great Anna! Whom three realms obey
Dost sometimes counsel take-and sometimes Tea.
* * * *
This day black Omens threat the brightest Fair
That ev'r deserv'd a watchful spirit's care;
Some dire disaster, or by force, or slight;
But what, or where, the Fates have wrapped in night.
Whether the nymph shall break Diana's law,
Or some frail China jar receive a flaw,
Or stain her honour, or her new brockade,
Forget her pray'rs, or miss a masquerade,
Or lose her heart, or necklace, at a ball.
....
Not louder shrieks to pitying heav'n are cast
When husbands, or when lapdogs breathe their last.

प्रसिद्धिविरुद्धत्व हा काव्यांत अर्थालंकाराचा दोष होऊं शकतो; पण तो कवीनें जाणूनबुजून केला असतां हास्यरसास उपकारकच होतो. उदाहरणार्थ:—

" झणझणमिति बहुभूषणशब्दमिश्रं
किं द्रौपदी इव पलायसे रामभीता ।
एष हरामि झटिति यथा हनूमान्
विश्वावसोः इव भगिनीं तां सुभद्रां " ॥

मृच्छकटिकांतील वरील शकारोक्तींत प्रसिद्धिविरुद्ध ऐतिहासिक उदाहरणें घातलीं आहेत. त्यामुळें हा श्लोक विनोदात्मक झाला आहे. व याच विवेचनपद्धतीनें काव्याचे सर्व दोष जाणूनबुजून केले असतां ते हास्याचे विभाव करितां येतील असें सप्रमाण दाखवितां येईल.

(९९) हास्याची उत्पत्ति—प्राणिमात्रामध्यें हास्याची उत्पत्ति केव्हां झाली असेल या विषयींचा विचार निःसंशय मनोवेधक आहे. मनुष्याची व्याख्या हसणारा प्राणी अशा शब्दांनीं कित्येक तत्त्ववेत्ते करितात. कोणत्याही पदार्थाचें लक्षण करण्याचा एक प्रकार, इतर पदार्थांपासून व्यवच्छेदक अशा त्याच्या गुणांचा निर्देश करणें असा आहे; व या दृष्टीनें पाहातां, मनुष्य हा हसणारा प्राणी आहे असें ज्यावेळीं आपण ह्मणतों त्या वेळीं इतर प्राण्यांच्या जातींना मनुष्याप्रमाणें हसतां येत नसून ती देणगी ईश्वरानें फक्त मनुष्यासच दिली आहे असा आपला बोलण्याचा अर्थ असतो. या बाबतींत प्राणिशास्त्रवेत्त्यांनीं आजपर्यंत जे शोध केलेले आहेत, त्यांवरून पाहातां हसण्याची देणगी ईश्वरानें फक्त मनुष्यासच दिली आहे अशा तऱ्हेचा गर्व मात्र मनुष्यास यथार्थ रीतीनें वाहतां येणार नाहीं. उत्क्रमणवादांतील एका सर्वमान्य सिद्धांताप्रमाणें पाहातां मनुष्य हा माकडापासून झालेला आहे; व माकडाहूनही अधिक रानटी स्थितींतील त्याचे कांहीं पूर्वज

हसूं शकतात हें जर खरें मानलें तर हास्यरूपी मिळकत मनुष्याची वडिलार्जीत आहे, स्वसंपादित नव्हे, असें ह्मणावें लागेल. आतां मनुष्यप्राण्यामध्यें हास्याचा विकास व पूर्णता जितकी झालेली आहे तितकी अर्थात् पूर्वीं झालेली नव्हती. व यामुळेंच मनुष्य हा हसणारा प्राणी आहे अशा तऱ्हेची व्याख्या करण्यास कांहीं बाध येत नाहीं. प्राणिशास्त्रवेत्त्यांचे शोध ह्मणून जे वर सांगितले त्यांत वस्तुनिरीक्षणाचा जितका भाग आहे तितकाच पण निवळ तर्काचाही आहे. तथापि या दोहोंच्या मिश्रणानें त्यांनीं जे सिद्धांत ठरविले आहेत ते अगदींच टाकाऊ आहेत असें नाहीं.

(६०) आनंदानें खदखदां हंसणें, दिलचैनींत असला ह्मणजे मोकळे मनानें हंसणें, वस्तुजातांतील असंबद्धता पाहून हंसणें, वगैरे हास्याचे जे श्रेष्ठ प्रकार आहेत ते फक्त मनुष्यप्राण्यांत दिसून येतात याबद्दल शंका नाहीं. परंतु हास्याचे जे कनिष्ठ प्रकार आहेत, ते इतर प्राणिमात्रांतही दिसून येतात. हे प्राणी ज्या वेळीं राग लोभ वगैरे तीक्ष्ण मनोविकारांचे आधीन नसतात व आपापसांत, अगर ते माणसाळले असल्यास मनुष्यप्राण्यांशीं, खेळत वगैरे असतात तेव्हां त्यांचे चेहऱ्यावरील स्नायूंमध्यें ज्या हालचाली होतात, त्यांत कित्येक अशा असतात कीं त्यांस हास्यक्रिया ह्मटलें असतां फारसें वावगें होणार नाहीं. जिला आपण थट्टामस्करी असें ह्मणतों ती तर खालच्या प्रतीच्या प्राण्यांस आवडते यांत बिलकूल शंका नाहीं. आपल्या आंगांत विशेष शक्ति असून आपल्या तावडींत कमकुवत असा प्राणी आला असतां त्याची चेष्टा करणें हें जसें मनुष्यप्राण्यांत आहे, तसेंच तें इतर प्राण्यांतही आहे. ही गोष्ट, मांजर अगर कुत्रें यांच्या तावडींत एखादा उंदीर सांपडतो त्यावेळीं त्यास त्यांचेकडून ज्या रीतीनें वागविण्यांत येतें, त्यावरून सिद्ध होते. कुस्त्यांमध्यें एकाद्या पैलवानाचे जोडीस कमकुवत गडी मिळाला असतां त्यास तो जसा इकडून तिकडून थपडा देत व हसत हसत चीत करितो, त्याचप्रमाणें कुत्रें किंवा मांजर हें उंदरास थोडास पंजा मारून सोडून देतें व तो पळूं लागला असतां फिरून त्यावर पंजा मारितें; व हें सर्व होत असतां त्याच्या चेहऱ्यांत जो एक प्रकारचा फरक पडतो तो सूक्ष्म रीतिनें पाहिला असतां हास्यामुळें होणाऱ्या मुखविकृतीसारखाच असतो. परंतु या क्रियांमध्यें एक प्रकारचा दुष्टपणाही असतो. ज्यांत दुष्टपणाचा लेशही नाहीं, तर फक्त ज्यांत त्यांचा गमती स्वभावच दिसून येतो अशा कित्येक क्रियाही आपण नेहमीं पाहातों. उदाहरणार्थ, एखाद्या कुत्र्यास फेकलेला दगड आणण्यास शिकविलें असतां त्यास त्याची इतकी गंमत वाटते कीं, तो पुष्कळ वेळां आपण होऊन दगड उचलून धन्याचे पायांपाशीं आणून ठेवितो व त्याचे तोंडाकडे वरचेवर पाहून, व प्रसंगविशेषीं त्रास देऊनही, त्यास आपला क्षणभरचा खेळगडी होण्यास भाग पाडतो. हा नेहमींचा अनुभव आहे. परका कुत्रा दृष्टीस पडला असतां त्यास प्रथम उगाच भेवडावयाचें व लागलींच खेळीमेळीस येऊन तो जसा काय बाळमित्र असल्याप्रमाणें त्याच्याशीं सलगीचें वर्तन करावयास लागायाचें, हें कुत्र्याच्या विनोदी स्वभावाचेंच निदर्शन होय. रस्त्यानें जातां जातां एखाद्या परक्या कुत्र्याचे पाठीमागें हळूच पाय न वाजवितां जाऊन तो दचकेल अशा रीतीनें एकदम ओरडावयाचें या कुत्र्याच्या कृतींत, व अंधाऱ्या कोपऱ्यांत दडून बसून बेसावधपणें पुढें येणाऱ्या मुलास बाऊ दाखविणें या खोडकर मुलाच्या कृतींत, विनोदशीलता सारखीच दिसून येते. प्रोफेसर मार्दन या प्राणिशास्त्रवेत्त्या-

च्या अनुभवांत जें एक चमत्कारिक उदाहरण आलें, त्यामध्यें एका कुत्र्यानें समुद्रकांठीं वाळूंत खळगे उकरून त्यांत खेंकडे घालून त्याजवर वाळू पसरलेली होती व तो लांब बसून गंमत पाहात होता; आणि एखाद्या खेंकड्यानें आपला पाय अगर नांगी काढलेली दिसली ह्मणजे त्यास कांहीं अनिर्वाच्य मौज वाटून तो एखाद्या विनोदी माणसाप्रमाणें ओरडून इकडून तिकडे उड्या मारीत असे. ही गोष्ट अशिक्षित अशा कुत्र्याच्या विनोदी स्वभावाची झाली. परंतु मनुष्याच्या सहवासानें जसें त्यास शिक्षण अधिक मिळतें, तशी त्याची विनोदशीलताही वाढते यांत शंका नाहीं. सर्कसींत अगर इतर खेळांत कुत्रीं जीं हंसूं येण्यासारखीं कामें करितात, तीं अर्थातच हुकुमाची अंमलबजावणी या नात्यानें करितात हें उघड आहे. तथापि तीं जे असंबद्ध प्रकार अगर गमतीचे खेळ करितात, त्यांपासून त्यांस केव्हां केव्हां विनोदसुख मिळत असेल अशी कल्पना करणें अगदींच अयोग्य होणार नाहीं. मांजरांचा स्वभाव कुत्र्याइतका विनोदी अगर खेळकर नसतो. परंतु कॉलेजांतील आमच्या एका स्नेह्यानें आपण मांजर हंसतांना पाहिलें आहे असें आग्रहपूर्वक प्रतिपादिलेलें आह्मांस ठाऊक आहे.* माकडांच्या जातींतील प्राण्यांना स्मित व हास्य यांचा अनुभव असतो असें मानण्यास पुष्कळ सबळ कारणें आहेत. गुदगुल्या केल्या असतां अगर ओळखीचा प्राणी कालांतरानें भेटला असतां त्यास हंसूं येतें, व माकडांस आपली कोणी थट्टा केलेली पुरवत नाहीं, यावरून त्यांना हास्यास्पद होणें ह्मणजे काय हें कळतें हें उघड दिसतें. या सर्व विवेचनासंबंधानें एक गोष्ट मात्र लक्षांत ठेविली पाहिजे, ती ही कीं, या खालच्या प्रतीच्या प्राण्यांना जें हंसूं येतें तें बहुधा स्मितापलीकडे जात नाहीं. ह्मणजे आवाज होण्यासारखें खदखदां हसणें हें या प्राण्यांमध्यें आढळून येत नाहीं. ध्वनिस्वरूपाचें हास्य हें फक्त मनुष्यप्राण्यांतच आहे. खालच्या प्रतीचे प्राण्यांत जें हास्य आहे त्याचें स्वरूप स्मितामुळें उत्पन्न होणाऱ्या सूक्ष्म मुखविकृतीपलीकडे जात नाहीं.

(६१) खुद्द मनुष्यप्राण्यासंबंधानें हास्य हें अगदीं प्रथम कोणच्या वयांत उत्पन्न होतें हाही विचार मोठ्या मौजेचा आहे व हें ठरविण्याकरितां कित्येक इंग्लिश प्राणिशास्त्रवेत्त्यांनीं प्रयोग करून पाहिलेले आहेत. या प्रयोगांमध्यें लहान मुलांस तीं अगदीं उपजल्यापासून एकलकोंडीं ठेवून त्यांजमध्यें स्मित, हास्य, विनोद वगैरे गोष्टी अगदीं प्रथम केव्हां व कशा प्रादुर्भूत झाल्या याविषयीं निरीक्षणपूर्वक त्यांनीं दिनचर्याही मांडून ठेविल्या होत्या. या निरीक्षणावरून त्यांनीं असें ठरविलें कीं हास्यक्रिया ही मनुष्यामध्यें केवळ आनुवंशिक आहे व ती केवळ अनुकरणानेंच त्याचे आंगीं आलेली आहे असें नाहीं. दूध पिऊन पोट भरलें असतां जी एक प्रकारची सहजानंद स्थिति तान्ह्या मुलामध्यें उत्पन्न होते त्यावेळीं त्याचे चेहऱ्यावर एक प्रकारचें स्मित पसरतें; व अर्थात् ही क्रिया जन्मापासून अगदीं थोड्या काळांतच घडून येण्यासारखी आहे. तथापि ज्यास स्मित अशी संज्ञा अगदीं बरोबर लावतां येईल अशी मुखविकृति मूल जन्मल्यानंतर त्याच्या दुसऱ्या महिन्यांत प्रथम दिसून येते व पुढें थोड्या काळांत ध्वनि उमटण्यासारखें हास्य त्यास येतें. हें स्मित व हास्य अर्थातच प्रथमतः सुखजन्य व आनंदजन्य असतें. यानंतर गुदगुल्या वगैरे केल्या असतां उत्पन्न होणारें हास्य त्याचे आंगीं येतें. व सुमारें तिसऱ्या महिन्याचे शेवटीं त्याजकडे पाहून हंसलें असतां

* मागें करमणूक पत्रांत एके ठिकाणीं हत्तीच्या हांसण्याचीही एक गोष्ट लिहिलेली होती.

व गाल चिमटींत धरून हालविले असतां हास्य येण्यास तें पात्र होतें. भूक भागली असतां होणाऱ्या आनंदानें उत्पन्न होणारें व गुदगुल्या केल्या असतां उत्पन्न होणारें या दोहों प्रकारच्या हंसण्याच्या कारणासंबंधाची उत्पत्ति प्राणिशास्त्रवेत्त्यांनीं मनुष्याच्या फार जुन्या काळच्या वंशजांच्या स्थितीशीं नेऊन भिडविली आहे. उदाहरणार्थ, गुदगुल्या झाल्या असतां लहान मुलांस हंसूं येतें याची आनुवंशिक उपपत्ति ते अशी सांगतात कीं, शरीराच्या ज्या भागांत गुदगुल्या हटकून होतात, ते भाग असे आहेत कीं मनुष्यप्राण्याच्या अगदीं जुन्या पुराण्या स्थितींत जेव्हां नख दंत हीं युद्धाचीं आयुधें होतीं, तेव्हां ते भाग प्रतिपक्षाच्या हल्ल्यास सर्वांत अधिक पात्र होत, व ते तसे पात्र झाले असतां आत्मसंरक्षणार्थ त्या भागांचे स्नायु आंखडण्याची जी संवय मनुष्यप्राण्यास तेव्हां लागलेली होती त्या संवयीचेंच आविष्करण गुदगुल्या झाल्या असतां अगदीं बाल्यावस्थेंत हल्लींचा मनुष्यप्राणी करितो. प्रो० सली यानें दुसरी एक चमत्कारिक उपपत्ति सुचविली आहे. तो ह्मणतो कीं, मनुष्यप्राण्याच्या उत्क्रमणांतील अगदीं जुन्यापुराण्या स्थितींत त्याचे आंगावर त्याचें रक्त खाण्यास पुष्कळ प्राणी चढून बसत असतील व गाय ज्याप्रमाणें जिभेनें आपल्या मुलाचें आंग चाटून साफ करिते, त्याचप्रमाणें हे उपद्रवी कृमि काढून टाकण्याकरितां त्या स्थितींतील त्याच्या आईचा हात अंगावरून फिरून ते कृमि निघाल्यामुळें त्यास जें सुख तेव्हां होत असेल त्याचीच आठवण हल्लीं मुलांस अगदीं बाल्याचवस्थेंत हलूच हस्तस्पर्श झाल्यास कदाचित् होत असावी. असो; मनुष्यामध्यें हास्यतत्त्व आरंभीं अगदीं स्थूलरूपानें व्यक्त झालेलें असून प्रथम शरीरसुख, नंतर आनंद खेळकरपणा व स्वकृत कृत्रिम आनंदाची भर, व त्यानंतर ज्ञानोत्पत्तीमुळें असंबद्धतादर्शन,—अशीं हीं कारणें परंपरेनें एकामागून एक उत्पन्न होत जातात; व त्यामुळें पूर्वीं जें हास्याचें अगदीं स्थूलस्वरूप होतें त्याचे पुढें सूक्ष्म प्रकार बनतात.

(६२) हास्यमीमांसा करितांना लहान मुलांच्या हास्याचा प्रकार ज्याप्रमाणें लक्षांत घेतला पाहिजे, त्याचप्रमाणें समाजाच्या बाल्यावस्थेमध्यें मनुष्यमात्राचें हास्य कोणत्या प्रकारचें असतें याविषयीं सुधारलेल्या लोकांनीं जिज्ञासाप्रेरित होऊन ज्या गोष्टी पाहून व ऐकून लिहून ठेविल्या आहेत त्यांचाही विचार करणें जरूर आहे. लहान बालकें व समाजाच्या बाल्यावस्थेंतील मनुष्यें या दोहोंमध्यें बऱ्याच गोष्टी साधारण आहेत असें आढळून येतें. उदाहरणार्थ, सकृद्दर्शनीं विशेषसें कारण नसतां एकदम हसण्याची उकळी फुटणें, हास्याच्या प्रयोजकतेविषयीं किंवा अप्रयोजकतेविषयीं विशेषसा विचार मनांत न येणें व आपणास आलेल्या हसण्याच्या उकळीबद्दल कोणत्याही रीतीनें लज्जा अगर चमत्कारिकपणा न वाटण्याइतका आंगीं साधेभोळेपणा असणें इत्यादि गोष्टी आयुरवस्थेनें व सुधारणेच्या दृष्टीनें बाल्यावस्थेंत असणाऱ्या व्यक्तीस बहुधा साधारण आहेत. लहान मुलें ज्याप्रमाणें परक्या माणसास पाहून लाजतात व त्यांचे पुढें त्यांच्या खऱ्या मनोवृत्ति प्रगट होत नाहींत, त्याचप्रमाणें रानटी लोकही सुधारलेल्या लोकांपुढें आपला सर्व दिल खुला करीत नसतील हें संभवनीय आहे. यामुळें रानटी लोकांमध्यें विनोदशीलता कमी असावी व हास्य ही वस्तु त्यांना फारशी प्रिय नसावी असा कित्येक लोकांचा समज झालेला असतो. रानटी मनुष्य हा जणूं काय मुळीं मनुष्यप्राणीच नव्हे अशा समजुतीवर पुष्कळ वेळां आपल्या सुधार-

णेचा गर्व वाहणाऱ्या मनुष्यांमध्यें कडाक्याचा वाद असलेला आढळून येतो. परंतु रानटी मनुष्यें फार थोडा वेळपर्यंत जे लोक बघतात तशीं ते वर्णितात, अर्थात् त्यांच्या अशा वर्णनावरून रानटी लोकांसंबंधानें व्यापक असे सिद्धान्त काढितां येणार नाहींत. परंतु मिशनरी वगैरे लोक, ज्यांना रानटी लोकांमध्यें बरेच दिवस अगदीं निकट संबंधांत घालविण्याची संधी येते, अशांनीं त्या लोकांसंबंधानें निरीक्षण करून ज्या हकीकती लिहून ठेविल्या आहेत, त्यांवरून असें खुशाल म्हणतां येईल कीं, त्यांच्या चेहऱ्यावरून दिसतात त्याप्रमाणें ते उदासवाणे अगर गांजलेले नसून त्यांचे आंगीं विनोदशीलता पुष्कळ असते. ते आपल्या वृत्ति व आपले मनोभाव बहुधा मोकळ्या मनानें प्रगट करितात व अंतःकरणांत हास्याची ऊर्मी आली असतां ती दाबून ठेवणें हें सुधारलेल्या व सुसंस्कृत मनुष्यास जितकें सोपें अगर आंगवळणीं पडलेलें असतें, तितकें तें रानटी मनुष्यास सोपें असत नाहीं. आस्ट्रेलिया वगैरे ठिकाणच्या अस्सल रानटी लोकांसंबंधानें प्रवाशांनीं असें लिहून ठेविलेलें आढळतें कीं, कोणत्याही गोष्टीनें त्यांना गंमत वाटली असतां ते मोठमोठ्यानें हसून इकडे तिकडे उड्या मारतात, टिऱ्या व टाळ्या पिटतात, व केव्हां केव्हां तर हांसण्यामुळें त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंचे पूर वाहतात. आफ्रिकेंतील काफीर हाही रानटी लोकांचा एक अस्सल नमुना आहे. तो सकृद्दर्शनीं उग्र व तिटकारा येण्यासारखा आणि चार हातांवर दूर ठेवण्यालायक असा दिसतो. परंतु मिस् किंज्ले या नांवाच्या प्रवाशी स्त्रीनें असें लिहिलें आहे कीं, जोंपर्यंत सुधारलेल्या राष्ट्रांतील लोकांशीं त्यांची गांठ पडून घड ना रानटी व घड ना सुधारलेले अशी त्यांची अर्धवट स्थिति होत नाहीं, तोंपर्यंत हे काफीर लोक अत्यंत विनोदी असतात व त्यांचा सहवास मोठा गोड व गमतीचा वाटतो. रानटी लोकांना हसूं आलें असतां त्यांचा हात व पाय यांचें चलन व वलन एकाच वेळीं होतें व डोळे पाण्यानें भरतात; व त्यांच्यांतील हास्याचे विभावांसंबंधानें पाहातां एक प्रकारचा लाजाळूपणा किंवा कांहीं तरी उपद्व्याप करण्याची बुद्धि किंवा एकमेकांस त्रास देणें, कुचेष्टा करणें, व्यंगें काढणें व वेडावून दाखविणें व चमत्कारिक नांवें ठेविणें वगैरे प्रमुख असून, त्यामुळें रानटी लोकांना सुधारलेल्या लोकांपेक्षांही अधिक हंसूं लोटतें असा अनुभव आहे. नवीन व अपरिचित वस्तु पाहिली असतां त्यांस फार मौज वाटते. बेर्निओ बेटांत एका गृहस्थानें 'पियानो' हें वाद्य प्रथमच नेलें तेव्हां त्याच्या कळ्या किंवा पट्ट्या तो वाजवितांना खालवर झालेल्या पाहून तेथील लोकांस असें कांहीं आश्चर्य वाटलें कीं, त्या पट्ट्याप्रमाणेंच ते खालवर उड्या मारमारून मोठमोठ्यानें हसूं लागले. एका इंजिनियरच्या पेटींतील लहानसा एक कंपस पाहून, त्याच्या योगानें सुंदर आकृति काढतां येतात असें जेव्हां एका अमेरिकन-इंडियन मनुष्यास सांगण्यांत आलें, तेव्हां त्यास तो नुसता असंबद्ध प्रलाप वाटून हंसें आवरेना. सुधारलेल्या युरोपियन लोकांनीं केलेलीं कलाकुसरीचीं कामें पाहूनही केवळ नूतनत्वामुळेंच अत्यंत मौज वाटते. आपणाव्यतिरिक्त परक्या टोळींतील किंवा जातींतील रीतरिवाज पाहूनही त्यांना हसूं येतें व युरोपियन लोकांच्या चालीरीती पाहिल्या असतां त्यांचा विनोद परमावधीस जातो. फार तर काय, ज्यांना तोंड धुणें हें माहित नाहीं अशा लोकांस गोऱ्या प्रवाशांनीं नुसतें तोंड धुतलेलें पाहून हंसूं लोटतें. युरोपियन लोक आपली आपण श्मश्रु कारितात हा चमत्कार पाहून दक्षिण आफ्रिकेंतील एका

टोळीच्या पुढाऱ्यानें जेव्हां एका गोऱ्या प्रवाशास आपली श्मश्रु करण्याची विनंती केली तेव्हां ती होईपर्यंत गांवांतील सर्व लोक त्या दोघांचे भोंवतीं गराडा घालून बसले व ती संपली असें पाहातांच सर्वांनीं एकदम व एकजात हास्य करून कल्होळ केला. गोऱ्या लोकांचें गाणें ऐकून रानटी लोकांना जणूं काय कुत्र्याचें गाणें त्यांनीं ऐकिलें अशी मौज वाटते, व स्त्रीपुरुषांनीं हातांत हात घालून व पायावर पाय ठेवून नाच केलेला पाहून कोंबडीं झुंजल्याचा देखावा पाहिल्याप्रमाणें त्यांना करमणूक होते. आपली भाषा खरोखर किती हेंगाडी आहे हें न पहातां ती फक्त परक्या माणसास बरोबर बोलतां आली नाहीं असें पाहून बहुधा मनुष्यास हसूं येतें; व रानटी लोकही या नियमास अनुसरूनच वागतात. गोऱ्या लोकांच्या ईश्वरोपासनापद्धतीचा देखावा पाहूनही रानटी लोकांस फार हंसूं येतें. एका मिशनऱ्यानें आपल्या रानटी विद्यार्थ्यांस आत्म्याचें अविनाशित्व समजावून देण्याचा प्रयत्न केला तेव्हां, चालायला पाय नाहींत व खायाला तोंड नाहीं असा मनुष्य असूं शकेल तरी कसा, असें ह्मणून त्याचा शिष्यवर्ग एक घटकाभर खदखदां हंसत होता. स्त्रीजाति व पुरुषजाति यांनीं आपापल्या गुणांचा गर्व वाहून एकमेकांची थट्टा व उपहास करणें हें सुधारलेल्या लोकांप्रमाणें रानटी लोकांतही आढळून येतें. रात्रीं शेगडच्या पेटवून त्यांचेभोंवतीं टोळींतील लोक जमले असतां लहानथोरांनीं मोकळ्या मनानें विनोद व थट्टा करून व गोष्टी वगैरे सांगून मौजेंत रात्रीच्या रात्री काढणें हें रानटी लोकांत पुष्कळ वेळां घडून येतें. रानटी लोकांस नकलाही उत्कृष्ट करितां येतात; व आपली थट्टा केली असतां ती समजून त्यांना जितका राग येतो, तितकीच दुसऱ्याची चेष्टा व नक्कल करण्याची मनापासून त्यांना हौस असते. मौजेचीं वर्णनें करणें, शब्दश्लेष करणें, व उत्तरास समयसूचक प्रत्युत्तर देऊन आपल्या ऐवजीं दुसऱ्यास हास्यास्पद करणें, हेंही रानटी लोकांना थोडचा बहुत प्रमाणानें माहित असतें. आस्ट्रेलियन व टासेनियन यासारख्या अगदीं अस्सल जातींच्या रानटी लोकांमध्यें सुद्धां नकल्या लोकांचीं ललितें व मुक्या आकृतीचा खेळ असल्याचें सांगतात. स्यामोआ या प्रातांत प्रत्येक टोळीच्या पुढाऱ्याचा एकेक दरबारी खुषमस्कऱ्या असतो. ग्रीनलंडमधील एस्कीमो जातीच्या रानटी लोकांत न्याय निवडण्याचे कामीं जीं दिव्यें करितात, त्यांमध्यें वादी प्रतिवादी हे एकमेकांचीं उणीं दुणीं काढून एकमेकांच्या निंदापर अश्लील कविता ह्मणतात; व त्यांपैकीं जो श्रोतृसमाजास आपल्या करामतीनें अधिक हसवील व रंजवील त्याच्या तर्फे निकाल देण्यांत येतो, अशीही गोष्ट सांगतात. तात्पर्य, ज्या हास्यास फारसा विचार लागत नाहीं ह्मणजे बुद्धिप्रागल्भ्य असण्याचें कारण नाहीं, असे हास्यप्रकार तर रानटी लोकांत सर्वत्र आढळून येतातच. परंतु ज्यास विचाराची आवश्यकता आहे असे प्रकारही नाहींत असें नाहीं. मिस् किंग्ज्ले या प्रवासी बाईनें आपला असा अनुभव लिहून ठेविला आहे कीं, दहा प्रकारच्या युक्तिवादांनेंही रानटी लोकांसंबंधानें जी गोष्ट असाध्य, फार काय पण डोक्यांत बंदुकीचा दस्ता मारून किंवा छातींत गोळी घालूनही जी गोष्ट त्यांचे हातून करून घेतां येणार नाहीं, ती गोष्ट प्रसंगविशेषीं थोडासा विनोद करून व त्यांस हसवून करून घेतां येते. तात्पर्य, विनोदाचे बाजूनें पाहातां रानटी लोक हे अज्ञान मुलांप्रमाणें एक बाजूस बुद्धिहीन प्राणी व दुसरे बाजूस सुधारलेला व सुसंस्कृत बुद्धीचा मनुष्य यांचे दरम्यान येतात.

(६३) हास्याचा इंद्रियविज्ञानदृष्ट्या विचार—संस्कृत साहित्यशास्त्रकारांनीं हास्याचे कोणते निरनिराळे प्रकार मानले आहेत व प्रत्येक निरनिराळा प्रकार ओळखण्याचीं लक्षणें कोणतीं ठरविलीं आहेत हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. परंतु त्यावरून फार तर इतकेंच कळेल कीं, हास्यरसाचा उत्कर्ष कमीअधिक प्रमाणानें हृदयांत झाला असतां त्यापासून अमुक अमुक प्रकारच्या शरीरक्रिया परिणाम पावून दृग्गोचर होतात, व तशा निरनिराळ्या क्रियांवरून अमुक एक प्रसंगींचें हास्य कोणच्या प्रकाराखालीं पडतें हें ठरवितां येईल. परंतु बाह्य शारीरिक दृश्य परिणामांप्रमाणेंच हास्याचे अंतस्थ असेही परिणाम होतात. ते दृश्य नसून त्यांचा समावेश साहित्यशास्त्रकारांच्या वर्गीकरणांत झालेला नाहीं. तसेंच हास्य या शारीरिक क्रियेचें मूळ कारण कोणतें अगर त्याची उपपत्ति काय याचाही विचार संस्कृत साहित्यशास्त्रांत कोठें पाहण्यांत आलेला नाहीं. इंद्रियविज्ञानशास्त्राप्रमाणें पाहिलें असतां शरीर व मन हीं दोन्हीही आपापल्या रीतीनें हास्यास कारणीभूत होतात. मन हें मनुष्याचें साहावें इंद्रियच होय. यास्तव मनामुळें उत्पन्न होणाऱ्या हास्याचाही विचार पंचशरीरेंद्रियांमुळें उत्पन्न होणाऱ्या हास्याबरोबरच इंद्रियविज्ञानदृष्टीनें केला पाहिजे.

(६४) आतां प्रथम शरीरेंद्रियामुळें हास्य उत्पन्न कसें होतें हें पाहूं. शरीरामुळें हास्य उत्पन्न होण्याचा सर्वांत सोपा व सर्वांच्या लक्षांत सहज येण्यासारखा प्रकार म्हटला म्हणजे शरीराच्या कांहीं विवक्षित भागास स्पर्श झाला असतां उत्पन्न होणारें हास्य हा होय. या विशिष्ट स्पर्शामुळें होणाऱ्या परिणामास गुदगुल्या असें म्हणतात. या गुदगुल्या बहुधा त्वचेच्या नाजूक भागावर म्हणजे पायांचे तळवे, तळहात, कांखा, वगैरे भागांवर होतात. व स्पर्श करणारा पदार्थ जितका मऊ, गुलगुलित किंवा नाजुक तितक्या गुदगुल्या अधिक होतात. गुदगुल्यामुळें हास्य येतें तें आयुष्यांतील सर्व स्थितींत मनुष्यांस व अगदीं पाळण्यांतील मुलांपासून तों जख्ख झालेल्या म्हाताऱ्यापर्यंत बहुधा सर्वांना येतें. हें हास्य मनुष्याच्या इच्छेवर अवलंबून नसतें; व (मनाची स्थिति दुःख, राग वगैरे तीव्र मनोविकारांनीं हास्यास सर्वथैव प्रतिकूल बनलेली नसल्यास) गुदगुल्या केल्या असतां ज्यास हसूं येणार नाहीं असा मनुष्य बहुधा विरळाच. गुदगुल्यांमुळें होणारें संवेदन नेहमीं व सर्वांशींच सुखात्मक असतें असें म्हणतां येणार नाहीं. गुदगुल्यांनीं एकप्रकारचें सुख होतें हें आपण पाहतों व लहान मुलें तर गमतीखातर एकमेकांस मुद्दाम गुदगुल्या करितात व हौसेनें स्वतःस करवूनही घेतात. परंतु गुदगुल्यांपासून होणाऱ्या संवेदनाचें पृथक्करण केलें असतां त्यांत शारीरसुखाचा व त्याचप्रमाणें दुःखाचाही भाग आहे असें इंद्रियविज्ञानशास्त्र जाणणारांचें मत आहे. गुदगुल्या करण्याच्या क्रियेंत शरीरास स्पर्श झाला असतां शरीरांतील स्नायूंकडून एक दोन प्रकारच्या क्रिया घडून येतात. पैकीं एक प्रकारचे क्रियांस संरक्षक असें नांव देतां येईल, व दुसऱ्यास आनंददर्शक असें म्हणतां येईल. गुदगुल्या होतांच हातपाय आंखडणें,—व विशेषतः ज्या भागांवर त्या होतात ते भाग आंखडणें,—गुदगुल्या करणारा पदार्थ झटकून टाकणें, वगैरे प्रकार संरक्षक होत. दुसऱ्या प्रकाराचीं उदाहरणें म्हटलीं म्हणजे गुदगुल्यांपासून वाटणाऱ्या आनंदामुळें किंवा सुखसंवेदनामुळें मन मोकळें करून खदखदां हसणें, डोळ्यांत सुखाश्रु येणें व आंग गदगदां हालणें, वगैरे होत. गुदगुल्यांपासून प्रथ-

मत: एक निश्चित असा परिणाम घडतो तो हा कीं, शरीरास कांहीं अपूर्व असा अनुभव किंवा साक्षात्कार होतो. व ही गोष्ट सिद्ध करण्यास एवढें सांगितलें असतां पुरे कीं, आपले आपणास गुदगुल्या चांगल्या करितां येत नाहींत; परंतु तेंच दुसऱ्याचीं बोटें किंवा आपल्याच हातांत आपण घेतलेला परासारखा नाजुक व मऊ पदार्थ यांचे योगानें गुदगुल्या हटकून होतात. स्पर्शाचा प्रकार जितका अधिक अननुभूत व अनपेक्षित तितक्या गुदगुल्या अधिक हटकून व्हावयाच्या व गुदगुल्यांपासून हास्य उत्पन्न होण्याचें जर कांहीं सोपपत्तिक कारण असेल, तर तें स्पर्शाच्या या अतर्कितत्वांत व आकस्मिकतत्वांतच आहे. परंतु हें अतर्कितत्व कांहीं मर्यादेपलीकडे गेलें ह्मणजे, उदाहरणार्थ, स्पर्श करणाऱ्या वस्तूपासून अपाय अगर भीति निःसंशय होईल अशी जर आपली खात्री झाली, फार काय पण यथार्थ असा संशयही जरी उत्पन्न झाला, तरी गुदगुल्यांचा परिणाम नेहमींहून वेगळाच होईल. ह्मणजे आपणास हंसें न येतां त्रास व भीति वाटेल. अर्थात् गुदगुल्यांमुळें होणारें संवेदन जरी पुष्कळ वेळां सुखात्मक असतें तरी त्यापासून हटकून हंसें येण्यास मनाची एक प्रकारची हर्षप्रवण अशीच मनोवृत्ति असावी लागते. लहान मूल काय किंवा थोर माणूस काय, गुदगुल्यांमुळें हास्य उत्पन्न होण्यास तो कांहीं विशिष्ट प्रकारच्या मनःस्थितींत असावा लागतो. ह्मणजे समजा कीं, बोटानें गुदगुल्या करावयाचे ऐवजीं हातांत विंचू धरून किंवा साप धरून त्याच्या अंगस्पर्शानें गुदगुल्या करण्याचा जर आपण प्रयत्न केला व विंचवाची नांगी मोडलेली असून सापाचे दांत पाडलेले आहेत अशीही जरी स्थिति वास्तविक असेल तरी हें जोंपर्यंत ज्यास गुदगुल्या करावयाच्या त्यास माहित नसेल तोंपर्यंत गुदगुल्यांचे योगानें त्यास हंसें न येतां बहुधा तो किंकाळीच फोडील. आतां जर त्याची खात्री करून दिली कीं विंचवाची नांगी व सापाचें तोंड हीं दोन्ही निरुपद्रवी केलेलीं आहेत, तर मात्र दुसऱ्या खेपेस तो भयानें किंकाळी फोडणार नाहीं. परंतु त्याचें मन सर्वथैव निःशंक झालेलें नसल्यामुळें आणखी एक दोन वेळपर्यंत त्या वस्तूंचा स्पर्श होतांच तो आंग चोरील व थोडा बहुत ओरडेलही; आणि गुदगुल्यांची कृति जेव्हां दहा पांच वेळ केली जाईल, तेव्हां मात्र त्याचें मन पुरें निःशंक होऊन तो गुदगुल्यांपासून हास्य उत्पन्न होण्यास योग्य अशा मनःस्थितींत येईल. गुदगुल्यांशिवाय इतर आणखी एका प्रकारानें हास्य उत्पन्न करितां येतें. रसायनशास्त्रवेत्त्यांनीं हास्यवायु या नांवाचा एक वायु शोधून काढिलेला आहे; तो नैत्रोजन (नत्रवायु) व ऑक्सिजन (प्राणवायु) या दोहोंच्या मिश्रणानें बनतो व त्याचा एक मौजेचा असा धर्म आहे कीं, तो श्वासाबरोबर नाकांतून आंत गेल्याबरोबर मेंदूस लागतो व तसें झालें असतां मनुष्य आपोआप, त्याचें त्याला नकळत किंबहुना त्याच्या इच्छेविरुद्ध, हसूं लागतो. या प्रकारचे हास्यास ज्ञानतंतुजन्य किंवा मज्जातंतुजन्य हास्य असें ह्मणतात. गुदगुल्यांमुळें उत्पन्न होणारे हास्याचा स्नायूंशीं संबंध असतो व आतां सांगितलेल्या दुसऱ्या प्रकारच्या हास्याचा संबंध या तंतूशीं आहे.

(६९) हास्याची मीमांसा हर्बर्ट स्पेन्सर यानें आपल्या एका ग्रंथांत केलेली आहे ती अशी:—मनुष्यमात्राचीं इंद्रियें व वस्तुजात यांचा सन्निकर्ष झाला असतां व मन जागृत असतां ज्ञानसंवेदन होतें व हें ज्ञानसंवेदन ही एक प्रकारची शक्ति आहे. ज्याप्रमाणें निरनिराळ्या दोन प्रकारची विद्युत्, एकमेकांजवळ

आली असतां एक प्रकारची शक्ति उत्पन्न होऊन तिजपासून ठिणगीच्या रूपानें प्रकाश व आघात हे दोन परिणाम होतात, त्याचप्रमाणें इंद्रियें व पदार्थ यांचा संनिकर्ष झाला असतांही ज्ञानसंवेदनरूपी शक्ति उत्पन्न होते. हें संवेदन दोन प्रकारचें असतें. एक सुखात्मक व दुसरें दुःखात्मक. यांपैकीं प्रत्येकाचा मनावर व शरीरावर निरनिराळ्या प्रकारानें परिणाम होतो. शरीरांत सृष्टिकर्त्यानें अशी कांहीं एक योजना करून ठेविली आहे कीं, सर्व शरीरभर दोन प्रकारचे ज्ञानतंतु पसरले आहेत. पैकीं एक अंतर्वाहक व दुसरा बाहिर्वाहक. इंद्रियें व पदार्थ यांचा संयोग होऊन जें ज्ञानसंवेदन होतें, तें प्रथमतः अंतर्वाहक तंतूंच्या द्वारानें थेट मेंदूपर्यंत जाऊन पोहोंचतें. व असें झालें असतां मेंदूच्या ठिकाणीं जो हुकूम फर्माविण्यांत येतो, तो बाहिर्वाहक तंतूंच्या योगानें शरीराच्या निरनिराळ्या भागांस पोंचविला जातो. हा हुकूम फर्माविण्याचे कामीं इच्छाशक्ति जागरूक असतेच असें नाहीं. ती जागरूक असेल तर अर्थात् तिनें फर्माविलेल्या हुकुमाचाच अंमल होईल. परंतु पुष्कळ वेळां ज्ञानसंवेदनाचे वेळीं इच्छाशक्ति असावी तितकी जागरूक असत नाहीं, किंवा ती जागरूक असली तरी तिचा अंमल होण्यास अवसर नसतो; यामुळें ज्ञानसंवेदन होतांच ज्या शरीरक्रिया घडून येतात, त्यांस इच्छाशक्तीची अनुमति असतेच असें नाहीं. उदाहरणार्थ, गुदगुल्या झाल्या असतां चहूंदिशीं पाय आंखडणें अगर आंग चोरणें, डोळ्यांपुढें एकदम पदार्थ आला असतां पटकन् पापण्या मिटणें, आंगास कंड सुटला असतां नखानें खाजविणें, वगैरे ज्या अनैच्छिक क्रिया घडून येतात त्यांचा हेतु जरी शरीरसंरक्षणाचाच असतो, तरी मनुष्याच्या इच्छेशिवायही त्या घडून येतात हें निर्विवाद होय. ही गोष्ट अनैच्छिक क्रियांची झाली. ऐच्छिक क्रियाही याच ज्ञानतंतूंच्या साहाय्यानें घडून येतात. विस्तवानें बोट भाजलें असतां ज्ञानतंतूंकडून स्नायूंस हुकूम पोहोंचून बोट आखडलें जातें हें अनैच्छिक क्रियेचें उदाहरण झालें. परंतु क्रिया जेव्हां ऐच्छिक असते, ह्मणजे उदाहरणार्थ आपल्या मनामध्यें जेव्हां एखादा विकार उत्पन्न होतो व त्या विकारामुळें आपण क्रिया करण्यास प्रवृत्त होतों, तेव्हां ही क्रिया ज्ञानतंतूंच्या योगेंच घडून येते. ज्ञानसंवेदनानें व मनोविकारानें अनैच्छिक व ऐच्छिक क्रिया कशा उत्पन्न होतात याचीं उदाहरणें आपण नेहमीं व्यवहारांत पाहतों. थंड वारा आंगास लागतांच आंगास एकदम कांपरें सुटतें. सुखकर किंवा आनंदाची बातमी कानावर आली असतां एकदम आपली चर्या पालटते, व ती पालटूं देऊं नये अशी आपली इच्छा असल्यास ती न पालटण्यास आपणास उलट बाजूनें पुष्कळच जोर करावा लागतो. एकदम निराशा झाली असतां शरीरास अर्धांगवायूसारखे विकार होतात; किंवा अर्धांगवायूसारखी व्यथा असणाऱ्या मनुष्यास कांहीं मर्यादेपलीकडे आवेश, भीति, दुःख वगैरे मनोविकार झाले असतां विकृत व निर्जीव अशा शरीरावयवांसही तात्पुरती चेतना येते,—वगैरे अनुभवसिद्ध गोष्टींवरून ज्ञानसंवेदन व मनोविकार या दोहोंमुळें एक प्रकारची क्षोभशक्ति उत्पन्न होते हें दिसून येईल. व हें ज्ञानसंवेदन जसजसें अधिक तीक्ष्ण व मनोविकार जसजसा अधिक प्रबळ, तसतशी क्षोभशक्तीही अधिक प्रबळ होते. "सांखळीनें बांधून ठेविलेल्या नाम्यानें आपल्या धन्यास दुरून येतांना पाहिलें कीं, त्याचें शेंपूट थोडेंसें हालूं लागतें. व त्यावरून असें दिसतें कीं, आपला धनी कदाचित् आपल्यास सोडावयास येत असेल अशी अर्धवट आशा

त्याच्या मनांत उत्पन्न झाली आहे. पण धनी जसजसा जवळ येईल तसतसें हें शेंपूट हालविणें जास्तच वाढतें, व तो आपलें आंगही हलवूं लागतो. त्याच्या गळ्यांतील पट्टयाला धन्यानें हात घातला ह्मणजे त्याची खात्री होते कीं, आपल्यास धनी बाहेर फिरावयास नेणार खरा; व तेव्हां तो असा कांहीं शेंपूट हालवूं व उड्या मारूं लागतो कीं, बिचाऱ्या धन्यास त्याच्या गळ्याची गांठ सोडावयाची देखील मारामार पडते. नाम्या अगदीं मोकळा झाला कीं त्याला जो आनंद होतो तेणेंकरून तो मोठाल्या उड्या मारूं लागतो, व मोठ्या वेगानें इकडून तिकडे व तिकडून इकडे सारखा पळूं लागतो. घरांतल्या मांजरीचीही गोष्ट अशीच आहे. घरधनीण 'गोजी'ला अंगाशीं कवटाळूं लागली कीं शेपटी फुलफुलावून व पाठ ताठ करून ती जणूं काय असें दाखविते कीं हें कुरवाळण मला फार सुखकर वाटत आहे. पोपट व मैना पिंजऱ्यांतल्या काठीवर नाचावयास लागून व पिंजराभर इकडे तिकडे मोठ्या वेगानें नाचून बागडून तेंच दाखवितात. बरें, आनंदाच्या उलट जर राग आला किंवा दुःख झालें, तरीही प्राण्यांचे ठायीं हा स्नायुक्षोभ दृष्टीस पडतो. कुत्रा आपला वरचा ओंठ आकुंचित करून दांत दाखवूं लागतो, घोडा आपले कान मागें टाकतो, क्रुद्ध झालेला सिंह आपली शेपटी कुशीवर जोरानें आपटूं लागतो, व रागावलेली मांजरी तर उलटी होते. मुलांना जर एखादा पदार्थ फारच गोड लागला तर तीं लागलींच जिभल्या चाटूं लागतात. एखादा अपरिचित ध्वनि कानीं आला किंवा विशेष झगझगीत रंगाचा पदार्थ दृष्टीस पडला कीं दाईच्या हातावर खेळणारें अर्भक देखील खदखदां हंसूं लागतें."

संगीत नाटकांतील एखादें पद्य प्रेक्षक मंडळीस विशेष आवडलें ह्मणजे नाटकगृहांत टाळ्यांचा ताल सुरू होतो; गवय्ये लोक एकत्र जमले ह्मणजे मानेनें व हातांनीं ते आपला आनंद दाखवित असतात व तोंडानेंही "खाशी—वाहवा—" चा पाऊस पाडतात. मनोविकार प्रबळ झाल्यानें मनुष्याच्या शरीराच्या हालचाली कोठवर जाऊं शकतात हें नाटकांतील अगर कादंबऱ्यांतील वर्णनावरून आपणास दिसून येतें. मनोविकारांचे प्राबल्यामुळें मनुष्यें आपल्याशींच मोठ्यानें बोलूं लागतात. तरवारीस वरचेवर हात घालणारा "ह्यामूलेट," कल्पनादृष्टीपुढें उभा राहिलेल्या जंब्याची मूठ पकडण्यास हाताची मूठ वळणारा म्याक्बेथ, व हातावरील कल्पनामय रक्त धुऊन टाकण्याकरितां घंगाळावर घंगाळें पालथीं करणारी त्याची स्त्री, चित्रफलकावर रेखाटलेली शकुंतला अगर उर्वशी देहमयी आहे अशा भ्रमांत पडून तिला उद्देशून प्रेमवचनें बोलणारा व तिला आलिंगन देण्याकरितां बाहू सरसावणारा दुष्यंत किंवा पुरूरवा,—हीं जरी नाटकपात्रें होत, तरी यांच्या प्रतिकृति खऱ्याखुऱ्या जगांत सांपडणें फारसें कठिण नाहीं.

(६९) वर सांगितल्याप्रमाणें शरीरक्रिया उत्पन्न करण्यास कारणीभूत अशी जी क्षोभशक्ति, तिचा व्यय अगर उपशम होण्याचा सदर क्रिया हाच ठळक मार्ग आहे. परंतु तो एकच मार्ग नाहीं. दुसरा एक मार्ग असा आहे कीं, शरीराच्या स्नायूंवर जरी त्या शक्तीचा परिणाम झाला तरी तो शरीराच्या बाह्यांगावर दृश्य नसतो. परंतु शरीराच्या अंतर्भागावर तो होतो असें आपणास कळतें. उदाहरणार्थ, सुखात्मक अगर दुःखात्मक ज्ञानसंवेदन तीक्ष्ण स्वरूपाचें झालें असतां नाडीचे ठोके अधिक पडूं लागतात, रुधिराभिसरण अधिक जलद होतें, काळीज अधिक उडूं लागतें, व पक्वाशयावरही परिणाम होऊन ज्ञानसंवेदन सुखाचें असेल तर

अन्न नेहमींहून लौकर पचतें अगर क्षुधा वाढते, व तें दुःखात्मक असेल तर त्याच्या उलट परिणाम होतो. अशा प्रसंगीं अंतरवयव व आंतडीं वगैरेच्या द्वारें क्षोभशक्तीचा व्यय किंवा उपशम होतो. हा व्यय होण्याचा तिसरा एक मार्ग असा आहे कीं, या क्षोभानें इंद्रियें क्रियावान न होतां ज्ञानतंतूंच्या एका भागांत झालेल्या क्षोभानें ज्ञानतंतुजालाचा दुसरा एखादा भाग सचेतन होतो. उदाहरणार्थ, शांतपणें आपण विचार करीत असतां जे मनोविकार उत्पन्न होतात त्यांचा व्यय शरीरक्रियेच्या अगर अंतरिंद्रियांच्या चलनवलनाचे द्वारें न होतां एका विचारापासून दुसरा विचार उत्पन्न होतो, दुसऱ्यापासून तिसरा, तिसऱ्यापासून चवथा, अशा परंपरेमध्यें क्षोभशक्ति विलीन होते व ज्याप्रमाणें नदीच्या उगमाशीं कालवा काढून त्याचें पाणी आसपासच्या सर्व प्रदेशावर खेळवून शिल्लक पाणी उरल्यास तें नदीचे मुखाजवळ फिरून पात्रांत सोडून द्यावें, त्याप्रमाणें स्थिति होते. ह्मणजे या तिसऱ्या प्रकारामध्यें क्षोभशक्तीची उत्पत्ति व लयही विचारांतच होऊन शरीरावर आंत किंवा बाहेर मुळींच परिणाम होत नाहीं. क्षोभशक्तीच्या व्ययाचे हे जे तीन मार्ग वर सांगितले, त्यांतील एक किंवा अनेक मार्गांनीं व कमी अगर अधिक प्रमाणानें एकाच वेळीं हा व्यय होऊं शकेल; व अर्थातच एक किंवा अधिक मार्ग बंद असल्यास क्षोभशक्तीच्या व्ययाचा सर्व भार राहिलेल्या मार्गांवरच पडेल. उदाहरणार्थ, अत्यंत मानसिक दुःख झालें असून तें बाहेर दाखविणें अयुक्त असेल अगर इतर कोणत्याही कारणामुळें तें दाखवितां येत नसेल तर तें दुःख दुःसह होतें. ज्याचे डोळ्यांतून पाणी वाहूं शकतें, त्याच्या दुःखापेक्षां ज्याचे डोळ्याला पाणी येत नाहीं त्याचें दुःख अधिक दुःसह. दुःख बाहेर न दाखवितां मनांत मनुष्य तें उगाळूं लागला ह्मणजे त्यास दुःखांत भर घालणाऱ्या शेंकडो आठवणी होऊं लागतात व विचार सुचूं लागतात. याचें कारण असें कीं, दुःखास क्रियेच्या द्वारानें वाव न मिळाल्यामुळें क्षोभशक्तीचा व्यय विचारतरंग उत्पन्न करण्याकडे होतो. उलटपक्षीं पाहातां, मनोविकार उत्पन्न होतांच त्यांचे समाधानाकरितां जव्हां मनुष्य क्रिया करण्यास प्रवृत्त होतो, तेव्हां त्याचा क्षोभ इतका दुःसह होत नाहीं. दुःख झालें असतां हिंडण्याफिरण्यास गेल्यानें किंवा गोष्टी सांगून ऐकून अगर पुस्तकें वाचून मनास करमणूक केली असतां दुःख विसरतें.

(६६) हा ‘क्षोभ’ कांहीं एक मर्यादेपलीकडे गेला ह्मणजे त्याचा परिणाम शरीरक्रियेमध्यें होतो हें वर सांगितलें आहे; व हास्य ही एक अशा प्रकारची क्रिया होय. मात्र ती क्रिया इतर नेहमींच्या क्रियांप्रमाणें सहेतुक नसते, तर निर्हेतुक असते. स्पेन्सर याचे मताप्रमाणें बहुधा कोणच्याही मनोविकाराचा अतिरेक झाला असतां त्याचा प्रथम परिणाम हास्य उत्पन्न होणें असा झालाच पाहिजे, व याच्या उदाहरणादाखल त्यानें असें दाखविलें आहे कीं, अत्यंत आनंद झाला तरी प्रथम हास्याची उकळी फुटते. अतिशय क्रोध आला तरी प्रथम हसूं येतें—मात्र तें हास्य भीषण किंवा विकृत असतें. हेवा, लज्जा, द्वेष, हे परमावधीस गेले असतांही पाहाण्यास वाईट किंवा भयंकर परंतु लक्षणानें हास्य अशीच मुखचर्या होते. फार काय पण दुःखानें मनुष्य वेडें झालें असतांही त्याला हंसूं येतें हें लोकप्रसिद्धच आहे. लँग या नांवाच्या एका डाक्टरानें आपला असा अनुभव लिहून ठेविला आहे कीं, एका तरुण रोग्याच्या जिभेस व्रण झाला होता. त्यावर औषधादाखल अत्यंत जलाल व झोंबणारें असें रसायन टाकावें लागलें, व तसें केल्यामुळें ज्या वेळीं

शारीरिक दुःख परमावधीस जाऊन पोहोंचलें, त्या वेळीं पाहावें तों रोग्यास खदखदां हसण्याच्या उकळ्या फुटूं लागल्या! शेक्सपियरचा एक नायक, टायटस ॲन्ड्रोनिकस, याचा एक हात कापला गेल्यावरही तो हंसूं लागला. याचें कारण त्यास विचारण्यांत आलें तेव्हां तो हंसतच ह्मणाला कीं- 'अहो विचारितां काय, रडण्याला माझ्या डोळ्यांत आतां एक अश्रु तरी उरला आहे काय?' ज्या वेळीं क्षोभजन्य क्रिया सहेतुक असते, त्या वेळीं अंगविक्षेपात्मक क्रिया होणें ती चेहऱ्याखेरीज शरीराच्या इतर भागांकडून होते. उदाहरणार्थ, क्रोधरूपी मनोविकार प्रबळ होतो तेव्हां कोणास कांहीं तरी शासन करण्याचा हेतु आपल्या मनांत प्रादुर्भूत होतो; व यामुळें असा हेतु असतां जी क्रिया होते ती बहुधा हाताच्या द्वारें होते. भीतिरूपी मनोविकार प्रबळ होतो त्या वेळीं आपण आंग चोरतों किंवा पळूं लागतों याचा अर्थ आत्मसंरक्षण करण्याचा जो आपला हेतु तत्द्योतक ह्या क्रिया होत. परंतु मनोविकारांचा क्षोभ होऊनही विचाराच्या दृढपणानें ह्मणा किंवा अन्य कारणानें ह्मणा सहेतुक क्रिया करण्याची इच्छा, अवश्यकता अगर संभवनीयता नसते त्या वेळीं क्षोभशक्तीचा व्यय इतर अवयवांच्या द्वारें न होतां मुखाचे द्वारें होतो. याचें कारण असें आहे कीं, मनुष्याचा चेहरा हा सर्व शरीराचे भागांत अत्यंत नाजूक असा भाग आहे, व स्वल्प अशा क्षोभानेंही त्याचे स्वरूपांत विकार होऊं शकतो. ज्याप्रमाणें मळलेल्या मार्गानेंच मनुष्य प्रथमतः होतां होईल तों चालतो, ह्मणजे विशेष कारण असल्याशिवाय मळलेला मार्ग सोडीत नाहीं, त्याप्रमाणें क्रिया करण्यास विशिष्ट हेतु नसतां क्षोभशक्ति चेहऱ्यावरील कांहीं मळलेल्या मार्गानेंच उपशम पावते. चेहऱ्यावरील कांहीं कांहीं स्नायु अत्यंत सूक्ष्म, हलके व चलनशील असतात, ते अशा वेळीं तेव्हांच विकार पावतात. व प्रथम त्यावर परिणाम घडल्यानंतर मग श्वासोच्छ्वासाचीं इंद्रियें, काळीज, पक्वाशय व नंतर शरीरांतील बाह्येंद्रियें यांवर निर्हेतुक क्षोभशक्तीचा परिणाम होतो. चेहऱ्यावर परिणाम घडवून जर क्षोभशक्ति शिल्लक उरेल तर ती इतर इंद्रियांचे द्वारें व्यय पावेल. सितापासून अतिहसितापर्यंत हास्याचे जे सहा प्रकार मागें एके ठिकाणीं सांगण्यांत आले आहेत ते सर्व वरील प्रमेयाचींच उदाहरणें होत. ह्मणजे अहेतुक अशी क्षोभशक्ति उत्पन्न झाली व ती सौम्य असली तर फक्त सितच उत्पन्न होतें; व सित हें फक्त श्रेष्ठ लोकांस उचित ह्मणून जें साहित्यग्रंथांत सांगितलें आहे त्याची तरी उपपत्ति हीच कीं, श्रेष्ठ व सुसंस्कृत मनाच्या मनुष्याचे मनोविकार बहुधा त्याचे ताब्यांत राहतात—उच्छृंखल किंवा अनावर होत नाहींत. ह्मणजे ज्ञानतंतुक्षोभ जरी झाला तरी त्यापासून उत्पन्न होणारी शक्ति ही नेमस्त असते. यामुळें ती सितासारख्या सूक्ष्म व सौम्य क्रियेस पुरून उरत नाहीं. शिवाय श्रेष्ठ किंवा विचारी लोकांच्या ज्ञानतंतूंचा क्षोभ विशेष कारण असेल तरच होतो, सहसा अकारण उत्पन्न होत नाहीं. पण अज्ञ व अविचारी लोक किंवा लहान बालकें यांजमध्यें मनोविकार प्रबल असून कर्तव्यचिंता फारशी नसल्यानें तीं हंसण्यास व अंगविक्षेप करण्यास वगैरे सर्वच गोष्टींस विशेष पात्र होतात.

(६६) वरील सर्व विवेचनांत ज्या हास्यकारणाचा विचार झाला तें कारण ह्मटलें ह्मणजे क्षोभशक्तीच्या उपशमाची आवश्यकता हें होय. परंतु हास्याचीं आणखी इतर कारणें आहेत त्यांपैकीं एक हें होय कीं, बराच वेळ एकच प्रकारच्या मनोवृत्तीचा ताण मनुष्यावर पडला असतां त्यांतून मुक्तता होणें. हें हास्यकारण सर्वथैव

आनंदमयच असतें. शाळेंत पांच चार तास करड्या शिस्तींत व गुपचुप बसून घालविल्यावर घंटा होतांच मुलें शाळेबाहेर पडतात त्या वेळीं बहुधा तीं हंसत असतात. याचें कारण त्यांचे मनोविकार अगर ज्ञानतंतुक्षोभ अनावर झालेला असतो असें नव्हे, तर पुष्कळ वेळपर्यंत मनोवृत्ति तटस्थ राहिल्यानें जो एक प्रकारचा ताण पडलेला असतो त्यांतून त्यांची एकदम मुक्तता होते. हें होय. घरीं एखाद्या संस्काराच्या वेळीं अगर वेदपठनाचे वेळीं आपणास जेव्हां एकसारखें तिष्ठत बसावें लागतें, अथवा श्रावणीचे दिवशीं वर्षांतून एकच वेळ पण पूर्णपणें एक प्रहरभर आपल्या आचार्यांच्या तावडींत सांपडून जी धार्मिक कवाइत करणें प्राप्त होतें, ती श्रद्धालूपणानें केलेली असल्यास तिच्या शेवटीं शरीरावरील व मनावरील ताण कमी पडला ह्मणजे आपल्यास बहुधा हंसूं येतें. याचा अनुभव पुष्कळांस असेलच. देवळांतून वेदांती कीर्तन चालू असतां सर्व वेळ स्तब्ध व तटस्थ बसणें हें पुष्कळांस जड जातें. व अशा कीर्तनाच्या शेवटीं सभा विसर्जन झाली असतां सभासदांच्या तोंडावर एक प्रकारचें हास्य दिसतें. दुःखानें मनास जडता आली असतां सुस्कारा टाकिल्यामुळें ज्याप्रमाणें एक प्रकारचा आराम वाटतो, त्याप्रमाणें वर वर्णिलेल्या निरनिराळ्या प्रसंगीं येणाऱ्या हास्यामुळें ताणलेल्या चित्तवृत्तीस आराम वाटतो. ह्मणजे त्याचे योगानें रुधिराभिसरण जलद होऊं लागतें, व मेंदूशीं संबद्ध असलेल्या ज्ञानतंतूंचीं छिद्रें मोकळीं होतात.

ज्या ठिकाणीं गंभीरपणा किंवा औत्सुक्यवृत्ति मनांत स्वाभाविकपणें उत्पन्न झालेली नसतां मुद्दाम ओढून ताणून आणलेली किंवा जबरदस्तीनें लादलेली असते अशा प्रसंगास वरील उपपत्ति लागू पडते. परंतु त्याच्या पुढे गेलें असतां आपल्यास असें आढळून येईल कीं, कित्येक प्रसंगीं आपली औत्सुक्यवृत्ति किंवा गांभीर्य किंवा तटस्थपणा हें आपल्यावर कोणी लादलेलें नसून केवळ ऐच्छिक असतें. अशा प्रसंगीं सुद्धां मनोवृत्ति एकदम शिथिल होण्यास कारण घडून आलें असतांही हास्य उत्पन्न होतें. समजा कीं आपण नाटक पाहाण्यांत अगदीं तल्लीन होऊन गेलों असतां व दुःखप्रसंग ऐनभरांत आला असतां जर नायकास अगर नायिकेस सपाटून एकामागून एक दोन तीन शिंका आल्या तर ज्यास हंसूं फुटणार नाहीं असा प्रेक्षक बहुधा विरळा. अगर समजा कीं, वसिष्ठ ऋषि पोक्तपणें रामचंद्रास उपदेश करीत असतां त्यांची कृत्रिम दाढी निसटून खालीं लोंबूं लागली, व त्यामुळें ऋषिवर्यांची भूमिका घेतलेल्या पात्राचा पोरकट व खप्पड चेहरा उघडा पडला, अथवा अश्वत्थाम्यानें कर्णास मारण्याकरितां म्यानांतून तरवार बाहेर काढली पण पाहतात तों तरवारीच्या मुठीस मोराचें पीस लावलेलें होतें तेंच बाहेर आलें. या उदाहरणांत पूर्वीं चाललेल्या विचारपरंपरेस एकाएकीं आडकाठी येईल व क्षोभशक्तीचा व्यय विचारपरंपरेंत होऊं शकणार नाहीं. कारण वसिष्ठाचा उपदेश ऐकत असतां किंवा अश्वत्थाम्याचें क्रोधाचें भाषण ऐकून जे उच्च प्रकारचे मनोभाव उत्पन्न झाले होते, त्यांच्या शक्तीचा सर्वस्वी लय होण्यास दृष्टीस पडलेला नवीन देखावा अगदीं अपुरेसा होईल ह्मणून हास्य उत्पन्न होईल, हें उघड आहे. अशा वेळीं नवीन देखाव्यासंबंधानें विचार उत्पन्न करूनही जी शक्ति अवशिष्ट राहील, तिचा व्यय मागें सांगितल्याप्रमाणें अन्य मार्गांनीं व्हावा लागेल; व त्यांपैकीं हास्य व हास्यसंबंधी क्रिया हे मुख्य मार्ग होत. हास्याव्यतिरिक्त इतर क्रिया न घडून येण्याचें कारण

असें कीं, वरील उदाहरणांतील असंबद्धतादर्शनापेक्षां अधिक प्रबल मनोविकार त्या क्षणीं उत्पन्न झालेले नसतात. व तसे झाले असतील तर हसूं येणार नाहीं.

असंबद्धता पाहून मौज वाटते व हसूं येतें. परंतु कित्येक प्रसंगीं ती असंबद्धता पाहून मौज न वाटतां, अगर थोडीशी मौज वाटली तरी, तिच्याहून अधिक प्रबळ असे दुसरे व गंभीर विचार मनांत येणें शक्य आहे. मनोवृत्तीस असंबद्धतादर्शनानें प्रतिबंध उत्पन्न होण्याचे आधींची मनोवृत्ति जितकी प्रबळ होती तितकीच जर ती प्रतिबंधानंतर रहाण्याइतके प्रबळ मनोविकार अगर हेतु उत्पन्न होतील तर हास्य उत्पन्न होणार नाहीं. सर्वच प्रकारच्या असंबद्धतेनें अगर बेतालपणाचे दर्शनानें मनोवृत्ति हलकी होऊं शकत नाहीं. उदाहरणार्थ, एखाद्या कृश व लंगड्या लुल्या ह्मातार्‍याच्या डोक्यावर कोणी बळजबरीनें भलें मोठें ओझें लादलेलें पाहून आपणांस हसूं न येतां रागच येईल. एखादा प्रतिष्ठित मनुष्य रस्त्यानें चालला असतां एखाद्या टवाळ पोरानें हळूच नक्कलत त्याच्या पागोट्यावर कागदाचा उंच तुरा खोंवला तर तें पाहून फारच थोड्यांस हसूं येईल. बहुतेकांस रागच येईल. उन्हाळ्यांत दोनप्रहरीं मेजवानीकरितां ह्मणून बोलावून नेऊन शंभर माणसांपुढें एक शेरभर चुरमुरे कोणी आणून ठेविले तर तें असंबद्धच होईल, परंतु त्यामुळें हसूं येईल किंवा त्वेष येईल. याचा विचार आपण स्वतः त्या शंभर पाहुण्यांपैकीं एक आहों असें समजून ज्याचा त्यानेंच करावा. सतार पहावी तर शंभर रुपये किमतीची दिसते, पण छेडूं लागावें तों कर्णकटु आवाज निघूं लागला; तर हसूं येण्याचे ऐवजीं सतार बनविणाराचा किंवा ती विकत घेणाराचा मूर्खपणा लक्षांत येऊन खेदच उत्पन्न होईल. मुद्दाम दिवाळीकरितां उत्तर हिंदुस्थानांतून वीस रुपये तोळ्याचें गुलाबी अत्तर आणविलेलें असावें व दिवाळीचे दिवशीं शिशीचें बूच काढून प्रथमच हातावर तेल घ्यावें तों आंत खवट खोबर्‍याचें तेल निघून त्यांतच मेलेली माशी दृष्टीस पडावी. असें झालें असतां असंबद्धतेमुळें हंसें येईल किंवा झालेला खर्च, त्रास व फजिती हीं लक्षांत येऊन क्रोध येईल याचाही ज्याचा त्यानें विचार करावा. इकडे सिंह अंगाला येऊन बिलगलेला असावा व शिकारी पाहावा तों फोटोग्राफ घेण्याकरितां क्यामेरा सजवीत असावा. हें पाहिलें असतां हंसूं न येतां शिकार्‍याचें अलौकिक धैर्य व प्रसंगाचा बिकटपणा हें लक्षांत येऊन मन गंभीरविचारपूरितच होईल. मेजवानीचा थाट उडाला असतां मंडळी 'हरहर महादेव' ह्मणण्याचे बेतांत असावी, व इकडे कोणीं एखादें शव उचलून आणून पंक्तींत ठेवावें; ही असंबद्धता पाहून हंसें येईल किंवा उद्वेग वाटेल? आहे मुलगा, व पहावें तर बापास रस्त्यांत ओढून लाथा मारतो, याहून अधिक असंबद्ध तें काय असणार? तथापि हा देखावा पाहून हंसें खास येणार नाहीं. एवढीं उदाहरणें वरील सिद्धांत मनावर ठसण्यास पुरेशीं होतील व तो सिद्धांत हा कीं असंबद्धता दृष्टीस पडण्याचे आधीं ज्या प्रकारचे विचार मनांत आलेले असतात त्यांहून हलके ह्मणजे कमी गंभीर असे विचार उत्पन्न होऊं शकतील, तरच त्या असंबद्धतेपासून हंसें येईल; एरवीं येणार नाहीं.

(६९) असंबद्धता तीन प्रकारची असूं शकते. एक "उच्चगा", एक "समगा" व तिसरी "नीचगा." उच्चगा असंबद्धता दृष्टीस पडल्यानें विचार पूर्वींहून अधिक गंभीर व उदात्त होतात; व ह्मणून हंसें येत नाहीं. असंबद्धता ही समगा असेल, ह्मणजे परस्परविरुद्ध असणार्‍या गोष्टी सारख्याच स्वरूपाच्या असतील तेव्हां मनःस्थिति

पालटण्याचें कारण रहाणार नाहीं; ह्मणजे पूर्वीच्या प्रकारचे विचार नंतरही राहून स्थित्यंतर नजरेस येणार नाहीं. मात्र असंबद्धता जेव्हां 'नीचगा' असेल, ह्मणजे मोठ्या गोष्टीचा लहान गोष्टीशीं विरोध किंवा असंबद्धता असेल, तेव्हांच मात्र हंसूं येईल.

(७०) हास्यासंबंधानें इतर कित्येक ग्रंथकारांनींही आपापल्या मताप्रमाणें उपपत्ति दिल्या आहेत. त्यांचा थोडक्यांत निर्देश करितों. या उपपत्तींपैकीं जी मुख्य तिला "लाघवी" अशी आपण पारिभाषिक संज्ञा देऊं. या उपपत्तीच्या पुरस्कर्त्यांच्या मतें विषयगत लघुत्वदर्शन हेंच हास्याचें रसरीत्या कारण होय. वस्तुमात्रांत जी जी वस्तु लघु किंवा हीन असेल,किंवा अनेक वस्तूंचा कांहीं विवक्षित संबंध दाखविल्यानें जी लघुता किंवा हीनत्व दिसून येईल तेंच पाहावयाचें किंवा उचलावयाचें, असा एक प्रकारचा मनुष्यस्वभाव आहे; व त्या स्वभावाप्रमाणें लघु किंवा हीन तेवढेंच पाहिल्यानें किंवा उचलल्यानें आनंदकारक अशी नवीन वृत्ति त्याच्या मनांत उत्पन्न होते. या उपपत्तीच्या पुरस्कर्त्यांत प्रख्यात ग्रीक तत्त्ववेत्ता आरिस्तातल व इंग्लिश तत्त्ववेत्ते हॉब्स व प्रोफेसर बेन यांचा समावेश होतो. ॲरिस्तातल यानें आपल्या काव्य (साहित्य) ग्रंथांत ज्याला 'कॉमेडी' हें इंग्रजी नांव आजकाल प्रसिद्ध आहे, अशा प्रकारच्या काव्याची व्याख्या देतांना 'मनुष्यस्वभावाचा हलकेपणा वर्णन करणारें काव्य' अशी व्याख्या दिलेली आहे. ज्यांत स्वभावाचा हलकेपणा असा कांहीं नसून फक्त वस्तुस्थितीचें अनपेक्षित्व हेंच हास्यास कारण होतें अशा वस्तुस्थितीचा व हास्यविभावाचा परामर्श त्यानें घेतलेला नाहीं. त्याच्या व्याख्येप्रमाणें पाहातां हास्यकारक गोष्टींचा समावेश "कुरूप" गोष्टींखालीं होतो. हॉब्स याचें ह्मणणें असें आहे कीं, आपल्याला जें हंसूं येतें तें आपल्या मनांत परसापेक्ष अशा श्रेष्ठपणाची कल्पना एकदम येऊन क्षणिक अहंकारवैभव प्रकट होतें त्यामुळें होय. या उपपत्तींत लघुतादर्शन किंवा हीनत्वदर्शन हें हास्याचें प्रत्यक्ष कारण न होतां विषयिगत अहंकारप्रतीति हेंच प्रत्यक्ष कारण होतें. हें श्रेष्ठत्व परसापेक्षच पाहिजे असें नाहीं. दुसऱ्यापेक्षां आपण श्रेष्ठ असें मनांत येऊन जरी बहुधा आपल्यास हंसूं येतें तरी कित्येक प्रसंगीं पूर्वीं आपण होतों त्याहून प्रस्तुत क्षणीं आपण श्रेष्ठ आहों किंवा आपण जितके हीन झालों असतों तितके न होतां आपलें श्रेष्ठत्व राहिलें असा विचार मनांत येऊनही हंसूं येतें. मूर्ख मनुष्य पाहिला असतां हंसूं येतें तें तो मूर्ख ह्मणून येत नाहीं, तर आपण त्याहून शहाणे या विचारानें येतें. तसेंच, उदाहरणार्थ, आपण लहानपणीं ज्या खोड्या किंवा मूर्खपणा करीत होतों त्याचा विचार मोठेपणीं मनांत आला असतां पोक्त मनुष्यास हंसूं येतें. या दुसऱ्या प्रकारच्या उपपत्तींत व पाहिलींत एवढाच फरक आहे कीं, पहिलींत लघुत्वदर्शन हाच आदि व हाच अंत—ह्मणजे एकच विचार मनांत येतो. दुसऱ्या उपपत्तीमध्यें प्रारंभ लघुत्वदर्शनानें होऊन शेवट अहंकारप्रतीतीनें होता. परंतु या उपपत्तीला एक उघड अपवाद आहे. तो असा कीं, अचेतन वस्तूंचे केवळ मौजेचे प्रकार पाहिल्यानें, ह्मणजे जेव्हां आपलें श्रेष्ठत्व किंवा हीनत्व याविषयींचा विचार उद्भवण्याचा अर्थाअर्थीं कांहींएक संबंध नसतां जें हास्य येतें त्याची मीमांसा करण्यास अहंकारप्रतीति हें कारण कसें लागू पडावें? आपल्या समोर दुसरा कोणी मनुष्यजातीचा प्राणी मूर्खपणानें वागत आहे व लोक त्याजकडे पाहून हंसताहेत असें पाहून आपण त्याहून श्रेष्ठ आहों व आप-

णाला लोक त्याचेप्रमाणें हसणार नाहींत असा जो सुरक्षितपणा वाटतो, त्यामुळें हसूं कां यावें हें आपणास कळतें. परंतु समजा कीं एखाद्या झाडावर भलें मोठें बांडगूळ वाढलेलें पाहिलें किंवा एखाद्या झाडाचा दुरून फोटोग्राफ काढिला असतां त्याची आकृति यदृच्छेनें माकडासारखी निघाली तर जें आपणास हसूं येईल त्यास आत्मश्रेष्ठत्वप्रतीति हें कारण कसें लागू पडणार ? प्रो. अलेक्झांडर बेन यांनीं या पूर्वीच्या उपपत्तीवर थोडी सुधारणा केली आहे. त्यांच्या मतें झालें तरी लघुतादर्शन हेंच हास्याचें प्रत्यक्ष कारण होय. मात्र एवढेंच कीं त्या लघुतादर्शनानें गंभीर किंवा आवेशयुक्त विचार येण्यासारख्या परिस्थितींत तें लघुतादर्शन घडून येऊं नये.

तत्त्ववेत्ता कँट याच्या हास्याच्या उपपत्तींत हास्याची व्याख्या अशी आहे:—An affection arising from the sudden transformation of a strained expectation into nothing. परंतु कँटची उपपत्ति ही सर्वत्र लागू पडेल असें वाटत नाहीं. हॉब्स व बेन यांचा विषयिगत विकारावर जसा सारा भर आहे त्याचप्रमाणें कँट याचा ही सर्व भर विषयगत विकारावर आहे. परंतु सर्व भार विषयगत असंबद्धतेवरच ठेवून चालत नाहीं, ह्मणजे हास्याच्या सर्व विभावजातींना सारखेंच लागू पडेल असें हें कारण किंवा हा खुलासा नाहीं. कँटच्या मताप्रमाणें पाहतां प्रथम अमुक एक कल्पना अपेक्षारूपानें उत्पन्न होऊन नंतर ती फसते, ह्मणजे त्या अपेक्षित कल्पनेचा निरास अनपेक्षित रीतीनें झाला पाहिजे. परंतु व्यवहारांत पाहतां आपण हसतों तेव्हां नेहमींच ह्मणजे असें घडून येतें असें नाहीं. एखादा विनोदी लेख आपण प्रथम वाचून हांसतों, तेव्हां कँटच्या ह्मणण्याप्रमाणें अपेक्षानिरास नकळत होतो व ह्मणून हसूं येतें. परंतु तोच लेख पुन्हां दुसऱ्यानें अगर तिसऱ्यानें वाचूं लागलों असतां लेखाचें पर्यवसान पूर्वीच कळून चुकलें असल्यानें अपेक्षा अशी कांहीं राहत नाहीं. निदान तिचा निरास होतो. तेव्हां तो केवळ अनपेक्षित रीतीनें होतो असें तरी ह्मणतां यावयाचें नाहीं. असें असतांही आपणांस हसूं येतेंच, तेव्हां केवळ अनपेक्षित रीतीनें ठराविक अपेक्षेचा निरास होणें हेंच कारण हास्याच्या सर्व विभावांस सारखेंच लागू पडणार नाहीं.

जर्मन तत्त्ववेत्ता शोपेनहूर याचीही या बाबतींत एक उपपत्ति आहे. तो ह्मणतो कीं आपल्या कल्पना व त्याशीं संबद्ध असलेल्या वस्तु यांच्या विसंवादित्वामुळें हास्य उत्पन्न होतें. कँटच्या अपेक्षानिरासांत फजिती झाल्याचा ध्वनि होतो, शोपेनहूरच्या उपपत्तींत फजिती होण्याची अमुक एक कल्पना नाहीं. त्याच्या ह्मणण्याप्रमाणें आपणास अनुभव आला व आपल्या कल्पनेशीं तो जुळणारा नसला ह्मणजे हास्यकारण सिद्ध होतें. ह्मणजे ही कल्पना अनुभवाचे पूर्वीं आपल्या मनांत असलीच पाहिजे असें नाहीं. केव्हां केव्हां तर ही कल्पना अनुभवानंतरही ठरणें शक्य आहे. कँटच्या उपपत्तींत विशिष्ट व पूर्वीं बनलेल्या कल्पनेचा निरास हें तत्त्व आहे. शोपेनहूरच्या उपपत्तींत कल्पना विशिष्ट नसली व अनुभवानंतरहा होणारी असली तरी चालतें. परंतु शोपेनहूरची उपपत्ति ही सर्व विभावांस लागू पडेल असें नाहीं. कारण मनुष्यमात्रास क्षुल्लक आपत्ति येणें या प्रकारच्या विभावांत अपेक्षानिरास वगैरे कांहीं नाहीं. तीच गोष्ट समजुतीचा घोंटाळा होणें या हास्यविभावाचीही समजावी.

अशा रीतीनें दोन्ही प्रकारच्या उपपत्ति सर्व विभावांस सारख्याच लागू न पडणाऱ्या आहेत असें दिसून येईल. ह्मणजे केवळ लघुतादर्शन किंवा केवळ असंबद्धतादर्शन हें एकटेंच हास्य-

रसाचें कारण नव्हे असें ठरलें. इंग्लिश टीकाकार हॅझलिट व तत्त्ववेत्ता हरबर्ट स्पेन्सर यांनीं दोन्ही कारणांचा एकत्र समावेश करून हा विरोध नाहींसा करण्याचा प्रयत्न केला आहे. स्पेन्सर यानें नीचगा असंबद्धता हें एक मुख्य हास्यकारण ठरविलें आहे असें मागें सांगण्यांत आलेंच आहे. अर्थात् 'नीचगा असंबद्धता' यामध्यें असंबद्धता व लघुतादर्शन दोन्हींचा ही समावेश होतो. ह्मणजे स्पेन्सरच्या मताप्रमाणें हंसूं येतें याचें कारण लघुतादर्शनही होतें व असंबद्धताप्रतीतीही होते; मग प्रत्येकाचें प्रमाण किती ही कमजास्त कां असेना.

मि. सली या तत्त्ववेत्त्याचे मताप्रमाणें लघुतादर्शन किंवा असंबद्धतादर्शन हें जितकें हास्यकारण आहे त्याही पेक्षां मनुष्याचा खेळकर स्वभाव, ज्याचे संबंधानें लहान मुलें व मोठीं माणसें हीं सारखींच होतात, हाच हास्याचें प्रत्यक्ष कारण मानितां येईल. परंतु ही उपपत्ति हास्याच्या सर्व विभावांस एकसारखी लागू पडत नाहीं हें त्याचें त्यानेंच स्वतः आपल्या हास्यावरील पुस्तकांत कबूल केलें आहे. तात्पर्य, अशा रीतीनें पाहतां हास्यकारणाची सर्व-संमत किंवा सर्व-व्यापक एकच उपपत्ति अद्यापि निघाली आहे असें ह्मणतां येत नाहीं, व ती तशी निघेल कीं नाहीं याची ही वानवाच आहे. जरी हास्य-क्रिया ही शारीर क्रिया या दृष्टीनें एकाच स्वरूपाची दिसते, तरी हेतुभेदानें व विभावभेदानें रसदृष्ट्या तिची उपपत्ति भिन्न असावी हें स्वाभाविकच आहे.*

(७०) हास्यरसाचा व्यावहारिक उपयोग—येथवर झालेल्या विवेचनावरून, व आमच्या एकंदर लिहिण्याचे रोखावरून, आह्मांवर एक जबरदस्त आरोप येण्याचा संभव आहे हें आह्मी पूर्णपणें जाणून आहों. तो आरोप असा कीं, हास्यरसास आह्मी वाजवीपेक्षां अधिक महत्त्व देतों. आमच्या आक्षेपकारांचे मतें आह्मीं हास्यरसास मूर्धाभिषिक्त करून त्याला रस-वर्गांत राजपदावर स्थापिलें आहे; व असें झालें ह्मणजे प्रौढ व गंभीर विचार, किंवा रसभरित सुंदर काव्यें यांस या दुनियेंत अनाथ व निराधार करून टाकल्यासारखें होणार. कोणी ह्मणतील कीं, हास्यरसास फाजील महत्त्व देऊन आह्मीं चेष्टेखोरपणाचा नवा बाजारच बसवूं पाहत आहों; व हा बाजार उघडल्यानें सभ्य-

* The impressions of the laughable can not be reduced to one or two principles. Our laughter at times is of various tones. It gathers up into itself a number of primitive tendencies; it represents the products of widely removed stages of intellectual and moral evolution. This is virtually admitted by all who recognise the intellectual and the moral principle; for our laughter at seeing dignity unfrocked is presumably of more ancient origin than the laughter of the mind which discoursers on the ludicrous are for the most part thinking of. Our argument takes us farther, namely, to the conclusion that the effect of the laughable, even of what is given by the philosophers as a sample of the ludicrous, is a highly complex feeling, containing something of the child's joyous surprise at the new and unheard of; something too of the child's gay responsiveness to a play challenge; often something also of the glorious sense of expansion after compression which gives the large mobility to freshly freed limbs of young animals and children.

Sully, para 153.

पणास व गंभीरपणास कायमचीच रजा मिळेल. कोणी विचारतील—"कायहो, हें आयुष्य केवळ थट्टा मस्करी करून घालविण्याकरितांच आह्मांस मिळालेलें आहे कीं काय, कीं तें आह्मीं हंसण्या खिदळण्यांतच घालवावें ? विनोदाची संवय लागली कीं, आवेश, गांभीर्य, भक्ति इत्यादि सद्गुणांस आह्मांस पारखें व्हावें लागणार; व ज्याच्या योगानें जगांत प्रगति संभवते ते हे वरील गुण नाहींसे झाल्यावर मग जग कसें चालणार ?" आक्षेप विचार करण्यासारखा आहे; तेव्हां त्याचा आपण शांतपणें विचार करूं.

(७१) सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् न ब्रूयात् सत्यमप्रियम्—हें नीतिवचन कोणास संमत नाहीं ? खरें बोलावयाचें झालें तरी तें दुसऱ्यास रुचेल किंवा गोड लागेल अशाच रीतीनें बोलावें हें तर ठीकच आहे, परंतु वचन सत्य असून रुचेल असें बोलून वरती जर तें हास्योत्पादक ही असेल तर दुधांत साखर पडल्यासारखें होणार नाहीं काय ? परंतु हें तत्त्व जितकें सयुक्तिक भासतें तितकें तें व्यवहार्य झालेलें आढळून येत नाहीं. कारण जगांत हास्याविरुद्ध युक्तिवाद व आचरण करणारे लोक पुष्कळ आढळून येतात. प्रथमतः निरनिराळ्या मनुष्यव्यक्तींची मुखचर्या कशी असते हें साधारणतः सूक्ष्मदृष्टीनें पाहणारास असें दिसून येईल कीं, कित्येकांची चर्याच मुळीं हास्यरसास प्रतिकूल असते. अशा लोकांचे नुसत्या चेहऱ्याकडेच पाहून खुशाल एकदम सांगावें कीं, या लोकांचा व हांसण्याचा नेहमीं बारावा बृहस्पति आहे. आपल्यांत एक ह्मणच अशी आहे कीं, "मिया रोते क्यों ?" तर ह्मणाले "सुरतही वैसी." अंतरंग व मुखचर्या यांमध्यें कधीं काळीं मेळ किंवा मुकाबला पडणार नाहीं हें संभवनीय आहे. तथापि साधारण नियम असा आहे कीं मनुष्यस्वभावाच्या, व अंतरगांतील विचारसरणीच्या भांडाराची किल्ली मुखचर्येंत सांपडावयाचीच; व या किल्लीचे साहाय्यानें जगांतील हास्यशत्रु निमेशिमे तेव्हांच ओळखून काढितां येतात. अशी मुखचर्या असणारांची दुसरी एक मौज अशी आहे कीं, यदाकदाचित् हिंवाळ्यांत पालवी फुटल्याप्रमाणें त्यांच्या रुक्ष मनांत हास्यरसाची क्वचित् उत्पत्ति झालीच तर त्याचे योगानें त्यांचे चेहऱ्यास मोहकता किंवा सौम्यता न येऊन उलट तो अधिकच भेसुर व कठोर असा वाटूं लागतो. (Some people never smile; they only grin.—Bovee.) अशा लोकांशीं गांठ पडणें ह्मणजे एक प्रकारचें दुर्भाग्यच होय. दुसरे कित्येक लोक असे असतात कीं, ते चेहऱ्यावरून सौम्य व आनंदी दिसतात व केवळ विनोदाचे ते शत्रुच असतील असें सकृद्दर्शनीं वाटत नाहीं. परंतु हास्यविनोदांचें त्यांस वस्तुतः वावडें असतें. ह्मणजे स्वतः ते बहुधा कधीं हास्यविनोदाच्या भानगडींत पडत नाहींत; इतकेंच नव्हे, तर यदाकदाचित् त्यांच्या कर्णपुटावर हास्याचा यत्किंचित्‌ही ध्वनी आला कीं लहान मुलाचे कानीं अवचित मेघगर्जना पडल्याप्रमाणें ते कावरेबावरे होतात. त्यांच्या अंतःकरणांतील सौजन्यक्षीरांत हा विनोद ह्मणजे एकाद्या मिठाच्या खड्याप्रमाणें पडून तें नासून जाऊन त्याची कालवाकालव होते. चार चौघा मंडळींत हांसणें खिदळणें झालेलें पाहून त्यांना पंचमहापातकांत भर पडल्या सारखी भीति वाटते. व जगांतील सर्व चातुर्य, सर्व विचारीपणा, सर्व तत्त्वज्ञान, हें, ज्यावरील रेषा कधींही पालटावयाची नाहीं अशा गंभीर व निश्चल चेहऱ्यांतच सांठविलें आहे अशी त्यांची समजूत असते. यामुळें उत्तम प्रकारच्या हास्यरसाच्या सुखाची जोड करून देणारा एखादा विनोदाचा प्रकार त्यांचे दृष्टीस पडला तरी शिकारीवर

सोडलेल्या कुत्र्यांचे कानाप्रमाणें त्यांची मनोवृत्ति ताठच राहते. दुसरे कित्येक असे असतात कीं त्यांस करुण रसच हास्यरसाचे ठिकाणीं वाटतो. अशा लोकांचे आंगीं नुकतेच वर्णन केलेल्या लोकांचे आंगीं नसणारा एक गुण असतो तो सहृदयता हा होय. ह्मणजे हीं तिसऱ्या प्रतीचीं माणसें अंतःकरणानें प्रेमळ असतात, परंतु त्यांचें प्रेम सर्व करुणरसासच अर्पण केलेलें असतें. यांच्या समजुतीनें हें सर्व जग दुःखमयच असतें. करुणरसात्मक वस्तुघटना हा यांचे मतें सृष्टि—नियम असून आनंदस्थानें ते अपवादादाखल मानितात. हास्यविनोद करणें ह्मणजे सृष्टिनियमांचे विरुद्ध जाणें असा त्यांचा ग्रह झालेला असतो. कामधंद्यामध्यें विनोदास जागा मिळूं शकत नाहीं व कामधंदा करणें हा तर जीविताचा मुख्य हेतु होय. यास्तव थट्टा मस्करी करणें ती केवळ पोरांबाळांनीं करावी असें त्यांचें मत असतें, व मन मोकळें करून हासणें हें तर ते बहुधा अर्धवेड्या किंवा पूर्णवेड्या लोकांवरच सोंपवितात. थट्टा व अक्कल या दोन जणूंकाय सख्या बहिणी आहेत, व ह्मणून त्या उभयतांशीं एकच वेळीं विवाहसंबंध ठेवणें ह्मणजे अनीतिमय होय असें त्यांस वाटतें. शहाणपणाचा एकवेळ स्वीकार केला ह्मणजे मग त्याजवरील प्रीति कायम राहावी या करितां ते विनोदास मार्गांतून हांकून देतात, व त्याच प्रमाणें विनोदावर प्रीति करणारा कोणी दिसल्यास त्यास शहाणपणाची ओळखही नसलीच पाहिजे असा सिद्धांत ते ठोकून देतात. तुह्मी वाटेल तें करा त्यांचे हातून विनोद ह्मणून घडणेंच नाहीं. दुसरे कित्येक असा युक्तिवाद करितात कीं; हास्याची उत्पत्ति ज्या अर्थीं असंबद्धते पासून आहे व असंबद्धता हा गुण नसून तिरस्करणीय दोषच आहे त्या अर्थीं विनोदास उत्तेजन देणें ह्मणजे बुद्धिवैकल्यास उत्तेजन दिल्यासारखेंच होय.

(७२) आतां वर जे इतके विनोदशत्रूंचे निरनिराळे प्रकार सांगितले, त्यांपैकीं कांहीं कांहीं प्रकारच्या शत्रूंच्या नावडीची आवड करण्यास आह्मी असमर्थ आहों हें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. कारण ब्रह्मदेवच मुळीं ज्यावर कोपला त्यास मनुष्यानें साहाय्य कोठवर करावें ? ज्यास ईश्वरानें घ्राणेंद्रिय दिलें नाहीं त्याची जरी कींव आली तरी त्यास सुवासाचें सुख कोण कसें प्राप्त करून देईल ? ज्या प्रमाणें सुगंधाचें इंद्रिय नाक आहे त्याचप्रमाणें विनोदाचें इंद्रिय मन आहे. विनोदग्रहणाची शक्ति ज्याची नाहींशी झाली असेल त्याच्यापुढें प्रत्यक्ष मूर्तिमंत विनोद जरी येऊन अवतरला तरी काय होणार ? परंतु जे दुसऱ्या एका प्रकारचे विनोदशत्रु वर सांगितले आहेत, ह्मणजे ज्यांचें विनोदग्रहणाचें इंद्रिय शाबूद आहे परंतु युक्तीच्या बाजूनें पाहातां ज्यांस विनोद हा दोषमय दिसतो, अशांना मात्र थोडें बहुत साहाय्य करितां येणें शक्य आहे. वर जी असंबद्धता ह्मणून सांगितली ती वास्तविक नेहमीं दोषरूपच असते असें नाहीं. प्रचारांत 'असंबद्धता' या शब्दास थोडीशी गौणता आहे हें खरें, परंतु कोणत्याही प्रकारचे अपवादास्पद विकार मनांत न येतां केवळ गंमतीनें असंबद्धतेशीं व्यवहार करितां येणें शक्य आहे. एवढेंच नव्हे तर आणखी असेंही ह्मणतां येईल कीं, असा व्यवहार करणें ही बुद्धीच्या एका भागाची किंवा प्रकाराची अवश्य करमणूकच होय. जगांतील वस्तुजातांत जेथें असेल नसेल तेथून संबद्धता किंवा संवादित्व हुडकून काढणें हें जसें बुद्धीस भूषणावहच आहे, त्याचप्रमाणें ज्या ज्या ठिकाणीं असंबद्धता किंवा विसंवादित्व दिसेल त्या त्या ठिकाणीं तें हुडकून

काढणें हें बुद्धिशक्तीस तितकेंच भूषणावह आहे. संवादित्व असणें हा जसा वस्तुजाताचा गुण आहे बुद्धीचा गुण नाहीं, त्याचप्रमाणें विसंवादित्व हा फार झाला तर वस्तुजाताचा दोष आहे असें ह्मणतां येईल, तो बुद्धीचा दोष नव्हे; व ज्या ठिकाणीं हें विसंवादित्व किंवा ही असंबद्धता असूनही तिचें अभिज्ञान करण्यानें शारीरिक किंवा मानसिक दुःख होत नाहीं, किंवा एखाद्या मनुष्याबद्दल तिटकारा उत्पन्न होत नाहीं, किंवा आपल्या नीति—बुद्धीस धक्का पोहोंचत नाहीं अशा ठिकाणीं असंबद्धतेचें ज्ञान हें निःसंशय आनंददायक झालेंच पाहिजे. शाई हा पदार्थ स्वच्छ नाहीं हें खरें आहे, परंतु तिचा उपयोग लिहिण्याकडे करणें हें जसें दोषास्पद होत नाहीं त्याच प्रमाणें असंबद्धताही स्वतः सदोष असली तरी तिला व्यवहार्य करणें हें ही तसेंच दोषास्पद होऊं शकत नाहीं. ह्मणजे असंबद्धतेच्या गुणदोषांचा विचार फक्त योजकाचा हेतु किंवा त्या योजनेपासून होणारे परिणाम हे लक्षांत घेऊनच करावयास पाहिजे.

(७३) आतां ही गोष्ट खरी आहे कीं नेहमींच कोट्या, थट्टा मस्करी किंवा विनोद करण्याची संवय असणें हें चांगलें नव्हे. कारण तिचे योगानें स्वभावास एकदेशीयता येते व एकदेशीयता हा दोष असून असा आहे कीं तो ज्या ज्या गुणांशीं संबद्ध असेल त्यांची माती करितो, व विनोद हा गुण झाला तरी तो ही या नियमास अनुसरूनच असणार. मनुष्यस्वभावांत भारदस्तपणा व आवेश हे दोन्ही ही मुळाशीं असले पाहिजेत ही गोष्ट निर्विवाद आहे. व विनोदाचें बेसुमार सेवन केल्यानें या दोहोंस धक्का बसण्याचा संभव असतो. जी जी वस्तु ह्मणून सांपडेल तिची चेष्टाच करीत गेलें तर सर्वच थट्टा होणार. विनोद असो वा नसो आपलें मुख्य लक्ष जगांतील उदात्त व शुद्ध अशाच गोष्टींकडे रोंखलेलें असलें पाहिजे. तसेंच थट्टा मस्करी केल्याबद्दल किंवा विनोदाबद्दल जरी आपणास तिरस्कार वाटला नाहीं तरी केवळ तिरस्कारार्ह अशाच कांहीं गोष्टी जगांत आहेत व त्यांचे संबंधानें मनांत नेहमीं तिरस्कारच बाळगला पाहिजे. असंबद्धतेचेही प्रकार असे पुष्कळ जगांत आहेत कीं ते पाहून हंसें कधींच येणार नाहीं तर फक्त वाईटच वाटेल. अर्थात् अशा गोष्टींचे संबंधांत विनोदास अवकाश नसून आवेश व भारदस्तपणा याच गुणांचा तेथें अश्रय करावा लागेल. जे लोक विनोदी ह्मणून आपल्यास दिसतात त्यांपैकीं कित्येक असे असतात कीं त्यांस जगांतील प्रत्येक गोष्ट तुच्छ वाटते व यांत काय आहे त्यांत काय आहे असें ते करीत सुटतात. अशा लोकांना जगांत वंद्य किंवा पवित्र असें कांहींच नसतें. परंतु अशा लोकांनीं केलेल्या विनोदास विनोद ही संज्ञाच देतां येत नाहीं व अशांच्या विनोदापासून एखाद्या रोगाप्रमाणें दूर राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एखाद्या दरबारांत ज्याप्रमाणें खुषमस्कऱ्या चतुर भाषण बोलत असतांही मुख्य स्थानावर राजा आरूढ असतो व इतर लोक आपआपल्या दर्जाप्रमाणें अदबीनें बसलेले असतात, त्याचप्रमाणें विनोदाचें काम चालू असतांही मनुष्याच्या मानसिक दरबारांत उदात्तपणा, विचारीपणा किंवा सत्यप्रियता यांपैकीं एखादा ना एखादा तरी सद्गुण मनःप्रवृत्तीवर आपला अंमल चालवित असला पाहिजे. व्यवहारांत आढळून येणारे कित्येक विनोदी लोक स्वभावतः पाहिलें तर केव्हां मूर्ख तर केव्हां दुष्ट, केव्हां हेवेखोर तर केव्हां पोकळडौली असे असतात. अशा लोकांकडे पाहिलें ह्मणजे असें वाटतें कीं, एका विनोदाचे पायीं जर इतके वर सांगितलेले दुर्गुण आपल्यावर हक्क सांगूं लागतील

तर तो विनोदच नको. कारण विनोद ही चीज जरी इष्ट व प्रिय आहे तरी तिला किती किंमत द्यावी याबद्दल कांहीं तरी सीमा असलीच पाहिजे. परंतु वरील सर्व कारणांमुळें जितकी सूट घालावयास पाहिजे तितकी घालूनही शेवटीं विनोदाचें मूल्य ह्मणून कांहीं थोडें तरी शिल्लक राहतेंच. कारण ज्या कांहीं विवक्षित गोष्टींत विनोद आपल्यास नको आहे अशा गोष्टी एकंदरीनें थोड्या असून ज्या गोष्टींत आपल्यास विनोद हवा आहे अशा गोष्टी अधिक भरतील. या संबंधानें ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं विनोदाची गणमैत्री पुष्कळ गोष्टीशीं जुळते; जुळत नाहीं अशी फार थोड्यांशींच. सद्गुणांशीं विनोदाचा सहवास होईल तेथें तर दुधांत साखर पडल्याप्रमाणें त्यास गोडी येईल, किंवा स्फटिकावर सूर्यकिरण पडल्याप्रमाणें त्यांचे जोडीस उज्ज्वलता किंवा दैदीप्यता येईल. शहाणा तत्त्ववेत्ता, शूर वीर, सहृदय विद्वान्, व्यवहारपंडित, सदसद्विवेकी, इत्यादि प्रकारच्या लोकांबद्दल आपल्या मनामध्यें आदर तर असतोच; परंतु वरील लोकांपैकीं प्रत्येकाचे आंगीं जर सुदैवानें विनोदीपणाची भर पडलेली असली तर आमच्या आदरबुद्धींत एक प्रकारच्या गोड प्रेमाचीही भर पडते. ह्मणजे नुसती आदरबुद्धि असल्यानें जे लोक आपणास केवळ परके किंवा दूरतः सेव्य असे वाटतात तेच वरील प्रेम उत्पन्न झालें असतां आपणाशीं एकजीव होऊन त्यांचे सद्गुण आपणांमध्यें संक्रमित होतात.

(७४) हास्य व विनोद यांच्या उपयोगाचा दोन तऱ्हेनें विचार करितां येईल. एक समाजदृष्ट्या व दुसरा व्यक्तिदृष्ट्या. पैकीं समाजासंबंधानें पाहातां ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे कीं, समाज ही कोणी एक व्यक्ति असून तिला मन आहे असें नाहीं. परंतु ज्याप्रमाणें व्यक्तीच्या बुद्धीला व नैतिक कल्पनांना वाढ आहे त्याच प्रमाणें एकंदर समाजाच्या बुद्धीला व नैतिक कल्पनांनाही वाढ असते. अर्थात् ज्यांचे योगानें या दोनही बाबतींत समाज अधिक सुशिक्षित होईल त्या गोष्टींनीं समाजास फायदा होईल. हास्यविनोद वगैरेंचा उपयोग व्यक्तीपेक्षां कदाचित् समाजासच कांहीं बाबतींत अधिक आहे. एका व्यक्तीच्या मनाचा कल बहुधा एकाच विशिष्ट बाजूचा असतो. त्याला शिक्षण बहुधा एकाच दिशेचें असतें व त्याचे विचारही बहुधा एकांगी असतात. समाजाची गोष्ट तशी नाहीं, ह्मणजे समाजाची वाढ अनेक अंगांनीं व्हावयाची असते व ह्मणून त्यास शिक्षणही अनेक अंगानीं मिळावें लागतें. हें अनेकांगी शिक्षण मिळण्यास समाजाच्या हास्यविनोदप्रियतेचा मोठाच उपयोग होतो. एखादें सुभाषित एखाद्या व्यक्तीनें एकट्यानेंच वाचलें किंवा ऐकिलें तर त्या पासून होणाऱ्या फायद्यापेक्षां तेंच दहा लोकांनीं एकत्र वाचलें किंवा ऐकिलें असतां जो फायदा यथाप्रमाण व्हावा त्याहूनही तो अधिक होतो. व्यक्तीस नुसतें शिक्षण मिळतें, परंतु दहा व्यक्तींनीं मिळून तोच सुभाषितास्वाद घेतला तर प्रत्येक व्यक्तीस मिळावयाचें तें शिक्षण मिळून वरतीं दहा लोकांच्या मनाचा तात्पुरता कां होईना परंतु मिलाफ होऊन संघशक्तिही उत्पन्न होते. ह्मणून कोणतेंही सुभाषित कसें काय आहे याचा विचार कर्तव्य असतां व्यक्तीच्या मनावर त्याचा काय परिणाम होईल हें पाहण्यापेक्षां समाजाचे मनावर त्याचा काय परिणाम होईल हें आधीं पाहिलें पाहिजे. हास्यविनोदशीलता हा एक सामाजिक गुण आहे, व स्पर्शानें एकापासून दुसऱ्या व दुसऱ्यापासून तिसऱ्यापर्यंत असा त्याचा प्रसार होतो. सामाजिक हास्यविनोदापासून

सामाजिक सुस्वभाव, सामाजिक सद्गुण, व समाजहितदृष्टि यांच्या वृद्धीस मदत होते.

(७९) आतां हास्यविनोदापासून व्यक्तीला होणाऱ्या फायद्याकडे वळूं.हास्यक्रियेचा शरीरावर वैद्यकदृष्ट्या फायदेशीर परिणाम होतो ही गोष्ट प्रथमतः ध्यानांत ठेवण्या जोगी आहे. हास्याचा परिणाम शरीरप्रकृतीवर चांगला होतो. ज्याला वैद्यकाची कांहीं माहिती नाहीं असा मनुष्यही एकदम सांगूं शकेल कीं हांसल्यापासून आंगांतील शिरांस एक प्रकारचा मोकळेपणा वाटतो. हास्य स्फुट नसतें त्यावेळीं श्वासोच्छ्वासाची क्रिया संथपणें चालत असते. तिच्यामध्यें हांसण्यानें एकदम व्यत्यय येतो हें खरें; परंतु या व्यत्ययाचा परिणाम श्वासोच्छ्वासाच्या इंद्रियांवर व शरीरांतील रक्तप्रवाहावर चांगला असाच होतो. हास्यामुळें वक्षकपाटावर एका मागून एक असे अनेक आघात होतात. या प्रत्येक आघाताचे वेळीं रक्तवाहिन्यांतील रक्त काळिजांत जाण्यास प्रतिबंध होतो. बराच वेळ मनुष्य हांसत असला ह्मणजे त्याचें डोकें व मान तांबूस होतात याचें कारण वरील प्रतिबंधच होय. तसेंच हास्यक्रियेच्या मधून मधून जो खोल असा श्वासोच्छ्वास घेतला जातो त्याचे योगानें फुफुसांत हवा शिरून तीं फुगतात व त्याचा परिणाम असा होतो कीं वाहिन्यांतील रक्त काळिजाकडे घालविलें जातें. काळजाकडे रक्त अधिक जोरानें जाणें व त्यास प्रतिबंध होणें या दोन क्रिया एका मागून एक व आलटून पालटून अशा झाल्यानें रक्तांत प्राणवायूची मिसळ अधिक होते, व प्रवाहही जोरानें चालतो. हे सर्व प्रत्यक्ष परिणाम होत. या शिवाय दुसरे अप्रत्यक्ष परिणामही होऊं शकतात. मोकळ्या मनानें मनुष्यांस हांसे आलें ह्मणजे रक्ताचा मेंदूवरील दाब कमी पडतो. रागावलेल्या मुलास कांहीं चेष्टा करून हांसवितात याचें कारण तरी हेंच कीं, हांसें फुटल्या बरोबर मेंदूकडील रक्त मोकळें होऊन मनोवृत्ति फुलते. एकंदर शरीरप्रकृतीवर हास्याचे होणारे सुपरिणाम अर्थातच इतके त्वरित होऊं शकत नाहींत. परंतु ते होतात या बद्दल कोणास क्वचितच शंका असेल. इंग्रजींत Laugh and grow fat अशी एक ह्मण आहे यावरून इंग्रज लोकांत या बद्दल काय समजूत आहे ती व्यक्त होते.

(1) When man smiles and much more when he laughs he adds a fragment to his life (Strene.)

(2) Laughter makes good blood

(Italian proverb.)

ग्रीक तत्त्ववेत्ता आरिस्टॉटल याचे वेळेपासून आजपर्यंत, हांसण्याचे योगानें फुप्फुसें बळकट होतात व शरीरप्रकृतीच्या निरोगीपणास हास्य हें एक साधन आहे असें सर्व इंद्रियविज्ञानशास्त्रवेत्ते ह्मणत आले आहेत. रस्त्यांत गर्दी वगैरे बरीच जमून जाण्यायेण्यास प्रतिबंध झाला असतां पोलीसानें सोटा उगारून "चला लोक गर्दी मोडा" असें ह्मटल्यानें ज्याप्रमाणें जमलेल्या समाजांत खळबळ सुरू होते, त्याच प्रमाणें मेंदूवर किंवा मनावर ताण पडला असला किंवा कांहीं काळजी वाटून उद्विग्नता आली असली तर खळखळून हंसें आलें ह्मणजे एकदम मोकळेपणा वाटूं लागतो. शरीरावरही तसाच परिणाम घडतो. कारण बहुधा मोकळ्या हासण्यानें हातपाय वगैरे अंगाचे भागासही चलन मिळतें. मात्र 'अति सर्वत्र वर्जयेत्' या ह्मणी प्रमाणें हांसण्याच्या कामांतही अतिशयत्वानें शरीरप्रकृतीवर वाईट परिणाम होण्याचा संभव असतो हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे. औषधाप्रमाणें हास्याचींही पथ्यकर व अपथ्यकर अशीं

प्रमाणें असतात, व निरनिराळ्या प्रकृतींस हास्यरूपी औषध हें निरनिराळ्या प्रमाणांनींच विहित आहे.

नेहमीं गंभीर किंवा आवेशयुक्त विचार मनांत उत्पन्न झाल्यानें मनावर एक प्रकारचा ताण पडतो. धनुष्याचा ज्या वेळीं उपयोग करावयाचा नसतो त्यावेळीं त्याची दोरी सोडून त्या वरील ताण कमी करितात. त्याचप्रमाणें कांहीं विशिष्ट प्रसंगींच आवेशयुक्त व गंभीर विचारांचा ताण मनावर पडावा, एरवींच्या वेळीं मन स्वाभाविक व न ताणलेल्या स्थितींत राहावे व त्याचें आंगच्या स्थितिस्थापकत्वाचा गुण नष्ट होऊं देऊं नये या करितां ईश्वरानेंच हास्यविनोदाची तजवीज करून ठेविली आहे. हा उपयोग केवळ अकरणरूप झाला. तथापि त्याचे प्रत्यक्ष असेही उपयोग आहेत. पैकीं एक असा आहे कीं विनोदशीलतेमुळें आत्मस्वभावाचें निरीक्षण मनुष्य करूं शकतो. जें शस्त्र आपण लोकांवर नेहमीं चालवितों तेंच अर्थात् स्वहितबुद्धीनें आपल्यावरच चालवून पाहाण्याची इच्छा मनुष्यास एखादेना एखादे वेळीं तरी होणारच. विनोद हा एक फिरता प्रदीप आहे; त्याचा प्रकाश दुसऱ्यावर जसा पडतो तसा आपणावरही पडलेला पाहून त्याच्या उजेडांत ज्या गोष्टी दिसतील त्यांचा बोध त्यास सहजच होतो. “ माझें मलाच हंसूं येतें ” असा शब्दप्रयोग आपण व्यवहारांत नेहमीं झालेला पाहतों. याचा अर्थ उघड आहे. ज्याला दुसऱ्याचें नेहमीं हंसूं येतें त्याला स्वतःचें एखाद वेळ तरी हसूं येईलच. परंतु आत्मनिरीक्षण किंवा आत्मशिक्षण यापेक्षां दुसरेही फायदे आहेत. आपल्या जीवितक्रमांत लहानसान अडचणी अगर लहानसान संकटें आपणावर येतात. तेव्हां आपण कित्येक त्यांच्या ओझ्याखालीं दडपून जातों. परंतु त्याच्या योगानें आपल्या एकंदर जीवितक्रमास व्यत्यय न येतां आपण कित्येक त्यांतून लीलेनें पार पडतों. एखादा जिन्नस आपणच कोठें तरी ठेविलेला असावा व तो सुरक्षित ही असावा, पण हुडकूं जावें तर मात्र तो आपणांस सांपडत नाहीं व तो शोधशोधून आपण दमतों. अशावेळीं आपल्या मनास किती त्रास होण्याचा संभव असतो. विनोदानें हासून जर आपण तो क्षण सुखाचा केला नाहीं तर तो दुःखाचा खास होईल; व असें झालें असतां शुष्क कारणाकरितां आपल्यास दुःखाचे कितीतरी क्षण विनाकारण काढावे लागतील. एखादे वेळ गर्दींगर्दीनें गांवाला जाण्यास निघावें तों आगगाडी चुकावी असे प्रसंग मनुष्यमात्रास केव्हां ना केव्हां तरी येतातच. समजा, अशा वेळीं गाडी चुकली ह्मणून खिन्न होऊन चार लोकांदेखत गुडघ्यांत मान घालून बसणारा एक मनुष्य घ्या, व दुसरा एक असा घ्या कीं आपल्यादेखत गाडी सुटलेली पाहून न त्रासतां विनोदानें एवढेंच ह्मणतो कीं “ अहो बाई, तुमच्या करितां आह्मी इतकें लांबून धडपडत व धापा टाकीत आलों. असें असतां आमची एक क्षणाची सुद्धां मुरवत तुह्मी धरूं नये हें चांगलें दिसतें कां ? ” असें बोलून हासत परत फिरतो. या दोन मनुष्यांच्या स्थितींची तुलना करून पहा व सांगा कीं दोघांचेंही नुकसान व अडचण सारखीच असतां त्यांपैकीं सुखी कोण व दुःखी कोण ? समजा आपण पायगाडीवर बसून जोरांत चाललों आहों, असें असतां एखादे वेळीं एखादें खेळकर व खोडकर मूल मुद्दाम होऊन पुढें तरी येतें किंवा जागचें हालत तरी नाहीं किंवा आपण त्यास चुकविण्याकरितां डावे उजवे हाताला पळावें तों तों तेंही उजवी डावी बाजू घेऊन नेमकें पुढेंच येतें. अशावेळीं प्रथम चटकन् रागाचा व त्रासाचा

झटका येतो, परंतु त्रासिक मनुष्य त्याजवर व आपल्यावर रागावून त्याला चार शिव्या देत व आपणासही चार घेत निघून जाईल, किंवा त्या मुलाचे वतीनें कोणी बोलूं लागल्यास वर्दळीवरही येईल, व एकदां रागाच्या शब्दांची, किंवा शिव्यांची सलामी दोहों पक्षांकडून झाली ह्मणजे मग तो तंटा किती विकोपास जाईल किंवा अखेर काय परिणाम होतील हें देव जाणे. विनोदी मनुष्याची तऱ्हा याहून वेगळी असते. अशा प्रसंगीं तो हें पटकन लक्षांत आणील कीं रस्त्यावर खेळण्याचा लहान मुलांचा हक्क निसर्गसिद्धच आहे, व येणारा जाणारांशीं गमतीनें वागणें हें त्यांच्या खेळांपैकींच एक अंग आहे. अशा वेळीं समजा कीं गाडीवरून तो पडला तरीही, अपघात विशेषच मोठा नसेल तर, तो "आतां या गाडीला तिच्या डाक्तराकडे नेलें पाहिजे" एवढेंच ह्मणून हांसून भागवून नेईल. किंवा अपघात न होतां मुलास चुकवून जातां आलें तर मागें वळून तो एवढेंच ह्मणेल कीं कां कशी झाली फजीती ? दिली कीं नाहीं झोकांडी? व असें झालें असतां तो स्वतः, तें मूल व आसपासचे लोकही सर्वजण मिळून हंसून जो तो आपल्या कामास जाईल. आपण एखादे वेळ गाडींतून उतरतांना आपणांस नकळत दारांत धोतर सांपडलेलें असावें व आपणास जलदीनें उतरतां येऊं नये अशा वेळीं कोचमनाला व्यर्थ शिव्या हासडणारे व रागावून अकांडतांडव करणारे लोक ज्या प्रमाणें जगांत असतात त्याचप्रमाणें दुसरेही असे कित्येक असतात कीं ते अशावेळीं एखादी कोटी करून किंवा विनोदाचें भाषण करून तो अडचणीचा क्षण हास्यासच कारणीभूत करितील. अंधारे रात्रीं रस्त्यानें जातांना अडखळून आपण पडलों असतां म्युनिसिपालिटीला शिव्याशाप देऊन आपले जिवाला त्रास करून घेणें ही एक गोष्ट व आतांशा आमच्या कमेटीची रोषनाईची व्यवस्था इतकी चांगली आहे कीं तिचे कंदील पाहाण्यास घरचे कंदील न्यावे लागतात एवढेंच ह्मणून व उठून आपल्या मार्गानें जाणें ही दुसरी गोष्ट. यांपैकीं शहाण्या माणसानें कोणती पतकरावी या बद्दल बहुधा वाद होणार नाहीं. समजा, आपण नाटक पहावयास गेलों असतां आपल्या समोरच्या खुर्चीवर बसलेल्या गृहस्थाचें पागोटें भलें मोठें असल्या कारणानें मौज पहाण्यास आपल्यास व्यत्यय येतो. अशा वेळीं "अहो नाटक पहावयास यावयाचें तर असलीं चाकासारखीं पागोटीं घरीं ठेवून यावीं समजलांत कां ? आह्मी मागच्या खुर्चीवर बसलों असलों तरी तुमच्या सारखेच आह्मांलाही पैसे मोजावे लागले आहेत. काढा तें पागोटें अगोदर नाहीं तर म्यानेजरास कळवीन" असें बोलून त्याचें प्रत्युत्तर ऐकून घेणें व शेवटीं भांडाभाडी करून स्वतःच्या व लोकांच्या करमणुकीस व्यत्यय आणून पोलिसापर्यंत मजल नेणें हा एक मार्ग, व समोरच्या गृहस्थास "काय हो स्टेजवर काय चाललें आहे तेवढें सांगाल कां ?" असें विचारून व्यंग्यार्थानें पागोट्याची अडचण त्याचे नजरेस आणून देणें किंवा थट्टेनें "रावसाहेब, आज फार उकडते आहे नाहीं ? जरा पागोटें बिगोटें काढून हवा घ्याल कीं नाहीं" असें ह्मणणें व अर्थात्च "कां हवेचीशी चौकशी चाललेली आहे ? पागोटें बिगोटें तुमच्या दृष्टी आड येते कीं काय ?" असें विनोदी उत्तर त्याजकडून घेऊन आपला हेतु साधणें हा दुसरा मार्ग. यांपैकीं चांगला कोणता हें आह्मी सांगावयास नको. एखादा भिक्षुक येऊन खटपटीस बसून त्रास देत आहे अशावेळीं त्याजवर रागावून "कायहो शंभर वेळां सांगितलें तरी तुह्मांस कळत नाहीं का ? उठतां कीं हातास धरून घालवूं ?" असें

फेब्रुवारी – फेब्रुवारी

णणें बरें? किंवा "भटजी महाराज, ऊन तर होत चाललें, आपल्याला आणखी चार ठिकाणीं जायचें असेल, दुसरे चार लोक हातांत दक्षणा घेऊन आपली वाट पहात बसले असतील, त्यांची आपण निराशा करणार कीं काय?" असें ह्मणणें बरें? एखादे वेळीं कुलूप काढायाला जावें तों तें गंजून गेल्यामुळें निघूंच नये असें होतें. अशा वेळीं कोणी तरी कुलूप बिघडविलें खास अशी समजूत खरोखर नसतांही उगाच घरच्या पोरां-बाळांस अथवा चाकर नोकरांस शिव्या हासडणारीं, किंवा आपल्या गैरमर्जीची मजल कुलपांच्या कारखानदारांपर्यंत नेऊन "कुलुपें गंजतात ह्मणजे काय, अलीकडे सर्वच कारखाने चोरांचे बाजार झाले आहेत. या बद्दलचा गवगवा वर्तमानपत्रांतून केलाच पाहिजे!" वगैरे ह्मणणारीं माणसें वेगळीं; आणि अचेतन कुलपासच उद्देशून "कां स्वारी आज रुसली आहे वाटतें? तेल पाहिजे कां थोडेंसें प्यायला?" इतकेंच ह्मणून जाणारीं माणसें वेगळीं. कथा ऐन रंगांत आली असतां एखादें मूल रडूं लागावें व असें झालें असतां, हरदास मूर्ख असेल तर तो "अहो बाई, त्या मुलाला गप कराल किंवा नाहीं? लोकांनीं येथें कथा ऐकायला यायचें कीं तुमच्या मुलाचें रडणें ऐकायला यायचें?" असें बोलून आपल्या स्वतःस त्रास करून घेईल व त्या बिचाऱ्या माउलीस आपला जीव नकोसा करून टाकील. परंतु त्याचे जागीं एखादा विनोदी हरदास असेल तर "लहान बालकें हीं राजे लोकांप्रमाणेंच शीघ्रकोपी असतात व त्यांचें समाधान करण्याचे श्रम काय असतात हें गोकुळच्या यशोदेस जाऊन विचारावें ह्मणजे कळेल" असें ह्मणून लहान मुलावर एखादी गोष्ट सांगून सर्वांस क्षणभर हास्यसुखाचा लाभ करून देईल. अशा प्रकारचीं उदाहरणें जितकीं द्यावीं तितकीं थोडींच होतील. परंतु त्या सर्वांचें तात्पर्य हेंच कीं, संसारांतील लहानसहान अडचणींचा किंवा संकटांचाही परिहार विनोदानें जितका होतो तितका रागाऊन किंवा त्रास करून होत नाहीं. कित्येक गोष्टी हलक्या हातानें केल्या तरच त्या साधतात हें आपण नेहमीं पहातों, व विनोददृष्टीनें अडचणीकडे पहाणें ह्मणजे त्यांच्या परिहारास जो एक प्रकारचा हलका हात लागतो त्याचा उपयोग करण्यासारखें आहे. अशा प्रसंगीं साधु लोक परमार्थदृष्टीनें जें समाधान स्वतःस प्राप्त करून घेतात तेंच संसारी लोक विनोदानें करून घेतात. आपल्या रागीट बायकोनें प्रथम शिव्या देऊन नंतर डोक्यावर घाण पाणी टाकिलें हें पाहून "विजेच्या कडकडाटानंतर व मेघगर्जनेनंतर पर्जन्यवृष्टि झालीच पाहिजे" असें ह्मणणाऱ्या साक्रेतीसच्या आंगचा विनोद जरी आपणा सर्वांमध्यें असला नाहीं तरी पण प्रत्येकास बऱ्याचशा सांसारिक अडचणी व संकटें यांचा परामर्ष विनोदी मनानें घेतां येईल यांत संशय नाहीं. यदृच्छा किंवा इंग्रजींत ज्यास "Circumstances" असें ह्मणतात, तिचा व मनुष्यमात्राचा सामना विषम आहे, ह्मणजे एका बाजूस सर्व शक्तिमान यदृच्छा व दुसरे बाजूस अल्पशक्तिमान असे आपण मानवी प्राणी आहोंत. आणि असें हें विषमद्वंद्व जोंपर्यंत आपणांस जगावयाचें आहे तोंपर्यंत चालणारच. ही गोष्ट नीट लक्षांत घेतली ह्मणजे मग हरप्रसंगीं हातघाईवर किंवा उपायीं न येतां विनोदरूपी मायावी शक्तीची आराधना करून तिच्या सामर्थ्याची मदत आपणांस घेतल्याशिवाय या द्वंद्वांत यश मिळणार नाहीं अशी तेव्हांच खातरी होते.

(७६) कोणत्याही अडचणीचा परिणाम एक प्रत्यक्ष ह्मणजे पदार्थसृष्टीवर घडणारा व दुसरा

अप्रत्यक्ष ह्मणजे आपल्या मनावर होणारा, असे दोन प्रकारचे असतात. पैकीं विनोदानें प्रत्यक्ष परिणाम नाहींसा होऊं शकणार नाहीं हें उघड आहे; त्यास योग्य अशी परिहारकारक कांहीं तरी क्रियाच केली पाहिजे. परंतु अप्रत्यक्ष ह्मणजे मनुष्याच्या मनावर होणारा परिणाम विनोदानें बराच कमी करितां येतो. विनोद-दृष्टीमुळें संकटाच्या अगर अडचणीच्या प्रत्यक्ष परिणामाचें भय वाटणार नाहीं; त्याचें स्वरूप आहे त्याहून थोडेंसें कमी असेंच वाटेल. व अप्रत्यक्ष परिणामासंबंधानें पाहतां एरव्हीं संकटमय अशा वस्तुस्थितीची जी बाजू आपणांस दिसत नाहीं ती, दृष्टि विनोदी झाली असतां, आपणास दिसूं लागते.

"In much of this alleviating service of humour the laugh which liberates us from the thraldom of the momentary is a laugh at ourselves. Indeed one may safely say that the benefits here alluded to presuppose a habit of reflective self-quizzing. The blessed relief comes from the discernment of the presposterous in the forcing of our claims, of a folly in yielding to the currents of sentiment which diffuse their mists over the realm of reality. The coming of the smile announces a shifting of the point of view, the maladjustment which a moment ago seemed to be wholly on the side of the world showing itself now to be on our side as well. (*Sully*, p. 329.)

संकटें जितकीं मोठीं तितका त्यांचा परिहार केवळ विनोदबुद्धीनें होणें कठिण आहे, हें उघड दिसतें. तथापि तन्निवारणार्थ अवश्य असे उपाय मनुष्यमात्र करीत असतां त्यास विनोदानें मार्गांत एक प्रकारचा आराम मिळतो. दीर्घनिश्चयी व विचारी माणसें धैर्यानें व नेटानें संकटाशीं हळू हळू झुंझत असतां त्यांची करमणूक न होईल तर त्यांस मनावर पडणारा ताण फार काळपर्यंत सोसतां येणार नाहीं. यामुळें इतिहासांत जे दीर्घोद्योगी पुरुष ह्मणून नांवाजले गेले ते विनोदीही होते असें दिसून येईल.

(७७) हास्यविनोद ही देणगी दैविक आहे. व तिचा उपयोगही आध्यात्मिक किंवा पारमार्थिक रीतीनें करितां येणें शक्य आहे. विनोद ही वस्तुस्थितीवर टीका करण्याची एक रीति आहे, व विनोद करणारा मनुष्य तात्त्विक विचारांत जितका मुरलेला असेल तितकी त्याच्या विनोदाला ह्मणजे टीकेला अधिक किंमत येईल. विनोदशीलता आंगीं येण्यास मन विकसित असावें लागतें ह्मणून मागें सांगितलेंच आहे. परंतु केवळ सांसारिक मनुष्याचा विनोद व तत्त्वज्ञाचा विनोद यामध्यें अर्थातच पुष्कळ फरक पडेल. एकंदर जीविताविषयीं आपली कल्पना काय आहे हें ठरलें ह्मणजे विनोदाला जीवितक्रमामध्यें कोणतें स्थान देतां येईल हें आपणास ठरवितां येतें. तत्त्वज्ञानानें मनुष्याला वस्तुमात्रांतील अविनाशी कोणचें हें ठरवितां येतें; वस्तुस्थितीचें स्वरूप व तिचा खरा अर्थ याचा विवेक करितां येतो; व याच कामांत हास्यविनोदाची त्यास मदत होऊं शकते. तत्त्वज्ञानी मनुष्य आपल्या तत्त्वज्ञानरूपी पंखाच्या साहाय्यानें भरारी मारून वर गेला ह्मणजे मग लोकसमाजाचीं मतें व त्याचीं मतें यांमध्यें फरक पडतो. जग असावें कसें व असतें कसें, या दोन कल्पनांमधील अंतर त्याचे दृष्टीनें लोकदृष्टीपेक्षां अधिकाधिक होत जातें; मोठ्या अशा मानलेल्या

गोष्टी लहान दिसूं लागतात; कित्येक लहान अशा दिसणाऱ्या गोष्टींचें महत्त्व लोक मानितात त्यापेक्षां तें अधिक आहे असें वाटूं लागतें; जे पदार्थ ह्मणून दिसतात त्या निवळ छाया आहेत असें वाटतें; अर्थात् जनसमूहाची दृष्टि व तत्त्वज्ञाची दृष्टि यांमध्यें फरक पडतो. एवढ्याच गोष्टीनें खरें तत्त्वज्ञान हास्यप्रवण असावें असें सकृद्दर्शनीं ह्मणावें लागतें. व तें खरेंही आहे. आतां कांहीं कांहीं प्रकारच्या तत्त्वज्ञानपद्धतींत हास्यविनोदाला फाटा दिलेला असतो, व कांहीं तत्त्ववेत्ते विनोदी नव्हते असें आपणास आढळून येतें. याचें कारण मात्र असें कीं, तत्त्वज्ञानी बनल्यावरही मनुष्यमात्रासंबंधानें जितकें प्रेम ठेवावयास पाहिजे तितकें त्या पद्धतींत व त्या तत्त्ववेत्त्यांमध्यें राहिलेलें नव्हतें व मनुष्यजातिविषयगत प्रेम मनांत असल्याशिवाय विनोद होणें शक्य नाहीं इतकेंच काय तें. परंतु मनांत तत्त्वज्ञान एका बाजूनें शिरलें ह्मणजे लगेच दुसऱ्या बाजूनें हास्यविनोदानें निघून गेलेंच पाहिजे असें नाहीं.

(७८) विनोद हें गंभीर व खेळकर अशा दोन परस्परविरुद्ध अशा वृत्तींचें मिश्रण आहे. व संसाराची कोणतीही उपपत्ति घेतली तरी ती समर्पक रीतीनें सर्वांशीं लागू पडत नाहीं. या गोष्टीमुळेंच तत्त्वज्ञानी हा विनोदी बनण्याचा संभव उत्पन्न होतो. आनंदवाद किंवा सदाशावाद (Optimism) घेतला तर त्याच्याशीं संसारांत प्रत्यक्ष अनुभवास येण्याऱ्या दुःखांचा मेळ चांगलासा घालतां येत नाहीं; ह्मणजे ज्यास मनुष्यमात्राबद्दल खरी कळकळ व सहानुभूति आहे अशा मनुष्यास जर सांगितलें कीं सकृद्दर्शनीं जीं दुःखें ह्मणून दिसतात तीं दुःखें नसून जीविताच्या किंवा जगाच्या आनंदरूपी होणाऱ्या पर्यवसानाचीं साधनें आहेत, तर तें त्यास फारसें पटावयाचें नाहीं. परंतु अशा रीतीनें आनंदवाद किंवा सदाशावाद ज्यास सर्वांशीं संमत नाहीं असा मनुष्य जर विनोदी असेल तर तो निराशावादी किंवा दुःखवादी (Pessimist) ही बनणार नाहीं. फक्त संसार हा दैवाचा मनुष्याशीं एक प्रकारचा खेळ आहे असा विचार त्याचे मनांत येईल. व तसें झालें ह्मणजे अर्थातच गंभीर व गमतीच्या अशा विचारांचें मिश्रण होऊन त्यास विनोदप्रतीति होईल व हसूं येईल. त्याला स्वस्वरूपाच्या अज्ञेयत्वाबद्दल निवळ खेद न वाटतां तो आपल्याशीं बहुधा असें ह्मणेल कीं " हें सर्व गौडबंगाल दिसतें. कोणचीही उपपत्ति घेतली तरी ती पुरत नाहीं व सर्वांशीं लागू पडत नाहीं तेव्हां जाईना कां? उगाच उपपत्ति रचीत बसविण्याचे श्रम कशाला घ्या ? आहे या स्थितीचें मनन केलें ह्मणजे गंमत व हास्यानंद होतो तेवढा आपला खरा."

आध्यात्मिक किंवा पारमार्थिक विचार व विनोद यांचा वरीलप्रमाणें संबंध आहे. परंतु तोही बाजूस ठेवून आपण विचार करूं लागलों तरी जगांतील नीति वाढविण्यास विनोदाचा अप्रत्यक्षरीत्या उपयोग होतो हें सूक्ष्म दृष्टीनें पाहणारास कळून येईल. अनीतीचें आविष्करण करण्यास विनोदासारखें दुसरें कोणचेंच साधन समर्थ नाहीं. अनीतीची निंदा केवळ रागानें केली असतां ती उलटून एखाद्या बेफाम घोड्याप्रमाणें उपायीं येण्याचा संभव असतो. परंतु विनोदाच्या मऊ अशा शलाकेनें अनीतीच्या सदोष दृष्टींत अंजन फिरलें असतां ती हळू हळू निवळूं लागते. खुद्द विनोदी स्वभावाला तुह्मी सद्गुणांच्या यादींत घाला किंवा न घाला, परंतु त्याच्या हातून जो नैतिक उपयोग होतो त्याबद्दल वाद

नाहीं. विनोदाला सद्गुण ह्मणण्यांसंबंधानें ही कांहीं हरकत आहे असें आह्मांस वाटत नाहीं. ज्याच्या पासून मनुष्याला स्वतः इतकें सुख होण्याचा संभव आहे व ज्याचे हातून दुसऱ्याची इतकी सुधारणा होणें शक्य आहे त्यास सद्गुण कां ह्मणूं नये हें आह्मांस कळत नाहीं. मनुष्याचे मनांत पापबुद्धि किंवा कित्येक दुष्ट व निंद्य विकार असूनही तो एक प्रकारचें हास्य हांसूं शकतो हें मागें एका ठिकाणीं सांगण्यांत आलेंच आहे. परंतु अशा प्रकारचें दोषी हास्य वगळलें असतां इतर प्रकारचें ह्मणजे निर्दोष हास्य ज्यांस येतें ते खरोखर धन्य होत. प्रसिद्ध तत्त्ववेत्ता कार्लाईल यानें एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, ज्या मनुष्यास आयुष्यांत एकदां तरी खळखळून व मनसोक्त हसूं आलें असेल तो मनुष्य अगदीं टाकाऊ असणें कधींही शक्य नाहीं.

"No man who has once wholly and heartily laughed can be altogether irreclamably bad. In cheerful souls there is no evil."

Carlyle.

त्याच्यांत कांहीं ना कांहीं तरी चांगले गुण असणें शक्य आहे. निदान इतकें तरी कबूल करावें लागेल कीं विनोदासद्गुण ह्मटलें किंवा न ह्मटलें तरी तो असल्याशिवाय कोणताही मनुष्य, मग तो इतर रीतीनें कितीही सद्गुणी असो, पूर्णतेस पोंचला असें ह्मणतां यावयाचें नाहीं. सद्गुणांस सुस्वभावाची जोड असल्यावांचून चालावयाचें नाहीं, व विनोदशीलता हा सुस्वभावाचा सर्वांत मुख्य घटक आहे. कारणाशिवाय दुसऱ्यास न दुखविणें, त्यास खुष ठेवण्याचा योग्य प्रयत्न करणें, व त्याजविषयीं एक तऱ्हेचा कृपाळूपणा मनांत वागविणें, या आपल्या स्वभावगुणांनीं विनोदी मनुष्य स्वतःच्या व दुसऱ्याच्या सुखास व आनंदास कारणीभूत होतो. मनुष्यकृत दुःखांधकार घालविण्यास मनुष्यकृत विनोदासारखें दुसरें कोणतेंही तेज प्रभावी होऊं शकत नाहीं. कोट्या करणारा मनुष्य हा मनुष्यजातीचा एक श्रेष्ठ उपकारकर्ता आहे असें मानावें लागतें. शुद्ध भावानें केलेला विनोद हा एक प्रकारचा स्निग्ध असा गिलावा आहे. त्याचे योगानें स्नेह्यांतील स्नेह आणि मानवी कुटुंबांतील मनुष्यांचें परस्पर प्रेम हें बळकट होतें. केवळ एकमेकांबद्दल आदर बाळगणाऱ्या स्नेह्यांचा स्नेह, आदर असूनही ज्यामध्यें विनोदशीलता आहे अशा स्नेह्यांमधील स्नेहापेक्षां कमी रम्य, कमी सुखकर व कमी टिकाऊ असतो. त्याचप्रमाणें असें एखादें कुटुंब घ्या कीं ज्यांतील माणसें फक्त आपापल्या नात्याचे संबंध मनांत आणून परस्परांशीं वागतात; व दुसरें एक कुटुंब असें घ्या कीं त्यांतील मनुष्यें हा नात्याचा संबंध न विसरतां मित्रत्वाचे नात्यानें हंसूनखेळून व्यवहार करितात—या दोन कुटुंबापैकीं अधिक सुखप्राप्ति कोणाला बरें होईल? कित्येक कुटुंबांत मुलग्यास मुलें झालीं तरी तो आपल्या बापापुढें उभाही राहत नाहीं, किंवा वानप्रस्थाश्रमास योग्य झालेल्या नवराबायकोचें मनोगत दिवसा परस्परांस कळावयाचें झालें तर त्यांना कोर्टांतल्याप्रमाणें एखादा दुभाष्या लागतो. व यांतच कायतें खरें बालबोध वळण आहे अशा समजुतीनें आपल्या घरच्या या फाजील मर्यादेचा अभिमान बाळगणारीं व विनोदशत्रु अशीं कित्येक कुटुंबें अद्यापि आढळून येतात. याच्या उलट समजा कीं एखाद्या कुटुंबांत भाऊ भाऊ, आईबाप, व आईबाप व मुलें, हीं सर्व परस्पर मिळून मिसळून नेहमीं बोलतात चालतात, बसतात उठतात, जो तो आपापल्या बुद्धिशक्तीप्रमाणें युक्तिवाद, कोट्या व विनोद करितो; व दुसरा, मग तो लहान असो किंवा वडीलधारा असो, आपल्या

बुद्धिशक्ती प्रमाणें त्या युक्तिवादास, त्या कोट्यांस व त्या विनोदास संवादी असें प्रत्युत्तर देतो, व सर्वजण मिळून सर्वजणांची हास्यविनोदद्वारें करमणूक करितात. अशी स्थिति असेल तर त्या कुटुंबांत पृथ्वीवरच स्वर्गसुखाचा अवतार झाला आहे असें मानण्यास काय हरकत आहे? A good laugh is a sunrise in a house. असें आंग्लकवि टेनिसन यानें ह्मटलें आहे व तें अगदीं यथार्थ आहे. शिक्षणशालांचीही अशीच गोष्ट आहे. शिक्षक व छात्रगण यांनीं मिळून विनोद केला ह्मणजे गुरुशिष्याच्या नात्यास रजाच मिळाली असें मानण्याचें कारण नाहीं. एवढेंच नव्हे तर जो गुरु विद्वान असून विनोदीही असतो तोच शिष्यवर्गास विशेष प्रिय व मान्य होतो.

(७९) आतां हास्यविनोद हा अतिरेकास जाऊन त्यापासून दुष्परिणाम होऊं नयेत अशाकरितां त्यास योग्य तितका प्रतिबंध होणें जरूर आहे. परंतु असा प्रतिबंध मुद्दाम होऊन कोणास करावा लागत नाहीं. कारण विनोदातिरेकानें सदसद्विवेक भ्रष्ट होण्याची भीति असते व यामुळें ज्याचें त्याला आपण योग्य मर्यादेंत आहों कीं नाहीं याविषयीं बहुधा भान राहतेंच. शिवाय विषयिगत मर्यादा राहिली नाहीं तरी विषयगत ही एक प्रकारची मर्यादा असतेच. ती अशी कीं आपल्या विनोदा पासून दुसऱ्यास बरें न वाटतां वाईट वाटूं लागलें ह्मणजे आपोआप प्रतिबंध होतो. विनोदातिरेकाचे परिणाम अमर्यादित मद्यसेवनाप्रमाणेंच होतात. जो कारणाशिवाय व गरजेपलीकडे हास्यविनोदसुख घेतो तो दुसऱ्यास उपद्रवकारक होतो; व हास्यविनोद हा विषारी व अमली पदार्थाप्रमाणें त्याचें स्वतःचे पचनीं पडून त्यापासून त्याला खरें सुख होत नाहींसें होतें. परंतु या मर्यादेच्या आंत हास्यविनोद-सुख उपभोगणें हें अगदीं कायदेशीर, योग्य, नीतिसंमत, व सुपरिणामी होतें. यामुळें त्याची वृद्धि करण्याचे कामीं श्रेष्ठ लोकांनीं आजपर्यंत प्रयत्न केले आहेत व पुढेंही करतील यांत शंका नाहीं. वरील विधानाचे समर्थनास मुख्य साक्ष इतिहासाची व अनुभवाची दिली ह्मणजे झालें. राजदरबारीं, विद्यामंदिरांत तसेंच कलाभवनांत हास्यविनोदाचा जो आजपर्यंत परामर्ष घेतला गेला आहे, तो लक्षांत घेतला ह्मणजे निराळें कांहीं सांगावयाचें कारण उरत नाहीं. हास्यविनोदाची कला हल्लींप्रमाणें प्रत्यकाचे अंगीं यावी असें पूर्वींच्या काळीं लोकांचें मत होतें असें दिसत नाहीं; तथापि त्याचे योगानें सभ्यपणास कमीपणा येत नाहीं अशी सर्वांची कबूली होती. हास्यविनोदास राजदरबारीं व श्रीमंताचे पदरीं उत्तेजन मिळत असे. आपल्या कडील संस्कृत नाटकांतून विदूषकांस राजाच्या जिवलग मित्राचा (प्रियवयस्याचा) मान दिलेला दिसून येतो. विदूषकानें राजास व इतरांस वाटेल तें बोलावें, मात्र तें विनोदी असावें, अशी मुभा होती. विक्रम व भोज राजांचे पदरीं कवींप्रमाणेंच विनोदी भाषणकारांस तेज असे. पाश्चात्य राष्ट्रांत ही राजाचे पदरीं, व श्रीमान लोकांचे पदरीं विदूषकांसारखे चतुरभाषणी विनोदी लोक असत हें प्रसिद्धच आहे. हे लोक Clown व Fool या दोन प्रकारचे असत. हे दोनही प्रकार शेक्सपीअरच्या नाटकांत उत्कृष्ट तऱ्हेनें पात्रांच्या रूपानें वर्णिलेले आहेत. यांच्या पोटजाति नऊ होत्या. १ (The general domestic fool) घरचा नकल्या. २ (Clown) नकल्या. ३ (Female fool) स्त्री जातीस करमणूक करणारी नकली स्त्री. ४ (City or corporation fool) ललितांतला वगैरे भुत्या. ५

(The Tavern Fool) गुत्त्यांतून वगैरे करमणुकीसाठीं ठेवलेला नकल्या. ६ (The fool of the ancient mysteries and moralities.) पौराणिक नकल्या. ७ (The Fool in the old dumb shows) बाहुल्यांच्या वगैरे खेळांतला नकल्या. 8 (The Fool in the Morris dance) एक प्रकारचा नाचतमाशांतला नकल्या. ९ (The mountebank's Fool or merry Andrew). विदूषक. शेक्सपीअरच्या एका टीकाकारानें या नकल्यासंबंधानें व विदूषकांसंबंधानें असें ह्मटलें आहे:—

"The practice of retaining fools can be distinctly traced from remotest times. They were to be found alike in the palace and the brothel. The pope had his fool and the bawd hers; they excited the mirth of Kings and beggars ; the hovel of the villain and the castle of the Baron were alike exhilerated by their jokes. With respect to the antiquity of this custom in England it appears to have existed even during the period of our saxon history, but we are certain of the fact in the reign of William the Conqueror. They continued an appertenance to the English Court to a late period. Mickle John, the Fool of Charlse I, was perhaps the last regular personage of that kind. These hirelings required considerable wit and dexterity to please these employers...... The license allowed them was very great." अशा प्रकारच्या नकल्यांचे व विदूषकांचे आंगीं हास्य विनोद करण्याची केवढी जबरदस्त शक्ति असे याची कल्पना खालील Middleton नांवाच्या एका इंग्रजी प्रहसनकाराचे प्रहसनांतील उताऱ्यावरून कळून येईल:— "Of the clowns that I have seen in my time, the very peeping out of one of them would have made a young heir laugh though his father laya-dying; a man undone in law the day before.

प्रख्यात आंग्लकवि शेक्सपीयर याच्या नाटकांत —आनंदपर्यवसायी व शोकपर्यवसायी नाटकांत ही—नकल्या व विदूषक हे पात्ररूपानें आलेले आहेत. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, कवीनें त्यांचे तोंडीं जो विनोद घातलेला आहे तो हलक्या प्रतीचा नसून सभ्य व तत्त्वज्ञांस शोभेल असाच आहे. शहाणपणा मिरविणाऱ्या इतर पात्रांची व खुद्द नायक किंवा नायिका यांचीही फजिती कवीनें त्यांच्या तोंडून करविली आहे. व त्यांची कोटीबाज, विनोदी, मार्मिक, मुद्देसूद व तत्त्वज्ञानप्रतीतिकारक अशीं भाषणें वाचलीं ह्मणजे उच्चप्रतीच्या हास्यविनोदाचा आस्वाद घेतल्याचा आनंद वाचकांस होतो. संस्कृत नाटकांतील विदूषकही अशाच

(१) Twelfth Night या नाटकामध्यें शेक्सपीअरनें नकल्या (Clown) व (ऑलीव्हिया) नायिका, यांच्या संवादांत नकल्याचें तर्कवादांतील चातुर्य सिद्ध केलें आहे तो प्रवेश फार गमतीचा आहे:—

Clown—Wit ! and't be thy will, put me into good footing ! Those wits that think they have thee do very oft prove fools; and I that am sure I lack thee, may pass for a wise man. For that says Quinapulus ? Better a witty fool than a foolish wit—God bless the lady !

Olivia—Take the fool away.

Clown—Do you not hear fellows ? Take away the lady.

Oli.—Go to, you are a dry fool. I will no more of you ; besides you grow dishonest.

प्रकारें मार्मिक दाखविले आहेत. परंतु मृच्छकटिकांतील विदूषक लघळपणा न करणारा, स्वाभिमानी, मित्रप्रेमी, असा असूनही मार्मिक व विनोदप्रिय जसा साधला आहे तसे इतर नाटकांतील विदूषक साधलेले नाहींत.

Clo.—Two faults, Madona, that drink and good counsel will amend; for give the dry fool drink, then is the fool not dry; bid the dishonest man mend himself; if he mend he is no longer dishonest; if he can not let the botcher mend him. Anything that is mended is but patched; virtue that transgresses is but patched with sin; and sin that amends is but patched with virtue. If that this simple syllogism will serve, so: if it will not what remedy? As there is no true cuckold but calamity, so beauty's a flower:—the lady bade take away the fool: therefore I say, again, take her away.

Oli.—Sir, I bade them take away you.

Clo.-Misprision in the highest degree! Lady *cucullus non facit monachum;* that's as much as to say I wear not motley in my brain. Good Madona, give me leave to prove you a fool.

Oli.—Can you do it?

Clo.—Dexterously good Madona.

Oli.—Make your proof.

Clo.—I must catechise you for it Madona; good my mouse of virtue, answer me.

Oli.—Well sir, for want of other idleness I will abide your proof.

Clo.—Good Madona, why mournest thou?

Oli.—Good fool for my brother's death.

Clo.—I think his soul is in hell Madona.

Oli.—I know his soul is in heaven fool.

Clo.—The more fool you Madona, to mourn for your brother's soul being in heaven—Take away the fool gentlemen.

Twelfth Night Act I, Scene V.

त्याचप्रमाणें King Lear नामक नाटकांतील संभाषणेंही फारच मार्मिक आहेत. इजिपशियन राजे लोकांचे पदरीं विदूषक वगैरे असत अशाबद्दलचा पुरावा मासपेरो या ग्रंथकर्त्याच्या Dawn of Civilization ह्मणजे 'सुधारणेचा अरुणोदय' या पुस्तकांत दिलेला आहे. ग्रीक व रोमन लोकांत अशा प्रकारचे विनोदी व मार्मिक नोकर श्रीमंतांचे पदरीं ठेवण्याची चाल होती यास इतिहासाचा आधार आहे. व मध्ययुगांतही तो प्रघात सरास होता.

(८०) विद्यामंदिरांत हास्यरसाची संभावना कितपत झाली आहे हें पाहण्यास आपणांस ग्रीक वाङ्मयापर्यंत जावें लागतें. हल्लींप्रमाणें त्याही वेळीं हास्यविनोदाचें माहेरघर नाटकग्रंथ व प्रहसनें हीं होतीं. हास्योद्दीपनास अवश्य असणाऱ्या विषयांचा परामर्ष नाट्य-ग्रंथांस जितका घेतां येतो तितका इतर वाङ्मयप्रकारांस क्वचितच घेतां येतो. ग्रीक लोक स्वभावतः परचेष्टानुकरणप्रिय व हजरजबाबी आणि कोटीबाज असत; व शेतांतील पिकें कापून खळ्यावर येऊन पडल्यानंतर द्राक्षासव पीत पीत व मौजेच्या गोष्टी बोलत आणि गाणीं गात हास्यविनोद करण्याचा ग्रीक लोकांचा प्रघात असे व त्याचप्रमाणें व्याजस्तुतिपर कविता फटके वगैरे ह्मणण्याची त्यांना संवय असे. व या दोहोंमधूनच ग्रीक भाषेंतील हास्यरसप्रधान नाटकें उत्पन्न झालीं. या प्रहसनांचा उत्कर्ष ग्रीस राष्ट्र अगदीं भरभराटीच्या शिखरास पोंचलें त्या सुमारास ॲरिस्टोफेनीस या कवीचे हातून झाला.* याचीं नाटकें किंवा प्रहसनें

---

(१) It (Athenian Comedy) flourished in those glorious days of Athens which not long preceded her political decline; when the faculties of her citizens were

हल्लींच्या नाटकांसारखीं किंवा प्रहसनांसारखीं नसत; कारण पात्रें, गाणें, भाषणें, नकला वगैरे अनेक गोष्टींचा त्यांत समावेश केलेला असे. हीं प्रहसनें वर्षांतून तीन वेळां मद्यदेवतेच्या महोत्सवप्रसंगीं (Dionysia or the great Festivals of Bacchus) अथेन्स येथें रंगभूमीवर प्रयोग रूपानें लोकांपुढें मांडलीं जात. ग्रीक लोकांना कोट्या व विनोद यांचा मोठा शोक असे. व या महोत्सवप्रसंगीं प्रहसनांना मोठमोठीं बक्षिसें लावलीं जात. या प्रहसनांतील विषय ह्मटले ह्मणजे मोठमोठ्या व्यक्तींवर,सामाजिक चालीरीतींवर व राजकीय कथाप्रसंगावर टीका, असे असत. प्रेक्षक वर्ग हा नाटक पात्रांपैकींच एक पात्र असा समजला जाई. शिक्षणाचा प्रसार या कालीं अथेन्स शहरांत बराच झालेला होता, परंतु मुद्रण. कला माहित नसल्यानें पुस्तकें अर्थात् थोडीं असत व न्यायकोर्टें राजकीय सभा वगैरे ठिकाणीं नेहमीं हजर असल्यानें ज्यांची बुद्धि तीक्ष्ण झाली होती अशा लोकांच्या करमणुकीस अर्थातच या प्रहसनांसारखीं साधनें अवश्य होतीं. या काळीं ग्रीक लोकांचें शिक्षण व त्यांची सुधारणा हीं कोठवर गेलीं होतीं याची खरी कल्पना येण्यास त्या वेळच्या कवींचीं रम्य काव्यें अगर जाड्या इतिहासकारांचें ग्रंथ किंवा वक्तृत्वपूर्ण अशीं मुत्सद्यांचीं भाषणें या सर्वांपेक्षां हास्यरसपूर्ण अशीं त्या वेळचीं प्रहसनें वाचलीं पाहिजेत.

strung to full pitch, when there was much wealth and much leisure, when the hearts were highly cultivated and education widely spread and the refinements and vices which follow such a state of things presented an ample field for the play, wit and fancy, the *badinage* of the humourist or the more trenchent weapons of Satire.

Aristophanes by Rev. Lucas Collins

लोकशिक्षण किंवा लोकमतानुनय हीं साध्य होण्यास हास्यरसपूर्ण ग्रंथाची किती मदत होऊं शकते हें ॲरिस्टोफेनीस या ग्रीक प्रहसनकाराच्या ग्रंथांनीं चांगलें कळून येण्या सारखें आहे. क्लीऑन, ॲलसीबायडीस, साक्रेटीस वगैरे लोकांच्या वेळची अथेन्सची स्थिति काय होती हें पाहणें असल्यास ॲरिस्टोफेनीस याचीं प्रहसनें मूळ भाषेंत वाचलीं असतां वस्तुस्थितीचा जितका खरा अर्थबोध होऊं शकतो तितका दुसरा कोणच्याही साधनांनीं होणें शक्य नाहीं. अशी गोष्ट सांगतात कीं, सायराक्यूज या संस्थानचा जुलमी राजा डिऑनीशीयस यानें अथेन्स येथील खरी स्थिति कशी काय होती असें प्लेटो नामक महातत्त्ववेत्त्यास विचारिलें. तेव्हां त्यानें ॲरिस्टोफेनीस याची मेघमंडळ या नांवच्या प्रहसनाची एक प्रत त्याजकडे पाठवून दिली व याशिवाय दुसरा कांहीं निरोप पाठविला नाहीं. अशा रीतीनें विषयगत गुणदोषावर टीका करण्याचें प्रहसन हें सुमारें दोन अडीच हजार वर्षांपूर्वीं मुख्य साधन होऊन बसलें होतें. परंतु विनोद हा 'विषयि'गत गुणदोषांवरही टीका करण्यास एक चांगलें साधन होऊं शकतो असें जें मागें सांगण्यांत आलें आहे त्याचें उत्कृष्ट व समर्पक उदाहरण त्याच प्रहसनकाराच्या " दारूची बाटली " या प्रहस. नामध्यें सांपडण्यासारखें आहे. ॲरिस्टोफेनीस हा अत्यंत वारुणीप्रिय बनून त्यानें आपली धर्मपत्नी जी काव्यप्रतिभा तिचा त्याग केला असा त्याजवर जबरदस्त लोकापवाद आला होता. तेव्हां तोच विषय घेऊन त्यानें स्वतःस नायक बनवून "दारूची बाटली" हें प्रहसन रचिलें व आपलें वारुणीप्रेम कमी होऊन प्रतिभारूप धर्मपत्नीचा फिरून आपण सप्रेम अंगिकार केला व लोकापवादांतून आपण मुक्त झालों असा कथाभाग त्यानें त्या प्रहसनांत

घातला होता. ॲरिस्टोफेनीस याचीं 'शिलेदार' 'मेघमंडळ' 'लिसिस्ट्राटा,' 'मंडूकसभा,' 'रमणी. महोत्सव,' 'विहगविलास' अशीं अनेक प्रहसनें प्रसिद्ध आहेत. पैकीं मेघमंडळ या प्रहसनामध्यें त्यानें, "स्कूलमेन" ह्मणून एक प्रकारचे तत्त्वज्ञानी लोक जागापुढें त्या काळीं आलेले होते त्यांची फजीती केलेली आहे. त्यांतच सॉक्रेतीस हा एका पाटींत बसून शिंक्यावर लोंबतो आहे व गूढ विचारांत अगदीं मग्न झालेला असून मेघमंडळाची प्रार्थना करीत आहे असें दाखविलें आहे. 'गंधोलिका' (Wasps) या नांवाच्या प्रहसनांत, न्यायकोर्टांत जाऊन ज्यूरर या नात्यानें इन्साफ करण्याची ग्रीक लोकांना जी अनावर चटक लागून राहिलेली होती तिची निंदा केलेली आहे. 'मंडूकसभा' या प्रहसनांत त्यानें आपला सहव्यवसायी—युरिपायडीस—याच्या तत्त्वज्ञानाची टर उडविलेली आहे. तात्पर्य, हास्यरसाचा व्यावहारिक उपयोग ॲरिस्टोफेनीस यानें सुमारें अडीच हजार वर्षांपूर्वीं करून दाखविला तो तसाच अद्यापीही होत आहे. फ्रेंच प्रहसनकार मॉलियर, इंग्लिश प्रहसनकार शेरिडन व गोल्डस्मिथ हेही, अरिस्टोफेनीसप्रमाणें, प्रहसनकार या नात्यानें आपल्याकाळीं प्रसिद्ध होऊन गेले. एवढेंच नव्हे तर अद्यापीही त्यांचीं प्रहसनें मोठ्या आनंदानें व आवडीनें बोधप्रद ह्मणून वाचलीं जातात. ही गोष्ट प्रहसनांची झाली. परंतु हास्यरसविलास हा फक्त प्रहसनांमध्येंच संग्रहित आहे असें नाहीं. तर तो मोठमोठ्या व नांवाजलेल्या नाटककारांचे ग्रंथांतून व कादंबऱ्यांतूनही संग्रहित आहे. हास्यरसात्मक लेख लिहिणाऱ्या सर्वमान्य ग्रंथकारांची यादी जर कोणी करूं गेलें तर ती फारच मोठी होईल यांत शंका नाहीं. परंतु वाङ्मयांतील अनेक उच्चस्थानांपैकीं एकावर हास्यरस अधिष्ठित झालेला आहे हें सिद्ध करण्यास ग्रीक भाषेंतील ॲरिस्टोफेनीस, ल्याटिन भाषेंतील ज्युव्हेलियन, फ्रेंच भाषेंतील मॉलियर, रॅबेले, व्हाल्टेअर, चॉसे डेप्यु, स्पानिश भाषेंतील साव्ह्यांटिस, जर्मन भाषेंतील हाईन, इंग्लिश भाषेंतील चॉसर, स्पेन्सर बेन् जॉनसन, शेक्स्पीयर, बटलर, विचर्ले कांग्रीव्ह, व्हानबरो, ॲडिसन्, स्टील रिचर्डसन्, लॉरेन्स स्टर्न, टॉमस हूड, फिल्डिंग, डीफो, स्वीफ्ट, पोप, ड्रायडन, गोल्डस्मिथ, लॅंब, डिकन्स, थ्याकेरे, लिहँट, हॅजलिट, ऑगस्टाइन बिरल, मार्क ट्वेन, आर्टेमस वार्ड, व संस्कृत भाषेंतील शूद्रक कवी व लटकमेलक प्रहसनाचा कर्ता श्रीशंखधर, मुकुन्दानन्द भाणाचा कर्ता श्रीकाशीपति, व इतर सुभाषितकार इतकीं नांवें सांगितलीं असतां पुरे होतील. मराठी भाषेंत मोठ्या दर्जाचे हास्यरसात्मक ग्रंथ अद्यापि पुष्कळसे झालेले नाहींत व जे कांहीं थोडे फार्स व प्रहसनें आहेत तीं शिष्टमान्य ग्रंथांच्या यादींत पडण्यासारखीं नाहींत. तथापि सर्वकाळ केवळ विनोदी ग्रंथ अगर सुभाषितें लिहिण्याचेंच एकांगी काम ज्यांनीं केलें नाहीं परंतु हास्यरसप्रचुर ग्रंथ अगर लेख लिहिण्याची ज्यांचे आंगीं शक्ति होती अगर आहे, असे मराठी भाषेंतील लेखक ह्मटले ह्मणजे विष्णूशास्त्री चिपळूणकर, प्रोफेसर आगरकर, प्रोफेसर वासुदेव बाळकृष्ण केळकर, प्रोफेसर गोळे, प्रो० शिवराम महादेव परांजपे, रा. गोविंदराव देवल, रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, रा. नारायण बापूजी कानिटकर, वगैरे होत.

(८१) हास्यरसात्मक लेखांसंबंधानें वरील विवेचन झालें. तथापि लेख व भाषणें यांत वाङ्मय या दृष्टीनें फरक करण्याचें कारण नाहीं हें उघडच आहे. हास्यरसात्मक लेख लिहिणारे व हास्यरसात्मक भाषणें बोलणारे यांचें प्रमाण एकास दहा या प्रमाणें तरी पडेल.

कारण लिहिण्यापेक्षां बोलण्याचे प्रसंग अर्थातच पुष्कळ पडतात, व ज्यांनीं हास्यरसात्मक लहान मोठीं भाषणें केलीं असें असूनही ज्यांनीं हास्यरसात्मक अशा वर्णनाखालीं पडणारे शब्दप्रबंध लिहिले नाहींत असे अनेक लोक सांपडतील. हास्यरसात्मक भाषण करणें, हें कोणत्याही देशांत व कोणत्याही काळीं मनःसंस्कृतीचें एक लक्षण असें मानलें गेलें असलें पाहिजे, याबद्दल यत्किंचितही वाद असण्याचा संभव नाहीं. लहान लहान विनोदी चुटके भाषणांत आले काय किंवा सुभाषित रचनेवरच नजर ठेवून ग्रंथ लिहिले काय, वास्तविक पहातां सुभाषिताची व विनोदाची योग्यता ठरण्यास दोहींचा उपयोग आमच्या मतें सारखाच आहे. विनोदाचा उपयोग हा अगदीं राजदरबारापासून तों तहत माजघरांत जेवावयास बसलेल्या नवराबायकोंचे पंक्तीपर्यंत सर्वत्र सारखाच सुविहित मानला गेलेला आहे. व वर सांगितलेल्या अशा या भोजनपंक्तींत किंवा चव्हाट्यावर किंवा पाणवट्यावर किंवा शेताच्या खळ्यावर, सराफकट्यावर, मित्रमेळ्यांत, शिक्षणशाळांत, व्यवहार सभेंत, राजपरिषदेंत,—तात्पर्य वाग्व्यवहार होण्याच्या हरएक प्रसंगीं व स्थळीं आजपर्यंत लोक जीं विनोदपर सुभाषितें बोलत आले परंतु अर्थात् ज्यांचा उल्लेख व संग्रह होणें शक्य नाहीं तीं ग्रंथकारांच्या लेखाप्रमाणें जरी काढून दाखवितां आलीं नाहींत तथापि मनानें त्यांचीं कल्पना करून त्यांच्या अस्तित्वावरून प्रस्तुत विषयासंबंधीं जें अनुमान काढणें न्यायाचें होईल तें काढण्यास आह्मी वाचकांस विनंती करितों. हास्यरसात्मक भाषणांसंबंधानें एवढेंच सांगितलें असतां पुरे होईल कीं, ज्याप्रमाणें पूर्वी विक्रम भोजादिकांच्या सभेंत, त्याचप्रमाणें सुधारणा व मनःसंस्कृती यांचे बाबतींत उच्च स्थितीस पोहोंचलेल्या या विसाव्या शतकांतही पाश्चात्य देशांतील राजसभांतून सर्वमान्य असे तत्त्ववेत्ते, मुत्सद्दी, व ग्रंथकार जीं भाषणें करितात तीं होतां होई तों हास्यरसप्रवणच असतात. आज काल इंग्लंदांत नावाजलेला वक्ता लॉर्ड रोजबरी याचें वक्तृत्व जें लोकांस इतकें प्रिय होऊन राहिलें आहे त्याचें मुख्य कारण त्यांतील हास्यरस हेंच होय. उलट बाजूनें पहातां, एडमंड बर्क हा विद्वत्तेनें जाडा तत्त्ववेत्ता होता. तथापि तो पार्लमेंट सभेंत बोलावयास उठला असतां जेवणास निघून जाण्याची घंटा (Dinner Bell) झाली असें ह्मणत. त्याचें भाषण केवळ हास्यरसप्रवण नसल्यामुळें कंटाळवाणें होणार ह्मणून लोक आधींच उठून जात. या बाबतींत शेवटीं एवढें सांगावयाचें राहिलें आहे कीं, ज्या काळीं व्यक्तिसत्ता प्रबळ होती अशा काळीं जर विनोद सर्वमान्य होता तर आधुनिक काळीं राजकारणांत एका व्यक्तीचे ठिकाणी जर शंभर व्यक्तींचा अनुनय करण्याचें कारण उपस्थित झालें आहे तर सुभाषिताची मान्यता अधिक वाढली पाहिजे हें स्वतःसिद्धच आहे.

(८२) आतां कलाभवनामध्यें हास्यरसाचा प्रवेश कोणत्या द्वारानें झालेला आहे हें पहावयाचें उरलें. सौंदर्य किंवा सुसंबद्धता हा कलेचा आत्मा होय. परंतु विनोदाचा आत्मा असंबद्धता हा आहे. मनुष्याची वाक्सृष्टी जितकी समृद्ध असते तितकी कलासृष्टी ही समृद्ध नसते. कलासृष्टीचे चित्रकला, शिल्पकला व गायनकला असे मुख्य भेद आहेत. यांपैकीं गायनकला ही हास्यरसाचे दृष्टीनें आपल्या आपण वर्ज्य होते. हास्यरस उत्पन्न करणारें असें गायन असणें शक्य दिसत नाहीं. गायन हें सुरेल किंवा बेसुरेल असणार. पैकीं सुरेल गा-

यनापासून रम्यताप्रतीति होईल, हास्य उत्पन्न होणार नाहीं. काव्यदोष ज्याप्रमाणें मुद्दाम योजिले असतां ते हास्यरसाचे विभाव होऊं शकतात त्याप्रमाणें बेसुरेल गायन हें मुद्दाम उत्पन्न केलें असतां कदाचित् हास्यरसोत्पादक होऊं शकेल. तथापि एकंदरीनें अर्थविभक्त अशा गायनाचा विचार आपल्यास करण्याचें कारण नाहीं, निदान तशा प्रकारचें गायन हास्यरसोत्पत्ति करण्याकडे उपयोगांत आणलेलें आमच्या पाहण्यांत नाहीं. शिल्पकलाही हास्यरस उत्पन्न करण्याकडे उपयोगांत आणलेली आमच्या पहाण्यांत नाहीं. तथापि केवळ हास्य उत्पन्न करण्याकरितांच जर वाईट शिल्परचना केली तर ती हास्योत्पादक होईल. एखादा गणपती तयार करून त्याचे तोंडांत शाडूचा चिरूट रंगवून दिला तर हास्य उत्पन्न होईल, व अशा रीतीनें ज्या असंबद्ध गोष्टी कल्पनेला दिसतात त्या शिल्पकलेच्या द्वारें व्यक्त करितां येतील. परंतु वरील गणपतीच्या उदाहरणांत कदाचित् हास्य न येतां राग येण्याचाच संभव अधिक आहे. कारण पवित्र गोष्टींस अपवित्रता आणणें हा हास्याच्या चांगल्या विभावांपैकीं विभाव होऊं शकत नाहीं. राहतां राहिली चित्रकला. चित्रकलेलाही बहुधा तिच्या इतर बहिणींप्रमाणेंच रम्य कल्पना जडद्रव्यद्वारा निर्मित करण्याचें काम आवडतें. तथापि अलीकडे तिचा उपयोग हास्यरसोत्पत्तीकडे केलेला दिसून येऊं लागला आहे. अंगीं कुशलता नसल्यामुळें वाईट काढलेलें चित्र हास्यरसाचा विभाव होऊं शकणार नाहीं हें उघड आहे. परंतु चित्रकला किंवा रेखनकला ज्यांस चांगली येते अशांनीं विकृत किंवा अद्भुत कल्पनांची प्रतीति आणून देणारें असें जर चित्र काढलें तर ते हास्योत्पादक खचित होईल. चित्रकलेचा असा उपयोग केल्याचें उदाहरण इंग्लिश चित्रकार होगार्थ याचीं समाजस्थितिदर्शक चित्रें हें एक आहे. अलीकडे वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें वगैरेमधून चालू विषयांवर व व्यक्तींवर हास्यरसोद्दीपक चित्रें देण्याचा उपक्रम झालेला आहे. या बाबतींत लंडन येथील पंच, वेस्टमिनिस्टर ग्याझेट, वगैरे पत्रांतून अशीं चित्रें येतात. 'रिव्हयू ऑफ रिव्हयू'च्या एका स्वतंत्र भागांत सबंध महिन्यांतील वृत्त अशा चित्रांचे द्वारें दिलेलें असतें. विलायतेंत लिनले सँबोर्न, बरनार्ड पारट्रिज, बेरिंग गूल्ड वगैरे गृहस्थांनीं अशीं चित्रें काढण्याचाच धंदा जन्मभर केलेला आहे. हास्यरसात्मक चित्र काढणें व शब्दांनीं कोटी करणें या दोहोंची फलश्रुति सारखीच असते. किंबहुना शब्दचित्रापेक्षां रंग व रेखा यांनीं निर्माण केलेलें चित्र अर्थबोध करण्यास अनेक पटीनें अधिक समर्थ होतें. अलीकडे विलायतेंत राजकीय पक्ष परस्परांवर टीका करण्यास जीं साधनें उपयोगांत आणतात त्यांपैकीं हास्यरसोद्दीपक चित्रें हें एक श्रेष्ठ साधन होऊन बसलें आहे. मि. ग्लॅडस्टन, लॉर्ड सालिसबरी, लॉर्ड रोजबरी, मि. चेंबरलेन वगैरे मुत्सद्यांची हास्यकारक चित्रें आजपर्यंत किती निघालीं असतील त्यांची गणतीच नाहीं. जी वेषविकृति शब्दानें बोलून दाखविणें ही कठीण जाईल ती या चित्रांतून मोठ्या सफाईनें रेखाटून दाखविली जाते. अशा चित्रांस Cartoon किंवा caricature असें ह्मणतात. इंग्रजी पत्रांचें अनुकरण करून आपल्या इकडेही 'हिंदीपंच' वगैरे पत्रें सचित्र निघूं लागलीं आहेत.

(८३) हास्यविनोद व शहाणपण यांमध्यें कांहीं तरी संबंध आहे काय? कोटी किंवा चतुराळाप व विनोदवचन यांनीं हांसें येतें हें कबूल

आहे. परंतु त्यांच्या योगानें कांहीं तरी शहाणपण मिळतें काय? हा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. ज्या वचनानें हांसें येतें ती गोष्ट अगदीं असत्य आहे असा जर आपला समज झाला, तर आपणांस बहुधा हंसावयास येणार नाहीं. अर्थात् कोटींत किंवा विनोदवचनांत सत्याचा कांहीं तरी अंश आहे असें आपल्या मनास वाटावें लागतें. मग तो अंश किती कां थोडा असेना! जें थोडें सत्य आहे तें उघड अतिशयोक्तीनें सांगितलें असेल, ह्मणजे फार फुगवून सांगितलें असेल, इतकेंच कायतें. परंतु अतिशयोक्ति व असत्य यांत पुष्कळच फरक आहे हें विसरतां कामा नये. कोटी व विनोदवचन याचे तळांत सत्य असतेंच; व हें सत्य कळणें ह्मणजे एक प्रकारचें शहाणपण शिकण्यासारखेंच आहे. मात्र कोटी व विनोदवचन यांचे द्वारें जें ज्ञान व शहाणपण दिलें जातें त्यांत व सरळ शब्दांनीं, ह्मणजे उदाहरणार्थ नीतिवचनाचे द्वारें दिलेल्या ज्ञानांत किंवा शहाणपणांत फरक आहे. तो असा कीं, पहिलें थोड्या प्रमाणावर असतें व त्याचें स्वरूपांतर झालेलें असतें; व दुसरें अंतर्बाह्य नुसतें ज्ञान किंवा शहाणपणच असतें. परंतु प्रमाण थोडें असलें तरी उपयुक्ततेला पहिल्या प्रकारचें ज्ञान किंवा शहाणपण अधिक भरतें. एखादा औषधी पदार्थ जशाचा तसा दिला तर तो थोड्या वजनांत पुष्कळ देतां येईल. ह्मणजे सुंठ द्याव-याची असल्यास सुंठीच्या अर्काचा एक थेंब जर जशाचा तसा दिला तर तो पुरेल. परंतु तो पाण्यांत किंवा इतर गोड पदार्थांत मिसळून न घेतला तर रुचीला व वासालाही उग्र लागेल व तो तसा घेववणार नाहीं. पण तोच थेंब जर जिंजरेड नांवाच्या वातमिश्रित पाण्यांत मिसळतात त्याप्रमाणें अच्छेर पाण्यांत मिसळून व त्यांत थोडीशी साखर टाकून घेतला, तर तो रुचकर लागावयाचा लागून त्याचा औषधी उपयोगही कमी व्हावयाचा नाहीं. त्याचप्रमाणें एखादें सत्य प्रमेय समजावून द्यावयाचें असतां तें स्पष्ट अनलंकृत व गंभीर अशा वचनानें न सांगतां, अस्पष्ट रीतीनें गोड व अलंकृत शब्दांनीं व हांसूं येईल अशा रीतीनें सांगितलें असतां, समजण्यास व मनावर ठसण्यास सोईचें जातें. निवळ व स्पष्ट सत्यप्रमेय किंवा ज्ञान हें बंद्या रुपयाप्रमाणें आहे. व हास्यविनोदांत ग्रथित असलेलें सत्यप्रमेय किंवा ज्ञान हें त्याच रुपयाच्या केलेल्या खुर्द्याप्रमाणें असतें. दोन्ही-चीही शेवटीं व एकंदरीनें किंमत सारखीच; पण बंद्या रुपयापेक्षां खुर्द्याचा उपयोग अर्थात अधिक, त्याचप्रमाणें नीतिवचनापेक्षां सुभाषि-तांतर्गतज्ञानाचा उपयोग व्यवहारास जास्ती. बाजारांत जाऊन दहापांच जिनसांचा सौदा करावयाचा असल्यास ज्याला त्याला नुसता बंदा रुपया दाखवून कांहीं उपयोगी नाहीं; मोड नसल्यामुळें शेवटीं, पदरीं द्रव्य असूनही हात हालवीत परत यावें लागेल. त्याचप्रमाणें ज्ञानाचा मुबलक सांठा असूनही हास्यरसाचे मदतीशिवाय तो फुकट जाण्याचा व इष्ट कार्य न घडून येण्याचा संभव आहे. एखादा व्याख्याता सर्वोत्कृष्ट विचार प्रतिपादन करणारा असला तरी, हास्यरसाची जर त्याजजवळ सामुग्री नसेल तर बंदा रुपया घेऊन बाजारांत जाणाऱ्या गृहस्थाप्रमाणें त्याचे लोकशिक्षणाचे श्रम व्यर्थ होतील. दुसरें एक उदाहरण असें देतां येईल कीं, एखाद्या धुराड्यावरचीं कोळीष्टकें काढावयाचीं असतील तर तीं बोटानें काढीत बसण्यापेक्षां थोडासा जोर लावून तोंडचा वारा घालून किंवा एखादा भाता घेऊन जर फुंकून काढलीं तर तीं अधिक चांगलीं निघतात. त्याच-प्रमाणें नीतिवचन व विनोदवचन यांत ज्ञानशक्ति

जरी सारखीच असली तरी निवळ नीतिवचनापेक्षां किंवा तर्कवादापेक्षां विनोदवचनाचे योगानें मानवी मनावरचीं अज्ञानाचीं किंवा दुराग्रहाचीं कोळीष्टकें अधिक जलद नाहींशीं होतात. खोटें बोलणें हें पाप आहे असें नुसतें व इतक्याच शब्दांनीं सांगितल्यापेक्षां खोटें बोलणाराची फजिती करून दाखविणाऱ्या एखाद्या विनोदी शब्दप्रबंधानें तेंच काम अधिक चांगल्या रीतीनें होतें. तात्पर्य, सुभाषितांत व विनोदांत शहाणपणाचा अंश असतोच; मात्र तो व्यक्त होण्याची व त्याच्या उपयोगाची तऱ्हा मात्र वेगळी असते इतकेंच काय तें. मॅक्स ऑरेल नांवाचा एक फ्रेंच विनोदी ग्रंथकार ह्मणतो—

The Humourists are the wise men of the world, because the most forcible way to impart truth is to do it according to a principle laid down by Horace through a laugh. "*Ridentem dicere verum quid vetat.*" Many a sermon would be remembered if the preacher had not sent his hearers to sleep by his prosy delivery but had kept them cheerful and attentive by the introduction of a little wholesome humour.

आतां ही तऱ्हा वेगळी असली ह्मणून सुभाषितावर नीतीचा किंवा तारतम्याचा मुळींच ताबा असूं नये असें मात्र नाहीं. उलट असेंही ह्मणतां येईल कीं सुभाषिताचा उद्देश नेहमीं ज्ञान देण्याचाच असला पाहिजे, व हास्यविनोदानें तारतम्याचे कह्यांतच वागलें पाहिजे. ह्मणजे एका दृष्टीनें सुभाषितास स्वतंत्रता अधिक तितकेंच दुसऱ्या दृष्टीनें बंधनही अधिक. इंग्लिश ग्रंथकर्ता ॲडिसन यानें सुभाषिताचा जो वंशवृक्ष दिलेला आहे, त्यामध्यें सुभाषितास सत्याचा दूरचा संबंधी परंतु तारतम्याचें औरस अपत्य असें ठरविलें आहे. व अर्थात् सुभाषितानें व विनोदानें आपल्या या दोन वडील आप्तांच्या योग्यतेस कमीपणा आणणारें असें कांहींच करतां कामा नये.

(Wherever you meet with anything like humour see if it is remotely allied to truth and lenially descended from good sense, if not you may conclude it to be counterfeit.--*Addison.*)

(८४) हास्यविनोद हा चांगला खरा. तथापि त्याचा उपयोग व्यवहारांत मिठासारखा किंवा साखरेसारखाच करावयाचा असतो, अन्नासारखा करावयाचा नसतो. मीठ किंवा साखर हे पदार्थ अन्नाला रुचि येण्याकरितां व फक्त रुचि येण्यास अवश्य तितकेंच उपयोगांत आणावयाचे असतात. गोड आंब्याच्या रसांत व आंबट आंब्याच्या लोणच्यांत दोन्हींतही रुचि येण्याकरितां मीठ घालतात. परंतु तें जास्ती झालें असतां ते दोन्ही पदार्थ निरनिराळ्या रुचीचे असूनही फुकट जातात. पक्वान्नांतही साखर प्रमाणाबाहेर पडली असतां त्याचा नास होतो. हेंच उदाहरण सुभाषिताच्या किंवा विनोदाच्या उपयोगाकडेही लागतें. भगवच्चिंतन हें जसें येतां जातां, बसतां उठतां व आहारनिद्रादि सर्व व्यवहार करितांना विहित ह्मणून सांगितलें आहे, तसा विनोद हा सर्वच काळीं विहित होत नाहीं. याचें पहिलें कारण असें कीं व्यवहारांत आपणास शेंकडो माणसांशीं प्रसंग असतो व शेंकडो माणसें निरनिराळ्या स्वभावाचीं असतात, इतकेंच नव्हे तर सर्व काल सर्वांची मनोवृत्ति एकसारखीच ह्मणजे हास्य विनोद करण्यास प्रवण अशी नसते. दुसरें असें कीं, प्रतिक्षणीं अस्सल व शिष्टसंमत अशा सुभाषिताचा

व विनोदाचा व्यवहार करूं शकूं इतके बुद्धिमान आपण व लोक कोणीही नसतों. उठल्या बसल्या कोट्या करणाऱ्या मनुष्याच्या कोट्यांमुळें हसूं न येतां त्या कोट्या करणाऱ्याचेंच हसूं येईल. सुभाषित हें स्त्रियांच्या कटाक्षांसारखें होय. दिवसभर कटाक्षप्रयोग करणाऱ्या स्त्रीच्या कटाक्षांच्या गोडीचें वर्णन कोणी करणार नाहीं. त्याचप्रमाणें दिवसभर कोट्या करणाऱ्या मनुष्यास कोटीबाज हें नांव न मिळतां त्याला मूर्ख किंवा फाजील असेंच लोक ह्मणतील. दुसरे पक्षीं हेंही खरें आहे कीं, विनोदाला थोडी बहुत सवलत इतर गोष्टींहून अधिक द्यावी लागते ह्मणजे प्रत्येक वेळीं कोटी घेऊन तिची छानी करीत बसणें हें बरोबर नाहीं. तिच्या औचित्याचा स्थूल मानानेंच विचार करावा लागतो. ज्याप्रमाणें एखाद्या नवीन झाडास पालवी येत असतां तें सरळ वाढावें, वांकडें फुटूं नये ह्मणून जरा आजूबाजूस जाणारी प्रत्येक मंजरी किंवा प्रत्येक दळ जर आपण खुडूं लागलों, तर तें झाड बहुधा मुळींच वाढणार नाहीं; त्याचप्रमाणें कोटीबाज मनुष्यास निखालस कैचींत ठेवणेंही बरोबर नाहीं. कोटी ह्मणजेच जर बोलून चालून पदार्थांचें विकृतस्वरूपदर्शन किंवा अद्भुत कल्पनांचा विलास होय, तर तर्कवादाच्या ताजव्यांत तंतोतंत बसणारी किंवा औचित्याच्या कसोटीवर अगदीं शंभर नंबर लागणारी कोटी कितीही बुद्धिमान व विनोदी मनुष्य असला तरी त्याच्या डोक्यांतून निघणें संभवत नाहीं.

(८९) हास्यविनोदाची सर्वमान्यता सिद्ध करण्यास एक अत्युत्तम प्रमाण असें आहे कीं, जगांत बहुधा असा एकही मनुष्य आढळत नाहीं की ज्यानें केव्हांना केव्हां तरी एखादी दुसरी कोटी केली नाहीं, किंवा जो एखादें विनोदवचन बोलला नाहीं. मनुष्य जितके वेळां हास्य विनोद करितांना दृष्टीस पडावा तितका पडत नाहीं याचें मुख्य कारण हास्यविनोद हा वाईट अगर वर्ज्य होय असें त्याचें मत असतें हें नव्हे, तर जितके वेळां त्यास हास्यविनोद करावासा वाटतो तितके वेळां तो करण्याची त्याचे आंगीं शक्ति नसते, हेंच होय. हास्यविनोदाचे बाबतींत पुष्कळ वेळां इसापनीतींतील कोल्हा आणि द्राक्षें ही गोष्ट लागू पडण्यासारखी असते. ह्मणजे हास्यविनोदास नांवें ठेवणारे लोक त्याची निंदा करून किंवा नाकें मुरडून फक्त तद्विषयक आपली अपात्रता किंवा असामर्थ्य झांकूं पहातात. निशाकालच्या चंद्रोदयाप्रमाणें मनांत खरोखर हास्यरसाचा उदय झाला असतां, कित्येक जातीचीं मुखकमलें त्याचे योगानें प्रफुल्लित होऊं शकणार नाहींत एवढ्याच विचारानें, कोणीं आपले ओंठ दाबून धरतील व हास्यरसचंद्राचा सुधावर्षाव होऊं देणार नाहींत इतकीं विचारी माणसें जगांत फारच क्वचित् सांपडतील. मात्र जी गोष्ट आपल्यास येत नाहीं तिची महती होईल तितकी कमी करूं पाहणें हा मनुष्यस्वभावाचा निसर्गसिद्धच दोष आहे. लिहिण्याबोलण्यांत किंवा प्रत्यक्ष व्यवहारांत जेव्हां विनोदाकडे पाहून कोणी नाक मुरडीत आहे असें आपणास दिसेल तेव्हां वरील विवेचनांतील तत्त्व लक्षांत घेऊन त्या नाक मुरडण्याची खरी मीमांसा ह्मणजे हेतुसंशोधन प्रत्येकानें आपले ठिकाणीं करून पाहावें. कोटी करितां येत असून केवळ औचित्य विचारामुळेंच ती न करणाऱ्यांपेक्षां, कोटी न साधली तरी ती करण्याचा प्रयत्न करून स्वतःस हास्यास्पद करून घेणाऱ्यांची संख्या निःसंशय अधिक भरेल. कारण कोटी ही एक चमत्कारिक स्वभावाची स्त्री आहे. तिच्या प्रेमाला मागणी घालणा-

राचा ती बहुधा अव्हेर करिते; व जे तिजविषयीं उदासीनता दाखवितात त्यांवरच ती अनुरक्त झालेली दिसते. कोणताही लहान मोठा समाज घ्या. त्यांत बहुधा प्रत्येक मनुष्य कोटी करून किंवा हास्यविनोद करून एकंदर वाग्व्यवहारास तजेला आणण्याचा प्रयत्न थोडाबहुत तरी करीत असतोच. आपल्या वाक्चातुर्याचें ज्याला त्याला कौतुकच वाटत असतें. एका ग्रंथकर्त्यानें असें ह्मटलें आहे कीं आपल्या दैवावर खुष आहे असा, व आपण केलेल्या कोटीवर किंवा विनोदवचनावर खुष नाहीं असा,—हे दोन्ही प्रकारचे मनुष्य जगांत विरळा. या विधानाचा अर्थ उघडच आहे. मनुष्य कितीही भाग्यशाली असूं द्या, त्याला कितीही संतति संपत्ति व सुख असूंद्या, त्याचें ह्मणून समाधान व्हावयाचेंच नाहीं. परंतु मनुष्याची कोटि कितीही अनुचित किंवा पाणचट अगर नीरस असूंद्या, तिचें त्याला "वः आपण काय सुरेख बोललों" असें कौतुकच वाटत असतें. तात्पर्य, अशा रीतीनें निसर्गसिद्ध मनुष्यमात्रास प्रिय व आनंददायी जो हास्यविनोद त्याची खरी योग्यता ओळखून त्याचा योग्य प्रसार होईल असा प्रयत्न करणें हें प्रत्येक प्रगतिप्रिय मनुष्याचें कर्तव्य होय.

(८६) **देशीभाषा व हास्यविनोद**—मराठी भाषेच्या स्थित्यंतरास प्रथम सुमारें चाळीस वर्षांपूर्वी सुरवात झाली, व तेवढ्या काळांत तिच्या वृद्धीसाठीं व सुधारणेसाठीं बरेच परिश्रम झालेले आहेत. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं आपल्या 'निबंधमाले'च्या पहिल्या अंकांत लिहिल्याप्रमाणें "स्वभाषेच्या लज्जास्पद अज्ञानास्तव व दुरभिमानास्तव आजपर्यंत मराठी भाषेची फारच हयगय होत गेली." ही गोष्ट त्या वेळीं खरी होती. परंतु तें लज्जास्पद अज्ञान व तो दुरभिमान हीं दोनीही अलीकडे नाहींशीं होत जाऊन, मराठी भाषेस दिवसें दिवस चांगलें स्वरूप येत आहे. व पुढें मागें तिचा उत्कर्ष खचित होणार अशाविषयींचीं सुचिन्हें जीं आज दिसतात तीं पाहण्यास शास्त्रीबोवांना ईश्वरानें आयुष्य दिलें असतें तर त्यांना किती तरी आनंद झाला असता! मराठी भाषेविषयीं तिच्या पुत्रांची उपेक्षा दिवसें दिवस निःसंशय कमी होत चालली आहे. व एका पक्षीं इंग्रजीप्रभृति पर भाषांच्या कचाट्यांतून जशी ती पूर्णपणें मोकळी होऊं लागली आहे तशीच दुसऱ्यापक्षीं त्या परभाषांचे ज्ञानभांडारांतील सर्वसाधारण अशी विचारसंपत्ति व अनुकरणयोग्य भाषापद्धत्ति या आपल्याशा करण्याचें तिचें सामर्थ्य दिवसें दिवस वाढत चाललें आहे. पैकीं विचारसंपत्तीसंबंधानें पाहतां हल्लीं फारच फरक दिसून येईल. इंग्रजी तत्त्वज्ञान व शास्त्रविद्या यांचा प्रसार शिक्षणशाळांची पुस्तकें, वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें यांचे द्वारें मध्यम प्रतीहूनही खालच्या लोकांपर्यंत थोडथोडा जाऊन पोंचला आहे, आणि विचारवृद्धीमुळें शब्दवृद्धीही इतकी झाली आहे कीं पूर्वींचे मराठी कोश अगदीं अपूर्णसे वाटूं लागून त्यांचे जागीं आज तागायतच्या भाषाप्रचारास अनुसरून असणारे नवे कोश करण्याचा स्वभाषाभक्तांचा उपक्रम सुरू आहे; व या नवीन कोशांचे साहाय्यानें, परभाषासंसर्गामुळें आलेलें दूषणही मराठी भाषेंतून समूळ नाहींसें होईल अशी आशा वाटत आहे. दुसरी गोष्ट भाषापद्धतीविषयींची. या बाजूनें पाहतां परभाषा संसर्गापासून मराठीस एक प्रकारचा फायदाच झाला आहे. ही गोष्ट खुद्द शास्त्रीबोवांसारख्या विद्वान् स्वभाषाभिमानी बाणेदार लेखकांनेंच कबूल केलेली आहे. 'भाषादूषण' या विषयावरील

आपल्या निबंधांत त्यांनीं असें लिहिलें आहे कीं, कांहीं विवक्षित मर्यादेपर्यंत मराठी लेखकांनीं इंग्रेजी भाषेचें अनुकरण करणें क्षम्य आहे इतकेंच नव्हे तर अवश्यही आहे. ही जी त्यांनीं मर्यादा घातली ती केवळ कांहीं प्रकारच्या शब्दप्रयोगांपुरतीच होती. परंतु भाषापद्धतीचे इतर कांहीं प्रकार असे असतात कीं, ते शब्दापेक्षां अर्थाशींच विशेष संबद्ध असल्यानें, एका भाषेंतून दुसऱ्या भाषेस ते घेण्यास सोईचे असतात. इतकेंच नव्हे तर ते घेण्यानें प्रसंगविशेषीं उपकृत भाषेस ऐश्वर्यही अधिक येतें. ज्याप्रमाणें अँग्लोसॅक्सन भाषा ग्रीक व लॅटिन भाषांचे संपर्कानें अधिक प्रौढ, ऐश्वर्यसंपन्न व वैचित्र्यपूर्ण झाली, त्याचप्रमाणें कांहीं कांहीं बाबतींत मराठी भाषाही आरबी व फारशी या प्रिय सख्यांच्या साहाय्यानें पूर्वीं नटली, व अलीकडे इंग्रजीच्या सहवासानेंही तिच्या अर्थप्रकाशनाची शक्ति व तिच्या रचनावैचित्र्याची शोभा वाढूं लागली आहे.

(८७) इंग्रजीच्या सहवासानें ज्या निरनिराळ्या भाषापद्धति मराठीमध्यें आलेल्या आहेत त्यांपैकीं हास्यरसात्मक लेखपद्धति ही विशेष महत्त्वाची आहे. हिचा प्रसार अद्यापि फार झाला आहे असें नाहीं. तथापि तो यापुढें फार होईल असा रंग दिसत आहे. ही लेखपद्धति आपणांत पूर्वीं मुळींच नव्हती असें आमचें ह्मणणें नाहीं. परंतु एकंदर वाङ्मयाचा विस्तार पाहिला तर त्यांतील हास्यरसपर लेख ह्मणजे खंडीस रति या मानानें भरतील. सुमारें तीस वर्षांपूर्वीं लिहितांना रा. विष्णुशास्त्री यांनीं या बाबतींतील आढावा घेतला तो येथें दिला असतां, शास्त्रीबोवांच्या वेळेपासून या प्रकारच्या लेखपद्धतीची वाढ किती झाली हें कळून येईल. हा आढावा शास्त्रीबोवांच्या 'भाषापद्धति' या निबंधांत दिलेला आहे. ते लिहितातः—"वरील कलमांत सांगितलेल्या स्थित्यंतराच्या योगानें आमच्या भाषेंत भाषापद्धतीचे नवे प्रकार कोणते निघाले ते सांगतों. एक विनोदाचा. विनोदात्मक लेखांची पद्धति पूर्वीं मराठी गद्यांत नव्हती व पद्यांतही नव्हती हें उघड आहे. तशीच ती संस्कृतांतही विशेष ह्मणण्यासारखीं नाहीं हें तद्भाषाभिज्ञांस माहीत असेलच. त्या भाषेंत इतकीं नाटकें आहेत पण हास्यरसाचा विशेष प्रकार असा एका मृच्छकटिकांत मात्र आहे. प्रहसन नांवाचा एक नाट्यप्रकार प्रसिद्ध आहे. पण त्यांतील विनोद विशेष वाखाणण्यासारखा नसतो. असो, तर ही वरील रीत इंग्रजी भाषेवरून इकडे आली. वर्तमानपत्रें सुरू होऊन त्यांचा जसा फैलाव होत चालला व जनमनोरंजन हें त्यांचें तत्त्व होऊन बसलें तसतसा वरील प्रघात वाढत चालला. लोकप्रसिद्ध गोष्टींविषयीं व लोकप्रसिद्ध मनुष्यांस अनुलक्षून लिहिलेला मजकूर लोकांस मनोवेधक होत गेल्यानें तो मार्मिक रीतीनें लिहिण्याची रीत पडली. त्याप्रमाणेंच ग्रंथ लिहिण्याचा प्रघात अलीकडे वाढत चालल्यानें टीका करण्याचा प्रचारही अलीकडे वाढत चालला आहे. ग्रंथांचे गुणावगुण लोकांस बरेच चांगले कळूं लागले आहेत. व मासिक पुस्तकांचा प्रचार सध्याहून अधिक वाढत चालला तर ग्रंथपरीक्षणांत वाचकांची निपुणताही अधिकाधिक होत जाईल हें उघड आहे. आतां वरील दोन्ही ठिकाणीं विनोदाचा बराच उत्तम ह्मणण्यासारखा मासला आजपर्यंत कोणकोणता दिसण्यांत आला तो सांगतों. एक येथील 'ज्ञानप्रकाशां'तील "पिशाच" या सहीचीं पत्रें. यांतील विषय जरी नेहमीं महत्त्वाचा नसे तरी आंतील मजकूर हास्यपर असल्यामुळें तीं पुष्कळ वाचकांस अत्यंत